नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी

१९८७-८८

१९८७ - जाते डि

१९८८ - जाते डि


अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

युगवाणी

जानेवारी, फेब्रुवारी, मार्च १९८७





अमृतमहोत्सवी
जन्मदिनानिमित्त
मनःपूर्वक
अभिनंदन!

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च
एकोणवीसशे सत्यांशी
वर्ष ४२ : अंक १०.११.१२
[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

युगवाणी

मुख्य संपादक : आशा सावदेकर
संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी
कार्यकारी संपादक : केशव जोशी
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

अनुक्रम • • •

■ संपर्क : संपादक युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / दूरभाष : २३९२९

संपादकीय

नववर्षानिमित्तच्या शुभेच्छा घेऊन हा अंक अवतरत आहे. हे वर्ष अनेक दृष्टींनी संस्मरणीय आहे. कवी कुसुमाग्रजांचा पंचाहत्तरावा वाढदिवस फेब्रुवारीत आहे तर रंगभूमीला आपल्या रूपलावण्याने आणि स्वरलावण्याने नवी आभा बहाल करणाऱ्या बालगंधर्वांच्या जन्मशताब्दिवर्षाची सुरुवात (जून ८७ ते जून ८८) याच वर्षात होते. 'युगवाणी' अर्थातच ह्या घटनांची योग्य ती दखल घेणारच आहे. पुढील अंक हा बालगंधर्व जन्मशताब्दी निमित्त नाट्यविशेषांक म्हणून सादर करीत आहोत.

कुसुमाग्रजांच्या काव्यदृष्टीवर आणि नाट्यदृष्टीवर प्रकाश टाकण्याचे कार्य करणारे लेख या अंकात आहेत. कुसुमाग्रजांच्या अमृतमहोत्सवाला एक साहित्यमाहात्म्य आहे, आणि ते म्हणजे तीन पिढ्यांवर पूल बांधून जोडण्याचे. कुसुमाग्रजांची कविता रविकिरणमंडळाच्या प्रभावाच्या काळात उमलली; तिने मुक्तछंदाचे युग पाहिले, मर्ढेकरांचे युग पाहिले आणि आजची अस्वस्थताही. तरीही ती आपलेच हृद्गत मोकळे करीत राहिली, आपल्याच भाषेत चांदणे सांडीत राहिली आणि अग्नीपराग फुलवित राहिली. तिचे तेज झाकोळले नाही की काळवंडले नाही. त्या प्रकाशमय अस्तित्वाचा रसिक जयघोष करण्याचाच हा समय आहे. कविवर्य कुसुमाग्रजांच्याच शब्दात ह्या क्षणाकडे पाहून म्हणावेसे वाटते—

> उरात जखमातली रुधिर-वाहिनी रोधुनी
> असेल तुम्ही ओतली स्वरघटात संजीवनी ।
> नकोत नसली जरी प्रगट स्मारकांची दळे
> असंख्य हृदयी उभी असत आपुली देवळे ।

आणि ह्याच जयघोषनिमित्ताने कवी श्रीधर शनवारे यांना 'थांग-अथांग' निमित्त मिळालेल्या कुसुमाग्रज पुरस्काराचे स्मरण होते. 'युगवाणी 'तर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

आशा सावदेकर

अनुक्रमणिका

मानाचे पान

कुसुमाग्रज – वि. वा. शिरवाडकर – १९८७ ह्या वर्षाच्या आगमनाबरोबरच ज्यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे स्मरण करावे असे कवी ! केवळ प्रेमाचे वा तेजाचे कवी नाहीत तर मानवतेचे कवी ! मानवता हेच मूल्य मानणारे कवी !

समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा
कोठून फुलांपरि वा मकरंद मिळावा ?

असे म्हणत कधी 'कनकांच्या धारा'चे, कधी तेजाच्या घटांचे तर कधी जळजळत्या आसवांचे गीत कविवरा, आपण ऐकवले ! तुमच्या कविता 'आंतरअग्नी' फुलवणाऱ्या समिधाच आहेत; कारण तुमच्या हृदयाबद्दल तुम्हीच म्हणून ठेवले आहे—

हे हृदय नसे परि स्थंडिल धगधगलेले
आशाचे इंधन अखंड त्यावर चाले

परंतु खरोखरच आम्ही तुमचा स्वर ऐकून तृप्त झालो ! तुमच्या स्वरांमधल्या 'सुंदर मार्दवाने' आमच्याही मनी 'भावनांची जान्हवी' वाहू लागली ! आमच्यावतीने आम्हाला पण सांगावेसे वाटते की तुमच्या स्वरांचा वर्षाव हा 'पारिजातकाच्या फुलांचा कोमल वर्षाव'च आहे. हे स्वर असेच अखंड लाभोत !

'हृदयातील रणे जाहली क्षणामधे शांत
आणि विस्मृतीच्या नाहली चांदण्यात रात
अशीच संगीते आळवी तुझी कलावन्ता,
घडिभर जागव रे आमुची अशीच मानवता !'

आशा सावदेकर

आत प्रीत आणि कर्तव्यकठोरता यांच्या संघर्षातून कुसुमाग्रजांची प्रेमकविता उदयास आली. त्यांच्या मनातील संघर्षाला नेमके निष्कर्षापर्यंत कधी येताच आले नाही. मनाचा लंबक दोन्ही टोकांकडे झुलत राहिला. कधी निरपेक्ष प्रीतिगायनात त्यांची कविता रमली, तर कधी निग्रहात, तर कधी तुच्छतेनेही प्रीतीची त्यांनी उपेक्षा केली. त्यांच्या दोलायमान मनोवस्थेचा प्रभाव प्रेमाच्या तत्त्वज्ञानापासून प्रत्यक्ष प्रेमाभिव्यक्तीवर अगदी खोलवर पडलेला दिसून येतो.

प्रेमाचे तत्त्वज्ञान

'किनाऱ्या 'त प्रेमाकडे पाहण्याचा कुसुमाग्रजांचा दृष्टिकोण अतिशय वस्तुनिष्ठ आहे. प्रीतीसाठी प्रीती, उदात्त प्रीती, चिरंजीविनी प्रीती असे वाग्देवतेने गायलेले तिचे कौतुक, तिची थोरवी कुसुमाग्रजांना पटत नाही. त्याकरिता युक्तिवाद करताना ते म्हणतात, या अशाश्वत जगात शाश्वत काहीच नाही. ज्या अंतरात ही निर्माण होते तेच नश्वर आहे. जिथे प्रत्येक क्षणी शून्याकडे जीवन वाहते, जिथे विश्वाचीही फुले आकाशगंगेमध्ये गळून पडतात, तिथे प्रीतीला चिरंतनत्व कुठले ? जीवित म्हणजे जाणारी घटका आणि भविष्य तर अज्ञात, तिथे प्रीतीची कुंडली मांडायची तरी कशी ? विश्वास ठेवायचा तो वर्तमानावर, चालू क्षणावर, ज्यावर तिची नाममुद्रा विहरत असते. कुसुमाग्रज स्पष्ट म्हणतात,

> माझ्या प्रीतित दिव्यता न असली
> ती मानवी सर्वथा
> आहे ती तुझियावरी नि रमते
> ती वर्तमानामध्ये

म्हणूनच 'जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी। झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी' असे प्रेमाचे तत्त्वज्ञान कुसुमाग्रजांना मानवत नाही. प्रेमातील दिव्यता समर्पणता यांची कालातीतता त्यांना पटत नाहीसे दिसते.

केशवसुतांनी, 'वृक्षावरी वीज जधी पडावी। त्याच्या स्थितीतचि तिची महती पहावी' असा प्रेमाचा महिमा वर्णन केला. त्याच कल्पनेला मोहून गडकऱ्यांनी 'प्रेम आणि मरण' नावाचे दिव्य आणि अपार्थिव प्रेमाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करणारे विलक्षण काव्य लिहिले. अप्राप्याच्या शोधामुळे प्रेमनिराशा हा त्यांच्या प्रेमकवितांचा स्थायीभाव झाला. स्वाभाविकच मरणकल्पनेला एक अलौकिक वैभव प्राप्त झाले. मूळचेच मरणाचे वेड असणाऱ्या बालकवींनाही या कल्पनेचे आकर्षण वाटले यात नवल नाही. आपली स्वभावसिद्ध सूक्ष्मता आणि तरलता सोडून, 'प्रीती हवी तर तळहातावर घे कापुन मान' असा याच कल्पनेचा त्यांनीही पुनरुच्चार केला. पण कुसुमाग्रजांना अशी प्रीत मानवत नाही. प्रेयसीला स्वामिनीचे किंवा देवतेचे रूप द्यायला कुसुमाग्रज तयार नाहीत. 'तू गगनमहाली बससी वैभवशाली मी पायपथाच्या धुळीत खपतो खाली' अशा 'विशाखे 'तील प्रकटीकरणात वास्तवतेपेक्षा रोमँटिक कल्पनाकर्षणाचाच भाग अधिक आहे. पुढे तो राहिला नाही. भावनात्मकतेपेक्षा वास्तवतेकडे त्यांनी अधिक लक्ष दिले. त्यांच्यातील बदलाचा अदमास त्यांच्या पुढील निवेदनातून घेता येतो. "त्या काळातील सर्वच मराठी (आणि इंग्रजीही) काव्यात समर्पणशील प्रेमाची ही धुंद उत्कटतेने व्यक्त झाली आहे. आजच्या काळातील आणि पर्यायाने काव्यादी साहित्यातील प्रेमविचार या भूमिकेपासून बराच दूर गेला आहे. प्रियकर प्रेयसीच्या अंगावरील देवपणाची आभरणे आता उतरली आहेत. प्रेमाचा सर्वच व्यवहार आता अधिक सरळ, समान पातळीवर वावरणारा, शरीरतेचे भान असणारा आणि परस्परसापेक्ष असा झाला आहे, होत आहे. आकाशाशी असलेले नाते त्याने निपटून टाकले आहे असे नाही. पण मातीशी असलेल्या अटळ संबंधाकडेही तो दुर्लक्ष करीत नाही."[१] या भूमिकेमुळेच गडकऱ्यांच्या काळातील रूढ झालेल्या 'पतंगप्रीत' या 'भावनात्मक वास्तवा 'ची टर किनाऱ्यातील 'प्रीत पतंगाची' या कवितेत कुसुमाग्रजांनी उडविली. काळोखातून ज्योतीवर झेप घेणाऱ्या आणि स्वाभाविकच मरण पत्करणाऱ्या पतंगाकडे पाहून ते म्हणतात,

---

१. वि. वा. शिरवाडकर : 'रूपरेषा', अमळनेर, १९८४, पृ. ९६

मार्गस्थच तू, तुझ्या पथातिल
ही पडशाळा विश्रांतिस्थळ
दूर तुझे मंझील, गमे ना
इथे रहावे तू.
सुखेनैव जा, हे स्मृतिसंचित
होईल मजला सांत्वन सोबत
पायखुणा तव उरतिल भवती
पुरे दिलासा तो.

ायसीने अशी परवानगी दिल्यावर कवी ध्येय-सिद्धीसाठी मार्गस्थ होत आहे असे दिसते. पण कधी त्या मार्गामध्ये अवचित जुने, की परत ाव्याने निर्माण झालेले मोह आडवे येतात आणि कवीला सांगावे लागते,

का येतेस पुनःपुन्हा प्रणयिनी मार्गामध्ये माझिया
ााहे ठाउक हे तुला न उरले ते भावनाबंधन
ीते एक दिनी अशांत जळते जे अंतरी सौख्यद
याची शीतल मृत्तिकामय उरे आता समाधी इथे
वप्नाची किमया सरे क्रमित मी मार्गास जागेपणी
ा येऊन पुनःपुन्हा वितरसी हे मोह जे मोह ना ।

ोढवलेली प्रेमनिराशा

या अशा निघून जाण्यामुळेच तो वसंत जणू कायमचा सरतोच; ते कूजन, ते आर्त उराचे ंदनही संपते आणि भोवताली जमतात ते वप्नांचे अवशेष; नि.शेष स्मृती. दोघातले अफाट ंतर अधिकच तीव्र होते. जीवनसंग्राममध्ये ाजुक भावांच्या लालनाचे वैयर्थ्य लक्षात येत ाही असे नाही, पण एकान्तात मात्र हृदयातील वप्नांची थडगी दुभंगतात आणि ती शय्याही ागीच्या ओहळाप्रमाणे प्रदीप्त होते. नगरातले ाकर्षण मोह घालू शकत नाही. भोवताली दीप ळपत असताना अंतरंगात जपल्या जाते ती मन्द ंव्याची वात. वाटेत धुंद उसासे टाकणारी ातराणी अडवतेही. पण व्याकूळ करतो तो परसा-ाधला एकटा निशिगन्ध. जलशांचा रंग रिझवीत ाही; मनात निनादत असतो तो आर्त अभंग.

लावण्यवतीचा लालस येथ निवास
मदिरेत माणकापरी तरारे फेस
परि स्मरती आणिक करती व्याकुल केव्हा
ते उदास डोळे, त्यातिल करुण–विलास !

'निर्माल्य' आणि 'कुतूहल' ही कुसुमाग्रजांची अप्रतिम सुनीते आहेत. दोन्ही सुनीते प्रेमनिराशाच व्यक्त करणारी आहेत. 'मूर्ती मोहक गौर गोल मुख अन् किंचित निळ्या लोचनी' असे प्रेयसीचे अल्पाक्षरमधुर वर्णन यात आहे. साध्या वेषभूषेने खुललेली ती लालस आकृती, डोळ्यातून जडलेले ते भावबन्ध ते सर्व संपले.

आणी गेलिस तू, वसन्तहि सवे गेला तुझ्या संगती
पुष्पातील उडून गंध उरले निर्माल्य हे भोवती !

जणू या निर्माल्यानेच एक तटस्थता स्वीकारायला त्यांना लावली आहे. तो आगीचा प्रदीप्त ओहळही आता जणू विझू लागला आहे. ते धागे आता तुटले. कलेकलेने मावळणाऱ्या चंद्राप्रमाणे ते प्रेमही पूर्णपणे अस्तंगत झाले. अचानक कधीतरी पडलेली ओंजळभर फुले सुकली, खोडकरपणे खांद्यावर आलेले हात दूर झाले, तारू शीड फिरवून माघारी वळले. कधीतरी त्या ठिकाणी आल्यावर ते तुटलेले धागे आठवले. अंतर जाणवले आणि ओठावर शब्द आले,

आज नसे ती व्याकुळता, ना राग न अनुराग
विझून गेली कधीच, जी तू फुलविलीस आग

नंदादीप की दीपस्तंभ ?

ती आग विझून गेली, पण त्या त्यागानेच हृदयात एक नंदादीप पेटवला, की ज्याने पुढचा मार्ग उजळला आणि या सततच्या प्रवाशाला मार्गदर्शन केले.

हृदयात आहे माझ्या
एक एकान्त कोपरा
चिमुकला तुझ्यासाठी
तेथे चंदेरी देव्हारा

कधी कधी सर्वसामान्य जीवाप्रमाणे आपली प्रीत फुलारली नाही ह्याबद्दल कवीला खंतही वाटते. संसाराच्या कोलाहलात आपला संवाद कधी जमला नाही, प्रेमभाव कधी अक्षरात आकारला नाही; स्पर्शातून, स्मितातून कधी अपेक्षा ओसंडल्या नाहीत, नेत्रातून भावपुष्पाच्या पाकळ्या फुलल्या नाहीत. कधी आपण नदीकिनारी मंजुळ कूजन

केले नाही, चांदण्यात कधी स्वप्नांचे देऊळ रचले नाही. तरी देखील आपले मीलन मात्र,

व्यक्ततेच्या पलीकडे
माझे भावनापूजन
पार्थिवाच्या पलीकडे
तुझे माझे हे मीलन

असे घडलेले आहे, त्याबद्दल त्यांना समाधान आहे. प्रत्यक्ष मीलनाची आसक्ती त्यांच्या काव्यात आढळत नाही, किंबहुना ते त्या दिशेने मार्ग क्रमितच नाहीत. आणि जर कधी मीलन व्हायचेच असेल, तर त्यात परीक्षा किंवा बंधन नसावे अशी त्यांची अपेक्षा आहे. 'आसवे आणि उन्माद' हीच तर खरी प्रीतिलक्षणे पण नेमकी तीच कुसुमाग्रजांना नको आहेत. त्यांची प्रीती सर्वसामान्यांहून वेगळी आहे याची त्यांना सतत जाणीव असते.

वारा थांबला वाटेत । तारा देखत राहिल्या
झाडाखाली लपून । उभ्या असती सावल्या
अशा निर्भर एकांती । खूण प्रीतीची पटावी
दोघांमधली दूरता । युगायुगांची फिटावी

मौनं संभाषणम्

त्यांच्या प्रेमाविष्करणात मीलनाची भाषा अस्फुट रीतीने प्रकट होत असली, तरी ती वास्तवापासून बरीच अलिप्त आणि काल्पनिक आहे. पुष्कळदा तर प्रेयसीच्या दोन ओठांच्या दलात गोठलेले दव तिने आपल्यासमोर मुळीच उघडे करू नये असे त्यांना वाटते. ते स्वतःही प्रेमातील पुढची पायरी ओलांडीत नाहीत व प्रेयसीला ओलांडू देत नाहीत.

नको सांगूस कधीही । काय सांगायचे आहे
अशा भावमोहनाचा । अंत अक्षरात राहे
किंवा
नकोत अश्रू नको शब्द वा क्षणामध्ये क्षण हा विरु दे
जे मौनामधि जन्मा आले ते मौनातच मोहरु दे

—भावनांना शब्दाकार देण्यापेक्षा असे ओठ शिवण्याचे तत्त्वज्ञानच त्यांना अधिक प्रिय आहे.

जीवनविषयक तत्वज्ञानाचा प्रभाव

जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा उघड प्रभाव त्यांच्या प्रेमकाव्यावर आहे, त्यांना अभिप्रेत असलेली प्रीती निव्वळ कोमल, मधुर नाही. तिच्यात अन्यायाविरुद्ध उभारलेल्या लढ्यातील त्वेष आहे, संकटाचे तुफान आहे, मानवतेच्या दुःखाची करुण वेदना आहे. प्रीतीच्या सौम्यशीतल रूपाबरोबर तिचे दाहक, दारुण आणि करुण रूपही त्यांच्या मनोविश्वात दृढतेने अंकित झालेले दिसते. 'आहे ती व्यथेची' या कवितेत स्वतःचा प्रीतिविषयक दृष्टिकोण स्पष्ट करताना ते म्हणतात,

प्रीती ना आपुली
फुलांची कळ्यांची
कोमलपणाची
निथळे तिच्यात असह्य वेदना
अखंड रणाची
प्रीती ना आपुली
संतोष सुखाची
सारंगी बिनाची
आहे ती व्यथेची गहन दुःखाची
अथांग मौनाची

उत्कट औदासीन्य

ध्येयसिद्धीसाठी केलेल्या प्रेमत्यागातून एक निराशा पूर्वीच वाट्याला आली होती. तिची तीव्रता कमी झाली, तरी त्या दुःखाची पातळ छाया सतत पाठलाग करताना दिसते. मनाच्या किंचित्मात्र स्थिरावलेल्या जलाशयावर प्रश्नांचा तरंग उठतो;

मीलनाच्या किनाऱ्याने वियोगाची चाले नौका
आठवते का ?
संयोगात ऐकू आल्या दुराव्याच्या क्रूर हाका
आठवते का ?

कवीला मात्र हे सर्व आठवते. ते प्रेमही आठवते आणि तो पक्षीही आठवतो. अंगणातल्या हिरव्या वेलीवरचे निळे स्वप्न, ते मखमाली मार्दव आठवते. उदासवाणे नेत्र त्या पक्षाला शोधतात पण विलग पाकळ्यांतून पुष्प कसे जुळणार ?

निळ्या अनंता निघून गेला माझा पक्षी निळा
रखरखती भवताली आता माध्यान्हीच्या झळा

तो पक्षी निघून गेला; पण त्याची छाया पाठलाग करीतच राहते. 'किनाऱ्या'तला तो पक्षी 'हिमरेषे'तही अवतरतो.

त्या पक्षाने केले होते मजला वेडे
निळ्या परांच्या सहवासी त्या
झाली होती सूज्ञपणाची
भवदाराच्या लौकिकतेची
बंद कवाडे

पण त्या पक्षाच्या उरात कुणाचा शर शिरला ते कवीला कळले नाही. कदाचित (त्या जुन्या ध्येयाचा ?) आपलाच शर त्या पक्षाला लागला नसावा ना ? अशी शंका त्यांच्या मनाला चाटून जाते. कवी त्या पक्षाला विसरण्यासाठी मऊ उशांच्या कोचावर रेलून व्यवहाराचा दिलासा घेत असला, तरी अवचित मनाला जाग येते. त्या पक्षाचा आठव जीवास व्याकूळ करतो आणि क्षणकाल का होईना 'त्या पक्ष्याविण जगण्याचे हे कवचच केवळ' अशी कबुली ओठांवर येते. त्या पक्ष्याला धरायचे होते, त्याच्याशी हितगुज करायचे होते, कदाचित पक्ष्यालाही ओठांची उघडझाप करायची असेल, पण ते ओठ तसेच शिवलेले राहिले, की ते तसेच रहावे याची अपेक्षा कवीने केली ?

तुला गायचे होते तेव्हा
मलाहि होते ऐकायाचे
त्या स्वरजाली होते काही
रहस्य अद्भूत धरावयाचे
ह्या गीताला परंतु नाही
शरीर शब्दांचे सापडले
अनुकारते पाऊल त्याचे
शब्दांच्या द्वारी अडले

मौनातच सारे काही मिटले. ओठावर मरणाची भाषा नसली, तरी कधी शांत मनाच्या जलाशयावर आठवणीचा खडा पडतो आणि व्याकूळ करणारे दु:खाचे अनेक तरंग निर्माण होतात.

कठोर होई बर्फ मनातिल । कोमल भावदंवाचे
भयाण त्या पोकळीत जीवन । सुन्नपणाने भ्रमते

अशी तिची आठवण व्याकुळ करते. परंतु तीच त्यांना पुढचा मार्गदेखील दाखविते.

अशा अभावी वहात येते । तव हाकेची पणती
प्रकाशात त्या आहे त्याचे । सूर पुन्हा ये हाती

कुसुमाग्रजांची अशी अशब्दा प्रेमकविता मौनाकडे गंभीर तटस्थतेने वाटचाल करीत राहते.

प्रेमविषयक नाटयगीते

कुसुमाग्रजांच्या आत्मनिष्ठ प्रेमगीतांवर त्यांच्या आदर्शांचा ठसा खोलवर आहे. परंतु नाटयगीते अशा आदर्श कल्पनांपासून पुरेशी विमुक्त आहेत. त्यातील नायक किंवा नायिकांवर आपल्या ध्येय-कल्पनांची सक्ती कुसुमाग्रज करीत नाहीत, जी मीलनाची आसक्ती, धुंदी, हुरहूर, उत्कंठा कुसुमाग्रजांच्या आत्मपर काव्यात आढळत नाही, ती इथे आपल्या आकार-विकारासहित समर्थपणे प्रकट झाली आहे. त्यांच्या नायिका ऐतिहासिक तशाच आधुनिक काळातील आहेत. त्यांच्या ऐतिहासिक नायिकांच्या आत्मनिवेदनातून पुष्कळदा लावणी वाङ्मयाचे सूर ऐकू येतात.

पृथ्वीचे प्रेमगीत

कुसुमाग्रजांचे हे सर्वश्रेष्ठ नाटयगीत. खंड-काव्याचे वळ अंतरंगात घेऊन ते निर्माण झाले. त्यात एक कथासूत्र अनुस्यूत आहे. त्यातला नायक प्रत्यक्ष सूर्य आहे. सूर्य म्हटला की वैभवशाली पराक्रमी, व्यक्तिमत्त्वसंपन्न, अनंत हस्ताने आपले औदार्य उधळणारा, ज्याच्या अंतरंगात शिरणे कठीण आहे असा करारी, जगच्चालक महापुरुष साक्षात डोळ्यासमोर उभा राहतो. त्याला जगाची गरज नाही पण जगाला मात्र त्याची गरज आहे. असा हा प्रत्यक्ष परमेश्वर या कवितेचा एक बिंदू आणि दुसरा बिंदू म्हणजे पृथ्वी. सहनशील, समर्पणशील मर्यादशील अशी ही किंचित प्रौढा मोहक वसुंधरा. एकाचे मोठेपण जन्मसिद्ध आहे पण दुसऱ्याचे ? कदाचित जन्मसिद्ध नसेलही, पण ते युगानुयुगीच्या प्रतीक्षेने, प्रीतीच्या समर्थ याचनेने आणि तिची पूर्ती होत नसतानाही निष्ठा डागाळू न देण्याच्या वृत्तीमुळे त्या वसुंधरेने प्राप्त करून घेतले आहे. दोन बिंदूच्या या विलक्षण समतोलावर या नाटयगीताची उभारणी झाली आहे.

अकरा कडव्यांमध्ये बांधलेल्या ह्या काव्याची विभागणी तीन खंडात करता येते. प्रथम खंडातील तीन कडव्यात वसुंधरेच्या संज्ञाप्रवाहाचे चित्रण कुसुमाग्रजांनी केले. युगानुयुगीची तिची चाललेली वंचना, प्रीतियाचना, सूर्यकक्षेतील तिचे मार्गक्रमण त्यांनी रेखाटले. तिच्या अंतर्मुखतेतून प्रौढतेची तिला होत जाणारी स्त्रीसुलभ हृदयविदा-

रेक संवेदना, ज्या सर्वस्वाचे अर्पण करायचे तेच निसटत चालल्याची प्रखर जाणीव त्यांनी स्पष्ट केली. याबरोबरच आंतरिक निष्ठा अभंग राहील, प्रीतीची जागती ज्योत अविश्रांत तेवतच राहील असे तिने स्वत.ला की प्रियकराला दिलेले वचनही नोंदविले.

दुसऱ्या खंडातील चार कडव्यांमध्ये तिची स्वतःची महत्ता, तिच्याविषयीच्या चंद्र, शुक्र, मंगळ, ध्रुव, धूमकेतू यांच्या आर्जवी याचना आसक्तीतून प्रकट झाली. प्रियकराची महत्ता पहिल्या खंडात पृथ्वीच्या याचनेत स्पष्ट झालीच होती. पृथ्वीची महत्ता या ताऱ्यांच्या याचनेतून केवळ स्पष्टच झाली नाही, तर सूर्य-पृथ्वीच्या महत्तेचा समान पूल त्यामुळे तयार झाला.

तिसऱ्या आणि शेवटच्या खंडांतील पहिल्याच कडव्यात पृथ्वीने ताऱ्यांच्या दुर्बलतेचे आणि क्षीण प्रकाशत्वाचे अधिक्षेपकारक उल्लेख करून आपल्या महत्तेवर शिक्कामोर्तब केले आणि शेवटच्या तीन कडव्यांत तिच्या मनातील आदिम कामभाव, आत्मजाणीव, स्त्रीसुलभ मर्यादशीलता आणि निरपेक्ष समर्पणशीलता अगदी रसरसून प्रकट झाली.

या रूपकाचे बीज कुसुमाग्रजांना सापडले तो क्षण विलक्षण असावा. एखाद्या उत्तम बीजाचा सकस भूमी जसा विकास करते तसे कुसुमाग्रजांच्या मूळच्याच सकस प्रतिभेने या बीजाचा विकास आणि विस्तार केला. वस्तुतः शास्त्रीय ज्ञान पुष्कळदा रूपकाच्या आड येते, पण कवी आपल्या आरोपांनी एका भावसत्याआड वस्तुस्थिती दाबून टाकतो. इथे ते शास्त्रीय ज्ञान आपल्या सगळ्या तपशिलासह कुसुमाग्रजांच्या मदतीला धावून आले आहे. ते इतके की काही ठिकाणी शोधक दृष्टीने पाहिल्याशिवाय शास्त्रीय ज्ञानाची ही स्थळे नजरेत देखील येत नाहीत. ब्रह्मांडात सूर्य पृथ्वीसहित इतर ताऱ्यांची असणारी स्थाने या प्रेमव्यापारात जशी उपयोगी ठरली, तशीच उफाळत्या ज्वालामुखीला तळी जागणाऱ्या निखाऱ्याचे, धरणीकंपाला अंग शहारण्याचे आणि धरणीभंगाला स्मृतीने सलणाऱ्या आणि उलणाऱ्या अंतराचे रूप अगदी सहजगत्या प्राप्त झाले. सगळ्याच नाट्यगीताला विकसित संपूर्णाकार प्राप्त झाला. कवीने या गीतातून गतीत असणारे एक प्रेमच सांगितले नाही, तर आपला स्वतःचा प्रेमविचार-जणू प्रेमाचे तत्त्वज्ञानही स्पष्ट केले. गतीतील श्रेयसाचे आणि मोह टाळून मरेपर्यंत आंतरिक प्रेमनिष्ठा उरी जपण्याचे.

जणू याच निष्ठेमुळे प्रेयसीच्या प्रेमाचा नजराणा दुसऱ्याच्या चरणी अर्पण झाला आहे हे लक्षात आल्यावर तिच्या सुखात आपला आनंद मानणाऱ्या प्रियकराची वृत्ती पृथ्वीवर एकनिष्ठ प्रेम करणाऱ्या शुक्राच्या चिंतनाद्वारे कुसुमाग्रजांनी 'संवाद' या कवितेत रेखाटली आहे.

त्यांच्या इतर नाट्यगीतांतून प्राधान्याने स्त्री-हृदयाची भावना साकार झालेली आहे. 'माळाचे मनोगत', 'शेवटचे पान', 'तू उंच गडी राहसी', 'प्रतीक्षा', इत्यादी 'विशाखे'तील नाट्यगीते सरस उतरलेली आहेत. नायिकेच्या हृदयातील भाव अगदी सहजगत्या कुसुमाग्रज टिपतात. त्यांच्या नाट्यगीतांतील स्त्रीरूपात विविधता आहे, 'हे जगदीशा ! तू राधा, यमुना सर्व काही स्मरशील, पण ही कुरूप गवळण तुला स्मरेल का ?' अशी प्रश्नबावरी झालेली गवळण कुसुमाग्रजांनी रेखाटली, तसेच, 'तुझ्या जीविताच्या चंद्राला माझ्या प्रीतीचे चांदणे, तुझ्या नियतीच्या पायात माझ्या भक्तीची पैंजणे आहेत' असा विश्वास बाळगणारी संतृप्त मस्तानीही त्यांनी रेखाटली.

भय वाटे मी अशीच जगता
चिराच होईन इथे चिऱ्यांतील
तिमिरामधली ज्योत एकली
तिमिरामध्ये विलीन होईल

असे भय बाळगणाऱ्या समर्पित एकाकी नायिकेचे रूप आपल्याला 'बंदीवान' या कवितेत दिसते. तसेच,

भुलणारे भुलवावे । माझ्या नावाची ही ख्याती
माझ्या पायी कितीकांच्या । झाली जीवनाची माती
देते म्हणून इशारा । माझा मुलूख दूरचा
तेथे मुशाफिरा तुला । धीर आहे का यायचा ?

असा धीर सवाल करणारी, लावणी वाङ्मयातील नायिका आपल्या मूळ स्वरूपात प्रकट होते. नायकाच्या विजयात त्याच्या जयजयकाराचे सुख-

दुःख तिमिरापरी असणाऱ्या दूरच्या तटातून अनुभवणारी, 'पराभूत पण । येशिल जर तू । विद्ध एकटा । या वेशीतून । शत भिंतीचे । तोडुनि बंधन । धुळीत येईन । कवळाया तुज । या वक्षावर' असे म्हणणारी आजच्या युगातील नायिकाही कुसुमाग्रज रेखाटतात. त्याचप्रमाणे मनात मठ निर्माण करून मनाने जोगीण झालेली आणि नायकाला 'काळोखाच्या तळघरात या । दिवा घेऊनी शिरू नका । गर्भरेशमी जरिपटका या । निवडूंगावर चिरू नका' असे कळकळीने बजावणारी नायिका त्यांनी रेखाटली आहे.

'शेवटचे पान' या गीतात नायिका, वेड लावून निघून गेलेल्या नायकाला परतून पाहण्याबद्दल विनंती करते आहे. नानाप्रकारे तिची आळवणी चालली आहे. क्षणात चार युगाचा घाव उरी घालणाऱ्या त्या उद्दाम प्रियकराच्या पायातळी आग पेटेल, शिखरावरच्या उन्हाने तो कासावीस होईल या जाणिवेने कासावीस झालेली ती प्रेयसी शेवटी त्याच्या डोक्यावर पुनवेचा चंद्र येवो अशी शुभकामना करते. 'प्रतीक्षा' या गीतातही हीच भावना व्यक्त झाली आहे. या कवितेचा बाज एखाद्या लावणीप्रमाणे आहे. त्यातील वातावरण, भावेची लकब शुद्ध शाहिरी आहे.

तीर मारला तुम्हिच नेमका मुक्त पाखरावरी
जात ते असताना अंबरी
हतबल होउन आणि बापडे पडता पायावरी
निष्ठुरा कसे जाहला दुरी ?

यातील ठसका लावणी वाङ्मयाची आठवण करून देतो. 'विझवाया हा वणवा राया, येशिल का लौकरी ? ना तरी उतरिन मी पायरी' ही गोड धमकी तर नायिकेच्या आतुर मनोवृत्तीची जात स्पष्ट करते. 'आश्वासना'तल्या प्रेयसीने तर; 'भांडार प्रीतिचे भरले का धनचिन्ता । दशदिशा चांदणे, का पणतीस्तव झुरता ?' असा खडा सवालच केला आहे. तिची समर्पित वृत्ती 'फुलरास फुलो वा फुलो निखारा चरणी । तू राजा आणिक तुझी प्रिय मी राणी' अशी स्पष्ट आहे.

अशा स्पष्ट समर्पित नायिकेबरोबर एक अश्राप नायिकाही कुसुमाग्रजांच्या मनात घुसून आहे. ती व्यभिचारिणी नाही, प्रेमासाठी आसुसलेली आहे पण प्रेमविद्धा नाही, स्त्रीसुलभ सावधपण तिच्या अंतरंगात आहे. ती चार भिंतींच्या तटाआड आहे पण तटात चिणलेली नाही. अशातच तिच्या मनातील आदिम कामभाव नेणिवेच्या पातळीवर जागृत होतो आणि तो प्रज्ज्वलित व्हावा म्हणून बाहेरच्या रानातून कधी गाणे ऐकू येते. घडा भरायचा राहतो. चार जणींच्या धाऱ्याला यावे लागते. कधी मृदुल कुसुमे मार्गावर पडतात पण त्या गंधित मृदुल निखाऱ्यांना ती स्पर्शही करीत नाही. कधी दूर दिव्यांच्या हालचाली होतात पण हे खटधीट इशारे कायमचे नसतात याची तिला जाणीव असते. महालातले दिवे विझवून ती त्या खटधीट इशाऱ्यांना काळोखाचे उत्तर देते. अशा धीट नकारात का सुप्त प्रतिसाद दडला असतो ? पण मनाची समजूत पटवताना ती म्हणते–

हे मतवाले स्वैर प्रवासी
लौकिक नीती नसे अशांसी
भोग घडीचा मग संन्यासी
कुळवंताची कोण अशी या भुलेल चंचल पाऱ्याला

स्त्रीरूपाचा वेध

अशा अनेक स्त्रिया कुसुमाग्रजांनी रंगविल्या आहेत. त्यांच्या रूपापासून स्वभावापर्यंतच्या अनेक विभ्रमांचे त्यांना विलक्षण आकर्षण आहे. स्त्री विविधरूपधारिणी आहे याची त्यांना जाणीव असल्यामुळे तिच्याविषयीच्या प्रत्ययातील विविधता लक्षणीय आहे. 'ही वादळवेडी विस्मयकर दीर्घकुंतली जात आहे' असा त्यांचा निष्कर्ष आहे. तिचा पार कसा लागावा, ते कधीही न उकलले जाणारे एक विलक्षण कोडे आहे. कधी वणव्याचा मुकुटावर तुरा घेऊन फिरणारे, तर कधी देवघरातील संथ शांत फुलवातीप्रमाणे तेवणारे. कधी दवबिंदूप्रमाणे नाजूक, तर कधी खडकाप्रमाणे कठोर. कधी नागीण होऊन कालकूटाच्या चुळा टाकणारे, तर कधी ईश्वरी कृपेची बरसात करणारे. कुसुमाग्रज लिहितात,

कधी पतीस्तव सती होउनी सरणावरती चढे
कधि जारास्तव विश्व जाळुनी घुसते वनवासात
ही रसरंगित करी सुगंधित जीवन म्हणती जया
हीच ठेविते फुटकळ मरणे किनखापी बटव्यात

या नाट्यगीतांतून दृग्गोचर होणारी स्त्रीरूपे

स्त्रियांबद्दलची पारंपरिक मते, प्रत्ययास आलेले वास्तव आणि त्याला दिलेली मनोहर कल्पनेची आणि नाटयात्मकतेची जोड या सगळयांच्या कलापूर्ण संपृक्ततेतून जन्मास आली. कुसुमाग्रजांनी या नायिकांवर आपले विचार-विकार–अपेक्षा अजिबात लादल्याच नाहीत असे नाही, पण त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यातही ह्या अत्यल्प विकारांचा कल रसिकाभिरुचीकडे न झुकल्यामुळे त्यात लावण्यातील नायिकांच्या रूपमनात जाणवणारा भडक शृंगार व उत्तानता आली नाही. या विकारांचा कल झुकलाच असेल तर तो स्व–अभिरुचीकडे झुकलेला आहे. ती विदग्ध असल्यामुळे स्वाभाविकच त्यात मनोहारित्व आले. या संदर्भात एक कलात्मक संयम आणि सदभिरुची कुसुमाग्रजांनी सतत दाखविली आहे व ती प्रशंसनीय आहे. परंतु सामान्यतः या नायिकांकडे पाहण्याची दृष्टी मात्र मध्ययुगीन आहे. याचे कारण ज्या कालखंडात कुसुमाग्रजांची स्त्रीविषयक जाणीव स्थिर झाली तो मध्ययुगाला जवळचा आहे. स्त्री–पुरुष समानतेचे संदर्भ त्यांच्या काव्यात येत नाहीत. स्त्रीला डावलून पुरुष जातो तेव्हा ध्येयमूल्यांना धार चढते. पण स्त्रीला दुय्यम मूल्य मिळते आहे याची दरकार कवीला वाटत नाही. बाह्यविश्वात पुरोगामित्व आणि अंतर्विश्वात प्रतिगामित्व असा अंतर्विरोध तर कवीमध्ये नाही ना ? असा क्षणकाल प्रश्न पडतो. वस्तुतः कुसुमाग्रजांच्या आधी माधव ज्यूलियनांनी स्त्रीपुरुष समानतेची जाणीव काव्यात प्रस्थापित केली होती. तिचा फारसा प्रभाव कुसुमाग्रजांवर पडलेला दिसत नाही. पण यामुळे या नाटयगीतांत काही उणेपणा आला आहे असे नाही. कुसुमाग्रजांच्या प्रेमकवितेने मराठी प्रेमकवितेला एक नवा उजाळा आणि नवे सामर्थ्यच दिले आहे. ■

८ १, राणी लक्ष्मीनगर
नागपूर

वि. वा. शिरवाडकरांच्या नाटकातील व्यक्तिचित्रणातील विविधता

सारिका ठोसर

उदात्त धीरगंभीर पात्र

धीरोदात्त, धीरगंभीर पात्राचे शिरवाडकरांना तीव्रतम आकर्षण आहे. अशा पात्रांभोवतीच नाटकाच्या कथानकाची गुंफण त्यांनी केली आहे. ती पात्रेच त्यांच्या नाटकाचा गाभा असतात. आपल्या हृदयाशी बाळगलेल्या उदात्त नीती-मूल्यांची किंवा वेदनांची त्यांना इतकी धुंदी चढलेली असते की, "अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलूनी प्रहार" ह्यासाठी ते सदैव तयार असतात. ह्या प्रहारांनी ते किंचितही डगमगत नाहीत.

कर्णाच्या कपाळावर नियतीने दुर्दैवाची तप्त-मुद्रा मारलेली असून देखील तो परिस्थितीला शरण जात नाही, तर स्वीकारलेल्या मार्गावरून पुढे-पुढे जात राहतो. यातच त्याचे श्रेष्ठत्व सामावले आहे. बाजीरावाच्या विचारधारेला समाजाने न ओळखल्यामुळे त्याला सहन कराव्या लागणाऱ्या मनःस्तापाला तो धैर्याने तोंड देतो. पण परिस्थितीशी तडजोड अजिबात स्वीकारत नाही. बाजीरावाची शोकांतिका कर्णाप्रमाणेच त्याच्या मृत्यूत नसून जीवनात आहे. समाजाविरुद्ध दंड थोपटून उभे ठाकणाऱ्या एका असामान्य व्यक्तीची शोकात्मिका आहे. आयुष्याच्या अखेरीस कोसळ-लेला बाजीराव मृत्यूजवळ एवढा उंच गेलेला आहे की पूर्वी कधीही त्याला ती पातळी गाठता आली नाही. 'वीज म्हणाली धरतीला' मध्ये परिस्थितीने आणि नियतीने निर्माण केलेल्या जाचक बंधनातून आपल्या झाशीला मुक्त करायचे ह्या विचारांनी एकदा राणी प्रवृत्त झाल्यानंतर त्यासाठी हसतमुखाने प्राणार्पण करण्यास देखील ती तयार होते. परंतु ध्येयपथावरून मागे फिरत नाही.

'वैजयंती' ह्या नाटकात देशातील जनतेचे प्राण वाचविण्यासाठी आपल्या शीलाचे बलिदान करणाऱ्या वैजयंतीची उदात्त भावना पराकोटीची आहे. सर्वसाधारणांच्या आकलनापलीकडची आहे. ह्या बरोबरच एकेकाळी जिच्यावर प्रेम केले होते, ती रूपवती आपले शरीर अर्पण करण्यासाठी एकवस्त्रानिशी आपल्यासमोर उभी असताना आपल्या मनाला बांध घालून तिच्यावरील आपल्या प्रेमाची केवळ जाणीव करून देऊन तिला इतमानाने जयपालाकडे परत पाठविणारा रत्नपाल उदात्ततेची आणि उत्तुंगतेची मर्यादा गाठतो. ही धीरगंभीर उदात्तता आपणास मंत्रमुग्ध करणारी आहे.

बेकेटला जोपर्यंत आपली प्रतिष्ठा गवसत नाही तोपर्यंत तो राजाची इमाने इतबारे सेवा करतो. परंतु राजानेच त्याच्यावर क्रमशः चॅन्सेलर व आर्चबिशप ही जबाबदारी टाकल्यावर आणि एकदा ईश्वराची प्रतिष्ठा त्याला गवसल्यावर मग मात्र तो ऐहिक जीवनातून पूर्णपणे निवृत्त होऊन त्या विरोधाला निधड्या छातीने तोंड देतो. कर्ण बाजीराव, राणी, बेकेट, वैजयंती आणि रत्नपाल ह्या सर्व व्यक्ती जीवनाचे आव्हान स्वीकारणाऱ्या आहेत. त्यांच्या नाटकातील प्रभावी व्यक्तिरेखन आणि त्यातील जीवनदर्शन मनावर विलक्षण प्रभाव करून जाते. त्या पात्रांच्या अंतरंगात शिरून शिरवाडकर त्यांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतात. त्या पात्रांच्या भावविश्वात आपण रमून जातो. त्या त्या पात्रांच्या भव्य आणि उदात्त दर्शनाने आपण भारावून जातो. नियतीला ताठरपणे तोंड देणाऱ्या त्या व्यक्ती आपल्या अंतःकरणाचा कब्जा घेतात.

अगतिक मानव

शिरवाडकरांच्या सर्व नाटकात एक आगळी एकसूत्रता आपल्याला आढळते. ते आपल्या नाटकातून वाचकांचे लक्ष मानवाच्या अगतिकतेवर केंद्रित करतात. ही अगतिकता विविध स्वरूपाची

आहे. वेगवेगळ्या परिस्थितीतून निर्माण झाली आहे. समाजातून किंवा आजुबाजूच्या व्यक्तींच्या दुष्टपणातून ती जन्माला आलेली नाही. तिचा शोधच घ्यायचा झाला तर तो मानवाच्या अपूर्णतेत घ्यावा लागेल. मानवाच्या ह्या दोषाकडे शिरवाडकर उदात्त दृष्टीने पाहतात. त्याला समजावून घेण्याचा प्रयत्न करतात. हळुवार हाताने त्याच्या मनोभूमिकेची उकल करतात. त्यांच्या नाटकातील कोणत्याही पात्राबद्दल तीव्र घृणा किंवा तिरस्कार वाटत नाही. त्यामुळेच त्यांच्या नाटकात खलपात्रे दिसतच नाहीत.

मानवाच्या प्रासंगिक दुर्बलतेतून जन्माला आलेले संघर्ष आणि त्यात सापडलेल्या जीवांची तळमळ, त्यात त्यांचा होत असलेला कोंडमारा ह्यावर शिरवाडकरांच्या प्रमुख नाटकाची उभारणी झाली आहे.

'कौंतेय' नाटकात केवळ तत्कालीन नीतिमूल्यांच्या दडपणामुळे टाकून द्याव्या लागलेल्या मुलाबद्दलची मातृसुलभ माया आणि ती उघडपणे न दाखविण्याची अगतिकता आणि ह्या दोन्हीमधील विरोधामुळे निर्माण झालेल्या संघर्षात होरपळून निघालेली कुंती एका बाजूला, तर माता जिवंत असूनही मातृविहीन जीवन जगणारा आणि स्वतःचा काहीही दोष नसताना समाजाने पदोपदी केलेली अवहेलना, अपमान, तेजोभंग ह्यांचे दुःख भोगणारा कर्ण दुसऱ्या बाजूला, अशी जीवघेण्या संघर्षाची उभारणी आहे. पण त्या दोघांच्या आचरणात दिसणारा कठोरपणा आणि त्यांच्या बोलण्यातून जाणवणारी अलिप्तता व कटुता आपण समजू शकतो. ह्या मानवाच्या स्वाभाविक प्रतिक्रिया आहेत. हे शिरवाडकर विविध प्रसंगातून समजावून देतात. मातेच्या मनोभूमिकेत शिरून तिची झालेली केविलवाणी कुचंबणा आपले मन दुभंगून टाकते. आणि हे सर्व कळल्यावर उदार मनाने मातेची क्षमा मागणाऱ्या कर्णाचा उदात्तपणा आपणास भारून टाकतो. कोणीही मुळात दुष्ट नाही. दुष्टपणा जर कोणी केला असेल तर तो दोघांनाही समजावून न घेणाऱ्या आजूबाजूच्या समाजाने आणि मानवी मनाचे व्यापार बहुतांशी प्रतिक्रियात्मक असतात हे विसरणाऱ्या समाजातील घटकांनी !

'दुसरा पेशवा' ह्या नाटकात शिरवाडकरांनी मानवाच्या मनोव्यापारांची वेगळी अशी प्रमेये आपल्यासमोर मांडली आहेत. एवढा पराक्रमी बाजीराव पण काशीबाईच्या आजारपणामुळे पत्नीसुखास पारखा होतो. हे हरवलेले सुख मस्तानीच्या रूपाने बाजीरावाला सामोरे येते. त्याचा तो पूर्णपणे स्वीकार करतो. बाजीरावाकडून पराक्रमातिशयाची अपेक्षा करणारा समाज बाजीरावाच्या पराक्रमाची स्त्रीसुख ही प्रेरणाशक्ती आहे हे समजावून घेत नाही. बाजीराव आणि मस्तानीच्या सामाजिक जाचाला सुरवात होते. घरीदारी सगळीकडून दावानल पेटल्यामुळे त्यात बाजीरावाची आहुती पडते. ज्या समाजाच्या उत्थानासाठी नीतितत्त्वे जन्माला येतात ती नीतितत्त्वे सांभाळण्याच्या प्रयत्नात समाजधुरीण समाजाच्या अधोगतीचा मार्ग मोकळा करून देतात. समाजधुरीणांच्या दुराग्रही निर्घृण भूमिकेच्या पार्श्वभूमीवर मस्तानी आणि काशीबाई ह्यांची बाजीरावातील माणूस समजावून घेण्याची वृत्ती आणि त्याच्या सुखासाठी आपल्या सर्वस्वाची होळी करण्याची उदात्तता 'माणूस' समजावून घ्या हा नाटककाराचा संदेश आपल्या अंतःकरणापर्यंत पोहोचवितात.

पत्नीसुखास पारखा झाल्यामुळे अगतिक झालेला ययाती निष्क्रीय होतो. देवयानीच्या तिरस्काराच्या आगीत होरपळून निघालेला ययाती शर्मिष्ठेच्या प्रीतीच्या शीतलतेने सुखावतो. ययाती आणि शर्मिष्ठा ह्यांच्यातील हे भावबंध आपले मन चटकन आकर्षून घेतात.

नटसम्राट अप्पासाहेब बेलवलकर ह्यांच्या रूपाने अगतिकतेचे आणखी एक रूप शिरवाडकरांनी आपणासमोर मांडले आहे. अप्पा वृद्ध झाले आहेत. त्यांना मागे जाऊन तरुण होता येत नाही किंवा पुढे जाऊन मरताही येत नाही. पत्नी प्रेमळपणे धोक्याचा इशारा देत असताना देखील वात्सल्यप्रेमाने भारावलेले अप्पा चाळीस हजार रुपये आपल्या लाडक्या मुलांना वाटून देतात. स्वतः निर्धन होऊन आश्रितत्व पत्करतात. येथूनच त्यांच्या अगतिकतेची सुरवात होते. सुनेला त्यांच्या खाण्याच्या सवयी व अव्यवस्थितपणा खपत नाही.

प्रत्यक्ष मुलगी बापावर चोरीचा आळ घेते. अप्पांचा संताप अनावर होतो. पण त्या क्रोधाला हातपायच राहत नाहीत. मुलामुलीने असा उपमर्द केलेला हा वृद्ध, प्रेमळ पत्नीच्या मृत्यूने एकाकी होतो. असा हा एकेकाळचा तुफानी व्यक्तिमत्वाचा नटसम्राट भिकारी होतो. रस्त्याला लागतो. ही वृद्धापकाळची जीवनस्पर्शी अगतिकता शिरवाडकरांनी अत्यंत परिणामकारक रीतीने दाखविली आहे.

'दूरचे दिवे' मधील विश्राम ह्याचे व्यक्तिमत्व केवळ एक प्रवाद सोडला तर आदर्श आहे. पण ह्या प्रवादाचा वडवानल करून त्यात विश्रामचे आदर्श व्यक्तिमत्व जाळून टाकण्याचा अतिरेकी निष्ठावाद सौदामिनीच्या हृदयात घर करून बसलेला असतो. मनुष्याच्या हातून चूक होणे शक्य आहे हे तिला पटतच नाही. केवळ एका अविवेकामुळे जेव्हा तिच्या पवित्र व्यक्तिमत्वाबद्दल शंका निर्माण होते, तेव्हा माणसाच्या हातून चूक होणे हे मानवी सत्य तिला उमजते. ती विश्रामच्या व्यक्तिमत्वाच्या पर्वताएवढ्या मोठेपणात त्याचा छोटासा प्रमाद डोळ्याआड करून दोघांचे जीवन सुखी करते.

वैजयंतीचे जयपालवर अतिशय प्रेम आहे. जयपाल सोडून अन्य पुरुषांबद्दलचा विचार देखील तिने कधी केला नाही. पण विशालगडचा सर्वनाश टाळण्यासाठी रत्नाकराने घातलेली अट मान्य केल्याखेरीज तिला गत्यंतर नव्हते. ती केवळ नाइलाजास्तव आपले शील समर्पण करण्यास तयार होते. तिची ही अगतिकता परिस्थितीजन्य आहे. ती फक्त विश्वपाल समजू शकतात. तिचा पती जयपाल समजू शकत नाही. त्यामुळे जयपाल वैजयंतीला दुरावतो.

'चंद्र जिथे उगवत नाही' ह्या नाटकात तारुण्याच्या उन्मादात भान विसरून शील हरवलेली रूपा अगतिकतेचे करुण दर्शन आहे. लग्न झाल्यानंतर एकनिष्ठ राहण्याचा तिचा निर्धार आहे पण सतीश घरात नसताना तिच्या शरीरावर घाला घालण्यासाठी आलेल्या धनिकांचा नाइलाजाने ती खून करते. तिची ही अगतिकता हृदयाला पीळ पाडणारी आहे.

कर्ण, कुंती, बाजीराव, ययाती, अप्पा, विश्राम, वैजयंती, आणि रूपा ह्या सर्व व्यक्ती मानवी अगतिकतेचे वेगवेगळे पैलू आहेत. ह्याची आपल्याला तीव्रतेने जाणीव होते. आणि ही जाणीव त्याच्यातील 'माणूस' आपल्यापर्यंत पोहोचविते.

मानवी प्रेमाचे पुजारी

संघर्षमय दाहक जीवनात प्रेमाच्या छायेची माणसाला नितांत आवश्यकता असते. म्हणूनच काही अपेक्षा न करता प्रेम मुक्तहस्ताने द्या, यावर शिरवाडकरांचा विशेष भर दिसतो. त्यांच्या नाटकात असे प्रेम वाटणाऱ्या पात्रांची विपुलता आहे. कर्ण अत्यंत कर्तव्यकठोर आहे. आणि शत्रूंचा कर्दनकाळ देखील आहे. पण रणांगणाबाहेर तो अत्यंत प्रेमळ आहे. तो माधवीवर निरतिशय प्रेम करतो. दुर्योधनाबद्दल त्याला एवढे प्रेम आहे की त्या प्रेमाखातर तो आपल्या आयुष्याचा शेवट करून घेतो. आई सापडली तर तिच्यावर प्रेमाची बरसात करण्यास तो उत्सुक आहे. अत्यंत अपमानित जीवन जगणाऱ्या कर्णाला जीवनात आधार असतो तो माधवी आणि दुर्योधनाच्या प्रेमाचा.

ययातीला प्रेमाची चिरंतन भूक आहे. देवयानीकडून अपेक्षित पत्नीप्रेम न मिळाल्यामुळे त्याच्या आयुष्यात विराणता निर्माण झाली आहे. प्रेमाभावी तो अधोगतीला लागला आहे. शर्मिष्ठेने त्यावर प्रेमाची पखरण घातल्याने ययातीच्या आयुष्यात आनंद निर्माण झाला आहे. ह्या परस्परांवरील प्रेमाने ययाती आणि शर्मिष्ठा या दोघांनाही जीवनातील सौख्य आणि आनंद मिळाला. ह्याउलट प्रेमाचा अव्हेर केल्याने देवयानी दुःखीकष्टीच राहते.

झाशीच्या राणीची वृत्ती तर 'वसुधैव कुटुंबकम्' अशी आहे. आपल्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर तिचे प्रेम आहे. त्यांच्या सुखाबद्दल कणव आहे. त्या प्रेमाच्या वाटपात लहान मोठा, स्त्रीपुरुष असा भेदभाव नाही. काशी, मुंदर, जुलेखा या सर्वांना तिने आपल्या प्रेमाने जवळ केले आहे. तात्या टोपे, रावसाहेब पेशवे या सर्वांना तिने प्रेमादराने आपलेसे केले आहे

प्रजाजन तर तिचे पुत्रच आहेत. ह्या सर्वांनी राणीवर अतिशय माया केली आहे. ह्या प्रेमळ वातावरणातच राणीच्या निर्धाराचे पोषण झाले आहे. तिचे आणि तिच्या सान्निध्यातील व्यक्तींचे संघर्षमय जीवन सुसह्य झाले आहे. एवढेच नव्हे तर त्यात गोडवा आला आहे. राणीच्या मर्दानी आणि धाडसी जीवनाला अशा प्रेममय, कोंदणात बसविल्यामुळे तिचे व्यक्तितेज उजळून निघाले आहे.

बाजीरावाचे जीवन पूर्णपणे प्रेमाधिष्ठित आहे. त्याचे छत्रपतीवर भक्तीयुक्त प्रेम आहे. सर्व सरदार मानकऱ्यांबद्दल बाजीरावाला अत्यंत माया आहे. त्यांचे कूळ, त्यांची जात असा विधीनिषेध त्याच्या मनाला कधीच शिवत नाही. चिमाजी अप्पा आणि बाजीराव यांचे बंधुप्रेम उत्कट आहे काशीबाई आणि मस्तानी त्याच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. मस्तानी आणि बाजीराव ह्यांची परस्परांवरील प्रीती बाजीरावाच्या जीवनाची प्रेरक शक्ती आहे. ह्या सर्वांनी बाजीरावावर मुक्तहस्ताने प्रेम केले आहे.

विश्राम अत्यंत लोकप्रिय नेता आहे. त्याचीही अमाप लोकप्रियता त्याने लोकांवर केलेल्या विशुद्ध प्रेमाच्या मोबदल्यात त्याला मिळाली आहे.

प्रजाजनांची झालेली अन्नान्न दशा पाहून वैजयंतीचे अंतःकरण ढवळून निघाले आहे. त्यांना सुख मिळावे म्हणून ती आपल्या सुखाचा बळी द्यावयास निघाली आहे. रत्नाकराने रसद पोहोचविल्यानंतर प्रजाजनांनी केलेला जयजयकार ही त्यांची तिच्यावरील प्रेमाची अभिव्यक्ती आहे. रत्नाकर सेनापती असून देखील बनवीरसारख्या शिपायाचा सुहृद आहे. सर्व जडजवाहीर त्याला देण्याइतका तो रत्नाकराच्या जवळचा आहे.

आनंद हा तर प्रेमाचा मूर्तिमंत पुतळाच आहे. त्याने आपल्या भोवती प्रेमाचे निर्मळ जग निर्माण केले आहे. त्याच्या तुफानी प्रेमात अवतीभवतीच्या साऱ्या व्यक्ती गुरफटल्या आहेत. कधीही न पाहिलेल्या न देखलेल्या व्यक्तींवर तो जन्मजन्मांतरीचे प्रेम असल्यासारखे वागतो. आणि सर्वांना आपल्या प्रेमाने वेडे करतो. इतके की त्याच्या व्यतिरिक्त जीवन ही कल्पनाच सर्वांना असह्य वाटते.

बेकेटचे राजावर अतिशय प्रेम आहे. त्याच्यावरील प्रेमाखातर तो राजाची सर्व कामे अत्यंत आवडीने आणि मन लावून करतो. जीवनसंघर्षात राजा त्याच्यापासून दुरावल्यामुळे त्याचें जीवन उध्वस्त झाले आहे. राजाचे पण बेकेटवर अतिशय प्रेम आहे. बेकेटबद्दल उणे बोललेले त्याला आवडत नाही. बेकेटबद्दलचे प्रेम त्याच्या मनात इतके घर करून बसले आहे की बेकेटला मारल्यानंतरही तो त्याला विसरू शकत नाही. त्यांच्या ह्या प्रेमाच्या काही पारस्पारिक अटी नाहीत. किंवा अपेक्षाही नाहीत. कर्तव्यकठोरतेने ते चिरडले गेले नाही. आपल्या प्रेमाने सर्वांना सुखी करण्याचा विदूषक नाटकांतील बगारामाचा अट्टाहास आहे. त्यासाठी वाटेल त्या हालअपेष्टा सहन करण्याची त्याची तयारी आहे.

सुखाचे वाटप करणारे विदूषक

नाटकात एखाद्या 'विदूषक' पात्राची योजना करण्याची पद्धत संस्कृत नाटकातून मराठी नाटकात आली आहे. शिरवाडकरांनीही अशा पात्रांची योजना आपल्या काही नाटकात केली आहे. पण संस्कृत नाटकात विदूषक हलकाफुलका विनोद करण्यापुरताच मर्यादित असतो. शिरवाडकरांच्या नाटकात तो विनोदापुरता सीमित राहत नाही.

'ययाती आणि देवयानी' ह्या पौराणिक नाटकातील विदूषकाच्या आगळ्यावेगळ्या दर्शनाने आपण भारावून जातो. जीवनसंदर्भ डोळसपणे पाहणारा असा तो एक जीवनश्रद्ध माणूस आहे. पारंपारिक विदूषकासारख्या विनोद निर्माण करण्यासाठी तो बौद्धिक वा शारीरिक कोलांटचा उड्या मारत नाही. आपला मित्र—ययाती राजा—कसा सुखी होईल हीच त्याला सदैव काळजी असते.

'चार्ली चॅप्लीन' ह्या इंग्लीश नटाच्या विदूषकी भूमिकेने शिरवाडकर भारावून गेले होते. हा विदूषक सर्वसाधारण वाटत असला तरी सर्वांना सुख वाटण्याचे, सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचे कठीण व्रत कठोरपणे पाळतो. त्यासाठी

अनुक्रमणिका

तो स्वतःच्या सुखाची आहुती देण्यासही मागेपुढे पाहत नाही. तो काही जमवून ठेवत असेल तर ते आपले दुःख 'विदूषक' हेच मुख्य पात्र असलेले नाटक शिरवाडकरांनी लिहिले आहे रावसाहेबां-सारख्या डोळस, व्यवहारी, आणि धनाढ्य माणसापासून तो अंध अंजलीपर्यंत तो सर्वांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. स्वतःच्या सुखाचा विचार कधी त्याला स्पर्शही करत नाही.

'आमचं नाव बाबूराव' ह्या नाटकातील 'बाबूराव' हे नाव विदूषकी नसले तरी त्याचा खाक्या विदूषकाचाच आहे. समाजातील दांभिकते-वर तो कोरडे ओढतो. माणसाचे जीवन स्वादिष्ट, रुचकर होत असेल तर मूर्खपणाचा आश्रय घ्यायला काही हरकत नाही; असे तो म्हणतो. मानवी जीवन सुखी करण्यावर त्याचा भर आहे. 'आनंद' नाटकातील आनंद थोडेफार विदूषकी चाळे करत असला तरी ते इतरांना सुखी करण्यासाठीच. शिरवाडकरांचा विदूषक असा मानवी जीवनात सुखनिर्मिती करण्यास कृतसंकल्प आहे.

जीवनानंदाचे प्रणेते

शिरवाडकरांच्या नाटकातून आणखी एक वेग-ळेच पात्र आढळते. ते निःसंगपणे नाटकात वावरते. माणुसकीचे महत्त्व इतरांना पटवून देण्याचा प्रयत्न करते. अशा पात्रांना शिरवाडकर 'माणुसकीचे प्रणेते' ह्या स्वरूपात उभे करतात. शिरवाड करांना जी काही मानवी सुखाची मौलिक तत्त्वे सांगायची असतात ती तत्त्वे हे प्रणेते आपल्यापुढे ठेवतात.

'ययाती आणि देवयानी' मधील कच म्हणतो, 'स्वतःला पटलेल्या आणि आवडलेल्या मार्गावरून वाटचाल करणारा मी एक साधा संन्यासी आहे अगदी सामान्य...मला कोणी मोठं मानलं तरी त्याचा संकोच नाही, कुणी क्षुद्र लेखलं तरी विषाद नाही, गळचात पडणारे हार आणि छातीवर पडणारे धोंडे मी सारख्याच निर्लेपतेने स्वीकारत आलो आहे....साधूसंतांना लाभणारी ही स्थित-प्रज्ञता नाही. एका नादिष्ट माणसाचा हा नुसता निःसंगपणा आहे.' (अंक २ प्र. २) 'एक होती वाघीण' मधील चित्रकार म्हणतो, 'अरुंधती, सृष्टीत समोवार संचय करणारा, विविध रसांचा उपभोग घेणारा मी एक स्वैर, स्वच्छंदी प्रवासी आहे...उमाठचावर उगवणारा प्रत्येक सूर्य हजार हातांनी मला बोलवीत आहे. क्षितिजामागून क्षितिजे ओलांडीत मला पुढं, सारखं पुढं जायचं आहे. मला घर नाही, गाव नाही, देश देखील नाही' (अंक २ प्र. ४) 'विदूषका' मधील बगाराम आंधळचा अंजलीला दिलासा देताना म्हणतो, 'आयुष्याला अर्थ आपणच द्यायचा असतो. हा अर्थ देण्याची कुवत नसेल तर डोळस असलेली माणसं देखील आंधळीच होतात. अशाच माणसांनी ही दुनिया भरली आहे....उजेडात राहणाऱ्या हजारो माणसांना जर आपल्याभोवती अंधार निर्माण करता येतो, तर अंधारात राह-णाऱ्या एखाद्या माणसाला आपल्याभोवती उजेड निर्माण करणं कठीण आहे का ? उजेडाचा उगम सूर्यामध्ये नसतो, माणसाच्या मनामध्ये असतो तो.' (अंक १ प्र. ३) तर 'दूरचे दिवे' मधील सुवर्णमध्याचा पुरस्कर्ता सनानंद, ध्येयनिष्ठ सौदामिनीला समजाविताना म्हणतो, 'कोणताही पुरुष, कोणतीही स्त्री आदर्शपदाला पोहोचू शकत नाही. एखाद्यावर खुनाचा आरोप करून त्याला सुळावर चढविणं जितकं वाईट तितकंच त्याच्यावर आदर्शतेचा आरोप करून आपल्या अपेक्षेशी त्याचं वर्तन सुसंगत नाही म्हणून त्याला शासन करणं वाईट. हे दूरचे दिवे आहेत. त्यांच्या प्रकाशात आपण जीवनाची वाट चालून जावं पण ते दूरचे आहेत. त्याचा विसर होऊ देऊ नये." (अंक ४)


'आमचं नाव बाबूराव' मधील बाबूराव लोकशाहीवर कडक टीका करताना म्हणतो, 'आपण माणसं मारू शकाल, पण अन्यायाचा प्रति-कार करणारं माणसामधलं तेज आपल्याला मारता कधीही येणार नाही. ते मरत नाही म्हणूनच जग जिवंत राहतं." (अंक ३) 'आनंद' मधील जातिवंत कलंदर नायकाच्या जीवनविषयक उदार दृष्टिकोण आपली नजर बांधून ठेवतो. "बाबू मोशाय, उद्या मी नसेन, पण आज आहे. आणि आज इतका आहे की उद्या असेन की नसेन याची

मला चिंता वाटत नाही. उद्या येणाऱ्या पाहुण्याच्या फिकीरीत माझी जिंदगी आज मी जाळून टाकणार नाही. मी शेवटल्या श्वासापर्यंत जगेन आणि असा जगेन की माझं जगणं तुम्हाला क्षणाक्षणाला जाणवत राहील. आषाढातल्या मुसळधार पावसासारखं. मरणावर मात करण्याचा हाच एक मार्ग आहे. ते येईपर्यंत जगत राहणं, मी जिवंत आहे तोपर्यंत तुम्हीच काय जगातील कोणतीही सत्ता मला मारू शकत नाही ?" (अंक ३ प्र. २)

माणसातील मूलभूत माणुसकीची जाण आणि ती जपण्याची धडपड, रसरंगरूपस्पर्शगंधयुक्त जीवनावर प्रेम करण्याची महत्ता, हे प्रणेते आपल्या मनावर बिंबवितात.

शिरवाडकरांच्या नाटकातील व्यक्तिचित्रणे ही अशी विविध आहेत. ■

वाहन निर्माणी क्वार्टर नं. ३६०१
जबलपूर ४८२००९



रेखाटन : हेमंत मानमोडे

एका कवितेचा शोध ! संपादनाच्या दृष्टीने !!

उषा मा. देशमुख

अमळनेर पूर्वी पूर्व खानदेशात होतं. आज ते जळगाव जिल्ह्यात गेलं आहे. हे माझं माहेर! अमळनेरचे दत्तात्रय वासुदेव ब्रह्मे वकील हे माझे वडील. माझं शालेय शिक्षण म्हणजे नववीपर्यंतचं शिक्षण अमळनेरला झाले आणि माधवराव देशमुखांशी विवाह झाल्यावर मी नागपूरला त्यावेळची मॅट्रिकची परीक्षा संस्कृतभाषेत प्रावीण्य मिळवून पास झाले ही गोष्ट सप्टें. १९५२-५३ मधली. मुलीच्या जातीला माहेरची ओढ ही नेहमीच असते मग तिचे वय कोणतेही असो. गेल्यावर्षी अमळनेरच्या केवलाबाई पटेल स्मृति-व्याख्यानमालेसाठी तीन व्याख्याने देण्यासाठी मी अमळनेरला गेले होते. वास्तविक मी त्या गावचीच असल्यामुळं अनेक वर्षे ती मंडळी बोलवीत होती आणि या ना त्या कारणानं माझं जाणं होत नव्हतं. माझे बंधू प्रा. मो द. ब्रह्मे यांनाही नेहमी व्याख्यानाला यावे असे वाटे. पण त्यांच्या हयातीत काही ते जमलंच नाही. त्यामुळं मला त्यांच्या पश्चात कुठेतरी एक नैतिक जबाबदारी वाटू लागली व म्हणून एरवी मी कुठेही व्याख्यानांना (म्हणजे व्याख्याने देण्यासाठी) सहसा जात नसताना १९८६ च्या फेब्रुवारीत जाऊन आले. अमळनेरचा टाऊनहॉल तसा मोठा आणि त्या वास्तूशीही ब्रह्मे घराण्याचा संबंध. तेथे श्री. वा. रा. सोनार अखेरच्या दिवशी व्याख्यानाला आले होते. दुसऱ्या दिवशी चेतश्री प्रकाशनाची पुस्तक दिंडी जवळून बघितली आणि कुसुमाग्रजांना फेब्रुवारीत पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत काहीतरी केले पाहिजे असा वा. रां. नी प्रस्ताव मांडला. 'नटसम्राट : एक समीक्षा' या ग्रंथाला नुकतेच त्यांनी हातावेगळे केले होते. मीही 'कुसुमाग्रजांची काव्यसृष्टी आणि काव्यदृष्टी' यावर तसेच 'शिरवाडकरांची नाट्यसृष्टी आणि नाट्यदृष्टी' यावर 'वसंत' मासिकातून लेखमाला लिहिल्या होत्या व त्यांचे स्वागतही जाणकारांकडून झाले होते. तसेच कुसुमाग्रजांची कथा, शिरवाडकरांच्या एकांकिका आणि नाटिका, शिरवाडकरांचे मुक्तगद्य हेही लेख वेळोवेळी वाङ्मयीन नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले होते व कदाचित ते वा. रा. सोनारांच्या वाचनात आले असावे त्यामुळे त्यांची आणि माझी ही चर्चा त्यांचे घरी चालू असतांनाच क्रांतीचा जयजयकार ! या कुसुमाग्रजांच्या कवितेच्या साह्याने त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाचा शोध घ्यावा असे मी वा. रां. ना सुचविले आणि माझी सूचना तर त्यांना पसंत पडलीच पण हे काम तुम्हीच करा म्हणून त्यांनी सांगितले. वास्तविक त्यावेळी मला जवळ जवळ दोनतीन महिने पुरेल इतकी साचलेली कामे डोळे वटारून होती. पण कुसुमाग्रज या व्यक्तित्वाचा दबदबाच मराठी माणसावर असा विलक्षण आहे की मी त्यांना संपादनासाठी नाही म्हणूच शकले नाही. माझ्या मनानं घेतलं की एका अर्थानं मराठी माणसानं कविवर्यांना दिलेलं ते एक उपायनच ठरेल, ती एक महत्त्वपूर्ण अशी भेटच ठरेल ! आणि माझ्या संपादनाच्या प्रवासाची सुरवात झाली. ही गोष्ट आहे फेब्रुवारी १९८६ मधली. मी मुंबईला परत आले. आणि पहिलं काम केले असेल तर कविवर्य कुसुमाग्रजांना पत्र टाकले. वास्तविक त्यांच्या साहित्याचा बारकाईने मी गेली आठ दहा वर्षे अभ्यास करीत आहे. त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व व त्या व्यक्तिमत्त्वाचे विविध विशेष मला जाणवलेले आहेत. वस्तुत: माधवराव देशमुखांचे तात्यासाहेब जवळचे मित्र होते व नाशिकला गेल्यावर वि. बा. आंबेकर आणि शिरवाडकर यांच्या नेहमी भेटीगाठी होत असत. मी मात्र अजून तात्यासाहेबांना भेटू शकलेले नाही. कदाचित माझा संकोची स्वभावच त्याला कारणीभूत असावा. वास्तविक माझे जावई आणि कन्या श्री. किरण वाघमारे व सौ. आरती वाघमारे सिडकोमध्ये असतांना मी दोनतीनदा नाशकाला जाऊनही आले. तसेच उत्कृष्ट शिक्षकाचे पारितोषिक ज्यावेळी सौ.

भारतीला (सौ. माया) मिळाले त्यावेळी ते तिने तात्यासाहेबांच्या हातूनच स्वीकारले होते व तसे छायाचित्रही आज मजजवळ आहे परंतु त्याकाळात मी 'वसंत 'मध्ये 'कुसुमाग्रजांची काव्यदृष्टी आणि काव्यसृष्टी ' अशी लेखमाला लिहीत होते त्यामुळे उगाचच वाटले की आपण थोडे स्पष्टपणाने लिहीत आहोत, कविवर्यांना काय वाटेल ? पण गंमत आणि की त्याच सुमारास 'वसंत 'च्या संपादकांकडे कुसुमाग्रजांचे हे लेख आवडल्याचे व त्यांनी दखल घेतल्याचे पत्र आले होते. एकूण काय या ना त्या कारणाने कविवर्यांची भेट होऊ शकली नाही. पण आता मात्र ठरविले आहे की 'गर्जा जयजयकार ! एक जागरण ' हा ग्रंथ घेऊनच कविवर्यांना भेटावयाचे !

दरम्यानच्या काळात माझ्या पत्राला त्यांचे उत्तर आले ते माझा उत्साह वाढविणारे कविवर्यांचे पत्र होते. पण त्यात 'एका कवितेवर पुस्तक होईल की नाही याची शंका वाटते. पण सर्व आपल्यावरच मी सोपवितो ' (८-७-१९८६) त्यामुळे मीही हे आव्हान स्वीकारले. कारण एखाद्या लेखकाचा समग्र अभ्यास करून ग्रंथ होऊ शकतो. एखाद्या कलाकृतीची समीक्षा एकत्रित करून ग्रंथ तयार होऊ शकतो. उदा. 'कोसला ' या कादंबरीत असा ग्रंथ तयार झाला आहे. किंवा 'नटसम्राट : समीक्षा 'हाही ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. परंतु एका कवितेच्या साह्याने ग्रंथ-निर्मितीविषयी कुसुमाग्रजांप्रमाणेच प्रा. माधव मनोहर, प्रा. कृ. ब. निकुंब यांनीही विस्मय प्रगट केला होता. त्यामुळे माझी जबाबदारी आणखीनच वाढली. चेतश्रीचे वा. रा. सोनार तसे उत्साही प्रकाशक आणि कुसुमाग्रजांचे साहित्य आणि खुद्द तात्यासाहेब हे त्यांचे परमदैवत ! त्यामुळे त्यांनी सर्व वृत्तपत्रांना एक जाहीर आवाहन* केले. व महाराष्ट्रातून आणि बृहन् महाराष्ट्रातून अनेकांनी ग्रंथाविषयी आस्था दाखविली व आपल्या आठवणी लिहून पाठविल्या. बडोद्याच्या अपर्णा-बाई देशपांडे यांनी 'क्रांतीचा जयजयकार' कवितेवरच एक कविताही करून पाठविली. यावरून एक गोष्ट पुनः एकदा लक्षात आली की तात्यासाहेब शिरवाडकर व्यक्ती म्हणूनही लोक-मानसात घर करून आहेत. आणि त्यांचे साहित्य मराठी माणसाच्या मनावर गुलाबपाण्याचे शिंपण घालीत असते व त्यांच्याविषयी मराठी माणसाला कसा भरभरून आदर आहे.

महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील अनेक मान्यवर लेखकांना मी पत्रे टाकली त्यात राज-कारणी मंडळी जशी होती तशीच समाजवादीही होती. काहींनी पत्राची पोचही दिली नाही पण काहींनी आपल्या बेचाळीसच्या लढ्यात या कवितेने कसे भारावलो होतो हे कळवून पुनः-प्रत्ययाचा आनंद टिपून ठेवला. ही सगळी पत्रे वाचत असताना मी एकदमच मनाशी निर्णय घेतला की या ग्रंथाचे दोन भाग करावेत ! एक म्हणजे उपयोजित समीक्षेच्या साह्याने विविध समीक्षा पद्धतीने ही कविता तपासून घ्यावी आणि कवितेच्या वाङ्मयीन पातळीवरील अभ्यास हा या ग्रंथाचा एक भाग ठेवावा व दुसऱ्या भागात या कवितेच्या साहचर्याने ज्यांनी बेचाळीसच्या लढ्यात ब्रिटिशांच्या आमदानीत हसत हसत तुरुंगवास भोगला अशा काही व्यक्तींचे अनुभव-कथन जसेच्या तसे स्वीकारावे म्हणून सौ. मृणालिनी देसाई, सौ. कुसुम कुळकर्णी, डॉ. सुरेंद्र बारलिंगे, ॲड. चंद्रशेखर धर्माधिकारी यांना विनंती केली आणि त्यांनी आपले लेख माझ्या स्वाधीन केले. डॉ. बारलिंगे, डॉ. सरोजिनी बाबर आणि डॉ. त्र्यं. कृ. टोपे यांच्या लेखात, 'गर्जा जयजयकार ' द्वारे तत्कालीन सामाजिक आणि राजकीय वातावरण आणि भविष्यात आलेली परिस्थिती यांचा तात्विक पातळीवरून शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणजेच 'जागरण' या भागातही अनुभवकथनात वैविध्य आले आणि जाणकार आणि समाजहितैषी म्हणून ज्यांनी आपले उभे आयुष्य वेचले त्यांनी भारताच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचा एक छेद घेतला तोही आजच्या तरुणांना मार्गदर्शक ठरावा. इतकेच नव्हे तर आणीबाणीच्या काळांत जी विचार-वंतांची धरपकड झाली. त्याही वेळी ही कविता गातगात तुरुंगात कसे डांबले गेलो याही हकिकती मला मिळविता आल्या. 'गर्जा... सनातन सूक्त ' निर्धाराचे दिव्य ' 'तुरुंगाच्या भिंती वाकल्या ',

* सोबत लेखाच्या अखेरीस ते जोडले आहे.

गर्जा...आणि आणिबाणी', 'सनातन सूक्त' असे लेख या ग्रंथासाठी मिळाले.

'जागरण' या भागासाठी आलेले लेख स्वतःचे अनुभवकथन आणि तात्त्विक चिंतन आल्यामुळे त्यात वैविध्य येऊ शकेल ! पण गर्जा... या एकाच कवितेच्या समीक्षेत तोच तोपणा येणार नाही का ? अशी शंका चर्चा करताना प्राध्यापक मंडळी आणि मराठीचे जाणकार व्यक्त करीत होते. विविध समीक्षापद्धतीचे उपयोजन यासाठी करून घ्यावयाचे असे मी ठरविले. व सौंदर्यवादी, आदिबंधात्मक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, चरित्रात्मक, कलावादी, आशयवादी आस्वादनपर पूर्वामूल्यमापनात्मक, आकलनात्मक अशा विविध समीक्षा पद्धतींचा अवलंब करून लेखन करावे अशा सूचना मी केल्या आणि सर्वच माझे स्नेही आणि कविवर्यांच्या कवितेवर प्रेम करणारे असल्यामुळे 'गर्जा जयजयकार' या कवितेच्या शीर्षकाच्या प्रश्नापासून परिष्करणाच्या प्रश्नापर्यंत या कवितेचा मूलगामी शोध घेतला गेला आहे. 'क्रांतिकारकाची मिथ्', 'राष्ट्रवादाचे ज्वलंत स्फुरण', 'मृत्युंजयाची गाथा' हे आणि असे जवळ जवळ सोळा सतरा वाङ्मयीन लेख या ग्रंथात संगृहित होणार आहेत.

'विशाखा' हा काव्यसंग्रह १९४२ च्या जुलैमध्ये प्रसिद्ध होईल म्हणून ज्योत्स्नाच्या डिसेंबर १९३९ च्या अंकापासून जाहिरात येत होती व त्याप्रमाणे तो १९४२ साली प्रसिद्धही झाला. नुकतीच त्याची दहावी आवृत्ती पुण्याच्या कॉन्टिनेंटल प्रकाशनाने १९८६ साली प्रसिद्ध केली आहे. 'क्रांतीचा जयजयकार' हे या कवितेचे मूळ शीर्षक नाही. १९४२ च्या पहिल्या आवृत्तीत आणि ज्योत्स्नाच्या दिवाळी अंकात या कवितेचे शीर्षक 'डम्डम्च्या तुरुंगात!' असे होते. ही कविता लिहिली गेली १२ जुलै १९३९ साली आणि प्रसिद्ध झाली. नोव्हेंबर १९३९ 'ज्योत्स्ना' दिवाळी अंकात ! सौ. मनोरमाबाई नावलेकरांच्या कवितेनंतर अंकाच्या शेवटी शेवटी ही कविता छापली आहे.

जीवन आणि कला यांना वाहिलेले अभिनव मराठी मासिक म्हणून मे १९३६ साली 'ज्योत्स्ना' सुरू झाले त्याचे संपादक होते. सर्वश्री वि. स. खांडेकर, खं. स. दौंडकर, वि. ह. कुळकर्णी, प्रभाकर पाध्ये, वा. रा. ढवळे, कवी यशवंत आणि ग. त्र्यं. माडखोलकर. ज्योत्स्नेतून कुसुमाग्रजांच्या 'स्वप्नांची समाप्ती', 'प्रकाशप्रभू', 'तीन कणिका', 'डम्डम्च्या तुरुंगात !', 'हिमलाट', 'दूर मनोऱ्यात', 'पृथ्वीचे प्रेमगीत' 'आगगाडी आणि जमीन', 'हा काठोकाठ कटाह भरा' या कविता जवळ जवळ १९४० पर्यंत प्रसिद्ध झाल्या. डिसेंबर १९४० पासून ज्योत्स्नेचे संपादकत्व प्रा. वि. बा. आंबेकर यांचेकडे गेले आणि नंतरच्या काळात 'ज्योत्स्ना' हे मासिक बंदही पडले. 'विशाखा' मधील सर्व महत्त्वाच्या कविता 'ज्योत्स्ना'मधून प्रसिद्ध झाल्या आहेत असे दिसते. 'विशाखा' या काव्यसंग्रहातील इतर कवितांची बरीच परिष्करणे झालेली आहेत. त्या मानाने 'क्रांतीचा जयजयकार' या कवितेत फारशी परिष्करणे झालेली नाहीत. या कवितेखाली अगदी सुरवातीपासून आज दहाव्या आवृत्तीपर्यंत एक टीप दिलेली आहे. ती अशी—'अन्नत्याग करून मृत्यूच्या दारात पाऊल टाकताना बंगाली राजबंद्यांच्या ओठावर असलेच गाणे स्फुरले नसेल काय ?' पहिल्या आवृत्तीपासून 'बंगाली' हा शब्द गाळून टाकला आहे.

'ज्योत्स्ना' १९३९ च्या दिवाळी अंकात 'डम्डम्च्या तुरुंगात !' या कवितेपूर्वी म्हणजेच अंकाच्या सुरवातीला माधवजूलियन यांची 'रामद्वारी' वा. भ. बोरकरांची 'संध्याकाळी फुललेली कळी' भवानीशंकर श्रीधर पंडित यांची 'सहसंचार' सोपानदेव चौधरी यांची 'निराकार' सौ. मनोरमाबाई नावलेकरांची 'जगातील विषमता' या कविता आल्या आहेत व त्यानंतर अंकाच्या जवळजवळ अखेरीस 'डम्डम्च्या तुरुंगात !' ही कुसुमाग्रजांची कविता आली आहे.

ज्योत्स्नाच्या दिवाळी अंकापूर्वीच्याच अंकात म्हणजे ऑक्टोबर १९३९ च्या अंकात कृष्णाजी बलवंत निकुंब यांची 'क्रांतिज्वाला' ही सोळा कडव्यांची आणि पाच ओळींचे एक कडवे अशी कविता प्रसिद्ध झाली होती. तिचे पहिले कडवे असे होते—

क्रांतिज्वाला ज्वलज्जहाला
खुशाल लावा आग जगाला
आंच लागू द्या जरा नभाला
आहुति न जी जठराग्नीला
दुर्बलतेचे स्तोम कशाला ?

...व्यर्थ नको बडिवार धनाचा

क्रांतिज्वाला ज्वलज्जहाला
चला पेटवा घाला घाला
समता ध्वज भिडवा गगनाला
नव्या दमाचा नव्या युगाचा–!

शेवटचे कडवे...भेदभाव क्रांतीत जळू द्या
ज्वलनानंतर होईल शांती
समृद्धीची दिसेल कांती
तरुण मनाला भरली भ्रांती
दुंदुभिरव–गर्जना झडू द्या !
क्रांतिज्वाला ज्वलज्जहाला–!
।। वंदेमातरम् ।।

क्रु. ब. निकुंब यांची 'क्रांतिज्वाला' आणि कुसुमाग्रज यांची 'क्रांतीचा जयजयकार' या कवितांचे भावाशयाचे असे जवळचे नाते आहे.

कुसुमाग्रज कवी म्हणून प्रसिद्ध पावले ते 'विशाखा' या काव्यसंग्रहापासून आणि विशेषत्वाने गाजले ते क्रांतीचा जयजयकार करणारे कवी म्हणून ! वि. स. खांडेकरांनी 'विशाखा' काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. वि. स. खा.> 'विशाखा' हे नामकरण झाले असावे का ? अशीही मला शंका आलेली आहे. "नव्या जीवनाचा नाद मला ऐकू येत आहे, लक्ष शून्यातून काही श्रेय आकारत आहे." कुसुमाग्रजांचे हे श्रेयस मराठी माती, मराठी संस्कृती आणि मराठी माणूस यांच्याशी एकजीव झालेलं आहे. हा बाधारवड मराठी माणसाला प्रकाशाची कवाडे उघडून देत आहे. त्यांच्या जन्मदिनी तर त्यांचे आपण शुभचिंतन करूच पण या ग्रंथाच्या साह्याने ज्याचे त्याला समर्पित करू या !

२७ फेब्रुवारी १९८७ रोजी कविवर्यांच्या वयाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण होतील. यादृष्टीने हे वर्ष त्यांचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. गेली पन्नास वर्षे कविवर्यांनी महाराष्ट्रातील वाचकाला खूप काही दिले. आज त्यांच्याच काव्यचिकित्सेचा नजराणा 'गर्जा जयजयकार : एक जागरण' या संपादनातून त्यांच्या भव्यदिव्य प्रतिभेस अर्पण करणार आहोत. फक्त खंत एकच राहून गेली ती म्हणजे प्रा. स. शि. भावे महिला विद्यापीठाच्या चर्चासत्रात भेटले असता (ऑक्टोबर १९८६) पुण्याला गेल्यावरोबर लेख पाठवितो म्हणाले पण तो लेख आलाच नाही !

एका कवितेचा शोध घेताना किती प्रकारचे अनुभव संपादकाला येतात. आणि संपादन ही देखील अखेरीस एक कलाच आहे याचाही धाक सतत कसा मनावर असतो या अनुभवातून मी गेले वर्षभर गेले आहे. प्रफुल्लदत्त, क्रु. ब. निकुंब या ज्येष्ठ कविवर्यांनी आपले लेखन तात्काळ तर दिलेच पण मौलिक सूचनाही केल्या. या सर्वांचे ऋण मानण्यापेक्षा ग्रंथप्रसिद्धीनंतरच खरी परीक्षा होणार आहे याची मला जाणीव आहे. तसेच या ग्रंथाच्या निर्मितिप्रक्रियेवर कविवर्यांचेही बारीक लक्ष असावे हाही माझ्या मनी धाक आहे. ग्रंथ संपादनाची एक नवी दिशा दाखविण्याचा जर हा प्रयत्न यशस्वी झाला तर असाच अभ्यास मर्ढेकर, केशवसुत, अनिल बोरकर, यांचाही करता येईल असा मला विश्वास वाटतो ! ■

गर्जा जयजयकार

गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार !
खळखळु द्या अदय शृंखला हातापायात
पोलादाची काय तमा मरणाच्या दारात ?
सर्पांनो उद्दाम आवळा कसूनिया पाश
पिचेल मनगट परी उरातिल अभंग आवेश
तडिताघाते कोसळेल का तारांचा संभार
कधीही तारांचा संभार ।।१।।

पदोपदी पसरुनि निखारे आपुल्याच हाती
होऊनिया बेहोष धावलो ध्येय पथावरती
कधि न थांबले विश्रांतीस्तव, पाहिले न मागे
बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार
होता पायतळी अंगार ।।२।।

श्वासांनो, जा वायुसंगे ओलांडुनि भिंत
अन् आईला कळवा आमुच्या हृदयातिल खंत
सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात
बद्ध करांनी अखेरचा तुज करिती प्रणिपात
तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार
तयांना वेड परी अनिवार ।।३।।

नाचविता ध्वज तुझा गुंतले शृंखलेत हात
तुझ्या यशाचे पवाड गाता गळ्यात ये तात
चरणांचे तव पूजन केले म्हणूनि गुन्हेगार
देता जीवन अर्घ्य तुला ठरलो वेडेपीर
देशिलना पण तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार
आई, वेड्यांना आधार ।।४।।

कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतील त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते
लोहदंड तव पायांमधले खळाखळा तुटणार
आई, खळाखळा तुटणार ।।५।।

आता कर ओंकारा, तांडव गिळावया घास
नाचत गर्जत टाक बळींच्या गळ्यावरी फास
रक्तमांस लुटण्यास गिधाडे येऊ देत क्रूर
पहा मोकळे केले आता त्यासाठी ऊर
शरिरांचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार
मरणा, सुखनैव संहार ।।६।।

—कुसुमाग्रज

चेतश्री प्रकाशनचे निवेदन

देशमुख चाळ, अमळनेर, जि. जळगाव ४२५४०१

स. न. वि. वि.

आपणा सर्वांचे आवडते आदरणीय कविवर्य श्री. कुसुमाग्रज यांचे हे अमृत महोत्सवी वर्ष, 'चेतश्री प्रकाशना'ची मुहूर्त-मेढ श्री. कुसुमाग्रजांच्या शुभ हस्ते ९ ऑगस्ट १९७२ रोजी प्रथम प्रकाशनाने झाली.

'चेतश्री प्रकाशन' अत्यंत कृतज्ञतेने 'श्री. वि. वा. शिरवाडकर/कुसुमाग्रज अमृत महोत्सवी वर्ष' साजरे करू इच्छिते. त्या योजनेतील एक भाग म्हणून 'गर्जा जयजयकार–एक जागरण' हा ग्रंथ सिद्ध करीत आहोत.

आपणास या कवितेने क्रांतिकारी कालखंडात प्रेरणा दिलेली असणार. अनेक मने या कवितेने पेटून उठली. आजही या कवितेचे स्मरण स्फूर्तिदायी ठरते आहे.

या कवितेसंदर्भात आपणाकडून लेखाची अपेक्षा आहे. त्या कालखंडातील आठवणींचा जागर व्हावा. साहित्य समीक्षेला आवाहन करणाऱ्या घटना पुन्हा नमूद व्हाव्यात अशी अपेक्षा आहे. आपले मनोगत, प्रतिक्रिया, वाङ्मयीन समीक्षा कवितेशी निगडित आठवणी इ. बहुविध लेखन अपेक्षित आहे. या ग्रंथाचे संपादन सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. उषा देशमुख यांनी करण्याचे मान्य केले आहे.

'चेतश्री'च्या उपक्रमात आपले सहकार्य, सूचना अपेक्षित आहेत.

आपला नम्र
वा. रा. सोनार

'क्रांतीचा जयजयकार'

"...हे गाणे अमुक एका देशातील, अमुक एका काळातील, अमुक एका पक्षाचे वा पंथाचे अशा स्वरूपाचे राहत नाही. किंबहुना एका अर्थाने हे केवळ त्या राजबंद्यांचेही गाणे नव्हे, काळाच्या अतिभव्य रंगमंचावर दोन प्रबळ शक्तीत झडणाऱ्या अटीतटीच्या संघर्षाच्या एका अवस्थेचे हे एक सनातन तितकेच नित्यनूतन नाट्यचित्र आहे..."

(रमेश तेंडुलकर 'साहित्य : समीक्षा'– वि. वा. शिरवाडकर गौरवग्रंथ- पृ. १५६)

अनुक्रमणिका

वि. वा. शिरवाडकर यांच्या साहित्यातील एक अनुबंध : माती आणि आकाश

तारा सावंगीकर

शाळेत असल्यापासून कुसुमाग्रज आवडायला लागले. १९४४-४५ साली शाहीर अमर-शेखच्या तोंडून 'गर्जा जयजयकार' ही कविता गेयतेच्या रूपानं कानामनात जाऊन बसली. ज्या वयात 'कवित्व-रसास्वाद' ह्या शब्दांची ओळख नव्हती; कवी 'आननी कसा ?' हे माहीत नव्हतं तरी सुद्धा त्यातील स्वरांनी, शब्दांनी मनात घर केलं आणि ही सुंदर कविता लिहिणारा कवी सुंदरच असावा हे समीकरण त्या वयात मनात रुजलं.

आमच्या शालेय जीवनात पाठ्यपुस्तकात लेखक-कवींची छायाचित्रं नसत. भाबडेपणाचं कोवळं वय संपलं. पुढे अनुभवक्षेत्र हळूहळू विस्तारत गेलं. कधीमधी छायाचित्रातून, वृत्तपत्रातून जेव्हा हे दर्शन घडलं तेव्हा कल्पनेनं मनी रेखलेल्या त्या रूपाचा पडताळा आला. शिकताना आणि पुढे शिकविताना त्यातील कवितेनं माझा पाठपुरावा सोडला नाही. लडिवाळ-आश्वासक स्वरासारख्या त्या साथसंगत करीत राहिल्या.

सात-आठ वर्षांपूर्वी नाशिकला गेले असता त्यांच्या शिवाजी पथावरील सरस्वती सदनात कविवर्यांना पाहण्याचा, त्यांच्याशी बोलण्याचा योग आला. डोळ्यावर सुबक चष्मा, चर्या सोशिक, स्नेहशील नजरेतला भाव खूपसा वत्सल, चेहेरा प्रसन्न आणि प्रशांत होता. खोलीत दोन आकर्षक चित्रं होती. लेखन टेबलावरील लाल भडक टपोरे गुलाबाचे फूल आणि कॅलेंडरवरही डौलातील गुलाबफूल. ही सजीव आणि रेखांकित फुलं त्यांच्या वृत्तीतल्या टवटवीतपणाची द्योतक वाटली. दुसरं चित्र होतं अथांग आकाशात झेप घेणाऱ्या गरूडाचं-त्यांच्या कवितेतील जणू नभनाविकाचं ! माझ्या नजरेनं इतरही अनेक सुबक वस्तू न्याहाळल्या. कपाटात पुस्तकांची रेलचेल होती. वाङ्मयीन मुलूखगिरीतील गौरवचिन्हे होती. आवडी-निवडी सूचित करणाऱ्या इतरही वस्तू होत्या बोलायला. सुरुवात कशी करावी ? मनाला झालेला आनंद, वाटणारी कृतज्ञता कशी काही सुचेना. माझ्या गोंधळलेल्या-थांबावलेल्या मनाची त्यांना कल्पना आली असावी.

त्यांनी प्रथमच सुरुवात केली. तुमचं पत्रं मिळालं, तुम्हाला हवी असलेली काही कात्रणं काढून ठेवली आहेत. तुमचं कसं काय चाललं आहे ? अशा सौजन्यपूर्ण शब्दांमुळे माझीही भीड चेपली. संवादाला ओघ आला. एक वळण मिळालं. दीड-दोन तास गप्पा झाल्यात. शंका-कुशंका विचारल्या. बांधेसूद, गोमटं आणि अवसानरहित बोलणं, अहंपणाचा लवलेश नसणारं, दुसऱ्यांचं मनःपूर्वक ऐकून घेणारी वृत्ती यातून त्यांची वाङ्मयीन गंगा छोट्या-मोठ्या विचारलेल्या प्रश्नातून उत्तराच्या रूपानं झुळझुळु लागली. नमस्कार करून परतताना फाटकापर्यंत पोहोच-वायला आले, रोमरोमातून निथळणारी 'माणुसकी' जाणवली. असा हा कवी 'मी नाही अनेकातील एकमेव' तर 'सर्वातील – सर्वांचा – सर्वांसाठी असणारा'-ह्या ओळीतून साक्षांत मला भेटला. नव्हे मी त्यांना भेटायला गेले २७ फेब्रुवारी १९७८ ला !

२७ फेब्रुवारी १९८७ हे त्यांचं अमृतमहोत्सवी वर्ष, त्यांच्याबद्दल, त्यांच्या संपर्कात, सहवासात नात्यात येणाऱ्या अनेक व्यक्तींकडून त्यांच्या मूक आणि निरलस सेवेची, स्थितप्रज्ञवृत्तीची, प्रसिद्धी पराङ्मुखतेची भरपूर माहिती मी ऐकून होते. स्व. वा. रा. ढवळे, डॉ. दातार, श्री. वसंतराव कानेटकर, उपेंद्र दाते, पुणे आकाशवाणीवरील वसंतराव कुळकर्णी, नागपूरला 'वीज'च्या प्रयो-गाला आलेल्या सुधा करमरकर, फैय्याज आणि अगदी परवाला झालेल्या हृदयनाथ मंगेशकरांच्या भेटीत तात्यासाहेबांचा-'अजातशत्रू' म्हणून आलेला उल्लेख ! त्यांचे घर म्हणजे सर्वांनाच असलेले

मुक्तद्वार, सर्वच त्यांच्या निर्मळ आणि त्यागी जीवनाच्या जमेच्या बाजू होत्या.

समाजातील विविध थरातील, व्यवसायातील माणसं त्यांच्याकडे येतात. कवी, नाटककार, प्राध्यापक, सामान्य माणसं कुणीही जावोत, प्रत्येक माणसाला आपल्या स्नेहपूर्ण वागणुकीनं आधार वाटणारं, गमाविलेला आत्मविश्वास केवळ त्यांच्या दर्शनातून परत मिळतो-या अर्थानं हे सारस्वताचं तीर्थस्थानच म्हणायला हवं, आदराने सल्ल्यासाठी, आशीर्वादासाठी, आखलेल्या योजना दाखविण्या साठी, साहित्यिक चर्चासाठी, प्रस्तावना घ्यायला, कवितांची पुडकी-वह्या वाचायला आणि वैयक्तिक समस्या घेऊन जेव्हा येतात त्यावेळी त्यांना इथं अचूक मार्गदर्शन मिळेल असा विश्वास असतो.

लौकिक व्यवहारात आत्मप्रदर्शन, आत्मगौरव ह्यापासून ते सदैव अलिप्त असतात. विशिष्ट प्रसंगांनी भावनांमुळे हेलावणारे, कंठ दाटून येणारे, सन्मानाने मोहरून जाणारे—असे सर्व तात्कालिक आवेग त्यांच्या स्थितप्रज्ञवृत्तीला रुचणारे नाहीत. उपनिषदांनी वर्णन केलेला "आत्मक्रीड-आत्मरति" पण 'क्रियावान' असा हा माणूस समाजमनाशी एकरूप झालेला आहे; आणि

दूर हजारापासुनि आहे । विजनामधी माझे घरटे
मीपण भरले जयात माझे : जे आहे माझ्यापुरते

—अशा दूरस्थ वृत्तीने राहणारा आहे.

ही दूरस्थ वृत्ती माणूसप्रेम टाळणारी नसून आपल्या काव्यातून पृथ्वीतत्त्वाला आकाशतत्त्वाची जी स्वयंभू ओढ आहे ती जपणाऱ्या वृत्तीचे द्योतक आहे. त्यांचं माणसावर जितकं प्रेम आहे तितकंच आकाशावरही आहे. माणूस मूळात चांगलाच आहे पण तो अधिक चांगला व्हावा अशी त्यामागे धारणा आहे. त्यांचं आकाशप्रेम पाहिलं की 'आनो भद्राः ऋतुनो यन्तु विश्वतः' या ऋग्वेदातील वचनाची आठवण येते. (All noble thoughts come to us from all universe)

माती व आकाश : एक अनुबंध

कुसुमाग्रजांचा 'मातीचा पुत्र' केवळ काव्यातूनच नव्हे तर अन्य वाङ्‌मयप्रकारातूनही जेव्हा आकाशाची ओढ व्यक्त करतो तेव्हा त्यांची लेखनप्रेरणा ही माती व आकाश अशा अनुबंधात सामावली आहे असे जाणवते.

मातीचे पण तुझेच हे घर ।
कर तेजोमय वलमय सुंदर
मातीच्या शय्येवर स्वप्ने ।
मेघातील पाहुणे

मातीलाही विलगली आकाशाची आठवण, आठवते कां ?

आकाशाची असीम महती
गणू नका पण हिणकस माती
तत्त्वे आहेत दोनच : आकाश आणि माती
तुमच्यात आणि माझ्यातही
माती आली पृथ्वीतून
आकाश आले अवकाशातून
एक शिरले देहात ।
आणि दुसरे बसले मनात
दोघेही खूप भांडले ।
हिचे काळे...त्याचे निळे
रक्त थोडे सांडले
अखेर जिवात काळीनेच ।
प्रस्थ आपले मांडले
आता माती खजील झाली ।
तिचे काळे करडे कण
आकाशाचा सांदित जाऊन ।
धरतात त्याचे निळेपण

आणि मग—

होता धरा ही पारखी । जावे नभा कोणीकडे ?
तुझिया घरातच वत्सला । हृदयास सांत्वन सापडे

असे जरी ते म्हणत असले तरी त्यांच्या मनातील पुनरावर्तित द्वंद्व

मातीपण मिटता मिटत नाही ।
आकाशपण हटता हटत नाही
आकाश मातीच्या या संघर्षात ।
माझं जखमांचं देणं फिटता फिटत नाही

ह्या शब्दातून ते पुनःपुन्हा मांडतात, मातीची म्हणजे माणसाची दुर्बलता, अगतिकता जेवढी खरी तेवढी त्याची भव्य-दिव्य उदात्त गोष्टींवर प्रेम करण्याची आदर्शवृत्ती अधिक खरी हा भाव त्यामागे असतो.

आकाश प्रेम

कुसुमाग्रज आपलं आकाशप्रेम केवळ काव्यातूनच व्यक्त करतात असं नाही, त्यांचा 'श्रीयुत आकाश' हा लघुनिबंध (आहे आणि नाही पृ. ७५–८३) आणि 'आकाश : एक टिपण' (रूपरेषा पृ. ८–९) या गद्याविष्कारातही ते दिसतं.

'जो आम्हावरी रुसला ।
त्याचा आकाशाशी अबोला'

हे तुकारामाचं वचन सर्वश्रुत आहे. माणसानं आकाशाशी अबोला धरण्याची, त्याच्यावर रुसण्या–रागावण्याची कल्पना आपल्याला किती मजेदार वाटते नाही ! आकाश केवढं, मनुष्य केवढा ! प्रेम करणाऱ्यांमध्ये जशी काही समानता हवी तशी राग आणि वैर करणाऱ्यांमध्येही नको का ? पण कुसुमाग्रजांनी आपल्या एका जीवनलहरीत गवताचं पातं आणि आकाशाचं नातं जोडलं आहे. मोठी माणसं लहान माणसाच्या सुखदु:खाशी जेव्हा एकरूप पावतात, त्यात सहभागी होतात त्यावेळी ह्या लहानांना काय वाटतं, अभिमानानं त्यांचा ऊर कसा दाटून येतो हे सूचित करताना ते म्हणतात–

इवले ते तृण होते । अभिमाने तरतरले
कुठला आनंद तुला । सहजच त्याला पुसले
वदले ते पाहात वर । रात्रभरी हे अम्बर
मजसाठी झुरत रडे । देखा दव अश्रूंचे
(क्रमांक १०६)

कुसुमाग्रजांचा एक आवडता छंद म्हणजे रात्री एकटेपणानी, मैदानावर जाऊन आकाशातील ग्रहनक्षत्रांशी गप्पा मारण्याचा ! आकाशाच्या संगतीत आकाश आकाशच असतं, आपण आपणच असतो–आणि या विषमतेतच परस्पर प्रेमाचं रहस्य कसं दडून बसलेलं आहे ? हे उदार दैवत मला कोणती वत्सलता देतं याचं सहृदय वर्णन त्यांच्याच शब्दात पाहायचे म्हणजे, "आकाशाजवळ निर्घृणता नाही. त्याचा विस्तार जेवढा मोठा तेवढंच त्याचं हृदयही मोठं. जो जवळ येईल त्याला ते हृदयाशी धरतं. सूर्य चंद्राची कंकण घातलेल्या आपल्या निळ्या हातानी त्याला ते कुरवाळतं, उदयास्ताच्या वेळी परिधान केलेल्या भरजरी रेशमी वस्त्रानं त्याच्या डोळ्यातील आसवं टिपून काढतं. घनतमावर राज्य करणाऱ्या शुक्राचं दर्शन देऊन त्याच्या खिन्न, उदासीन मनाला संजीवनी देतं. कारणानं आणि कारणाशिवाय आपलं अंत:करण विषण्ण झालं, विचारशक्ती बधिर झाली, अथवा जीवन शरशय्येप्रमाणं चहुबाजूंनी खुपू लागलं म्हणजे आकाशाइतका उदार, इतका प्रभावी सांत्वनकर्ता आपल्याला अन्यत्र आढळत नाही. नक्षत्रांच्या नेत्रानं आपल्याकडे पाहणारं हे निळं दैवत यात जी अपार गहन शांतता भरली आहे तिचे काही वत्सल थेंब आपल्यापर्यंत येतात; आणि आपलंही चित्त शांत होतं." (श्रीयुत आकाश पृ. ८०)

आकाशातील उदयास्ताच्या वेळचं रंगवैभव प्रतीत करून देताना कल्पनाप्रभू आणि नाटककाराच्या व्यक्तिमत्वातून त्यांना हे आकाश कसं दिसतं हे सांगताना ते म्हणतात, "रंगविलासाच्या भव्यसौंदर्याची ही झगमगीत पेठ पाहून पाहणाऱ्याचे डोळे दिपून जातात. क्षितिजावर इतस्तत: पसरलेल्या मखमली मेघांवर सोनेरी, कुसुंबी : केशरी; लाल, जांभळ्या रंगाचे दैदिप्यमान झोत एकामागून एक सारखे पडत असतात. ती ग्रहताऱ्यांच्या जगातील रंगभूमीच असावी. पाहता पाहता पडद्यांची मखमल बाजूला ओढली जाते. आणि शुक्राची चांदणी (कुसुमाग्रजांचं हीवर अत्यंत प्रेम) एखाद्या अभिसारिकेप्रमाणे मोठ्या डौलात रंगमंचावर प्रवेश करते. केव्हा केव्हा असाही भास होतो की कोणी अदृश्य पुजारी विश्वातील ब्राह्मतत्त्वाची प्रदोषपूजा करायला बसले असून विविध रंगाची अभ्रपुष्पे त्या अनंताच्या पायावर वाहात आहे. आणि नंतर अनंताच्या आरतीला प्रारंभ होतो." (पृ ८१) आकाशाच्या पायापाशी बसल्यावर कोठल्यातरी अबोध भक्तिभावनेनं आपलं मन भरून जातं. परमेश्वर समजून हात सहजपणे जुळून येतात.

आकाशस्थ परमेश्वर

आकाशाच्या भव्यदिव्यतेतच जेव्हा कुसुमाग्रज परमेश्वर शोधू लागतात त्यावेळी त्यांच्या आस्तिक वृत्तीचं दर्शन घडत जातं. कधी 'अप्रत्यक्षपणे आकाशात त्याची चाहूल लागते,' कधी 'अंधारा-

वंर उमटलेली त्याची पाऊलचिन्हे' जाणवतात कधी 'माडीवर वस्ती नाही असं वाटतं पण दाल-नात कुणाची तरी संथ पावलं वाजतात,' कधी 'त्याच्या निळया प्रभेचा दिवा दिसतो,' कधी 'पृथ्वीच्या चरणशिलेवर पाय ठेवून अंतराळात बसलेला विचारमग्न परमेश्वर' त्यांना दिसतो. तर कधी.

ही तुझीच करुणा
माझ्यावर धुवांधार वरसते आहे.
कोणाच्या शब्दातून
कोणाच्या स्पर्शातून
कोणाच्या नेत्रातून
आसवातून, हुंदक्यातून, स्मितातून
व्यक्तातून आणि अव्यक्तातूनही
आणि तुझ्या शोधार्थ
शिणलेल्या माझ्या जाणिवा
उभारीत आहे
तुझे अंतिम आकाशगामी देवालय

–असे कुसुमाग्रजांचे परमेश्वर शोधाचे स्वरूप शेवटी व्यक्तातून अव्यक्तात – आकाशगामी देवालय व्यक्त करण्यात स्पष्ट होते.

माणसाचे सश्रद्ध–अश्रद्ध मन

आकाश जर निराशय, कोणत्याही आकार–मानाच्या, काळाच्या कल्पनांना थारा न देणारे आणि वैचारिक चेतना नसलेले असेल तर त्याच्या अपार भव्यतेची कल्पना कोण निर्माण करतं? तर माणसाचं मन! केवळ आकाशालाच नव्हे तर सर्व वस्तुजाताला आशय आणि सौंदर्य देण्याचं सामर्थ्य लक्षावधी वर्षांच्या उत्क्रांतीनं प्रगल्भ झालेल्या माणसाच्या मनामध्ये आहे–अशा माणसाच्या–मातीच्या पुत्राची महती त्यांना आकाशाइतकीच प्रबलतेने जाणवते.

कुसुमाग्रजांचा पिंड भारतीय आध्यात्मिक आणि नैतिक विचारांवर पोसलेला आहे. पण ते अंधश्रद्धेने परमेश्वराला पूजीत नाहीत. वास्तवाच्या संदर्भात धर्म–नीती–देव या कल्पना पुनः-पुन्हा तपाशीत जातात. ज्यावेळी माणसाला भोगावं लागणारं दुःख, दैन्य, अपमान ते प्रत्यक्ष व्यवहारात पाहतात त्यावेळी देवाच्या अस्तित्वाबद्दल त्याचं मन शंकित होतं. माणसानं ज्यादिवशी दगडातून देव निर्माण करून त्याच्यापुढं आपलं डोकं वाकविलं त्याचदिवशी आपल्या प्रगतीच्या मार्गात एक अनुल्लंघनीय धोंड निर्माण करून ठेवली, आणि हा काल्पनिक देव म्हणजे भित्या भावनेला पोटी घालायसाठी निर्माण केलेला संवेदनाशून्य देव आहे. तो माणसांना कोणतं सक्रीय साहाय्य करणार? त्याच्या व्यथा–वेदना कशा जाणणार? त्यांचे अश्रू कसे पुसणार?– ह्या शंकावर्तात सापडून 'देवाच्या दारी'त त्यांनी परमेश्वराची भरपूर संभावना केली आहे, आणि असशि कुठे तू–अखंड मानवयात्रा तुज शोधते अथवा असशी मृगजळ?– ह्या संदेहामुळे ते माणसाचा स्वसामर्थ्याविद्दलचा आत्मविश्वास

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार।
व्यर्थ हा पुकार तुझ्यादारी
आहेस की नाही आज नसे चिंता।
दोहोमध्ये आता भेद नुरे

–असा व्यक्त करतात.

विभूतीपूजक–श्रद्धाशील मन

कुसुमाग्रजांच्या ऐहिक भक्तिभावनेचा जिवंत आविष्कार समाजाभिमुख कार्यरत असणाऱ्या आणि रचनात्मक कार्य करून सामान्यांना सन्मार्गाला लावणाऱ्या व्यक्तीत आढळतो. 'मार्ग आमुचा रोधु शकती ना धन ना दारा'– ह्या कोलंबसी वृत्तीतून मृतवत् मातीत ज्यांनी चेतना आणली, सामान्यांच्या जीवनाला उजाळा आणताना मातीत आकाश निर्माण केले, तयाला तेजाचा मोहोर आणला, वादळल्या रात्रीही जी नंदादीपाप्रमाणे तेवत राहिली, काजळलेल्या जीवनाची काजळी झटकून तेजाने जगण्याची ताकद दिली अशांबद्दल 'असंख्य हृदयी उभी असत आपुली देवळे' ही कृतज्ञ भावना ते व्यक्त करतात.

ह्या कृतज्ञ भावनेचा परिसर कवी, कलावंत, गायक, सामाजिक–राजकीय आणि ऐतिहासिक क्षेत्रात महनीय कामगिरी करणाऱ्या माणसांनी व्यापलेला आहे. अनेक व्यक्ती काव्यविषय, नाट्यविषय आणि ललितलेखाच्या स्वरूपात पुनःपुन्हा आविष्कृत होत जातात. एका दृष्टीने ही त्यांची अभिव्यक्तीमर्यादा मानावी की काय?– असा संदेह मनात उत्पन्न होतो. उदा. 'मराठी माती'त

'उल्काकारास' ही वि. स. खांडेकरांवरील श्रद्धा व्यक्त होते–

साद मिळो वा शाप मिळो ही मशाल हातातली
जळत राहिली यात साधना
सार्थकता पावली.–

तर 'नंदादीप' (विरामचिन्हे) आणि 'साहित्य-महर्षी' (एकाकी तारा)

यात गद्याविष्कारात हीच भक्तिभावना अधिक परिपुष्ट झालेली दिसते.

भारतीय जनजीवनात चंदनाप्रमाणे झिजणाऱ्या महात्मा गांधीजींवर 'वैष्णव', 'ती संध्याकाळ' ह्या कविता तर 'महात्मा' हा 'प्रतिसाद' मधील लेख विशेषतः १९४२ सालातील मुंबई कॉंग्रेस-मधील 'चलेजाव' ठरावावरील ऐकलेले भाषण यांनी भारावून दुनियेतील निराधारतेच्या तळाशी जाण्याची त्यांची ताकद, दुःखाच्या नि दुर्बलतेच्या अंधारवाडीत रमून 'माणूसकी' जपण्याची त्यांची वृत्ती या विशेषामुळे भारावून गेलेले शिरवाडकरांचे मन त्यात दिसते.

'संत' ही बाबा आमट्यांवरील दीर्घ कविता आणि. 'आनंदवनातील संत' हा लेख, 'बाजीराव : एक मनोगत' (स्वगत पृ. ३६) आणि 'मस्तानी' (मराठी माती पृ. ७१) ह्या कविता तर 'दुसरा पेशवा' हे नाटक आणि 'बाजीरावाचा भाऊ–चिमाजी' हा 'प्रतिसाद' मधील लेख 'कर्ण'–जीवनावर 'सूर्यपुत्र' ही कविता, रथचक्र ही कथा, कौंतेय हे नाटक शिवाय 'प्रतिसाद' मध्ये लेख, – उमरखय्याम' ही कविता आणि 'निशा-पूरचा कवीश्वर' हा 'प्रतिसाद' मधील लेख–अशी आणखी बरीच यादी देता येईल. असे कां व्हावे ? कल्पनादारिद्र्य अथवा विषयदुर्भिक्ष्य हे त्यामागील कारण नसून त्याचे स्पष्टीकरण त्यांच्याच निवेदनात शोधता येते. ते म्हणतात, "एकेका विषयाच्या स्वाधीन होऊन मी अनेकदा एकेक–दोन दोन वर्षे त्या तंद्रीत घालविली आहेत. त्या काळात हे विषय सिंदबादच्या म्हाताऱ्यासारखे मानेवर आवळून बसलेले असतात.

...एखादा विषय आवडण्यासाठी त्याचा समग्र, सांगोपांग परिचय व्हायला पाहिजे असे मला वाटतच नाही. मला जाणवणारी त्यांच्या वैशिष्ट्यांची एखादी जबरदस्त शलाका मला त्या विषयाच्या कक्षेत ओढायला पुरेशी असते. हा विषय लेखनाच्या प्रांतात शिरला की मनात घुसलेल्या त्या एका शलाकेभोवतीच त्यांची जुळणी होऊ लागते." (प्रतिसाद : पृ. ८२–८३) आणि ह्या मानसिक प्रक्रियेतून गद्य–पद्याचा मुक्ताविष्कार घडत जातो. 'कर्ण', 'राणी' (झाशीची राणी), 'ज्योतीराव फुले', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर'–ह्या ऐतिहासिक–सामाजिक क्रांतिकारकांचा आठव व त्यात त्यांनी आपापल्या सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून एकाकी-पणे जी झुंज दिली त्याबद्दलची आदरभावना आहे. माणसांना पुतळे कळतात पण खरी माणसं कळत नाही असा उपरोधिक–विषादाचा सूरही मधूनच उमटलेला जाणवतो.

'ज्योतीराव' मध्ये

तुमचा देहाकार पुतळा
ज्योतीराव आज राजधानीत
राजधानीच्या गर्भागारात
थाटानं उभा राहिला
आनंद वाटला...

–पण एक लक्षात ठेवा, ज्योतीराव

तुम्ही आता फक्त पुतळा आहात
पुतळ्यांना अधिकार नसतो
संतप्त होण्याचा
भोवतालच्या व्यवहारात उतरण्याचा
त्यांना अधिकार असतो फक्त
जयंती...मयंतीच्या हारांचा
आणि एरव्ही
काकादिक पक्ष्यांच्या
विष्ठाप्रधान सहवासाच्या–आणि

'शिवराय' मध्ये

महाराज,
प्रस्थापित आकाशाचा भेद करून
भविष्याचं अंतराळ शोधणारा
तुमचा प्रदीप्त इतिहास
आम्हाला समजत नाही

–अशा स्वातंत्र्योत्तर काळात माणूसनिष्ठा–समाजनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा हरवून बसलेल्या समाजमना-बद्दलची, खंत व्यक्त होते.

ऐकाकीपणा : एक आवडती कल्पना

माणसाच्या एकाकीपणाची कल्पना एकटेपणाने कार्यरत असणाऱ्या व्यक्तींबद्दलचा आदर त्यांच्या सर्वच वाङ्मयीन क्षेत्रात केंद्रस्थानी असलेला आढळतो. काव्य-कथा-नाटक ह्यात ही कल्पना वारंवार ध्वनित होते.

'बापू गोखले' त

> विद्धमनाने, विद्ध कराने
> रुतलेले रथचक्र उपसण्या
> सूर्य सुतापरि तू एकाकी
> करसी संगर
> पराक्रमासह वीर नायका
> दिव्य एकलेपणा तुझा हा
> मुद्रित झाला अमरपणे

इतिहासावर-असा दुसऱ्या बाजीरावाच्या कालखंडातील रंगेल आणि पाटपलंगाच्या जिण्यात सार्थकता मानणाऱ्या समाजमनाच्या पार्श्वभूमीवर काळाला आव्हान देणारा ऐकाकी बापू गोखले त्यांच्या संवेदनशील मनाला काव्यविषय भावतो.

वर्तमानकालीन समाजजीवनावर असा विदारक प्रकाश 'संत' मध्ये

> हे यात्रिका
> विस्कटलेल्या शरीरांचा
> चुरगळलेल्या आत्म्यांचा जथ्था घेऊन
> तू तुझ्या मार्गानं जा
> ....
> तुझ्या अलौकिक वेदनेसाठी
> आम्ही रडणार नाही
> आमच्या जयघोषांच्या जमावातही
> तू राहणार आहेस एकटा
> असेच एकाकीपण
> लाभले होते ख्रिस्ताला
> असेच एकाकीपण
> लाभले होते बुद्धाला
> ज्याच्या प्रज्ञेचे किरण
> मला दिसताहेत तुझ्या पथावर
> तुझ्या एकलेपणाला हीच सोबत
> आणि हेच तुझे संरक्षण

शिरवाडकरांच्या बहुतांशी नाटकांच्या केंद्रस्थानी नायक-नायिकांचे 'एकाकीपण' आहे. ह्या व्यक्तींच्या पाठीमागील संदर्भ पौराणिक-ऐतिहासिक-वर्तमानकालीन राजकीय वा सामाजिक परिस्थितीचा असतो.

'कौंतेय' मध्ये कर्णाची व्यक्तिगत भावसंबंधावरील असीम निष्ठा आणि परिस्थितीच्या संदर्भात काळजाला कळ देणारी नातेसंबंधातील जीवघेणी भावनिक गुंतागुंत यामुळे कर्ण एकाकी, एकटा; निराधार झाला आहे.

'दुसरा पेशवा' मधील बाजीरावाचे अंक ४ प्रवेश १ पृ. ७१ वरील स्वगत पहावे. त्यात एकान्त, एकटेपणा, एकाकी अवस्था, एकटा या शब्दातून त्याची अगतिक अवस्था दिसते. शेवटी या एकाकीपणातून माझी सुटका कर ही व्याकुळता प्रकट होते.

'ययाती आणि देवयानी' मधील ययातीच्या मानसिक एकाकी अवस्थेचा आविष्कार तिच्या आंदोलनासह पृ. ५१ व ५३ वरील एकटा, एकाकी, निराधार एकाकी अहंकार यातून व्यक्त झालेला दिसतो.'

'वीज' मधील राणीची एकाकी अवस्था गंगादास बावांशी झालेल्या संवादातून (पृ. ६१-६१) व्यक्त झालेली आहे.

'नटसम्राट' मधील अप्पा कावेरीच्या मृत्यूनंतर कोसळलेले आभाळ सावरीत एकाकीपणाचं दुःख सोसताहेत.

ह्याशिवाय 'विदूषक' मधील बगाराम एकाकी, 'मुख्यमंत्री' मधील गांधीजींवर व त्यांच्या जीवनमूल्यांवर असीम निष्ठा असणारा मुख्यमंत्री सध्याच्या मूल्यभ्रष्ट आणि भ्रष्टाचारानी लडबडलेल्या समाजात मूल्यनिष्ठ जीवन जगता येत नाही म्हणून 'एकाकीपणा' चं दुःख सोसत आहे.

त्यांच्या कथासृष्टीतील 'एकाकीपणा' सोसणारी 'सीताबाई' (रस) काशीबाई (पाचोळा) बापूजी (बाभळीचं झाड) ह्या सर्व व्यक्तिरेखा दैनंदिन जीवनात उपेक्षित ठरून एकाकी बनलेल्या आहेत.

एकूण, सामान्य आणि असामान्य अशा दोन्ही माणसांच्या 'एकाकीपणा' ची अवस्था त्या त्या

व्यक्तिरेखांच्या अंतरंगाशी समरस होऊन शिरवाडकरांनी प्रतीत केली आहे. यात काही प्रवाहपतित आहेत तर काही प्रवाहाविरुद्ध जाणारी, विशिष्ट श्रद्धांनी आणि मूल्यांनी बांधलेली अशी माणसे आहेत. ह्या सर्वांचे 'माणूस' म्हणून झालेले आकलन आहे. ह्या एकाकीपणाच्या आवरणात त्या त्या व्यक्तीचे 'वेडेपण' त्यांना जाणवते.

वेड कल्पना

परिस्थितीशी झगडणारी, आपल्या लहान मोठ्या कृतींनी आपल्या कार्यक्षेत्राचा परिसर उजळवून टाकणारी माणसे त्यांना 'वेडी' वाटतात. 'वेड–वेडे' ही पुनरावर्तित होणारी आवडती कल्पना. ह्या वेडेपणातले शहाणपण आपल्या व्यवहारी स्थूल दृष्टीला कधीच दिसत नाही. शिरवाडकर तिचे नेमके आकलन करतात. जगाच्या वर्दळीत हे 'वेडेपण' विचित्र वाटते, वेडाच्या भरात बेभानपणे ही माणसे कामं करीत जातात; अंतिम लक्ष्यावरील त्यांचे भान अविचल असते, त्यामुळेच ती सुंदर स्वप्ने पाहतात. स्वप्नभंग हा माणसाचा कायमचा सोबती आहे. पण माणसाचं मोठेपण आपल्या वाट्याला आलेलं सारं दुःख साहून नवी स्वप्नं पाहण्यात आले. हलाहल पचवून अमृताचा शोध घेण्यात आहे. असा भाव ते प्रतीत करून देतात. हे सुंदर जग ह्या वेड्यानी निर्माण केलेले आहे असं त्यांना वाटतं. 'जनावरातून माणसास पुढे नेणारे हे खुळे,' बेभानपणे धावणारे 'वेडात मराठे वीर दौडले सात', आपल्या आईजवळ काकुळतीने 'देशील ना तुझ्या कुशीचा वेड्यांना आधार...सांगा वेडी तुझी मुले ही'–असे म्हणणारे क्रांतिवीर, विविध ध्यासाने पछाडलेले 'वेड्याने खोदले प्रचंड मंदिर। नंतर सुरू हो वेड्याचे पूजन', 'आणि अंती मृत्यूच्या घासात वेडा सापडे', 'म्हणू वेड एक, एक रात्र राहियेले'–अशी ही सामान्य वेडी माणसं त्यांच्या मनात मुरलेली आहेत, जी प्रसिद्धीपासून दूर आणि कार्यनिष्ठेशी बांधली आहेत त्याच्याबद्दलचा आदर अवसर मिळेल तिथे ते व्यक्त करीत जातात.

माणूसप्रेम

शिरवाडकरांची सामान्य आणि असामान्य माणसांबद्दलची भक्ती–प्रेम पाहिलं म्हणजे त्यामागील 'माणूस' शोधण्याचा त्यांचा प्रयत्न लक्षात राहतो, असामान्य व्यक्तिमत्वांची खाजगी वैयक्तिक दुःखं, त्यांचे मनःक्लेश–व्यथा–वेदना समजावून घेण्याबरोबरच काही सामान्य माणसे, त्यांची दुर्बलता, अगतिकता, स्वभावविशेष याकडेही ते सहृदयतेने पाहतात. सामान्य माणूस म्हणजे लोकशाहीचा कणा, लोकशाही जीवनपद्धतीचे मूलद्रव्य, त्याला समजावून घेणे, त्याच्याशी, त्याच्या प्रश्नांनिशी सहानुभूतीने बातचीत करणे, मग तो शहरातला निम्न मध्यमवर्गीय, झोपडवासीय, श्रमजीवी दलित, अल्पसंख्यांक असो अथवा विद्यार्थी कुणीही असो त्या सर्वांबद्दल अविचल निष्ठा, अस्सल आस्था त्यांच्या मनात असते. काव्यात 'चार कोळसेवाले', 'स्मरण', 'अनामिकास', 'बळी' ह्या कविता चटकन आठवतात तर 'एक होती वाघीण'मध्ये शेवट सामान्य माणसाच्या जयजयकाराने होतो.

'हे सामान्या, अतिसामान्या तुझाच जयजयकार।'
आज हा तुझाच जयजयकार
तुझ्या कृपेने दुनियेमधले सर्व उभे वडिवार–

असा होतो. ह्याच संदर्भात शिरवाडकरांच्या 'विदूषक' आणि 'सैनिक' ह्या अतिसामान्य माणसावरील प्रेमाची आठवण आवर्जून होते.

विदूषक प्रेम

शिरवाडकरांचे विदूषक प्रेम त्याच्याबद्दलची आत्मीयता आपणाला विविध संदर्भात प्रत्ययाला येते. सर्कशीचा आकर्षणबिंदू असणारा 'विदूषक', 'विदूषक' हे स्वतंत्र नाटक, 'ययाती'मधील विदूषक हे माणुसकीचा झरा झुळझुळविणारे पात्र, 'विदूषक' ही कविता पहावी, हे विदूषक प्रेम कां? तर त्याचे उत्तर म्हणजे तो निखळ माणूस–अगदी अंतर्बाह्य माणूस असतो हे होय. वरपांगी लोक मोठेपणाचा आव आणतात; अंतस्थ मात्र क्षुद्र असतात. ह्याउलट विदूषक वरपांगी क्षुद्रातिक्षुद्रासारखा दिसतो. पण आतून निर्मळ माणूस असतो. त्याची असंस्कृतता, रानटीपणा, लोकांना

खदाखदा हसविण्याचा प्रयत्न–या त्याच्या वैगुण्यपूर्ण बाबी नाही; वैशिष्टचपूर्ण बाबी आहेत. खोटचा सभ्य संस्कृतीचे ओझे तो बाळगत नाही. स्वत:शी आणि इतरांशी अत्यंत प्रामाणिक असतो.

सैनिक प्रेम

सैनिक हा कुसुमाग्रजांच्या काव्यप्रतिभेचा आस्थाविषय आहे. सैनिकाची कल्पना, त्याचा त्याग, तळहातावर शिर घेऊन लढण्याची तत्परता, सीमा व देशरक्षणाची जबाबदारी या सर्व दृष्टिकोनातून ते त्याच्याकडे भारावून पाहतात. किनारामध्ये 'सैनिक', 'दोन याचक', मराठी मातीत 'गाडीवाला', स्वगतमध्ये 'यंत्र', हिमरेषेत 'सैनिक', 'रक्त तुझे हे', 'खाकी', वादळवेलमध्ये 'जवान' ह्या सर्व सैनिकावरील कविता.

सैनिक ही कल्पना ते तीन प्रकारे स्वीकारतात, एक देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेणारा, दुसरी–महायुद्धाच्या वणव्यात होरपळणारा, तिसरी–स्वातंत्र्योत्तर काळात सीमारक्षण करणारा. देशप्रेम, त्यांचा पराक्रम, त्यासाठी करावे लागणारे आत्मबलिदान या आदर्श कल्पनांवर त्यांचे प्रेम आहेच, शिवाय शांतता आणि सुव्यवस्था असणाऱ्या समाजातील माणसाचे नीतिनियम आणि मरणाचा क्षण केव्हा आणि कसा टपकेल अशा भयावह परिस्थितीत राहणाऱ्या सैनिकांचे नीतिनियम वेगळे, समाजाने यांची उपेक्षा करू नये, हा भाव वस्तुस्थितीच्या स्वच्छदर्शनातून 'यंत्र'मध्ये–

काय मनामधि या यंत्राच्या
अथवा उरले आहे कां मन
पगार काही भत्ता काही
त्यासाठी हे वेदीवरती
चढले जीवन
यंत्र पिते हे केव्हा मदिरा
दिसते कधि वेश्येच्या द्वारी
परी वाहते हेच शिरावर
संस्कृति मंगल राखायाची
अमुच्यासाठी प्राणपणाने
जबाबदारी–

या शब्दात सूचित झालेला आहे. 'खाकी'तील सैनिकाचे मनोगत, माणूस म्हणून असणाऱ्या त्याच्या व्यथावेदना ते अशा व्यक्त करतात.

रेल्वेतला सैनिक पण हा
करात त्याच्या दहीवडयाचा द्रोण असू द्या
स्वरात त्याच्या तक्रारीचा भाव दिसू द्या
मुलें माणसें म्हणता त्याचे नेत्र भिजू द्या
जेव्हा अपुली (टिनोपॉलची)
मुलखी दुनिया सोडुनि जातो
रणगाडे–तोफा तंबूच्या जगात अपुली
जागा घेतो
गळून पडती सर्व जांभया
तक्रारीचा स्वरही विरतो
दूरस्थातील आप्तजनांचा
आठव तेथे विद्ध न करतो
मळकट कवचे (रेल्वेतली) फुटून पडती
आणि सनातन पुरुषार्थाचा
सोलीव गाथा युद्धतळावर उभा राहतो.

हजारो मैलावर दूर त्याचे घर असते. चुलीत जाळ खुपसून श्रमिष्ट व शून्य नजरेने पहाणारी पत्नी, ओटीवर काही शोधणारा व ती कुठे दिसत नाही म्हणून इतस्ततः हाताने चाचपडत काठी शोधणारा वृद्ध बाप, परसामधल्या निंबाखाली अशब्द बसणारी आणि उडण्यासाठी पंख न उकलणारी दोन पाखरे अशा कुटुंबियांचा तो मनोमय आठव करतो, पण कर्तव्यापुढे भावना श्रेष्ठ नसते ह्याची त्याला पुरेपूर जाणीव असते.

लेखनविश्वातील स्त्रीपात्रे

शिरवाडकरांच्या नाटचविश्वात आणि कथाविश्वात त्यांनी जी स्त्रीपात्रे रंगविली त्यात सामान्य आणि असामान्य अशा दोन्ही स्तरावरील स्त्रीपात्रे आहेत. स्त्रीमनाचे विविध उन्मेष नाटककार या नात्याने प्रकट करण्यात ते यशस्वी ठरलेले आहेत.

स्त्री मनाच्या अंतरंगाचा वेध घेताना यात राजघराण्यातील राजकन्या, राणी, राजमाता, दासी ह्या स्त्रिया तर समाज जीवनातील कलावंताची पत्नी, वेश्या, मध्यमवर्गीय नोकरदार, ग्रामीण पातळीवरील स्त्रिया–अशा त्या त्या वास्तवाच्या संदर्भात वावरणाऱ्या विविध स्तरावरील स्त्रीमनाचा तिच्या स्त्रीत्वाचा, मातृत्वाचा

शिरवाडकर जो विचार करतात तो महत्वाचा वाटतो. ह्या सर्वच स्त्रिया त्याग, सहनशीलता, आंतरिक प्रीती, क्षमाशीलता ह्या भारतीय स्त्रीच्या अंगभूत गुणाचा वारसा घेणाऱ्या आहेत. अपवाद आहे 'देवयानी 'चा.

मत्सर आणि सूडबुद्धीने पेटलेली, ऐहिक सत्ता, स्वामित्व-वैभव यामुळे गर्विष्ठ बनलेली अशा स्त्रीचा 'देवयानी' हा नमुना आहे.

ह्या पार्श्वभूमीवर देवयानीचे दास्यत्व स्वीकारणारी राजकन्या शर्मिष्ठा 'माणुसकी' जाणणारी, जागविणारी स्त्री म्हणून रंगवितात.

भारतीय धर्मपत्नीचं सुंदर रूप 'काशीबाई 'त आहे. स्वतः रुग्ण, एकीकडे बुंदेलखंडातून येताना बाजीरावाने आणलेली गृहदेवता याचा मानसिक निषेध तर दुसरीकडे आपल्या न्यूनत्वाची जाण, पतीला नेत्रसुख-शरीरसुख देण्यास असमर्थ याची खंत – अशा मानसिक द्वंद्वात तिला स्वतःशी खूप झगडावं लागतं. पण संयम आणि शांतता यामुळे ती आपला कुठेही तोल ढळू देत नाही.

काशीबाईच्या भावजीवनात आणि पेशव्यांच्या सामाजिक जीवनात खळबळ माजविणारी यावनी 'मस्तानी'-ही देखील अतिशय समंजस स्त्री म्हणून शिरवाडकरांनी रंगविली आहे. ती बाजीरावाच्या पराक्रमाला आपल्या प्रेमाची साथसंगत करते पण त्याच वेळी तो स्वकीयांपासून दुरावत चालला आहे याची सल तिच्या मनात आहे. ह्या परस्परविरोधी भावनांची वीण तिच्या अंतरंगात विणलेली आहे.

राजमाता कुंतीचे दुःख हे पूर्वायुष्यातील चुकीचे मूकपणाने आयुष्यभर स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या दुःखाचे प्रतीक होय.

'सूर्याची पाकळी' हे झाशीच्या राणीचे स्त्रीरूप! पाकळीसारखी नाजूक, हळुवार, ताजी-प्रसन्न, टवटवीत स्त्री जेव्हा राजकारणाच्या आणि युद्धाच्या खाईत उडी घेते तेव्हा तिचे सूर्यासारखे धगधगीत, तेजस्वी व प्रखर रूप ते प्रतीत करून देतात.

'एक होती वाघीण 'मधील अरुंधती म्हणजे सर्वदूर आपलाच हेका चालविणारी, नीतीनियमाच्या कडक बंदोबस्तात स्वतःला बंदिस्त करीत अकारण पुरुष जातीचा तिरस्कार करणारी आहे. जीवनातील छोट्या मोठ्या आनंदावर सरकारी जाहिरनाम्याचे वरवंटे फिरविणारी स्त्री स्वतः व सभोवारच्या सर्वांना जीवनातील सुखापासून वंचित करणारी आहे. नैसर्गिक सुख-शांतीकडे पाठ फिरवून, पुरुषांच्या सहवासात एकमेकांच्या जीवनाचे कोश फुलविणारे प्रेम टाळून निग्रही वृत्तीने राहणाऱ्या स्त्रीचा पराभव एक चित्रकार-कलावंत करतो व तिच्या स्त्रीत्वाला अर्थ आणून देतो. तिचे मानसिक परिवर्तन करतो.

अशा अरुंधतीसारख्या काही दुराग्रही स्त्रिया त्यांच्या कथासृष्टीतही आहेत. स्वातंत्र्याची खोटी हौस मिरविणाऱ्या, पुढे प्रौढवयात जीवनात आलेले पुरुष पण त्यांनाही धिक्कारत आयुष्याच्या शेवटी विषण्ण व खंतावलेल्या मानिनी, वत्सला, ताराबाई ह्या नायिका आहेत.

खेड्यातील स्त्रियांचे ग्रामीण सौंदर्य, त्यांचा रसरशीतपणा, मनाचा भावडेपणा आणि शहरी संसारात रमलेले पुरुष ज्यावेळी ग्रामीण स्त्रियांच्या सहवासात येतात. त्यावेळी त्यांचा किंचित काळ रंगलेला प्रणय, पुढे प्रेमवंचना नंतर त्या स्त्रियांच्या वाट्याला आलेले उपेक्षित जीवन-अशा आमराईतील रंभा आणि फुलवाली या कथात स्त्री मनाचे पैलू शिरवाडकरानी रंगविले आहेत.

दारिद्र्य-उपासमार-दुष्काळ अशा परिस्थितीच्या झंझावातात झपाटलेल्या स्त्रियांचे भावविश्व अतिशय सहृदयतेने त्यांनी उभे केले आहे. यात काही कजाग व भांडखोर स्त्रियाही आहेत. पण हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच बाकी सर्व त्यागी, सहनशील, मूक वृत्तीनं जीवनातील विविध समस्यांना सामोऱ्या जाणाऱ्या आहेत.

निसर्गधर्मामुळे, स्वभावधर्मामुळे, सामाजिक परिस्थितीमुळे, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांच्या वाट्याला वेदनाच वेदना आलेल्या दिसतात. आणि त्या वेदनात शिरवाडकर आपल्या प्रतिभेचे रंग मिसळवितात 'मृगनक्षत्र 'मधील शांता म्हणते, 'आमच्यासारखीचं आयुष्य म्हणजे मृगनक्षत्रासारखं...कायमचं जखमी. मरेपर्यंत पाठीशी पारधी अन् छातीशी बाण.'

'माधवीची कथा 'मधील माधवी म्हणते,


'राभवाचा आणि संपूर्ण संहाराचा लेख आमच्या ाळावर लिहिलेला असतो. त्या क्षणाची वाट ह्यात जगता येईल तसं जगायचं.'

'अपुरं चित्र'ची नायिका म्हणते, 'तुमच्या ावनातून मी स्वतःला हद्दपार करून घ्यायचं ठरविलं आहे. ह्या हद्दपारीत कोणती वेदना आहे मला माहिती आहे.'

याशिवाय 'खरं-खोटं'मधील वत्सला, 'पाच आणि तीन' मधील अनुराधा, 'आघात'मधील मित्रा, 'इंद्रधनुष्याचे तुकडे'मधील दोन अना-ाक कुमारिका,—सगळ्याच शिकाऱ्याने मारलेला ाण पोटात घेऊन धावणाऱ्या हरिणीसारख्या ाहेत. कौंतेयमधील कुंतीच्या वेदना पुनश्च रथचक्र'मध्ये आवृत्त झालेल्या आहेत.

अशाप्रकारे स्त्रीमनाची दुःख, व्यथा-वेदना आपल्या कथात-नाटकात रंगविताना 'एक माणूस' म्हणून तिच्या अंतरंगाचा हळुवारपणे त्यांनी वेध घेतला आहे.

एकंदरीत शिरवाडकरांच्या समग्र साहित्यातून त्यांचं सामान्य आणि असामान्य माणसांबद्दल वाटणारे 'माणूस प्रेम' याची ही रूपरेषा आहे. आपल्या अंतःप्रेरणांशी एकनिष्ठ राहून तितकीच प्रामाणिकता त्यांनी आपल्या वाङ्‌मयीन प्रांतात सांभाळली ह्यातच ते त्याचं वेगळेपण आहे, आकाशाइतक्या उदारवृत्तीचा हा माणूस व्यवहारातल्या आणि वाङ्‌मयीन प्रांतातल्या मातीवर-माणसांवर अकृत्रिम प्रेम करणारा आहे. ■



रेखाटन : हेमंत मानमोडे

क | वि | ता

मनुष्य आणि मनुष्य आणि मनुष्य

माणसात आहे एक माणूस
ज्याला निर्मायची आहे / वधशाला आकाशावर

माणसात आहे दुसरा एक माणूस
जो व्यस्त आहे बंगल्यानंतर कार / कारनंतर
लुटमार करण्यात

माणसात आहे तिसरा एक माणूस
जो व्यग्र आहे बलात्कारात /
प्रत्येक सुंदर शवाबरोबर

(काय खरोखरच ती प्रेतेच होती ?)

आणि अशी कितीतरी माणसे
मनुष्यमक्षी लांडगे /
तुटून पडतात कोणाच्या आतून
करून टाकतात चिंध्या चिंध्या /
सोडत नाहीत एक तुकडाही शाबूत

दूर उभा कोणी नखहीन गिद्ध
वाजवीत घंटा
एका स्वरात कण्हतात ते / पराजिताप्रमाणे
बुद्धं शरणं गच्छामि
धम्मं शरणं गच्छामि
संघं शरणं गच्छामि
□

दंश

दंश
प्रत्येक बाजूने
प्रत्येक प्रकारे
इतके दंश
सर्पदंश !
काळया नागाचे जहर देखील
आता
परिणामहीन !
□

मित्रा !

जन्मभर रडण्यापेक्षा
मित्रा
बरे स्मित करणे
हसणे
खदखदणे सात मजली
मग ते
क्षणकाल का होईना !

मित्रा !
माझ्या मित्रा !!
हसता हसता मरणे बरे
रडता रडता
जगण्यापेक्षा प्रदीर्घकाळ !
□

(डॉ. श्यामसिंह शशी यांच्या हिंदी कवितांचा म. ल. वराडपांडे यांनी केलेला अनुवाद.)

तुरुंग
मनोहर सप्रे

सरळ रेषांसारखे गज आहेत पण–
तुरुंग अलिकडे की पलिकडे
ते मला माहिती नाही
तरी–
अलिकडचे पलिकडच्यांना व
पलिकडचे अलिकडच्यांना मोकळं समजतात.
खरं तर मोकळं कुणीच नाही आणि,
असतीलच तर
फक्त गजच तेव्हढे मोकळे आहेत.

□

सूर्य कोरला गेला नाहीय
प्रकाश खरात

पुनः पुनः असे परावृत्त का करताय ?
काय म्हणता ? वाट वळणाची आहे ?
पण
आत्महत्या करायला मी निघालो नाहीय !

एवढं खरंच
की, रितं आभाळ पाह्यलंय.
नि खंतावलोय
सूर्य कोरला गेला नाहीय हातांनी....

भळभळत्या वेदनेचा
दिवा तरी तेवू द्या !

□

रस्ता
अलोन

मन नसतेच कधी फाटक्या देहात
असे म्हणून विझत डोळ्यांतली वात

मांड खुराड्यांत तुझा टिचका संसार
वाघूळाला कशाला रे प्रकाशाचे घर !

गळा आवळ पुरता चाकोरीच्या फासे
दीन ओठांवर खुळे डकवावे हासे....

रस्ता : सरणापर्यंत–मरणांनी–साध
घड्याळाच्या काट्यावर कलेवर बांध

मात्र जाऊ नको कधी इच्छेला शरण
जिवापलीकडे जप रोजचे मरण.

□

कविता–गावाकडची
इंद्रजित भालेराव

आपण जातो गावाकडं, महिन्यातून एकदातरी
आणि पाहून येतो डोळाभर
माय–बाप–गाव–माणसं आणि शेतीवाडी
आपणाला ने–आण करणारी एस्टी गाडी
इतक्या वेगात नेते–आणते
की सगळंच गरगरायला लागतं
इथं आल्यावर आपण करतो प्रयत्न
जीवाला गारवा मिळवायचा
कथा–कविता–कादंबऱ्या वाचून
तर पुस्तक आपोआप मिटत जातं
मनात एक वादळ उठत जातं
आणि पुन्हा गरगरायला लागतं
गाव–माणसं–शेतीवाडी सगळंच
सुटते एक सुसाट वावटळ
आपण जातो हेलपाटत वाऱ्यावर
पाचोळ्यासारखे
कुणीही करत नाही प्रयत्न
आपणाला वरच्यावर अलगद तोंडात झेलण्याचा
आणि कोऱ्या गाडग्यात पुरुन सोनं करण्याचा

□

अनुक्रमणिका

संवाद : नारायण सुर्व्यांशी

प्रभू राजगडकर

बरे झालेत भेटलात
आपल्याशी मला बोलायचं खूप
इथल्या सारस्वताविषयी / त्यांच्या सिद्धांताविषयी
अलिकडेच आपण भेटलात 'सनद' घेऊन,
आपण स्थापलेल्या विद्यापीठात बरेच विसावले
आपल्यावर उधळलीत फुलेही
आता फार बिझी असता आपण
"बरं का !" ह्या आपल्या शब्दांनी आम्ही सुखावलो
अजूनही आठवते तुमचे 'ब्रह्म' होणे
तेव्हा आपण सुनावलं येथल्या प्रस्थापितांना
आणि उगारली शब्दांची तलवार
तसे हे सावध झाले, त्यांना घ्यावीच लागली दखल
आम्ही भारावून गेलो.
असं आपल्याविषयी आपुलकीस
बरीच होती कारणंही.
आमच्या वाळवंटाला आपणच लावलंत की हो वळण
आपण म्हणालात नां–
"प्रत्येक शब्द हा भूमिकाच घेऊन जन्मलेला असतो"
पर्यायाने माणसालाही असते भूमिका.
आपण हलविलंत गदगदा इथल्या समीक्षकांना
त्यांनी शोधलं तुमच्यात बरंच काही
केलंय् पृथःकरणही तुमचं
उदा. नरहर कुरुंदकर नाहीत का म्हणाले–
"सुर्वे हा माणूस कम्युनिस्ट असेल पण
त्याची कविता ही फक्त त्याच्या व्यथेचा हुंकार आहे"
आता सांगा आपणच,
आपल्या व्यथेच्या हुंकाराला कोणी हो दिला अर्थ !
तात्पर्य, असं की टाकावे लागले उसासे त्यांनाही दम्याच्या रोग्यासारखे.
त्यांची दमछाक पाहून मला हसू आले
जमलं नाही तर ते करतात,
सर्कशीतल्या विदूषकासारखे विनोद.
आपण डोळ्यावरच्या चष्म्यातून न्याहाळता इथला परिसर
आणि सांगत जाता–
माणसासारख्या सृजनात्म्याचं महत्त्व, सोबतच
उद्याच्या येणाऱ्या वास्तवाची हिरवळ
किंवा
आफ्रिकन चाचाशी भेट घडवून देता
नेहरूविषयी सांगतानाच, दांत विचकणाऱ्या

काळोखास इशारा देता.
त्यासाठीच तुम्ही
त्यांच्या काळ्याशार समुद्रात नांगरलय् जहाज
आणि घेऊन आलात जाहिरनांमा
आजच्या उद्याच्या नावाने.
आपण भेटलात म्हणून हे सारं आठवलं बघा,
बरे झाले,
आमच्यासाठी सोबत झाली आपली
आपणच म्हणाला ना–
" कलावंताला व कार्यकर्त्यांना जीवनाच्या
सततच्या प्रगत बाजूला हातात फलक
घेऊन उभे राहावेच लागते."

□

रस्ते

प्रभू राजगडकर

रस्ते–
जंगलासारखे घनदाट
किंवा निष्पर्ण वृक्ष.
रस्ते–
तुकतुकीत / गुळगुळीत कातडीसारखे
किंवा बाभुळवन सुकलेले.
रस्ते–
ओले, ओरबडून निघालेले
त्याची गिट्टी देवी रोग.
रस्ते–
निराकार / निर्विकार
की, संदर्भ जीवनाचे.
रस्ते–
आपण चालतो ते
किती निःशब्द
किती बोलके.

□

तुझ्या गावात...

अशोक काळे

ऐन भर दुपारी तुझ्या गावात आलो तेव्हा
रस्ते अबोल होते
गावपणाच्या खुणा मात्र बोलक्या
मंदिर, मशिद, शाळा......
भावनिक संदर्भ नाकारता येत नव्हते
म्हणून तुझ्याकडेही आलो
खूप बोललो आपण
आवश्यक आणि अनावश्यकही
प्रसंगावधान राखून
एक मनातला प्रश्न मात्र विचारायचा
राहून गेला
" लहानपणी कवितेत वाचल्यासारखी
सायंकाळी पारालगतच्या पिंपळावर
पाखरांची शाळा भरते का तुझ्या गावात? "

□

रक्तपक्षी
लक्ष्मीकांत घुमे

आता कुठे रक्ताळलेले रक्तपक्षी आकाशात उडू लागले आहेत
आता कुठे त्यांच्या पिलांनाही पंख फुटू लागले आहेत
अरे आम्हीही आमचे श्वास बांधले आहेत आकाशात
आजकाल आमचेच चेहरे दिसू लागले आहेत नकाशात
जिथल्या नकाशाची प्रत्येक रेषा आमच्या रक्तांनी आखली आहे
जिथली धरतीही आमच्याच रक्तांनी माखली आहे
रक्ताचाच होईल रक्ताला स्पर्श
असे राखून ठेवलेले रक्तबळ
जशी प्रसववेदना तशी कळ
आता सगळेच हिशोब मुक्तपणे मांडले गेले आहेत
आता कुठे रक्ताळलेले रक्तपक्षी आकाशात उडू लागले आहेत !

□

पेस्टींग
संजय आर्वीकर

किती सारं घडलं या नपुंसक डोळ्यांच्या
साक्षीनं
चक्रव्युहात शिरलेला अजाण अभिमन्यु
तशी माझी अक्षरे होती
बेभान खाटिकांच्या स्वामीनिष्ठ तलवारी
केवळ तळपतात गर्भाशयावर वार करताना
मुंडक्या छाटण्याचे त्यांचे हे कार्य
अव्याहत सुरू असते
शेवटचे पान पूर्ण होईपर्यंत.

“अहो या, या, या,
तुम्ही मुंडक्या छाटत नाही ना आमच्या !
तुम्ही खेळणार ना आमच्या शरीराशी
मग या असे दूर का ?
आमच्याशी खेळ खेळता असा भयभीत
का होतो तुमचा चेहरा
आणि मग फुरफुरतात नाकपुड्या
क्षणभरच अग्निकुंड पेटतं तुमच्या डोळ्यात
आणि मग हळूहळू नपुंसक होत जातात
तुमचे डोळे
तुम्ही महापराक्रमी
बंड मोडून काढणारे वीर
गर्भाशयावर वार करणारे निर्भीड योद्धे”

“आम्ही नाहीत योद्धे–खाटीक–महापराक्रमी
आम्ही आहोत अनुयायी
‘जमीनदोस्त’ साहेबराव पाटलाचे
मुंडक्या छाटणाऱ्या नराधमाच्या कृपेनं
त्याच्या डोळयात पेटले होते एक अग्निकुंड
अश्वत्थाम्याचे प्रतिबिंब
साऱ्याच स्वामीनिष्ठ तलवारी
केव्हातरी गंजून म्यानात जातात
आणि सांगतात
माहित नसलेल्या सर्वव्यापी उत्तराची कहाणी.”

“माझ्या तान्हूल्या अक्षरांनो,
तुम्ही निपचित पडता का थोडेसे
तुम्ही अजरामर आहात ना !
माझ्या दुर्दम्य अश्रूंसोबत
थोडा धीर धरा
बंदुकीतून वेध घेण्यासाठी
सुटणाऱ्या गोळ्यांसारखे तुम्ही याल
अनिर्बंध जगज्जेते !
तेवढं साहेबराव पाटलाच्या
बातमीचं पेस्टींग होऊ द्या !”

□

माझा तबेला कुठे ?
संजय आर्वीकर

घोड्याला नाल बसवावी
तशी पदवी मिळाली
घोडा रपेट मारेल आता जाहिरातींवरून
घोडा वेगवान प्राणी आहे
तो लवकर परिक्रमा पूर्ण करेल.

घोड्याच्या उडीखाली ओढा नाही
म्हणून घोडा चेतक नाही
घोड्यावर खोगीर नाही
म्हणून घोडा दिलगीर आहे
घोड्याची आयाळ म्हणजे
मानेवर उगवलेले शेपूट आहे.

घोडे बेभान असतात
घोडा 'दे-दान' आहे
मालक-पालक पैसे घोड्यावर लावतात
पण सर्व घोडे रेसचे नसतात.

घोडा वरातीत खाली बघतो
घोड्याच्या पाठीवर 'स्वप्न' असतं.
अश्वाचं नृत्य ते !
हुकमी नृत्यानं घोडा मिळवतो समृद्ध तबेला
तबेल्यासमोर घोडा उधळत नाही.

घोडा कुणीच नाही
घोडा नाहीच नाही
घोडा दिलगीर आहे
घोडा मीच आहे.

मी नाच-नाच नाचतो
माझा तबेला कुठे ! माझा तबेला कुठे !

□

छप्पापाणी
प्रमोद मुनघाटे

पुरे झालं पोरींनो आता छप्पापाणी
अग, दमून जाल !
ते पहा आखून ठेवलेयत्
लांबचे लांब चौकोन.
बघा सांभाळून पाय टाका
शनी-मंगळाच्या तिरप्या रेषा
विभागून गेल्या आहेत चौकोनांना
पाय अडकून पडाल-विहिरीत
किंवा जळाल बंद चौकोनी बाथरूममध्ये वगैरे
निमित्त कशाचंही लागत नाही,
भाजीत मीठ कमी झाल्याचं
किंवा-
गालाला बोटभर पावडर
जास्त झाल्याचंही पुरतं !

□

आदिताल
धनंजय देशपांडे

त्या रुद्र तांडवाचा, मी आदिताल आहे
या तामसी जगाचा, संहार मीच आहे.

भस्मातुनी निघावे
या सृष्टीचे फुलोरे
ज्वाळेत अंकुरावे
हे सूर्य चंद्र तारे
नेत्रात बंद माझ्या, सौदामिनी प्रवाहे
वडवानळात जळत्या, गंधीत श्वास वाहे.
धूम्रातुनी वहाती
स्नेहार्द्र शीत वारे
या पेटत्या चितांचे
अंकीत जीव सारे

घन दुष्ट संगराचे, मी कालकूट आहे
हृदयात नित्य माझ्या वात्सल्य ओघ वाहे.

□

संदर्भ
विजया फडणीस

ओठापर्यंत पोचू न शकणारे
काही शब्द
ठेवून दिलेत मी
पर्णहीन झाडाच्या ढोलीत
जेव्हा सारेच संदर्भ बदलतील
अन् झाडांना
कोवळया पालवीची
आठवण येईल
तेव्हा,
अज्ञातवास संपवून
येतील काही अर्थ
ढोलीत ठेवलेल्या शब्दांसाठी
आता मला करायचंय दान
दुथडी भरून वाहणाऱ्या शब्दार्थांचे
आहे कुणी तयार
माझ्या अस्तित्वाचे दान स्वीकारायला!

□

कविता :
अशोक कांबळे

आयुष्याच्या पिसाळलेल्या बाभूळवनात जगताना
रस्त्याकडे उभे ठाकतात प्रश्नांचे ढीग
तेव्हा,—
अख्खं संदर्भाचं बाभूळबन दाटून येतं
पेटत्या निखाऱ्याच्या डोळ्यांत
हंबरडा फोडतो प्रेताच्या जगात
आणि
स्वप्नांचे ढीग घेऊन ठेपतात बुबुळापर्यंत
निसर्गही पोरका बनवितो
इथे तुमचे कुणी नाही म्हणून
वळायला लावतो....
सरणासोबत मरण शोधायला निघता
इथली खिळलेली संस्कृती
आयुष्याच्या पिसाळलेल्या जगण्या / मरण्याला
जाळत बसते....
जाळतच बसते....

□

कहर
गणेश देशमुख

सुने दिवस
उभ्या आठवणींच्या राती
चांदण्याशी खेळण्यात
गुंतलेली माती !
कालच्या आठवणींचा
काळजात दाटलेला भर
तशातच
अजाणत्या येणाऱ्या वादळाची
काळजात दाटलेली थरथर
साऱ्या शिवारभर त्यातच
उदासीचा कहर !

□

बंदिस्त
सदानंद देशमुख

मजला खुणावती का, रस्ते अता नवाडे !
रस्त्यावरील सारे, बहरात गच्च झाडे,

विरहात जीवघेण्या बंदिस्त जाहलो मी
युक्तीहि आठवेना, मुक्तीवरील नामी.

किती काळ कुर्वळावे, सांजावल्या दिशांना
झाला हवा-हवासा, काळोख काजऱ्यांना....

मजला खुणावती का, रस्ते अता नवाडे
भाळी अजून आहे, भोगायचे भवाडे !

□

गंगाधर गाडगीळ : एक शोकात्मिका (उत्तरार्ध)

शशिकान्त लोखंडे

"टीका लेखन सोपं आहे असं वाटणाऱ्या" (संवाद पृ. ७४) गाडगीळांनी खडक आणि पाणी, (१९६०) साहित्याचे मानदंड (१९६२) आजकालचे साहित्यिक (१९८०) पाण्यावरील अक्षरे (१९७९), प्रतिभेच्या सहवासात (१९८५) खाडिलकरांची तीन नाटके (१९७३)–अशी समीक्षापर पुस्तके लिहिली आहेत. 'खडक आणि पाणी'मध्ये जे गाडगीळ जाणवतात तेच 'प्रतिभेच्या सहवासात' (१९८५) मध्ये जाणवतात. म्हणून आपण इथे मर्यादेमुळे त्यांच्या 'खडक आणि पाणी'विषयी इतरांचा विचार पाहू.

गंगाधर गाडगीळांना कोणत्याही प्रकारची वाङ्मयीन भूमिका ठोस वैचारिक बैठक नाही.[१] 'आलोचने'तील एका परीक्षणकर्त्याने 'खडक आणि पाणी' ह्या पुस्तकाच्या संदर्भात यथामूल व यथार्थपणे गाडगीळांच्या साहित्य–विचारांचा खोलपणे परामर्श घेतला, आणि जेव्हा, हे सिद्ध केले गेले तेव्हा गाडगीळांनी प्रत्युत्तर म्हणून अशिष्ट भाषा वापरली,[२] विचाराने विचार खोडावा हे त्यांना मुळीच तेव्हाही साधले नाही, त्यांनी 'तृतीय पंथी आलोचना' असा प्रत्युत्तरात्मक लेख लिहिला. आणि 'आलोचने'तील परीक्षणकर्त्याच्या संदर्भात, असाह्य दुर्बल माणसासारख्या 'तृतीयपंथी' 'वंध्या', 'नपुंसक', 'इंद्रियदौर्बल्य', 'खरुज' अशा शिव्या दिल्या आहेत. ह्या त्यांच्या अशिष्ट भाषाव्यापाराचा प्रत्यय आपणास 'पाळणा' ह्या कथांमधूनही येतो. उदाहरणार्थ, 'षण्ढ', 'भानचोद', 'ढेपीसारखे नितंब', कसे तरी सुटलेले 'ढुंगण', 'चांगली तासडतो त्या पोरीला', 'त्यांनी, ठरविले की तिची यथास्थित भोसडपट्टी काढायची'[३].

गाडगीळ अप्रामाणिक व स्वार्थी बनले आहेत हे सप्रमाण प्रा. ल. ग. जोग ह्यांनी, गाडगीळांनी संस्कृत साहित्यशास्त्र संपूर्ण सलग न वाचल्याचे मो. दि. पराडकर ह्यांनी आणि गाडगीळांनी वेताचे दुय्यमदर्जाचे इंग्रजी ग्रंथकार वाचल्याच्या गैर परिणामाचे चित्र 'आलोचनेतील एक समीक्षक' ह्यांनी व गाडगीळ गर्विष्ठ असल्याचे जगन्नाथ महाजन ह्यांनी–सिद्ध केलेले आहेच.[४]

'खडक आणि पाणी' मध्ये गंगाधर गाडगीळांनी रसविचाराविषयी चर्चा करून, रसविचार 'अडगळी'चा आहे. हा अनभ्यस्तपणे निष्कर्ष काढला आहे, त्या संदर्भात आपण शोध घेऊ :

नवसाहित्याचे स्वरूप कसे आहे ते दाखविणे व त्याचे समर्थन करणे अवश्य झाल्यामुळे हे टीकालेखन आपण केले अशी नोंद स्वतः गाडगीळांनीच केली आहे.[५] परंतु हे नवसाहित्याचे समर्थन नसून आत्मसमर्थन आहे, हे त्यांचे लेखन प्रासंगिक आहे. "साहाजिकच त्यात समर्थनाचा अभिनिवेश

---

१. 'आलोचना' ऑक्टो. १९६३, आणि फेब्रु. १९६४.
२. 'वीणा' जानेवारी १९६३.
३. 'आलोचना' जानेवारी १९६४ पृ. ३९.
४. 'आलोचना' फेब्रुवारी १९६४ पृ. १७ ते २७, (मतान्तरे : आलोचना आणि गंगाधर गाडगीळ.)
५. खडक आणि पाणी १९६० 'प्रास्ताविक' मधून.

व प्रासंगिकतेचा वर्तमानपत्रीपणा हे दोन्ही विशेष आले आहेत, तेव्हा या विवेचनात शुद्ध शास्त्रीय बैठक नाही.[७] मूलत: रसविचार वस्तुनिष्ठपणे समजून न घेता गाडगीळांनी, रसविषयक वर्गीकरण व संख्यानिश्चिती हे रसचर्चेतील महत्त्वाचे अंग आहे असा पूर्वग्रह करून घेतला. रसचर्चा भावनांचे वर्गीकरण करत नाही. रसविषयक वर्गीकरण व संख्यानिश्चिती हे रसचर्चेतील महत्त्वाचे अंग नाही. 'आनंद विचार' हे महत्त्वाचे अंग आहे. काव्य, नाटय वाचून कोणाला किती प्रमाणात आनंद होतो हा रसचर्चेत महत्त्वाचा प्रश्न नाही, आनंद होतो की नाही हे महत्त्वाचे. करुणरसापासून आनंद का होतो हा प्रश्न तर अभिनव गुप्ताने अप्रस्तुत ठरवून टाकला आहे, कारण त्याच्या मताने 'स्वसंविदे'ची चर्वणा हे रसाचे स्वरूप आहे व रसास्वादकाली रसिकाचे अंत:करण निर्विघ्न एवं एकघन अवस्थेत विश्रांत किंवा मग्न होत असल्यामुळे विकृतीचा किंवा दु:खाचा प्रादुर्भाव होऊच शकत नाही. रसास्वाद म्हणजे स्वसंवेदनेचा आस्वाद; लौकिक हर्षशोकांचा अनुभव नव्हे आणि शोक स्वगतसंबंधाने मर्यादित झाल्याशिवाय त्याचा दु:खाशी संबंधच लावता येत नाही, रस हा तर कधीच व्यक्तीशी संबद्ध नसतो. किंबहुना अभिनवगुप्ताच्या मताने अलौकिक प्रतीतिरूप रस काव्यात किंवा नाटयातच असू शकतो. लौकिक व्यवहारात त्याचा प्रत्यय येत नाही. या पातळीची भिन्नता ज्यांना ठेवता येत नाही त्यांनाच शृंगार 'सुख' देतो, करुण 'दु:ख' देतो आणि बीभत्स 'बघवत' नाही. त्यांच्या रसिकतेलाही अपरिहार्यपणे मर्यादा पडतात. 'सर्वे अमी सुखप्रधान: स्व संविच्चवर्णरूपस्य एकघनस्य प्रकाशस्य आनंदसारत्वात्' हे अभिनवगुप्ताचे सर्व आक्षेपकांना चोख उत्तर आहे. रसविषयक वर्गीकरण व संख्यानिश्चिती हे रसचर्चेचे महत्त्वाचे अंग नाही असे मो. दि. पराडकर यांनी दाखवून दिले आहे.[८] "रसचर्चेच्या विवेचनात गाडगीळांची रस-विषयक गृहीत कृत्ये कधी चुकीची आहेत, तर कधी डळमळीत आहेत. त्यामुळे अशा गृहीत कृत्यांवर आधारलेली भूमिका व त्यावरून काढलेले निष्कर्ष ठिसूळ ठरतात; अशक्यतेचे, घातुकपणाचे, दिशाभुलीचे गाडगीळांचे रसचर्चेवरील आरोप (खडक आणि पाणी पृ. ७ आ. १९६०) काल्पनिक आहेत ... असली कपोलकल्पित रसचर्चा गाडगीळांच्या योग्यतेच्या कलावंताला करता येणे कदाचित साहजिक असले, तरी गाडगीळांच्या तोलाच्या अभ्यासकाने ती करावी ही खेदाची बाब. 'मुळात सदोष कल्पनारचना करून घ्यायची व ती सदोष असल्याचा आक्षेप जोरात घ्यायचा असा चमत्कारिकपणा गाडगीळ करतात.[९] गाडगीळांच्या रसविषयक कल्पनेतील गलथानपणा बराच स्पष्ट करून दाखविला गेला आहे.[१०] गाडगीळांच्या (या) अभिप्रायामागे समूळ अभ्यासाचे अधिष्ठान नाही.[११]

इतकेच नव्हे तर साहित्य-विचारांबाबत गाडगीळांची अद्यापी भूमिका मंडनात्मक नाही. त्यांची टीकालेखनाची बाजू ही नकारात्मक-खंडनात्मकच असते. "ही खंडनात्मक भूमिका सिद्ध झाल्यानंतर साहित्यातील सत्याचे स्वरूप काय, साहित्यात वास्तव कशाला म्हणायचे साहित्याचे, नेमके स्वरूप काय, त्याचे घटक कोणते, साहित्याची साहित्यपूर्णता व कलापूर्णता कशात, हे प्रश्न शिल्लक उरतात. या प्रश्नांची अस्तिपक्षी, नेमकी व व्यवस्थित उत्तरे गाडगीळांच्या विविधांगी साहित्यचर्चेत सापडत नाहीत"[१२] हे खरं आहे.

साहित्यचर्चेच्या संदर्भात गाडगीळ जी भाषा, जे शब्द वापरतात ते सुद्धा संदिग्ध असतात.

६. 'आलोचना' आक्टोबर १९६३ पृ. ११.
७. आलोचना फेब्रुवारी १९६४.
८. आलोचना-आक्टोबर १९६३ पृ. १५.
९. कित्ता पृ. १६
१०. कित्ता पृ. १६
११. कित्ता पृ. १८
१२. आलोचना आक्टो. १९६३ पृ. २०.

त्यातून नेमकेपणा, सूचकपणा आढळत नाही.[१३] उदाहरणार्थ, 'काही तरी अधिक', 'संबंध', 'एक प्रकारची', 'स्वतःच', 'कांही', 'विशिष्ट प्रकारची', 'काही तरी' 'एक नवा' 'एक' 'एका निराळ्या' 'काही एक' 'एक विशिष्ट', 'एक अनन्यसाधारण', 'वेगळ्या पद्धतीचा', 'वेगळ्या प्रकारची' या विशेषणात्मक शब्दखंडातून कलावंताच्या अनुभवाचे, त्याच्या पातळीचे. त्यातील संगतीचे, त्याच्या गुणधर्माचे, त्यातील प्रतीक पद्धतीचे, अर्थाचे, आकाराचे, शब्दांच्या रचनेचे किंवा एकंदर रचनेचे, निर्मितीचे, प्रसंग, वस्तू व कवी यांच्यातील संबंधाचे कोणतेही वैशिष्ट्य, गमक निश्चितार्थाने प्रस्थापित होत नाही. ही गोलमाल भाषा अनुशासित, सुसंघटित व स्वच्छ साहित्य ज्ञानाची निदर्शक नाही.[१४] गाडगीळांपाशी साहित्यविषयक किंवा काव्यविषयक तत्त्व किंवा मूल्य theory नाही ... त्यांना साहित्याची किंवा कलेची मंडनात्मक positive भूमिका नाही ... ते विविध विषयांच्या अंगोपांगाच्या चर्चेतून काही विसंगत, गोंधळाची, भ्रामक, अतिरेकी, मोघम किंवा विशिष्टार्थाची निश्चित दिशा न दाखवणारी विधाने करतात...[१५] त्याचे प्रत्यंतर 'पाण्यावरील अक्षरे' (१९७९), 'आजकालचे साहित्यिक '(१९८०), 'प्रतिभेच्या सहवासात' (१९८५) ह्या त्यांच्या समीक्षा-ग्रंथांमधून येते, स्थलाभावी त्याची उदाहरणे द्यायचे मी तूर्तास बाजूला ठेवतो. इच्छुकांनी हे ग्रंथ मूळातूनच वाचून पाहून माझे मत ताडून घ्यावे हे उत्तम. त्यांच्या विचारसरणीतील गोंधळ, अनिश्चितता[१६] अद्यापी बाकी आहे. मी लिहिताना 'सेल्फ कॉन्शस' असतो असे मुलाखतीत म्हणणारे गाडगीळ बेसावधपणा 'खडक आणि पाणी' नंतरच्या त्यांच्या वर उल्लेखित ग्रंथातही दाखवतात.

गाडगीळांना १९६० ते १९८५ ह्या कालावधीतही आपली स्वतःची खास वाङ्मयविषयक भूमिका वाचकांपुढे विशद करता आलेली नाही. ज्यांना पाश्चात्य-समीक्षा ग्रंथ अवलोकन करता आले नसतील त्यांना कदाचित गाडगीळ 'अभिनव' विचारांचे वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. गाडगीळांनी सहजपणे पाश्चात्य—समीक्षक पचवले असते, तर त्यांनी ह्यातून नवी वाट कदाचित शोधली असतीच. गाडगीळांना सौंदर्यशास्त्रमीमांसाही नीट आकलन झालेली नाही.[१७] हे विद्यमान डॉ. रा. भा. पाटणकर देखील सांगू शकतील. शरदचंद्र मुक्तिबोधांच्या संदर्भातील गाडगीळांची समीक्षा अशीच धूळफेक करणारी आहे.[१८] एवढेच नव्हे तर "मराठी लघुकथेचा विचार करताना दिवाकर कृष्णांचा उल्लेखही गाडगीळ करीत नाहीत ... ते खांडेकरांनाही लघुकथेच्या विकासक्रमात स्थान देत नाहीत ... ही भूमिका अनैतिहासिक व म्हणून एकान्तिक वाटते."[१९] कादंबरीच्या क्षेत्रात ते भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, कवितेच्या संदर्भात-अरुण कोलटकर मनोहर ओक, नाटकांच्या संदर्भात आळेकर-एलकुंचवार, कथेच्या संदर्भात अनिल डांगे, जातेगावकर, आशा बगे इत्यादी नव्यांसंबंधीही मूल्यमापन करीत नाहीत.

जी स्वीकृत भूमिका असते ती ग्रंथ-विचार करताना सिद्ध करून दाखविण्याची जबाबदारी स्वतःवरच असते. स्वीकृत भूमिका आणि स्वतःहून केलेली ग्रंथ--रसग्रहणे ह्यात विसंवाद असताच कामा नये. मर्ढेकरांनी आपला लयतत्त्व-विचार विशिष्ट कलाकृतींचे विश्लेषण करताना लावून

---

१३. खडक आणि पाणी (१९६०) पृ. क्र. ४, १०, १२, १३, १४, १६, २०, ३२, ५४-५५, १०१, १०५.
१४. आलोचना आक्टोबर १९६३ पृ. २१.
१५. कित्ता पृ. २१.
१६. कित्ता पृ. २३.
१७. कित्ता पृ. २७.
१८. कित्ता पृ. २६-२७.
१९. कित्ता पृ. २९.

दाखविला आहेच[२०] ती भूमिका त्यांनी अविचल निष्ठेने जोपासली. अशी अविचल निष्ठा वाङ्मयीन भूमिकेच्या व कलाकृतीच्या रसग्रहणाच्या संबंधातील संबंधावाबत गाडगीळांनी जोपासलेली नाही.

प्रत्यक्ष जीवन व त्या संबंधीच्या साक्षात दृश्य प्रतिक्रिया, यांचे निरूपण व विश्लेषण गाडगीळ करीत बसतात. यांच्यापुढे ते जात नाहीत. हेच विश्लेषण व निरूपण कलाकृतीची वैशिष्टये म्हणून गाडगीळ जर मानतात, तर जीवनवादी समीक्षेतून ते निराळे कोणत्या बाबतीत ?[२१] गाडगीळ हे 'प्रच्छन्न जीवनवादी' आहेत. १९८५ सालातही त्यांच्या साहित्य-विचारात बदल झालेला नाही. आपण पाहिलं की त्यांची वाङ्मयीन भूमिका ही शंकास्पद आहे, तरीही 'पाण्या-वरची अक्षरे' (१९७९) च्या प्रास्ताविकात लिहितात की, "हे पुस्तक म्हणजे 'खडक आणि पाणी' या पुस्तकाचे मावंडच आहे. कारण जी वैचारिक भूमिका मी त्या पुस्तकात घेतली आणि ज्या पद्धतीनं साहित्याचं रसग्रहण व समीक्षा केली त्याच वैचारिक भूमिकेचं व समीक्षा पद्धतीचं दर्शन वेगळ्या संदर्भात या पुस्तकातही वाचकांना आढळेल...[२२] साहित्याच्या स्वरूपा-विषयीच्या माझ्या तात्त्विक भूमिकेत गेल्या काही वर्षात फरक पडलेला नाही.[२३] ह्या पुस्तकात 'तत्त्वचर्चा', 'आत्मनिवेदन', 'रसग्रहण आणि समीक्षा' असे तीन विभाग आहेत. लघुकथा, ललितनिबंध, कादंबरी, विनोदी साहित्य आणि काव्य या संबंधीची तत्त्वचर्चा अभिनव नाही, ह्या संदर्भातील वा. ल. कुळकर्णी यांच्याइतकी मूलभूत तत्त्वचर्चा त्यांनी केलेली नाही. उदाहरणार्थ, "चिं. वि. जोश्यांनी चिमणरावांच्या कथात निर्माण केलेलं विश्व हे त्या मानानं पुष्कळच अधिक प्रमाणात प्रत्यक्ष अनुभवांशी मिळतंजुळतं आहे." प्रत्यक्षानुभवाशी मिळतंजुळतं म्हणजे वास्तवाशी मिळतं-जुळतं असा त्याचा अर्थ आणि गाडगीळांना तर साहित्यात 'वास्तव' नसतं असं म्हणायचं आहे. खरं म्हणजे "कोठल्याही कलाकृतीत वास्तवाचे असे जे पडसाद असतात ते विलक्षण परोक्ष रीतीनेच उमटलेले असतात, नाहीतर वास्तव्याच्याच चिंध्यांची एकत्र शिवून बनविलेली गोधडी म्हणजे कलाकृती असे झाले असते"[२४] असे एक मत आहे, ते महत्त्वाचे आहे. पुढे गाडगीळ लिहितात; "शेक्सपिअरचं हॅम्लेट, चेकॉव्हच्या कथा, अगर बालकवींच्या कविता जितक्या अर्थपूर्ण असतात तितक्या वुडहाऊस अगर चिं. वि. जोश्यांच्या कथा अर्थपूर्ण असूच शकत नाहीत"[२५] मूलत: विनोदी कथांच्या स्वत्वाची-सत्वाची तुलना नाटक, कथा, कविता ह्या परस्परभिन्न रूपप्रकारांशी कशी काय होऊ शकते? वरील वाक्यात त्यांनी 'अर्थपूर्ण' अशी एक संकल्पना वापरली आहे. "येथे अर्थपूर्णता हा शब्द वैचारिक आशय या अर्थानं वापरलेला नाही, हे स्पष्ट करण्याची खरं म्हणजे गरज नाही. परंतु तरी ते करतो.'[२६] वस्तुत: 'अर्थपूर्णता' ही संकल्पना वादग्रस्त असूनही अनेकार्थी आहे, ती आपण कोणत्या अर्थी वापरली नाही एवढेच ते सांगतात. परंतु 'अर्थपूर्णता' म्हणजे नेमकं काय ते positive दृष्टचा सांगत नाहीत. असाच प्रकार 'काव्य : सर्वश्रेष्ठ साहित्यप्रकार?' ह्या लेखातही आहे. छंद, ताल, अर्थ ह्या जुन्या परिमाणाच्या अनुषंगाने काव्याची व्याख्या करण्याचा

२०. सौंदर्य आणि साहित्य : बा. सी. मर्ढेकर.

२१. आलोचना आक्टोबर १९६३ पृ. ३०-३१.

२२. पाण्यावरची अक्षरे-१९७९ प्रास्ताविक पृष्ठ क्र. १.

२३. कित्ता पृ. क्र. २.

२४. नौका-डुबी : रवीन्द्रनाथ टागोर अनुवाद डॉ. वि. म. कुलकर्णी, सुरस प्रकाशन, सोलापूर-२, आ. चौथी १९८५ या पुस्तकात "'नौका-डुबी'च्या अनुषंगाने" प्रा. दि. के. बेडेकर ह्यांनी जे लिहिले आहे, त्यातून उद्धृत-पृ. ९.

२५. पाण्यावरची अक्षरे : पृ. १७.

२६. कित्ता पृ. १७.

फसवा प्रयत्न केला आहे. "इथे असा प्रश्न उपस्थित होतो की काव्यात्मक आशय कोणता ? गद्यातून व्यक्त होणाऱ्या आशयापेक्षा तो भिन्न कसा ? हा खरं म्हणजे स्वतंत्र विवेचनाचा विषय आहे" असे लिहून मूलभूत प्रश्नाला डावलून छंद, ताल, अर्थादी गुणविशेषांची "ज्या आशयाच्या अभिव्यक्तीसाठी आवश्यकता असते तो काव्यात्मक आशय"[२७] अशी 'जाता जाता' व्याख्या सुचवतात पण 'जाता जाता' गद्यातील आशयापासून काव्य–आशय भिन्न कसा ? हे सुचवत नाहीत. 'स्वतंत्र विवेचनाचा विषय आहे' म्हणून पलायन करतात. "चार्ली चॅप्लिनचे चित्रपट अनुभवांचे अनेक अर्थपूर्ण आकार आपल्या निदर्शनाला आणतात"[२८] अशा चमकदार वाक्यातून गाडगीळांना काय म्हणायचं आहे, तेही अस्पष्टपणे तरी जाणवावं इतकंही पुरेसं नाही. 'सौंदर्यशास्त्र : एक भाकड खटाटोप' हा लेख कधी तरी लिहू पहाणारे गाडगीळ[२९] सौंदर्यशास्त्रात 'वंध्यामैथुन'[३०] मानतात हे जरा चमत्कारिकच आहे. "मी संस्कृत साहित्यशास्त्र फारसे वाचलेले नाही"[३१] अशी प्रामाणिकपणे कबुली देणारे गाडगीळ अपुऱ्या वाचनाने रस–विचाराला 'साहित्यातील अडगळ' तरी कसे काय मानतात ? "थोडी फार मार्क्सिस्ट टीका" वाचून (मूलतः मार्क्सवाद न वाचता टीकाच वाचणारे) ते मार्क्सवादाला 'भोंगळ तत्त्वज्ञान' कसं काय ठरवतात ?

'दुर्दम्य–लेखकाची भूमिका' ह्यात ते लिहितात, 'दुर्दम्य' ही मराठीतील एकमेव चरित्रात्मक कादंबरी आहे, असा दावा करण्याचा मोह होतो.[३२] ह्या लेखातही भूमिकेपेक्षा आत्मसमर्थनाचाच सूर आहे. लेखकांची आत्मसमर्थने ही वाङ्मयविचाराला योगदानवत ठरली पाहिजेत पण ती अपेक्षा गाडगीळ पूर्ण करू शकलेले नाहीत. 'दुर्दम्य' हे दोन खंडातील लो. टिळकांच्या जीवनावरले लेखन आहे, त्या संदर्भात 'हे चरित्र म्हणजे अगदी कादंबरीच आहे' असं वाचकानं म्हणावं अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यामुळे ना. सी. फडके ह्यांनी 'माझे जीवन : एक कादंबरी' हे जे आत्मवृत्त लिहिले आहे, त्यास कादंबरी म्हणण्याची आपत्ती येते. एकूण कादंबरीच्या संदर्भातील त्यांचं भाष्य पहा, 'मर्ढेकर, पु. शि. रेगे इत्यादी लेखकांनी कादंबरीचे गुणविशेष कोणते हे नीटसे समजून न घेता कादंबऱ्या लिहिल्या. आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की, पु. शि. रेग्यांच्या कादंबऱ्या या चांगल्या आहेत असा उगीच गवगवाही झाला. एखाद्या लेखकाला उगीचच श्रेय मिळाले तर त्याबद्दल फारशी तक्रार करायचे कारण नाही. पण कादंबरीच्या स्वरूपाबद्दल गैरसमज होऊन ती चुकीच्या दिशेने जाऊ लागली तर ती मात्र चिंतेची गोष्ट आहे.'[३३] कादंबरीच्या स्वरूपाविषयी अद्यापही 'निश्चित–तात्त्विक 'नॉर्म्स' ठरलेले नाहीत.' 'कादंबऱ्यांचे इतके प्रकार आज उपलब्ध आहेत की अमूकच वैशिष्टये असलेली कलाकृती, कादंबरी या संज्ञेला पात्र होईल असे म्हणणे अवघड आहे.'[३४] परंतु विवेचनाच्या सोयीसाठी मनात एक विशिष्ट व्याख्या असणं आवश्यक आहे. पण 'त्या व्याख्येच्या चौकटीत न बसणाऱ्या कलाकृतींना कमी दर्जाच्या मानल्या पाहिजेत असे मात्र नव्हे पण त्यांना कादंबरीच्या साहित्य प्रकारात न बसविता मोठेपणा द्यावा. उदाहरणार्थ अरेबियन नाईटस्, गलिव्हरचा

---

२७. कित्ता पृ. २५.
२८. कित्ता पृ. १४.
२९. कित्ता प्रास्ताविक पृ. ४.
३०. कित्ता पृ. ८८.
३१. कित्ता पृ. ८८.
३२. कित्ता, पृ. ६७.
३३. कित्ता, पृ. ११.
३४. 'नौका–डुबी'च्या अनुषंगाने'मधून दि. के. बेडेकर पृ. १३–१४.

प्रवास, स्मृतिचित्रे', 'माझे रामायण', 'रागिणी', 'ब्राह्मणकन्या' इत्यादी खऱ्या अर्थाने कादंबऱ्या ठरणारच नाहीत. म्हणूनच गाडगीळांच्या विचार-चौकटीत रेग्यांच्या कादंबऱ्या न मावल्यामुळे त्या दर्जाहीन ठरून दुर्दम्य 'महान' ठरते, असे होत नाही. पु. शि. रेग्यांच्या कादंबऱ्या ह्या कादंबऱ्या का ठरतात ? तर कादंबरीचा भर घटनांच्या प्रवाहावर नसून काही स्पष्ट व्यक्तिस्वभावांच्या 'गुंतागुंती'वर असतो. कादंबरीमधील व्यक्तींमध्ये असा विशेष दिसतो की, त्यांचे स्वभाव राम किंवा रावण यांच्या स्वभावासारखे अचल, साचेबंद व प्रतीकात्मक नसतात. उलट प्रत्येक व्यक्ती स्वतंत्रपणे विकसणारी असते व तिचे स्वतःचे वैशिष्टच असते. अशा स्वतंत्र व्यक्तींचे परस्परसंबंध अंतरंगातील व बाह्य घडामोडींमुळे जिच्यात स्पष्ट प्रतिबिंबित होऊ शकतात अशा एखाद्या कथेलाच आधुनिक कादंबरीचे रूप येते... कादंबरीला स्वतःची परिपूर्णता, रेखीवपणा व एखाद्या शिल्पाप्रमाणे स्वतःचे व्यक्तित्व असते. आधुनिक कादंबरी आपल्या मर्यादित रेखीव क्षेत्रात व बांधेसूद रचनेत जीवनाच्या एखाद्या कोपऱ्यात घडलेल्या गुंतागुंतीचे स्पष्ट चित्रण करण्यासाठी जन्म घेते."[३५] ह्या सर्वसाधारण निकषावरती 'रणांगण'[१] 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर'[२] 'सात सक्कं त्रेचाळीस'[३] 'सॉलिड वांधे'[४] 'सावित्री अवलोकिता'[५] 'हे ईश्वरराव पुरुषोत्तमराव'[६] 'उलिटा चालिला प्रवाहो'[७] ह्या कलाकृती कादंबऱ्या ठरतात पण गाडगीळांच्या 'लिलिचे फूल' 'दुर्दम्य-खंड १/२' ह्या कादंबऱ्या ठरू शकत नाहीत. त्यांच्या कथांमध्ये बिनचेहऱ्याचे, भागलेल्या चांदोबाचे, किडलेल्या माणसांचेच जग आहे, जीवनाची काळी बाजूच ते रंगवितात. जर त्यांनी निघृंणतेचे गडद काळे चित्र रंगविण्यापेक्षा जुन्यातील वास्तवातील काळेपणावर टीका करीत त्यांच्या भोवतालच्या माणसांच्यात देखील जी माणुसकी दिसते तिचे चित्र रंगविले असते तर श्रेयस्कर झाले असते. पण तेथेही त्यांचा दृष्टिकोन खंडनात्मकच आहे.

तात्पर्य काय, त्यांनी साहित्यविषयक जी तत्त्वचर्चा केली आहे. त्या अनुषंगाने जाणारे त्यांचे लेखन नाही. परंतु 'एकंदरीत मी आणि माझं लेखन याविषयी महाराष्ट्रातल्या संपादकांना आणि वाचकांना बरंच कुतूहल आहे."[३६] हा त्यांनी स्वतःच स्वतःविषयी केलेला गोड-गैरसमज आहे. 'कोसला'बद्दल तर त्यांचा वाईट समज आहे. ती कादंबरी त्यांना Fascinating[३७] वाटते. तर दुसऱ्यावेळी ती व वासूनाका 'धूमकेतू'[३८] सारख्या वाटतात.

गाडगीळ बऱ्याच वेळा काही विधाने करतात पण त्या विधानांचे स्पष्टीकरण तार्किकरीत्या करत नाहीत. उदा. १. कलेला काही प्रमाणात अशुद्धतेची आवश्यकता आहे, हे 'साहित्याचे मानदंड'-मधील विधान २. कारागिरीतून कला निर्माण होते (यासाठी त्यांनी फक्त उदाहरणं दिली 'कीचकवध', 'फडक्यांची प्रवासी', ('वसंत कानेटकरांची नाटके') हे विधान*—अशा विधानांतून काहीही स्पष्ट होत नाही.

आता एकूण साहित्याविषयी त्यांची भूमिका काय ते पाहू : "साहित्याचा हेतू awareness वाढवणे हा आहे. अनुभवांच्या वेगवेगळ्या अवस्था discover करण्याचे व त्याबद्दल अधिक insights देण्याचे कार्य करते. हे गृहीत धरले तर चांगले साहित्य कोणते ? जे माणसाचे महत्त्वाचे मूलभूत जीवस्पर्शी अनुभव व्यक्त करते आणि त्यांच्या विविध संगती दाखवते ते. जी संगती अधिक

---

३५. दि. के. वेडेकर : 'नौका-डुबी'च्या अनुषंगाने पृ. १३-१४.

१. विश्राम बेडेकर, २. भाऊ पाध्ये, ३. किरण नगरकर, ४. राजा राजवाडे,

५. पु. शि. रेगे, ६. श्याम मनोहर, ७. नागनाथ कोत्तापल्ले.

३६. पाण्यावरची अक्षरे (१९७९) प्रास्ताविक पृ. २.

३७. कित्ता, पृ. ८८.

३८. आजकालचे साहित्यिक / (१९८०) प्रास्ताविक पृ. ११.

* पाण्यावरील अक्षरे पृ. ९३.

diverse elements व्यक्त करते किंवा अनेक शक्यता सूचित करते ती अधिक चांगली संगती."[३९] अनुभव व संगती याबद्दल त्यांची ही भूमिका 'साहित्याचे मानदंड'मध्ये व 'पाण्यावरची अक्षरे'-मधील 'रसग्रहण आणि समीक्षात्मक सहा लेखांमध्ये' 'आजकालचे साहित्यिक'मध्ये निकष म्हणून वाचकांच्या प्रत्ययाला येत नाही. साहित्यिकाचे उणेपण व दोष दाखविणे, त्यांच्या लेखनाचे खंडन करणे एवढं ते जे करतात ते सहजपणे ध्यानात येते. 'आजकालचे साहित्यिक'मध्ये 'जी. ए. कुलकर्णी : भोवऱ्यात अडकलेला प्रतिभावंत' 'विजय तेंडुलकर : गाजलेला पण तोकडा नाटककार' 'चि. त्र्यं. खानोलकर : काव्यात न मावणारा कवी' अशी वर्णने विश्लेषणात्मक दृष्टचा करून वाचकांचा 'awareness' कसा वाढावा ?–गाडगीळांची भूमिका अस्पष्टपणे मार्क्सवादी-साहित्यविचारांच्या जवळपास येणारी आहे.[४०] मात्र मार्क्सवादी–साहित्यविचारात पुरोगामी जीवनानुभवाला केंद्रवर्ती स्थान आहे, तेवढे गाडगीळांच्या भूमिकेत नाही, ते diverse elements ला केंद्रवर्ती मानतात, ह्या अर्थाने त्यांच्या भूमिकेचा अर्धा भाग मार्क्सवादी–साहित्यविचारांचा नाही. कलाकृती ही अनुभवावर आधारलेली असते हे गृहीत धरून त्यांनी 'आजकालच्या साहित्यिकां'विषयी लिहिले आहे, वस्तुत: "अनुभव हीच कलाकृती असते, अनुभवावर आधारलेली कलाकृती नसते."[४१] परंतु सर्वच अनुभव कलारूप घेत नाहीत, ज्या अनुभवात स्वनिरपेक्षता, विश्वात्मकता, सर्वस्पर्शित्व व लौकिक भाव–रहितता असते तेच कलारूप पावतात. त्यांना तेव्हा अलौकिकत्व लाभते, अभिनवगुप्ताने 'स्थायी विलक्षणो रसः' ही भूमिका मांडली, वस्तुत: लौकिक स्थायीभाव रसात परिणत होत नाही. व्यक्तिगत स्थायीभाव म्हणजे रती, शोक आदी भावांची निर्मिती व परिपोष करणाऱ्या गोष्टी काव्यांतून किंवा नाटकातून ज्यावेळी प्रकट होतात त्याच वेळी त्यांचे वैयक्तिक स्वरूप नाहीसे होते; त्यांचे विभावात रूपान्तर होते आणि तन्मय होण्याची पात्रता असलेल्या रसिकाच्या ठिकाणी वासना–संस्कार जागृत होतो. हा संस्कार लौकिक स्थायीसारखा दिसतो, पण वस्तुत: अलौकिक असतो. यामुळे होणारा आनंदही लौकिकापेक्षा वेगळा, स्थिर स्वरूपाचा म्हणजे नवीन किंवा अलौकिक असतो....काव्य-स्वादाच्या प्रक्रियेत रसिक स्थायींचा अनुभव घेत असतो (काव्यान्तर्गत व्यक्तींच्या सुखदुःखाचा नव्हे) हेही रसनिष्पत्ती प्रक्रियेच्या मीमांसेतील मत ध्यानात न घेता गाडगीळ कलाकृती अनुभवावर आधारलेली असते असा ग्रह करून घेतात. कलाकृती हाच एक अनुभव असतो, त्यापासून मिळणारा आनंद हा लौकिक नाही, कारागिरीतून निर्माण होणारा आनंद लौकिक व स्वार्थमूलक–वस्तू साक्षीत्वबद्ध असतो, म्हणून कारागिरीतून कला निर्माण होते हेही त्यांचे मत अग्राह्य मानावे लागते. 'कारागिरी' 'सर्वसंवेद्य' नसते, कला 'सर्वसंवेद्य' असावी लागते. 'जीवनानुभव' आणि 'कलानुभव' यांच्यातील तफावत लक्षात न घेता गाडगीळांनी जी. ए., तेंडुलकर–खानोलकर ह्यांना न्याय दिलेला नाही.

गाडगीळांच्या या सर्व लेखन प्रपंचातून काही निवडक गोष्टी घेतल्या, त्यांचेही श्रेय मराठीपुरतेही गाडगीळांना मिळत नाही. उदाहरणार्थ काव्यातील संयमाचा व सूचकतेचा निर्देश त्यांच्या कितीतरी आधी द. के. केळकरांनी केला आहे. सामाजिक संकेतातून वाङ्मयाला मुक्त केले आहे, फडके–रा. श्री. जोग ह्यांनी, लेखकाने कोणत्याही एका दृष्टिकोनाचे गुलाम राहू नये व कलात्मक अनुभव स्वयंपूर्ण असतो या गोष्टीही वा. म. जोशी, रा. श्री. जोग ह्यांनीच त्यांच्या खूप आधी सांगितल्या आहेत. साहित्य वाचकाची इच्छाशक्ती उदात्त करते, जीवनातील वास्तववाद आणि वाङ्मयातील वास्तववाद या दोन गोष्टी भिन्न आहेत हे दि. के. बेडेकर, फडके, आचार्य अत्रे ह्यांनी त्यांच्या आधीच सांगितले आहे. मार्क्सवादी साहित्यविचारांवर कडाडून हल्ला अत्र्यांनी गाडगीळांपूर्वीच चढविला

३९. पाण्यावरची अक्षरे : पृ. ९१.
४०. मार्क्सवादी साहित्यविचार : के. रं. शिरवाडकर.
४१. आलोचना आक्टोबर १९६३.

आहे. कला जिवंत असेल, तर नवा प्रत्यय, नवा अनुभव, नवी जाणीव देईलच; जाणीवेचे क्षेत्र वाङ्मय विस्तृत awareness करते हे विचार १९४२ च्या आधीच प्रभाकर पाध्यांनी स्पष्ट केले आहेत. साहित्याचे 'केवलत्व' गाडगीळांपूर्वीच वा. ब. पटवर्धनांनी सिद्ध केले आहे. "गाडगीळांना हेच सारे विचार व ह्याच भूमिका पटत असतील तर त्यांनी त्या पुन्हा मांडाव्यात. यात अप्रस्तुत काही नाही. पण मग, गाडगीळांची 'वेगळी, स्वतंत्र भूमिका' कोणती? 'मराठी टीकेच्या क्षेत्रातील कोंडी फोडण्याच्या' श्रेयाची अपेक्षा गाडगीळ कोणत्या भूमिकेतून करतात? गाडगीळां-सारख्या मातबर ठरलेल्या मराठी टीकाकाराच्या टीकालेखनाची ही शोकांतिका पाहिल्यानंतर मात्र मन खिन्न झाल्यावाचून राहात नाही."[४२]

गंगाधर गाडगीळ यांच्या लेखनाचे–ललित व साहित्य–विचार पर–मुद्दाम 'खंडन' करावे या हेतूने हा लेख लिहिलेला नसून 'गाडगीळांनी मराठी साहित्याला काय दिलं?' ह्या मला पडलेल्या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेण्याच्या हेतूने लिहिलेला आहे. ■

६ / ११२ स्वातिमित्र,
गुलमोहर मार्ग,
जुहू, मुंबई ४०० ०४९.

---

४२. आलोचना आक्टोबर १९६३ पृ. ३१.

अनुक्रमणिका

लोककथा (१९८६) : उगम आणि व्याप्ती !

राम देशमुख

लोक गंगेच्या गंगोत्रीचा शोध घेत असतांना हातात अचानक 'ग्रंथाली'ची नवी कोरी विज्ञान-कादंबरी आली. लक्ष्मण लोंढे आणि चिंतामणी देशमुख या लेखकद्वयांनी परिश्रमपूर्वक सादर केलेल्या या अप्रतिम कादंबरीचे नावही तसे कुतूहलजनकच आहे– 'देवांसि जिवे मारिले !' जिज्ञासा वाढविणाऱ्या अशा शीर्षकाने सुरू झालेल्या या कादंबरीची अखेरही तशीच धक्कादायक आहे. 'देवांसी जिवे मारिले' या कादंबरीच्या आरंभीच (पृष्ठ ४–५) वाचस्पती नावाच्या पात्राच्या तोंडी जे विचार आले आहेत, त्यांचा एक संकेत लोककथांच्या उगमस्थानाकडे असल्यामुळे त्यांचा प्रस्तुत स्थळी उल्लेख केल्यावाचून राहवत नाही. लेखकद्वय आपल्या पात्राच्या तोंडून असे वदवितात की; 'पृथ्वीच्या विविध भागात इतिहास पूर्वकाळी राहणाऱ्या विविध मानवसमूहांच्या विचारात आश्चर्य वाटावे एवढे साम्य होते. हे मानवसमूह एकमेकांपासून दूर राहात होते, एकमेकांना अपरिचित होते, आणि तरीही त्यांना सारखेच विचार, सारख्याच कल्पना सुचल्या, आणि त्यांनी आपल्या धार्मिक ग्रंथात आणि पुराणात लोककथात जपून ठेवल्या होत्या; आणि पुढच्या पिढीच्या हाती दिल्या होत्या !'

आधुनिक विज्ञानविभूषित संस्कृतीची खोलवर पाळेमुळे प्राचीन संस्कृतीत दडलेली आहेत. सूक्ष्म बीजाची परिणती महावृक्षात झालेली आहे, हाच या संकेताचा रोख दिसतो. जगाच्या पाठीवर नांदलेल्या, नावारूपास आलेल्या आणि प्राचीनतम म्हणून गणल्या गेलेल्या संस्कृती आहेत. सुमेरियन, ग्रीक, बॅबिलोनिअन आणि वैदिक संस्कृतीचा परिचय आपल्याला आहे. लोककथांच्या उगमाचा शोध घेतांना या संस्कृती दीपस्तंभाचे कार्य करतात असा हृद्य प्रत्यय येतो. त्यामुळे या संस्कृतींचा चौरस अभ्यास हे लोककथांच्या अभ्यासकांचे प्रथम कर्तव्य ठरते. कारण लोककथांच्या उगमस्थानांचा शोध हा खऱ्याखुऱ्या अर्थाने आदिम मानवजातीच्या संस्कृतीचाच शोध ठरू पाहतो.

'एरिक फॉन डॅनिकेन' यांच्यासारख्या जिज्ञासू आणि बुद्धिनिष्ठ विद्वानांच्या मते जगाच्या पाठीवर नांदलेल्या बहुविध संस्कृतीपैकी सुमेरिअन संस्कृती ही सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे त्याखालोखाल ग्रीक व भारतीय संस्कृतीचा दर्जा आहे. 'एरिक फॉन' यांच्या मते सर्व धर्मग्रंथांची उत्पत्ती एकाच ठिकाणाहून झाली आहे. हा तर्क जर खरा असेल, तर पृथ्वीवरील सारी आदमजात एकाच सूत्रात बांधली जाते; एवंच मानवजातीच्या संस्कृतीचा पायाही एकच (Common) आहे, असे मानावे लागेल. या संदर्भात एरिक फॉन यांनी 'Chariots of the gods ?' In search of ancient Gods, आणि 'According to the Evidence' ही तीन पुस्तके प्रकाशित केली आहेत. या तिन्ही पुस्तकांचे सारतत्व एकवटून आणणारे मराठीतील एकमेव पुस्तक म्हणजे 'देव ? छे ! परग्रहावरील अंतराळवीर' हे होय. या अनुवादित पुस्तकात बाळ भागवत यांनी संस्कृती–आकलनाच्या प्रक्रियेत येणाऱ्या संभ्रमाचे एक उदाहरण देऊन जे तार्किक वाचकांपुढे मांडले आहे ते सर्वांनाच विचार करायला लावणारे आहे. श्री. भागवत म्हणतात—

'समजा की मानवाच्या दुर्दैवाने अणुयुद्ध झालेच आणि आपल्या सर्व संस्कृती नष्ट झाल्या म्हणून. पाच हजार वर्षानंतरच्या पुराणवस्तू–संशोधकांना न्यूयॉर्क येथील स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याचे

अवशेष मिळाले तर आपण आज करीत आहोत, तसाच विचार तेही करतील. पुतळ्याच्या हातातील मशाल बघून त्यांना वाटेल की ती कोणी अग्नीदेवता आहे म्हणून. किंवा स्वातंत्र्यदेवतेच्या डोक्या-भोवतालचे किरण पाहून त्यांना वाटेल की, कोणत्यातरी सूर्योपासक लोकांची ती देवता आहे म्हणून. कोणत्याही धर्माशी किंवा कोणत्याही पंथाशी संबंध नसलेला भव्य असा स्वातंत्र्यदेवीचा तो पुतळा होता ही कल्पना माणसाच्या मनात येईल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे !'

तर्कनिष्ठा आणि बुद्धिप्रामाण्याला हुलकावणी देणारे असे काही क्षण संस्कृतीच्या इतिहासात असतात. त्यामुळे कोणतेही संशोधन कार्य हे 'पूर्ण' नसते. निर्व्यंग नसते. आणि सार्वकालिक सत्य तर नसतेच नसते. सत्याकडे झालेली ती वाटचाल असते, इतकेच ! दुसऱ्या शब्दात सांगायचे तर संशोधन हे संस्कृतीचे होत असते, होऊ शकते-मानवी भावभावनांचे, त्यांच्या निष्ठांचे संशोधन करणे मानस-शास्त्राच्याही आटोक्याबाहेरचे आहे. लोककथांचा पुराणकथांशी आणि विज्ञानकथांशी मेळ घालताना अर्थातच ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

'सर्व धर्मग्रंथांचे उगमस्थान एकच आहे' असे मानले, तर पर्यायाने सर्व लोककथांचे उगम-स्थानही एकाच तळ्यातून आहे, असे मानणे क्रमप्राप्त आहे. प्रत्येक प्रवाह आपापल्या खाणमातीचा रंग लेवून आला असला तरी त्याची मूळ प्रकृती एक आहे. द्राव्यता तीच आहे. प्रेरणा आणि धारणा एकच आहेत. विशिष्ट परिस्थितीत माणसाचे वर्तन बदलते, अस्मिता बदलत नसते, तसे लोककथांचेही झाले असावे. भित्रेपणा-धृष्टता, अहिंसा-हिंसा, सदाचार-दुराचार, दया-क्रौर्य या परस्परविरोधी विकारविलसितांची माणसे लोककथांतून येतात. या माणसांची, अतिमानवांची Super humans राक्षसांची जगण्याची एक रीत असते. नीती-अनीतीच्या त्यांच्या कल्पना असतात. या सर्व आचार-विचारांचा, रीतीभातींचा दुवा मानवी संस्कृतीशी जुळलेला दिसून येतो. त्यामुळे लोककथा ही पुराणकथा आहे की इतिहासकथा, आख्यायिका आहे की दंतकथा, विज्ञानकथा आहे की कल्पकथा असे प्रश्न उपस्थित होतात.

या प्रश्नांचे उत्तर तसे सोपे आहे. पृथ्वी ही जशी पंचमहाभूतांची बनलेली आहे, तशी लोक-कथाही पुराण, विज्ञान, इतिहास आख्यायिका आणि दंतकथा या पाच घटकांची सरमिसळ होऊन बनलेली आहे.

भारतीय संस्कृतीला ललामभूत अशी रामायण व महाभारत ही महाकाव्ये पाच ते सात हजार वर्षे प्राचीन आहेत.ग्रीकांचे 'इडिपस,' 'ओडेसी' ही महाकाव्ये रामायण महाभारताइतकीच प्राचीन. बायबल हा ग्रंथ वयाच्या दृष्टीने या महाकाव्याहून वडील. पण या सर्वांपेक्षा वयस्कर, प्रगल्भ व परिपूर्ण असे एक महाकाव्य आज मानले जात आहे. हे महाकाव्य म्हणजे 'गिलगामेशचे महाकाव्य !'

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पुराणवस्तूसंशोधनात एक अत्यंत खळबळजनक शोध लागला. हा शोध म्हणजे बारा मृत्तिकापत्रांवर लिहिलेल्या 'गिलगामेश'च्या या अप्रतिम महाकाव्याचा. अक्काडियन भाषेत लिहिलेले हे महाकाव्य असिरियन राजा असूरबानिपालच्या पौराणिक संग्रहालयात मिळाले. 'गिलगामेश'च्या या महाकाव्याचा उगम सुमेरियन संस्कृतीत झाला, ही गोष्ट सिद्ध झालेली आहे. मात्र हे सुमेरियन लोक कोठून आले, पुढे त्यांचे काय झाले या शंकेचे निरसन जगातील कोणताही इतिहास करीत नाही, हो लक्षणीय गोष्ट आहे. 'गिलगामेश'च्या महाकाव्याचा मुख्य धागा आणि-बायबलमधील विश्वोत्पत्तीचा सिद्धांत सारखा आहे.

या सर्व अवलोकनातून एक विधान असेही करता येते की, सर्व प्रकारच्या, सर्व-भाषेतील लोक-कथांची जननी 'गिलगामेशचे महाकाव्य' हीच असावी. दुर्गा भागवत यांनी पंजाब, काश्मिर व अन्य प्रांतातील लोककथा मराठीत आणलेल्या आहेत. या सर्व लोककथा देश आणि वेषपरत्वे भिन्न असल्या तरी त्या राष्ट्रीयतेच्या एकाच सूत्रात बांधलेल्या आहेत. आणि हे सूत्र आहे संस्कृतीचे. आशयविषयांचे

समान घटना आणि घटितांचे. लोककथांच्या विविधतेत अशी एकता असण्याचे कारण त्यांचा उगम एकाच जागी आहे; यापलीकडे दुसरे कोणते असू शकते ?

लोककथा आणि पुराणकथा :

महाभारताच्या कालनिर्णयासंबंधी लो. टिळकांच्या अनुमानाला पुष्टी देणाऱ्या अभ्यासूंच्या संख्येत कूर्मगतीने का होईना, दिवसेंदिवस वाढच होत आहे. सर्व भारतीय भाषेतील विद्वानांना, व चोखंदळ समीक्षकांना आज महाभारतातील विज्ञानाची कधी नव्हे इतकी जाणीव निर्माण झाली, ही समाधानाची गोष्ट आहे. दिल्लीस्थित माधवसिंह दीपक या अमराठी पण साक्षेपी अभ्यासकाचा 'महाभारतातील विज्ञाना'च्या संदर्भातील तर्क उल्लेखनीय आहे. श्री. माधवसिंह यांच्या मते लोकमान्यांचा महाभारताच्या कालनिर्णयासंबंधी केलेला तर्क (इ. स. पू. १४००) विश्वासार्ह वाटतो. कारण– 'इसापूर्व चौथी सदी के नंदवंशी संम्राट के बारेमें उल्लेख मिलता है की, उनका जन्म उसी लग्न मे हुआ था जिसमे उनसे एक सहस्र वर्ष पहले महाराज परिक्षित ने जन्म लिया। महाभारत वास्तव में युद्धविज्ञान का अद्‌भूत ग्रंथ है।'

साऱ्या विज्ञानाचे मूळ महाभारतातच आहे या विधानाची पुष्टी बाळ भागवतही करतात : 'महाभारतात बारा वर्षे दुष्काळ पाडणाऱ्या आणि जन्मसुद्धा न झालेल्या गर्भांचा नाश घडवून आणणाऱ्या अस्त्रांची वर्णने आहेत. कमीत कमी पाच हजार वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या महाभारत या धर्मग्रंथाची व्याप्ती खूप मोठी आहे. आजच्या विज्ञानयुगात आपण प्राप्त केलेल्या ज्ञानाची जाणीव ठेवून तो ग्रंथ पुन्हा व्यवस्थित वाचला पाहिजे.'

या अनुषंगाने विचार केल्यास असा प्रश्न निर्माण होतो की बारा वर्षे दुष्काळ पाडणारे हे जालीम अस्त्र कोणते ? पाशुपतास्त्र, पर्जन्यास्त्र, अग्न्यस्त्र ही नुसती कल्पितेच आहेत की ती भयंकर संहारक अस्त्रे (खरोखरच) होती ! अग्नीबाणासारख्या दाहक शस्त्रांचा त्याकाळी मुक्त वापर करण्यात आला, हे पुढे मागे सिद्ध झाले तर ?

—तर महाभारताचे, रामायणासारख्या प्राचीन ग्रंथांचे पुनरावलोकन करणे अपरिहार्य होईल. आधुनिक विज्ञानाला आव्हान करणाऱ्या या पुराणकथा ह्याच लोककथांचेही जन्मस्थान. म्हणूनच लोककथाही विज्ञानाचे संदर्भ टाळू शकत नाही. परिणामतः अंतराळातून उड्डाणे घेणारे राजपुत्र (की अंतराळ वीर ?), परग्रहावरील राजवाडे 'बारवी विहिरी 'सारख्या गूढ रहस्यमय विहिरी, इतकेच काय आकाशातून उडणारी विमानेही लोककथांतून आली; हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. लोककथांची–केवळ भारतीयच नव्हे तर जागतिक लोककथांची मानसिकता पुराणांकडे झुकणारी आहे. किंवा असेही म्हणता येते की, पौराणिक कथांच्या खाद्यावरच लोककथांची कलमे झालेली आहेत. पुराण हा महासमुद्र आहे. या समुद्रातून भरतीच्या वेळी खाड्यात शिरलेले जे पाणी आहे तेच लोकांनी संस्कार करून लोककथांच्या रूपाने आपापल्या कुवतीनुसार विविध घटात भरले व सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविले ही नाण्याची एक बाजू. या नाण्याची दुसरीही एक बाजू आहे. ही बाजू म्हणजे विज्ञानकथेचीच !

लोककथा ह्याच खऱ्या विज्ञानकथा

'लोककथा याच खऱ्या विज्ञानकथा ' हे विधान सकृद्दर्शनी कुणाला वदतोव्याघात वाटण्याचा संभव आहे. कारण लोककथा ही काल्पनिक कथा असा आपला समज Concept असतो. विज्ञानकथा हीच खरीखुरी वास्तवकथा असाही आपला समजच असतो. परंतु थोडा विचार केल्यास आपले हे समज कसे चुकीचे आहेत याची साक्ष पटेल. थोडी अतिशयोक्ती होईल, पण यापुढेही जाऊन असे म्हणण्याचा मोह अनावर होतो की; लोककथा ही नैसर्गिक वीजेसारखी असून विज्ञानकथा ही कृत्रिम वीजेसारखी आहे. लोककथा ही स्वयंभू असून आधुनिक विज्ञानकथा ही विज्ञानाचा मालमसाला घालून अर्थात् जुळवाजुळव करून तयार केलेला आधुनिक पदार्थ आहे.

या पार्श्वभूमीवर लोककथा ही स्वयंभू विज्ञानकथा कशी हे म्हणणेही स्पष्ट झाले पाहिजे. आईसलँड आणि नॉर्वेच्या आख्यायिका आकाशमार्गाने संचार करणाऱ्या 'देवा'बद्दल सांगतात. 'फ्रिग' ही देवता तिच्या दासीला घोड्यावरून वेगवेगळ्या जगात पाठविते, आणि तो घोडा जमीन आणि पाणी यांना पाय न लावता तरंगतच जातो, तिच्या निरनिराळ्या जगांच्या या प्रवासात आकाशातच तिला वेगवेगळे प्राणीही भेटल्याचा उल्लेख आहे. चंद्र, सूर्य, पृथ्वी, विश्व यांना वेगवेगळी नावे दिलेली आढळतात. त्या काळात सर्वांचच जग इतके संकुचित असताना एकाच गोष्टीकडे असे वेगवेगळ्या तऱ्हेने ते प्राचीन लोक कसे बघू शकत होते ? काल्पनिक म्हणून ज्याची आपण विल्हेवाट लावतो, त्यालाही कुठेतरी सत्याचे अधिष्ठान असतेच. त्याकाळातील–विज्ञान हेच ते सत्य होय.

लोककथांतून विज्ञानाचे व सृष्टिविज्ञानाचे संदर्भ कसे येतात हे पाहणे उद्बोधक ठरेल. विज्ञानाचे प्रत्यक्ष वा परोक्ष सूचन करणाऱ्या अशा कित्येक जागा लोककथांतून दाखविता येतील. उदाहरणार्थ, 'हिरवा चाफा' या 'विदर्भाच्या लोककथे'त षण्मासाचा दिवस आणि षण्मासाची रात्र असलेले प्रदेश प्रस्तुत लेखकाला भेटलेले आहेत. भूखंडावर असा प्रदेश अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्न येथे उपस्थित केला, तर लोककथाकारांना उत्तर ध्रुवाजवळील प्रदेशांच्या कालिक अवस्थेचे ज्ञान होते, त्यांचे सृष्टिविज्ञान आजच्याइतकेच प्रगल्भ होते असे म्हणणे भाग पडते. 'पुष्पक विमान', 'पंखवारु', 'उडणारे खडाव' या अंतरिक्षाशी गुज करणाऱ्या गोष्टी नुसत्या कल्पनेतून कशा येऊ शकतील ? स्वयंवर मंडपात जमलेल्या देशोदेशींच्या राजपुत्रांच्या उपस्थितीत, सहस्रावधी पौरवासियांच्या गराड्यातून शुंडमाळा घेऊन निघालेली गजगामिनी असहाय्य, दिगंबर अवस्थेत भटकणाऱ्या एखाद्या कृषीवलाच्या गळ्यात हार घालून मोकळी होते, ही घटना तशी बोलकी आहे. असे कोणते मॅग्नेट त्या गजगामिनीला आकर्षित करते की, ज्यामुळे ती त्या अठ्ठाविश्वे दारिद्र्याला वरते ?

या सर्व योगायोगाच्या कथानक फुलविण्याच्या दृष्टीने लोककथेत हेतुतः घुसविलेल्या गोष्टी आहेत ? आधुनिक विज्ञान-युगात गुन्हेगाराचा तपास करण्यासाठी कुत्र्यांचा नामी आणि निश्चित उपयोग होतो, हे सर्वविदित आहेच. गुन्हेगार माणसाच्या रक्तात काही विशिष्ट घटक हे जर श्वानांचे मॅग्नेट ठरत असतील, तर हत्तीणीचे घ्राणेंद्रियसुद्धा पात्र–अपात्र व्यक्तीचे विश्लेषण करण्याइतके सक्षम नसेलच असे कसे म्हणता येईल ? आणि लोककथेच्या पहिल्या निर्मात्याला जर या विज्ञानाची सहस्रावधी वर्षे आगावू कल्पना असेल तर लोककथांना आदिम विज्ञानकथा कां म्हणू नये, असा प्रश्न उपस्थित होतो.

लोककथा आणि इतिहास

विज्ञानाशी अशी सलगी करणाऱ्या लोककथा कधी–इतिहासाशीही हातमिळवणी करताना दिसतात. ज्यावेळी स्थळकाळाच्या नावनिशीवार नोंदी लोककथा घेऊ लागते. त्यावेळी ती भक्कम ऐतिहासिक पायावर उभी आहे, असे म्हणणे प्राप्त होते. रंजकता हा तिचा गुणविशेष सोडायला मात्र ती राजी नसते.—म्हणूनच ती लोककथा ! इतिहासकथा आणि लोककथा यांच्या सीमारेषा केरळच्या लोककथांतून जितक्या ठळकपणे स्पष्ट होतात तितक्या अन्यभाषिक लोककथातून होत नाही. 'बिल्वमंगल' या सिद्ध पुरुषाची कथा याचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल.' 'बिल्वमंगला'ची कथा अनेक भारतीय भाषांतून उपलब्ध आहे. आपापल्या प्रदेशाची वैशिष्टचे घेऊन ती साहित्यात अवतरते. केरळीय (मल्याळम्) लोककथेचे एक गाढे व्यासंगी डॉ. एन्. ई. विश्वनाथन् या विधानाचीच पुष्टी करतात. "बिल्वमंगल एक सिद्ध संत थे। भारतभर में प्रसिद्ध बिल्वमंगलके असली जन्मस्थान आदि का सही सही विवरण नहीं मिलता। कई भारतीय भाषाओं में बिल्वमंगल साधु की ज्ञानसिद्धी के संबंध में अनेक कहानियाँ प्रचलित है।"

डॉ. विश्वनाथन यांचे हे उद्धरण लोककथेच्या आशयदृष्टया बहुभाषिक एकसूत्रतेचे प्रमाण म्हणून मुद्दाम प्रस्तुत केले आहे.

अरण्य हा सर्व देशातील, सर्व भाषेतील लोककथांचा मध्यवर्ती बिंदू ! लोककथांचा प्राणच म्हणाना ! लोककथांतील सर्व चमत्कार Spectaculars घडतात ते अरण्यातच. लोककथेतील अरण्ये वगळा की साऱ्या लोककथांचा चोथा व्हायला वेळ लागणार नाही.

'सोन्याची छडी' ही अशीच एक अरण्यप्रधान बंगाली लोककथा. या कथेत अरण्याच्या हृदयस्थ एक चमत्कारिक राजवाडा आहे. हा राजवाडा वर्षानुवर्षे मृतप्राय आहे. त्यातील राजा, राजाचा दरबार, मंत्री, प्यादे सर्व शिल्पस्थ पुतळयासारखे विश्रब्ध बसून आहेत. राजा बोलता बोलता जणू काही अचानक थांबला आहे—

राजकन्या सुवर्णमंचकावर डोळे मिटून पहुडलेली आहे. कुठल्यातरी अतींद्रिय शक्तीने जित्या-जागत्या माणसांची ही पाषाणावस्था करून सोडली आहे. ही मंडळी मेलेली नाही, फक्त निद्रिस्त आहे. वर्षानुवर्षे, युगानुयुगे ! जणू कुणी देवदूत येऊन त्यांना जागविणार आहे ! लोककथेतील निद्रिस्त जगाचा हा संसार खरं तर इतिहासातील मोहेंजोदाडो–हडाप्पा संस्कृतीचे स्मरण करून देणारा आहे. कल्पनेचा एवढा मोठा प्रपंच सत्याच्या अधिष्ठानाशिवाय उभा राहील, असे म्हणवत नाही. लोक-कथांनी सत्याचे हे अधिष्ठान कसे प्राप्त केले असेल ?

पुरातत्व विभागाकडून मोहेंजोदाडो–हडाप्पा संस्कृतीचा अंतर्वेध घेतल्या गेला त्याला आता कुठे पाव शतक लोटले आहे. हजारो वर्षाच्या लोककथांतून या मोहेंजोदाडो हडाप्पाप्रणीत नगरप्रासादांची जी वर्णने येतात ती नुसत्या कल्पनेतून अशी वासलात लावणाऱ्या तर्कशक्तीचे दिवाळे निघाले, असे म्हणण्याशिवाय अन्य पर्याय नाही. ■

संदर्भ ग्रंथ

(१) Chariots of the gods ?–एरिक फॉन डॅनिकेन
(२) In Search of Ancient Gods–एरिक फॉन डॅनिकेन.
(३) According to the Evidence–एरिक फॉन डॅनिकेन
(४) 'देव ? छे ! परग्रहावरील अंतराळवीर–अनु. बाळ भागवत. 'अजब पुस्तकालय' कोल्हापूर.
(५) 'देवांसि जिवे मारिले !'–लक्ष्मण लोंढे–चिंतामणी देशमुख 'ग्रंथाली', मुंबई
(६) 'केरल की लोककथाएँ–डॉ. एन् ई. विश्वनाथन्–राजपाल एन्ड सन्स, देहली.
(७) कादम्बिनी वसंत अंक–फेब्रुवारी १९७९.

३० 'विजय' जि. प. क. गृहनिर्माण
पो. विदर्भ महाविद्यालय
अमरावती ४४४६०४

'अक्करमाशी'च्या निमित्ताने

मधु जामकर

श्री. शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' हे आत्मकथन श्री विद्या प्रकाशनच्या वतीने इ. स. १९८४ मध्ये प्रकाशित झाले. लेखकाच्या शब्दात सांगायचे झाल्यास "प्रत्येक गावात पाटील जमीनदार असतात. त्यांची रांड असते. या रांडेच्या मुलांच्या व्यथा लोकांना कळाल्या पाहिजेत हे सांगण्यासाठी मला 'आत्मकथा'च जवळची वाटते." या आत्मकथेत अक्करमाशी संततीचे प्रश्न जाहीरपणे समाजशास्त्रज्ञ व मानववंश शास्त्रज्ञांना विचारले आहेत. विवाहबाह्य संबंधातून जन्मलेली, आंतरजातीय असलेली संतती व तिच्यापुढील यक्षप्रश्न येथे आलेले आहेत. 'गाव, भाषा, आई, वडील, जात, धर्म या सर्व बाबतीत मी दुभंगलेला, व्यक्तिमत्व हरवलेला. माझ्या अस्तित्वाला अनौरस म्हणून हेटाळलेलं.' असे हे लेखकाचे मनोगत आहे. त्याने संपूर्ण आत्मकथनभर जे सामाजिक, वैवाहिक, जातीय, पारंपारिक, धार्मिक व सांस्कृतिक प्रश्नांचे मोहोळ उठविले आहे, त्यांनी वाचक अक्षरशः सुन्न होतो. 'माझा जन्मच अनैतिक ठरवला जात असेल तर मी कुठल्या नीती पाळू ?' या प्रश्नाने आत्मकथनाचा शेवट होतो. 'कोनं बगितलाय जन्मण्यापूर्वी आपल्या मायबापाचा संभोग ?' या प्रश्नाने तर साऱ्या आत्मकथनाचा नूरच बदलून जातो. 'म्या सवर्ण का ? तर माय अस्पृश्य. म्या अस्पृश्य का ? तर बाप सवर्ण. म्या जरासंधासारखा. अर्धा गावात तर अर्धा गावाबाहीर फेकलेला. म्या कोन ? माझी नाळ कुणाशी ?' या प्रश्नात लेखकाने 'अक्करमाशी'चे मर्मग्राही दुःख सांगितले आहे. 'माझी माय का झाली बलात्काराला राजी ? कशासाठी वाढवला हा कडू गर्भ ? म्या जन्मल्यावर कुणी वाटले पेढे कुणाला ? कुणी केली मायीला चोरचोळी ? कुणी केलं माझं बारसं ? म्या कुणा वंशाचा वारस ? कुण्या हक्काच्या बापाचा पोर ?' लेखक जेव्हा ही निरुत्तर करणारी प्रश्नावली विचारतो तेव्हा सुन्न झालेला वाचक अंतर्मुखतेने समाजाकडे पाहू लागतो. 'शेवटी म्या कुठं मरनार ? कुठं जगनार ? माझ्या नेमक्या कुळचा कुठं ?' याही प्रश्नात लिंबाळे अंतरीची व्यथा अधिक बोलकी करून देतात. समग्र आत्मकथनात लेखकांनी अशा कितीतरी प्रश्नांची कलात्मक पेरणी करून वाचकास सुन्न केले. या साऱ्या प्रश्नांची उत्तरे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक पातळीवर सोडवता येणार नाहीत, इतकी आजही आपली समाजरचना, मनोरचना कठोर झालेली आहे.

वस्तुतः लिंबाळे यांनी सडतोड, रोखठोक प्रश्नातून ज्या 'अक्करमाशी' पुढील समस्यांचे स्वरूप सांगितले तेच इ. स. १९३० मध्ये डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी आपल्या 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीत सांगितले आहे या कादंबरीत कालिंदीपुढे असेच प्रश्नांकित जीवन आहे. कालिंदी पतित कां झाली, तिच्या पतित अवस्थेला कोणती सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती कारणीभूत झाली याचा शोध घेणारी आणि तिला समाजात पुन्हा मानाचे जिणे जगण्यास समर्थ कसे करता येईल या संबंधी समाजशास्त्रीय भूमिकेवरून उपाययोजना सुचविणारी अशी सुबुद्ध सहानुभूती लेखकाजवळ आहे. विवाहाचे बंधन न स्वीकारता शिवशरणाप्पाजवळ राहणारी व म्हणूनच रूढ नैतिक कल्पनांच्या दृष्टीने व्यभिचारी ठरणारी कालिंदी स्त्री पुरुषाचे स्वामित्व झुगारून देऊन मातृसत्ताक कुटुंबपद्धती[illegible] ती प्रयोग करते. अर्थात डॉ. केतकर हे 'प[illegible]स्थितीवादी' असल्याने आवश्यक ते शैक्षणिक संस्कार केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात इष्ट ती सुधारणा कार्यक्षम करता येते यावर त्यांचा मनोमन विश्वास आहे. कादंबरीच्या शेवटी जी 'वैजनाथस्मृती' येते तिचे स्वरूप लेखकाच्या या मनोभूमिकेचे आहे. कालिंदी हळवी पण स्वतंत्र विचाराची आहे. उदा.— तिने केलेला गृहत्याग. 'जात' आडवी आल्याने

एक प्रकारची विकृत चिकित्सक दृष्टी तिच्यात आली. शिवशरणाप्पाकडे ती विवाहाशिवाय तशीच राहते ती या दृष्टीमुळेच. संस्कार असलेली कालिंदी संस्कार नसलेल्या शिवशरणप्पाजवळ टिकू शकत नाही. शिवशरणाप्पापासून तिला मूल होऊनही ती त्याला सोडते. पुढे एसतेरच्या सहाय्याने कामगार पुढारी रामाराव, सुविद्य व नव्या दृष्टीने जगाकडे पाहणारा–त्याच्याशी कालिंदी जवळिक करते. रामारावला 'अनूढ मातृत्वाबद्दल'च्या विचारांचे अपुरेपण वेळीच कळते व तो कालिंदीशी विवाहबद्ध होतो. लग्नानंतर कालिंदीचे मन सामाजिक प्रश्नांतून अजिवात उडते. ती संसारात रमते. या कादंबरीत शेवटी जी 'वैजनाथस्मृती' येते त्यात जी विवाहनीती येते तिचे स्वरूप म्हणजे स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही कर्तृत्व विकासाला समाजात जीवनाच्या विविध क्षेत्रात भरपूर वाव मिळावा. विशेषत: द्रव्यार्जन करणाऱ्या व म्हणून स्वसंरक्षणक्षम आणि अपत्य संरक्षणक्षम असलेल्या स्त्रीला पुरुष स्वामित्वाच्या जाचातून आपली मुक्तता करून घेण्यास संधी मिळावी, याकरिता समाजात एकाचवेळी पितृसत्ताक आणि मातृसत्ताक अशा दोन्ही कुटुंबपद्धती असल्या पाहिजे. ठाशीव, रेखीव, व क्वचित उग्र भाषेत डॉ. केतकरांनी आपली मते वैजनाथस्मृतीत दिलेली आहेत. ती रसहानी करीत नाहीत, उलट विचारार्ह बनतात.

'ब्राह्मणकन्या' आणि 'अक्करमाशी' यात आशयदृष्ट्या बरेच साम्य दिसते. 'ब्राह्मणकन्ये'त चितोपंत व मंजुळा, अण्णासाहेब डग्गे आणि शांता बाई आणि पुढे कालिंदी अशी परंपरा आहे. म्हणजे कालिंदीच्या आजी–आजोबा पर्यंतचाच इतिहास मिळतो. 'अक्करमाशी'मध्ये देखील लेखक स्वत:चा इतिहास आईच्या आईपुरताच सांगतो. संतामाय आणि मसामाय, पुढे शरण अशी ही परंपरा म्हणजे शरणच्या आजीपर्यंतचा हा इतिहास आहे. या दोन्ही पुस्तकात लिंगायत समाजाचा आवर्जून उल्लेख येतो. कालिंदी ज्या शिवशरणप्पाजवळ विवाहाशिवाय राहते, तिला मूल होते. तो लिंगायत समाजाचा आहे. तर मसामाय इठुल कांबळयाची पत्नी असूनही तिला हणमंता लिंबाळे या लिंगायतापासून दिवस जातात– शरण या दोघांपासून झालेला मुलगा– अक्करमाशी. 'शरण'ने आपले आडनाव लिंबाळे लावताना प्रस्थापित समाजाचे, पर्यायाने पितृसत्ताक संस्कृतीचे रूप स्वीकारले. परंतु 'माझा जन्मच अनैतिक ठरवला जात असेल तर मी कुठल्या नीती पाळू ?' या प्रश्नाने त्यांचे आत्मकथन संपले तरी त्याचे उत्तर मात्र मिळत नाही. पितृसत्ताक व मातृसत्ताक या संस्कृतीतला संघर्ष ह्याच कालिंदीच्या जीवनाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. शरण आणि कालिंदी ज्या अक्करमाशीतून जन्माला आले ती जात त्यांच्या जीवनभर त्यांना अस्वस्थ करून देते. आंतरजातीय विवाह मग तो कुठल्याही जातीचा असो 'अक्करमाशी' हे पद कुणालाही जीवन जगू देणारे नाहीच. शरणकुमार एम. ए. पर्यंत शिक्षणाची मजल मारतात. परंतु विद्याविभूषित होऊन त्यांना संस्कारक्षमता स्वीकारता येत नाही. कालिंदी सुशिक्षित, स्वतंत्र विचाराची होऊन एकाहून अधिक पुरुषांच्या सान्निध्यात येऊनही तिला जीवनात पडलेल्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. शरण आणि कालिंदी यांची परिस्थिती वेगळी, घडण वेगळी. परंतु दोघांच्या समस्या ज्या एकाच कारणातून निर्माण झाल्या ते कारण गाव, भाषा, आई, वडील, जात, धर्म या सर्वच बाबतीत दुभंगलेले आहे. १९३० मध्ये डॉ. केतकरांना जो 'अक्करमाशी'चा प्रश्न जाणवला तो आणि १९८४ मध्ये शरणकुमार लिंबाळे यांना 'अक्करमाशी'चा प्रश्न जाणवला तो तत्वाने एकच आहे. फक्त त्याचे तपशील बदलले आहे. शोषण करणारे आणि शोषित झालेले स्त्री–पुरुष सबल दुर्बलाच्या संघर्षात नेहमीच चिरडतात, ही व्यथा या दोन्ही पुस्तकाच्या मुळाशी आहे.

या दोन्ही पुस्तकात 'अक्करमाशी'च्या संदर्भात जे प्रश्न उभे केले आहेत ते केवळ निरुत्तरित नाहीत, तर ते स्थल–काल–व्यक्तिनिरपेक्ष असे सार्वत्रिक राहणारे आहेत. 'स्त्री व पुरुष ही एकत्र आली म्हणजे स्त्रीस गरोदरस्थिती व अपत्यस्थिती ही होतात व त्यामुळे तिची द्रव्यार्जनक्षमता कमी होते. पुरुषाची द्रव्यार्जनक्षमता कमी होत नाही. त्यामुळे स्त्रीच्या आणि तिच्या अपत्याचा पोषणाचा भार पुरुषावर टाकला आहे. व टाकता यावा यासाठी पुरुषाच्या ठायी अपत्याविषयी स्वकीयता स्थापन झाली पाहिजे.' 'ब्राह्मण-

कन्या' कादंबरीत 'वैजनाथस्मृती'तून आलेले हे उद्गार विवाहविषयक 'अक्करमाशी'तून जे प्रश्न निर्माण करतात ते आजही सुटलेले नाहीत. कालिदी-पुढे जीवन-जगण्याचा मूलभूत प्रश्न नाही. तर हे जीवन ज्या पातळीवर तिला जगायचे आहे त्या पातळीचा प्रश्न आहे. परंतु शरणकुमारपुढे आपले अस्तित्वच दुभंगताना दिसते. दैनंदिन जीवनात ज्या मूलभूत, प्राथमिक गरजा आहेत त्याच मुळी पूर्ण होत नाहीत. बापाच्या नावाशिवाय एम ए. झालेला शरण-बँकेत आपले खाते उघडतो तेव्हा त्याच्या मनाची जी घालमेल होते तिला आमच्या समाजात आजतागायत तोड नाही. ही घालमेल, ही वेदनाच शब्दातून आकार घेते. 'अक्करमाशी' प्रकाशित करून जे सामाजिक कार्य प्रकाशकाने केले ते सार्वत्रिक पातळीपर्यंत पोचले पाहिजे. कालिंदीपुढे निर्माण झालेल्या समस्या आणि शरण-कुमारपुढे निर्माण झालेल्या समस्या आज ५४ वर्षे लोटून गेली तरी आहे त्या ठिकाणीच आहेत. अशावेळी 'ब्राह्मणकन्या' पुस्तकास डॉ. केतकरांनी जी दोन ओळींची प्रस्तावना जोडली तिची आठवण येते; जी आजही या दोन्ही पुस्तकांच्या संदर्भात वाचकांसाठी बहुमोलाची आहे. प्रस्तावना अशी.

"सहृदय वाचकास—

पुस्तक एकदा वाचल्यानंतर दुसऱ्यानदा वाचावे, व दुसऱ्यानदा वाचल्यानंतर पुन्हा एक किंवा अनेक वेळ वाचावे अशी माझी विनंती आहे." ■

'दिलासा' स्नेहनगर, परळी वैजनाथ

लेखकांसाठी सूचना

१. मजकूर कागदाच्या एका बाजूने लिहिलेला व सुवाच्य असावा.

२. पुरेसे पोस्टेज नसलेले लेखन परत केले जाणार नाही. स्थळप्रत ठेवावी, नाहीतर पुरेसे पोस्टेज पाठवावे.

३. कवितेची पोच दिली जात नाही. निर्णयही दिला जाणार नाही. तीन अंकापर्यंत कविता न आल्यास ती अस्वीकृत आहे असे समजावे. कवितेसंबंधी कुठलाही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही.

४. अनाहूत लेख, कथा, ललित वा वैचारिक निबंध ह्याबाबत निर्णय हवा असल्यास पत्ता लिहिलेले एक पोस्ट कार्ड पाठवावे. गद्याबाबत निर्णय कळवल्यानंतरही, तात्काळ प्रसिद्ध होईलच असे नाही. यथावकाश प्रसिद्ध होईल.

५. अनाहूत समीक्षणे प्रसिद्ध होणार नाहीत. 'युगवाणी'-कडून मागवली गेलेली समीक्षणेच प्रसिद्ध होतात.

६. 'युगवाणी' साहित्यप्रेमाला, साहित्याला मोकळी वाट देते. पण ते साहित्य अभिरुचीसंपन्न असावे.

' प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील स्त्री जीवन '

जयश्री तोटे

' हजारी वैलगान ' हा स्व. यशवंतरावजी चव्हाण पारितोषिकप्राप्त असा प्रा. प्रतिमा इंगोले यांचा पहिला वहिला कथासंग्रह ! हा कथा-संग्रह प्रकाशित होण्यापूर्वी त्यांच्या सुटया कथा बहुतांशाने ' तरुण भारत ' या वृत्तपत्रात प्रकाशित होत होत्या.

वैदर्भीय ग्रामीण जीवनाचा आपल्यापरीने वेध घेणारा हा कथासंग्रह. सर्वत्र मानवी भावभावना जरी बऱ्याचशा सारख्या असल्या तरी नागरी जीवना-पेक्षा ग्रामीण जीवन बऱ्याच बाबतीत भिन्न स्वरूपाचे आहे. ग्रामीण साहित्य काही विशिष्ट प्रकारच्या अनुभवांचा व जीवनप्रणालीचा निर्देश करीत असते. आजही हे ग्रामीण जीवन अंतरंगाने व बहिरंगाने हळूहळू बदलत असले तरी त्याचे बदलणेही शहरी जीवनापेक्षा सर्वस्वी भिन्न आहे. येथली अर्थव्यवस्थाही नागरी जीवनापेक्षा वेगळी आहेच. त्यांच्या जीवनाची बदलती रूपे, बदलती मने, भावभावना, अंतर्बाह्य जीवन या सर्वांचा वेध, येथील स्त्रीजीवनाचा मागोवा, त्यांच्या कालच्या आजच्या सुखदु:खाचे चित्रण तटस्थतेतून प्रतिमा इंगोलेची कथा करते का ? यावर त्यांच्या कथेचा कस अवलंबून आहे.

" मिया बिबी राजी " ही या कथासंग्रहातील पहिलीवहिली कथा. लेखिकेने पुष्पा या नायिकेचे चित्रण, तिच्या भावभावनांचे बारकावे टिपत सुबकपणे केले आहे. या कथेत पुष्पाच्या बापाच्या आडमुठ्या स्वभावामुळे तिचा सुखाचा संसार उधळतो. लग्नात पुष्पाचा पाचशे रुपये हुंडा द्यायचा ठरला असतो. परंतु पुष्पाचे वडील त्यावेळी पावणेपाचशेच देतात. इतकेच नव्हे तर मुलीला माहेरी घेऊन जायला येतो तेव्हा म्हणतो " मी नियाले आलो तरी तुमाले माया पोरीले धाडाव वाटत नायी ? तुमाले फुकटात हमालीन पायजे. तिच्याकून रकेसासारखे कस्ट करून घेता म्हनून त मायी पोरगी इतली वायली. मी आता कायी झाला तर या तुया अयी मायी पोरगी ठिवत नाही." केवळ अशी धमकीच देऊन थांबत नाही तर मुलीला नेहमीकरिता व दुसरे लग्न करून द्यायच्या विचाराने आपल्या सोबत घेवून येतो. मुलीची मात्र तिथेच नांदायची इच्छा असते. म्हणून अखेर बापाच्या इच्छेविरुद्ध पुष्पा नवऱ्याशी संगनमत करून घरून पळते. आणि तिचा नवराही आपल्या बापाचा मुलाहिजा न ठेवता तिला साथ देतो. शेवटी नायिका वाचकांना विचारते, ' म्या माया नवऱ्याच्या इकळे पयून यिवून कायी गुना केला काय? तो मले वागोतो म्हने अन् मी रायतो म्हनो. मंग ? बाकिच्याईले काय करा लागते ?'

पहिल्यावहिल्या कथेवरूनच प्रतिमा इंगोलेच्या कथेची जाण, पोत, शैली या सर्व गोष्टींचे सम्यक् दर्शन घडते. परंतु वाचक म्हणून मनात असा प्रश्न उभा ठाकतो की, प्रतिमा इंगोलेंनी हाताळलेला हा प्रश्न इतका वरवरचा खुदुखुदू हसविणारा आणि रंजकपणे हाताळण्याइतका तलम, मुलायम व एकसुरी आहे का ? पुष्पाच्या तरुणपणी संसाराला पडलेली ही गाठ इतक्या सहजपणे उकलण्याइतकी साधीसुधी आहे कां ? मुलीचा हुंडा देऊन लग्न जुळविल्या जाणाऱ्या गरिबातल्या गरीब घरातल्या खेड्यातील मुलीवर बरंदाजपणाचे संस्काराचे, सासरच्या घरातून तुझे प्रेतच बाहेर पडले पाहिजे इ. विचारांचे अतीव दडपण असते. मुलीकडील पक्ष समाजात गौणस्थानी ठरला असतो. अशा अनेक दडपणाखाली नवविवाहित तरुणी ओठांच्या पाकळ्या घट्ट मिटून झिजून झिजून मुक्या वेदना उराशी कवटाळून मरतात किंवा खानदानीपणाचे, संस्काराचे दडपण ज्या समाजातील मुलीवर नसते त्या कानात वारे भरल्यागत वासरासारख्या उच्छृंखल वागताना दिसतात. या दोनही स्वरूपातील नवविवाहित तरुणी प्रतिमा इंगोले यांनी चित्रित न करता

त्याची नायिका न शिकतासवरता स्त्रीमुक्तीच्या विचारांशी इमान राखून आपल्या बुद्धीचा कौल घेऊन नवऱ्याकडे जाते आणि वाचकांनाही विचारते मी यात गैर काय केले ? यात तिने गैर काहीच केले नाही परंतु पुरुषप्रधान संस्कृतीत चूक असो वा नसो बहुतांशाने स्त्रीलाच सोसावे लागले आहे, त्यामुळेच "हल्या हल्या दुध दे" या कादंबरीतील या अशाच प्रसंगातली शोभा आणि तिची शोकांतिका जास्त खरीखुरी आणि जिवंत वाटते. असो. जोळम्हाणी, चोरावर मोर, हजारी बेलपानं, खोयमोळी, गुरुप सेकरटरी पाट्टे या पैकी कोणत्याही कथेतील नायिका किंवा यातून घडणारे तरुणीचे दर्शन तिच्या जीवनातील कोणतेच नागमोडी दर्शन घडवीत नाही. परंपरा, समाज, कुटुंब, पुरुषप्रधान संस्कृती, धर्म या सदराखाली कोणतेच भोग ती प्रतिमा इंगोले यांच्या कथांमध्ये भोगतांना दिसत नाही. बहुधा कथा लेखिका कथाविषयाच्या खोलीत शिरू इच्छित नाही किंवा विषय कोणताही असो, तो खुमासदारपणे, रंजकपणे व मनोरंजक पद्धतीने किस्सेदार शैलीत हाताळत जायचा असे त्यांनी ठरविले असल्यामुळे असे घडले असावे का ?

'चोरावर मोर' या लघुकथेतील तीन पिढ्यांपासून एकुलता एक दिवा असलेल्या घरंदाज घराण्यातील पाटलाची पाटलीन चार मुलीच्या नंतर गुपचूपपणे स्वतःवर शस्त्रक्रिया करवून घेते. सरकारी कुटुंब नियोजनाच्या योजनांना हातभार लावून संपूर्ण गावाला शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देणारा पाटील वंशावळी चालवायला कुलदीपक नाही म्हणून स्वतः मात्र शस्त्रक्रिया तर करवून घेत नाहीच शिवाय नवस, देवदेवता दर्शनाच्या मागे लागलेला दिसतो. आता पाचव्या खेपेला का होईना आपल्याला मुलगा होतोच या आशेने देवीचा नारळ परतीकरिता घेऊन येतो. तेव्हा खात्यापित्या घरची पाटलीण त्याला म्हणते, "छवलीच्या वक्ती डागतरीन म्हने बस झाल्या चार मुली ! आता ऑपरेशन करा नाहीतर तुम्हाला धोका आहे. मंग म्या करून टाकलं आपरीशन ! तुमी खिजरू याल म्हणून तवा सांगलं नायी. देवीचा नारळ घेऊन येणाऱ्या पाटलाला आज बटाटयाच्या भाजीऐवजी वांग्याची भाजी केली" अशा आणि इतक्या सहजपणे ही गोष्ट पाटलाला सांगते. आणि घराण्यात एकुलता एक असलेला हा गावचा पाटील बायकोचे वक्तव्य ऐकून तिच्याकडे भामटयासारखा पाहत राहातो. अशा परिस्थितीतील शिकल्या सवरल्या मुलीलाही हा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळते का ? आणि एकटीने निर्णय घेतल्यानंतर भामटयावानी पाटलाने बायकोच्या तोंडाकडे पाहात बसण्याइतका हा विषय हलका फुलका आणि 'एप्रिल फूल' बनवण्याइतका खुमासदार व चटपटा आहे कां ? आणि इथेही जाणवते की रंजकतेची कास सोडायची नाही अशी लेखिकेची मनोमन इच्छा असावी म्हणूनच कोणत्याही वादळाचे आव्हान त्यांची लेखणी स्वीकारीत नाही. त्यामुळे वाचकांच्या मनावर खोल ठसा उमटविण्याचे सामर्थ्य या कथा गमावतात.

तसेच जोळम्हानी, हजारी बेलपान, खोयमोळी या कथेतून भेटणारी किंवा इतर कथांमधूनही अनुषंगाने डोकावणारी सासूही ह्यांनी अशीच हुबेहुबशी व कंगोरेहीन चित्रित केली आहे. "खोयमोळी' या लघुकथेतील सासू सावत्र पोराच्या लग्नात आपल्या तोऱ्याने वागते पण सख्ख्या पोराच्या लग्नात वधूपक्षाकडून वारंवार अवहेलना व अपमान सहन करते. आणि इतकेच नव्हे तर गावकऱ्यांचा वधूपक्षाकडील बडेजावाचे वर्णन करते. ही स्वभावशलाका निश्चितच मार्मिक आहे पण अशी ही सासूही मात्र आपल्या सुनेला छळतांना कुठे दिसत नाही. 'हजारी बेलपान' या कथेतील सासू तर आईहूनही प्रेमळ वर्तन करणारी दिसते. मुलगा दुकानातून घरी यायला उशीर करतो तेव्हा आपली सून त्याची वाट बघत असेल या जाणीवेने आपल्या मुलाला नेहमी रागावत असते. आपले मर्यादित क्षेत्रातले का होईना परंतु तिला प्राप्त झालेले अधिकार सुनेच्या हवाली करतांना चिडचिड करणारी किंवा आम्हाला सासुरवास भोगावा लागला मग तुम्हा सुनांनाच कां नाही ? असा दावाही कधी करताना प्रत्यक्षाप्रत्यक्ष दिसत नाहीत. 'हजारी बेलपान' या कथेतील सासू मुलाला म्हणते,

"अरे अजुनई घरी यियाले निम्मी रात करतं, तुया जिवाले कायी लाज ? त्या नयतुऱ्न्या जिवाले एकलीले माळीवर हुरहुर नसीन लागत काय ?" परंतु खेडयातल्या बहुतांश सुनांना जिणे नकोसे होते ते सासूच्या अधिकाराने आणि जाचानेच ! अशा खाष्ट सास्वा किंवा सासू कशी माया करते हे सांगणाऱ्या सुना या ग्रामीण पातळीवर लेखिकेला कुठे भेटल्या नसतीलच का ? वेगवेगळया नात्याने वावरणारी ग्रामीण स्त्री रूपे इतकी वरपांगी, एकेरी आणि बोपट आहेत का ?

'भिकीचे कपळे', 'ठान वाई अवचित' या दोन लघुकथा ग्रामीण स्त्री जीवनातील अंधश्रद्धांवर प्रकाशझोत टाकणाऱ्या आहेत. जीवनातील इच्छित गोष्ट प्राप्त न झाल्यामुळे ग्रामीण स्त्रिया अज्ञानामुळे तर अधिकच अंधश्रद्धांच्या आहारी गेल्या आहेत. या अंधश्रद्धांचे मनोहर चित्रण या लघुकथांमध्ये केले आहे. 'ठानबाई अवचित' या लघुकथेत 'तवापासून कानाले कानखळी लावली, आपुन तं, कोन्या ठान्यावर जात नायी रे बुवा !' असा धडा घेणारी सावधचित्त स्त्री अखेर दाखविली आहे. तर 'भिकीचे कपळे' या लघुकथेत सुद्धा नवऱ्याच्या हातचे दणके खाता खाता आहेत तर आहेत तीनही पोरीच. तेच चांगले आहे. मुलगाच काय देतो? अशा शहाणपणाचा बोध घेणारी स्त्री दाखविली आहे. परंतु अंधश्रद्धा ही त्यांच्या बहुतांशाच्या जीवनातील अपरिहार्यता आहे. एका आवर्तातून सुटल्या तरी दुसऱ्या आवर्तात त्या पुन्हा फसणारच नाही असे सांगता येत नाही. पण या शक्याशक्यतेशी लेखिकेने आपले नाते ठेवले नाही.

'धुयमाती' या लघुकथेतील कथाविषय प्रतिमा इंगोलेच्या शैलीशी मात्र एकदम फिट्ट बसला आहे. या कथेतून खेडयातील मिश्किल नातीगोती, स्त्रियांचे मनोरंजन, विसावा या गोष्टींचे सुरेख वर्णन केले आहे.

असो. वर्ण्यविषय हलके-फुलकेपणाने चित्रित करताना प्रतिमा इंगोलेची कथा किस्सेवजा व एकसुरी ठरू नये. लेखिकेने ग्रामीण जीवन जवळून अनुभवले आहे हे त्यांच्या ग्रामीण बोलीमुळे व विषय निवडीतून जाणवल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या शैलीला ओघ आहे, ग्रामीण वातावरण व प्रसंग यथातथ्य डोळयासमोर उभे करण्याची ताकद आहे. या सर्व ताकदीने त्यांची ग्रामीण कथा खऱ्या, वास्तव रूपात दुसऱ्या कथासंग्रहाच्या रूपाने वाचकांसमोर उभी राहो एवढीच आकांक्षा ! ■

अमरावती

"...खाडिलकरांच्यापेक्षा गडकऱ्यांच्या प्रतिभेशी शिरवाडकरांची प्रतिभा अधिक नाते दर्शविणारी आहे हे आपणास जाणवेल. गडकरी हे माझ्या वाङ्मयीन गाभाऱ्यातील मध्यवर्ती दैवत होते, असे शिरवाडकरांनी १९३३ मधील स्वतःच्या आठवणी सांगताना म्हटले आहे. आपल्या विद्यार्थीदशेत ते संभाजीची अथवा सुधाकराची प्रदीर्घ भाषणे हातवारे करून तारस्वरात म्हणत असत. नाटकाच्या नावात कोणता तरी संन्यास असला पाहिजे. या समजुतीने योगसंन्यास किंवा धर्मसंन्यास असे नाव देऊन त्यांनी आपल्या नाटयलेखनाला प्रारंभही केला होता, आणि त्या प्रारंभीच्या नाटकातली सगळी भाषणे गडकरी वळणाची घातलेली होती. लहानपणीच त्यांच्या मनात गडकऱ्यांची नाटयप्रतिभा अशी घर करून राहिली होती..."

(शिरवाडकरांची नाटके—व. दि. कुलकर्णी, साहित्य : समीक्षा—वि. वा. शिरवाडकर गौरव ग्रंथ— पृ. १९०)

अनुक्रमणिका

दखल घेण्याजोगा साहित्यिक उपक्रम

यदुनाथ थत्ते

श्रुती किंवा वाणी या भाषेच्या व साहित्याच्या अंगाबद्दल पुरेशी जाणीव आमच्या संस्थात्मक कार्यात दुर्दैवाने आढळून येत नाही.

साहित्य अभिरुचीचे संगोपन करण्याचा, कलात्मक जाणीवा उंचावण्याचा श्रुती आणि वाणी हा अत्यंत प्रभावी मार्ग आहे.

बालवयात होणारे संस्कार सखोल आणि सुदृढ असतात, परंतु बालांची आबाळ आणि उपेक्षा साहित्यक्षेत्रात होत आली आहे. तीच गत त्यांच्यासाठी लिहिणारांची.

बालसाहित्याला मिळणारी शासकीय पारितोषिके हे त्याचे एक प्रमाण होय. प्रौढ साहित्याला ज्या रकमेची पारितोषिके दिली जातात त्याच रकमेची पारितोषिके बालवाङ्मयाला न देण्यात एक तुच्छताबुद्धी आहे आणि मिळालेले पारितोषिक नाकारून मी सक्रियपणे तिचा निषेधही नोंदवला आहे.

कोणाही बालवाङ्मयसेवकाला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद आजवर देण्यात आले नाही, हेही तशाच तऱ्हेच्या तुच्छताबुद्धीचे द्योतक म्हणावे काय ? साहित्य संमेलनात बालवाङ्मयाबद्दल कधी गंभीरपणे चर्चा झाल्याचेही आढळत नाही. दलित लेखकांच्या दृष्टीने हा विभाग उपेक्षणीयच ठरला आहे. याचा अर्थ समजून घेतला पाहिजे.

वा. गो. आपटे, पां. ना. मिसाळ, बा. रा. मोडक प्रभृतींनी मुलांची नियतकालिके चालवली. साने गुरुजी हेच एक प्रमुख व्यक्तित्व असे होते की ज्यांनी लेखनाप्रमाणे वाणीच्या अंगानेही साहित्यसेवा केली. त्यांच्या तोंडून गोष्टी ऐकलेली एक पिढीच्या पिढी महाराष्ट्रात झाली.

साने गुरुजींच्या निर्वाणानंतर हा वाणीरूपातला साहित्यसेवेचा प्रकार पुढे नेण्याचे काम साने गुरुजी कथामालेच्या चळवळीने केले आहे. साहित्याभिरुची आणि भाषाभिरुची वाणीच्या अंगाने जोपासण्याचा हा एक कल्याणप्रद प्रयत्न आहे..

'श्यामची आई' हे साने गुरुजींचे सर्वात लोकप्रिय पुस्तक याच पद्धतीने लिहिले गेले आहे. श्याम आपल्या आईच्या गोष्टी अत्यंत सहृदयतेने आपल्या सोबत्यांना सांगतो आहे, अशीच मांडणी पुस्तकाची आहे.

'मातृप्रेमाचे हे महन्मंगल स्तोत्र आहे' अशी आचार्य अत्रे यांनी 'श्यामची आई' पुस्तकाची भलावण केली आहे.

'श्यामची आई' पुस्तकाचे अर्धशतक पूर्ण झाले म्हणून साने गुरुजी कथामालेने एक भव्य कार्यक्रम आखला. सुवर्ण महोत्सवी वर्षात 'श्यामची आई' पुस्तकाच्या पन्नास हजार प्रती खपवण्याचा हा संकल्प होता आणि साहित्य संस्थांनी पुरेशी दखल न घेताही तो संकल्प अपेक्षेहूनही अधिक यशस्वी झाला !

'श्यामची आई' ह्या आधुनिक पुस्तकाचे हे भाग्य आहे की असा संकल्प सिद्धीस गेला ! साहित्यसंस्थांनी कौतुक करावे अशी ही बाब आहे.

येत्या सानेगुरुजी जयंतीला साने गुरुजींच्या कर्मभूमीत अमळनेरला तीन दिवसांच्या एका भव्य महोत्सवाचे आयोजन साने गुरुजी कथामाले तर्फे करण्यांत आले. २४, २५ व २६ डिसेंबर ८६ असा तीन दिवस हा साहित्योत्सव झाला.

बालवाङ्मय सेवक म्हणून साने गुरुजींना लोक ओळखतात. त्यांचे गद्यही ज्ञानेश्वरांच्या ओवीसारखे रसाळ आहे. 'साच आणि मवाळ, मितले आणि रसाळ, शब्द जैसे कल्लोळ, अमृताचे' ही साने गुरुजींच्या वाङ्मयाला बऱ्याच प्रमाणात लागू पडते.

पण साने गुरुजी एक फार मोठे भावकवी होते, याची फारशी दखल घेतली जात नाही. 'पत्री' या त्यांच्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाचेही अर्धशतक याच वेळी आले हा एक शुभ योगायोग

आहे. त्यांच्या देवभक्तिपर व देशभक्तिपर कवितांचा हा संग्रह आहे.

'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' ही एकच कविता त्यांना काव्यक्षेत्रात चिरंजीव करण्याला पुरेशी आहे ! 'प्रभू माझी जीवनबाग फुलव', 'असो तुला देवा माझा सदा नमस्कार' अशा त्यांच्या कितीतरी कविता सहज संत साहित्यात शोभून दिसतील.

त्यांच्या देशभक्तिपर कविताही तशाच प्रभावी आहेत. 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो' या कवितेला श्री. वसंत देसाई यांनी स्वराचा साज चढवून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोचवले तर 'आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान' ही कविता भारतभर गाईली जाते. 'स्वातंत्र्याचे आम्ही शिपायी, सुखवू प्रियतम भारत माई।' या कवितेतील 'देशभक्तीचा सुदिव्य सोम, पिउनि करू प्राणांचा होम' या ओळी म्हणताना बाहू सहज स्फुरण पावतात. 'आम्ही मांडू निर्भय ठाण, देऊ ही प्राण, देऊ ही प्राण। स्वातंत्र्यसुधेचे निज जननीला घडवू मंगल पान।' ह्या ओळी म्हणताना उदात्ततेचा परीसस्पर्श मनाला सहज होतो.

तर अशी ही पत्री !

खरे तर आमच्या साहित्य संस्थांनी सुवर्ण महोत्सव प्रसंगी या दोन पुस्तकांबद्दल बरेच काही करायला हवे होते. पण आपणच तयार केलेल्या चाकोरीबाहेर त्या पडू शकत नाहीत, हे दुर्दैव आहे.

मराठी भाषेला ललामभूत ठरलेली 'गीताई' आणि 'गीता प्रवचने.' त्यांच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगीही आमच्या साहित्य संस्थांनी फारशी हालचाल केल्याचे दिसले नाही. तिथे साने गुरुजी कोण लागून गेले ! विनोबांच्या गीता प्रवचनांनी प्रादेशिक साहित्याला विश्वस्पर्शित्व कसे लाभते ते दाखवून दिले !

'श्यामची आई' आणि 'पत्री' या दोन पुस्तकांच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने जो साहित्यिक उपक्रम साने गुरुजी कथामालेसारख्या मुलांच्या संस्थेने हाती घेतला तो दखल घेण्याजोगा नाही काय ?

ग्रंथमोहोळाच्या गजबजाटात छोट्यांनी केलेल्या साहित्याच्या या महानसेवेची दखल घेतली गेली पाहिजे.

'श्यामची आई', 'पत्री' यांच्याप्रमाणेच साने गुरुजींच्या इतर वाङ्मयानेही लोकांना भावसाक्षर केले आहे.

'साने गुरुजींचे वाङ्मय रडके' ठरवणाऱ्या पर्यंकपंडितांनी त्यांच्या देशभक्तिपर कविता वाचल्या असत्या तरी आपण किती भयंकर चूक केली ते त्यांना उमगले असते !

साने गुरुजींवर असा आक्षेप घेणारांना 'भारतीय संस्कृति कोष'कार महादेवशास्त्री जोशी यांनी एकदा ठणकावून सांगितले होते की 'आगी शिवाय कढ नाही, मायेशिवाय रड नाही.' साने गुरुजींचे सर्व साहित्य कृपाळू, कनवाळू आणि मायाळू आहे.

ज्या स्तन्यावर नवनागरिकांची साहित्याभिरुची पोसली गेली आणि परिशुद्ध झाली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची ही सुवर्णसंधी आहे. साहित्य संस्थांनी ती गमावली तर त्यांच्या एकाक्षपणाबद्दल लोक हळहळतील !

टॉलस्टॉय या विश्वविख्यात साहित्यिकाच्या पुस्तकाचा 'कला म्हणजे काय ?' या नावाने साने गुरुजींनी भावानुवाद केला असून त्या पुस्तकाला एक दीर्घ प्रस्तावना लिहून आपली साहित्यविषयक कैफियत लोकांपुढे मांडली आहे.

प्रा. नरहर कुरुंदकर यांच्यासारख्या चिकित्सक वाङ्मयप्रेमींनी साने गुरुजींच्या पंचाविसाव्या पुण्यतिथीला साने गुरुजींच्या साहित्याचा अतिशय चोखंदळपणे परामर्श घेणारे व्याख्यान मुंबईत दिले होते. त्याची ह्या संदर्भात तीव्रतेने आठवण होते. ■

'क्षिप्रा' पत्रकारनगर, पुणे ४११ ०१६

टि | प | णे

'देवदास' – दोन टिपणे

टि | प | णे

: १ :

शरदबाबूंची 'देवदास' कादंबरी आकाराने लहान पण प्रातिनिधिक आहे. सव्यसाची, भारती, भैरवी, शेष प्रश्न या कादंबऱ्यांत प्रामुख्याने सामाजिक–राजकीय प्रश्नांची हाताळणी झालेली आहे. तसे देवदाससारख्या कादंबऱ्यांचे नाही. अर्थात देवदासचे कथाबीज सामाजिक वास्तवतेत आहेच. बंगालच्या जमीनदारशाहीचा अंत होत असताना या पार्श्वभूमीवरील शरदबाबूंच्या अनेक कादंबऱ्या आहेत. देवदास त्यातीलच एक.

देवदास या व्यक्तीची दुःखी कहाणी हा या कादंबरीचा विषय आहे तर सरंजामी व्यवस्थेने देवदास या भावना–प्रधान व्यक्तीची शोकांतिका हा या कादंबरीचा आशय म्हणजे विषयाचा विषय आहे किंवा विषयाचा अर्थ आहे. या आशयबीजाचा विकास होऊन त्याचे कादंबरीच्या झाडात रूपांतर होताना देवदासशी संबंधित व्यक्ती, त्यांचे मनस्वी प्रेमातुर स्वभाव, एकमेकांशी निर्माण झालेले भावसंबंध, त्यातील उदात्तता–उत्कटता व गुंतागुंत, बंगालचे वातावरण यांचे चित्रण आले आहे. तसेच शरदबाबूंचे विशाल व्यक्तिमत्त्व व जीवनविषयक जाणीव त्या अनुभवात मिसळली. या सर्वांच्या संमिश्रणातून देवदासचा जन्म झाला. वास्तवाची कलात्मक पुनर्निर्मिती झाली. पुनर्रचना झाली.

देवदासचे पारुशी लग्न न होणे ही कादंबरीतील महत्त्वाची घटना. ही घटना कोणत्या कारणांनी घडते ? देवदासच्या वडिलांच्या नकारामुळे. ते नकार का देतात ? तर त्यांच्या मते पारूच्या वडिलांचे घराणे आपल्या बरोबरीचे नाही. ते भाडयाच्या घरात राहतात. शिवाय एका जमीनदाराचे व्याही एकाच गावातले असावेत हे त्यांना कमीपणाचे वाटते. देवदास त्यांच्या विरोधात जाऊ शकत नाही, कारण त्या सरंजामी समाजात मोठ्यांची आज्ञा पाळलीच पाहिजे असा संकेत आहे. त्यावेळी एकत्र कुटुंब पद्धती होती. व्यक्तिस्वातंत्र्याचा उदय व्हायचा होता. विभक्त कुटुंबपद्धती उदयाला यायची होती. सरंजामी व्यवस्थेचा एकत्र कुटुंब हा सामाजिक आधार आणि जमीनदारी हा आर्थिक आधार असतो. एकत्र कुटुंबपद्धतीचे विघटन भांडवली युगात होत असते. आणि तिच्या ऱ्हासकाळात विभक्त कुटुंबाचेच काय त्यातील प्रत्येक व्यक्तीचे विघटन होत असते. सारांश एकत्र कुटुंब हा भांडवली व्यवस्थेचा आधार असू शकत नाही. कारण ज्या उद्योगीकरणाने, शेतीच्या दुर्दशेने, शहरीकरणाने व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या उध्वस्त होण्यामुळे तसेच व्यक्तिस्वातंत्र्याच्या व व्यक्तिस्वार्थाच्या कल्पनांनी एकत्र कुटुंबे विघटित होतात, ही कारणे फक्त भांडवली व्यवस्थेत असतात. त्या आधीच्या सरंजामी वा त्यानंतरच्या समाजवादी व्यवस्थेत नसतात; (आणि म्हणून जी. एं. च्या कथेतील दुःख एकत्र कुटुंबाच्या विघटनातून तयार झालेले असेल तर ते भांडवलशाहीच्या अनेक दुष्परिणामांपैकी एक आहे, असे म्हणावे लागेल.) सरंजामी व्यवस्थेत व्यक्ती दुबळी ठरते. परंपरा, रूढी, संकेत बलवान ठरतात, व्यक्तीचे मन कमकुवत बनते. देवदास त्यापैकी एक आहे. सरंजामी समाज व्यवस्थेने त्याच्या वधस्तंभाची चौकट तयार केली, देवदास त्या दिशेने गेला.

कलाकृतीच्या आशयाचे हे सूत्र झाले, पण हा आशय किती प्रभावीपणे व कसा आणि कोणत्या पद्धतीने आविष्कृत झाला ते आस्वादात, रसग्रहणात महत्त्वाचे ठरते. या दृष्टीने पाहिल्यास शरद-

बाबूंची खालील बलस्थाने दिसतात : (१) भावपूर्ण व तणावपूर्ण प्रसंगांची निर्मिती; (२) अंतरंगदर्शनाला प्राधान्य देणारे जिवंत व्यक्तिचित्रण व (३) सहज, स्वाभाविक निवेदन शैली व भाषाशैली.

प्रसंग वर्णनाच्या दृष्टीने पारू लग्न ठरल्यानंतर अपराधी देवदासला येऊन भेटते हा एकच प्रसंग पाहावा. त्याकाळात स्त्रीवर असलेल्या बंधनाच्या पार्श्वभूमीवर पार्वतीने देवदासापुढे पळून जाण्याचा मांडलेला प्रस्ताव पाहावा, म्हणजे या प्रसंगात केवढे थरारक नाट्य भरले आहे, ते समजेल. दुसरे म्हणजे या प्रसंगातील भावनांचा विरोधी ताण, एखाद्या जोगिणीप्रमाणे सर्वस्व उधळून आलेली पार्वती आणि तिच्या धाडसाने बर्फ झालेला देवदास ! स्त्रीची आदिम तेजस्विता पुरुषाची आदिम भेकडता यांच्यातील ताणाने थरथरणारा असा क्षण फक्त शरदबाबूच पकडू शकतात !

व्यक्तिदर्शनाच्या बाबतीत गंगाधर गाडगीळांच्या शब्दात सांगायचे म्हणजे शरदबाबू पात्रांच्या आत्म्यालाच हात घालतात. येथे आत्मा म्हणजे अध्यात्मातील आत्मा नसून माणसाचे आंतरिक व्यक्तित्त्व इनर पर्सनलिटी-होय. पारूच्या बाह्यांगाचे व हालचालींचे वर्णन किंवा मनोविश्लेषण करण्याच्या भानगडीत ते पडत नाहीत. यापेक्षा मूलभूत गोष्ट ते करतात. व्यक्तित्वाच्या गाभ्याचे सोलीव दर्शन ते घडवतात. आपण वाचक जणू काही या पात्रांच्या मनाच्या या गाभाऱ्यात प्रवेश करून आतूनच त्यांना न्याहाळतो असे वाटायला लागते. शरदबाबूंचे हे सामर्थ्य केवळ अपूर्व आहे. शरदबाबूंची ही पात्रे (चकोर फक्त चांदणे पिऊन जगतो किंवा राजहंस फक्त मोत्यांचा चारा खातो, तशी) फक्त प्रीतीचे चांदणे आणि भावनांच्या चाऱ्यावर जगतात असे वाटते. हे प्रेम त्या पात्रांना वासना-विकार, सुख-दुःख, रूढी, परंपरा एवढेच काय मृत्यूलाही न भिण्याचे सामर्थ्य प्रदान करते. हे प्रेम पार्वतीला नीतीपेक्षाही श्रेष्ठ असणाऱ्या अनीतीकडे जायला प्रवृत्त करते; हे प्रेम चंद्रमुखीला अधःपतनाच्या चिखलात राहूनही निर्मल आणि पवित्र ठेवते; त्या पात्रांच्या ठिकाणी दिव्यत्वाचा एक अंश निर्माण करते. शरीर असूनही अशरीर बनवते. शरदबाबूंचे हे सामर्थ्य आहे तसेच ही त्यांची मर्यादाही आहे; कारण त्यांच्या कादंबऱ्यांतील पात्रे प्रेमाच्या व उत्कटतेच्या क्षणी आपल्या या जीवन कहाणीचा शेवट करून घेतात, पण व्यवहारात इतके भाग्य माणसांना लाभत नाही. उदात्ततेच्या क्षणानंतर व्यवहाराचे, उत्कटतेच्या क्षणानंतर स्वार्थाचे आणि प्रेमाच्या क्षणानंतर कोळसे, रेशन यांचे हिशेब सुरू होतात.

लेखकाची जीवनदृष्टी किंवा मूल्यविषयक जाणीव कलाकृतीत अत्यंत महत्त्वाची असते. जणू पात्रे, प्रसंग यांच्या तारांमधून जीवनदृष्टीचा, जाणीवेचा वीजप्रवाह वाहत असतो व त्यामुळे ती कलाकृती भारल्या जाते, अभिमंत्रित होते, चैतन्ययुक्त होते. ही जीवनमूल्ये जितकी व्यापक, त्यांचे दर्शन जितके सखोल आणि उंच आणि ही जाणीव जितकी प्रगल्भ तितकी कलाकृती श्रेष्ठ ठरते. या दृष्टीने शरदबाबूंच्या वाङ्मयात मला तीन थोर गोष्टी दिसल्या. उत्कटता, प्रेम व माणुसकी. देवदासचा शेवट शरदबाबूंनी पुढील शब्दात केला आहे—

"मरणाची पर्वा नाही. पण मरायच्या वेळी कुणाचा तरी स्नेहाचा, जिव्हाळ्याचा हात मस्तकावरून फिरावा, दयेने ओथंबलेल्या कुणाच्या तरी स्नेहपूर्ण तोंडाकडे पहात जीवनाचा शेवट व्हावा, देहातून प्राण निघून जात असताना कुणाच्या तरी डोळ्यातल्या आसवाचा एक थेंब पडलेला पाहून मृत्यू यावा !"

उत्कटता हे वैयक्तिक, प्रेम हे दोन व्यक्ति संबंधातील व माणुसकी हे एकूण मानवांच्या संबंधातील मूल्य होय, आणि या तीन मूल्यांचा आविष्कार केल्यामुळे शरदबाबू हे जगातील थोर लेखकांपैकी ठरतात. —सदाशिव कुळी

■

: २ :

शरदबाबूंची 'देवदास' ही एक लहानशी शोकात्म कादंबरी. एक-एक घटना व प्रसंगांच्या शृंखलेत जसजशी कादंबरी गुंफत जाते तसतसा ह्या कादंबरीतील शोकात्म अनुभव अधिकच गहिरा होत जातो. आणि शोकाचे आत्यंतिक टोक

कादंबरीतील देवदासच्या मृत्यूने गाठले आहे. देवदासचा मृत्यू म्हणजे कादंबरीतील पराकोटीचे शोकनाट्य ! (की शोकाचा अंत ?)

देवदास कादंबरीतील दुःखान्ताचा विचार करताना देवदासच्या जीवनात हे दुःख कशामुळे निर्माण झाले ह्याची कारणमीमांसा शोधावी लागते. व ह्या कारणाचे बीज 'देवदास'मधील शोकनाट्यातच आहे. जमीनदारपुत्र देवदास आणि गरिबीत वाढलेली, त्यांचीच भाडेकरू पारू ह्यांच्या स्नेहबंधातून कादंबरीतील नायकाचे एकाकीपणाचे व दुःखाचे बंध बांधलेले दिसतात. देवदासच्या वडिलांच्या नकारामुळे हे सर्व घडून येते. व म्हणूनच देवदासचे पारूशी लग्न न होणे ही महत्त्वपूर्ण घटना आहे. अशा तऱ्हेने देवदासची दुःखी कहाणी कादंबरीचा विषय आहे. सरंजामी व्यवस्थेपेक्षाही स्वतःच्या निष्क्रीय व भेकड स्वभावाने स्वतःच्याच जीवनाची देवदासने केलेली वाताहत हा कादंबरीचा आशय ! देवदासने दिलेल्या नकारामुळे स्वाभिमान दुखावलेली पारू श्रीमंत जमीनदाराशी लग्न करण्याचा निर्णय घेते व त्यामुळे मनस्वी प्रेमातुर देवदासच्या जीवनात प्रेमभंगातून एकाकीपणा, एकाकीपणातून वैफल्य व ह्या सर्वांचे पर्यवसान त्याच्या लाचार आणि थरकाप उडविणाऱ्या मृत्यूत !

देवदासच्या दुःखाचे कारण शोधताना प्रा. मृणालिनी पाटील म्हणतात की, "देवदास या कसोटीला उतरला असता तर कदाचित त्याच्या (आणि पार्वतीच्याही) जीवनात सुख बहरून आले असते. पण निर्णय घेण्यास देवदास चुकतो आणि स्वतःबरोबर सर्वांनाच दुःखाच्या खाईत लोटून देतो." देवदासच्या निर्णयावर त्याचे सुख, पार्वतीचे सुख अवलंबून असते. 'देवदास'चे बीज सरंजाम व्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिक संकेतात दडले आहे हे जरी मान्य केले तरी ते अंशतः खरे आहे. सभोवार असलेल्या बंधनाच्या पार्श्वभूमीवर पार्वती देवदासपुढे पळून जाण्याचा प्रस्ताव मांडते. पार्वतीपुढे जमीनदारी व्यवस्थेचे बंधन नसेलही पण सामाजिक बंधने का तिला असे पळून जाण्याला मान्यता देणारे होते ? मुळीच नाही. पण लहानपणी गमतीच्या दुनियेतही देवदास जेव्हा तिला जायला सांगायचा तेव्हा त्याला निडरपणे "नाही म्हणजे नाहीच जायची मी" असे उत्तर देणारी लहानगी पारू तरुणपणी सुद्धा सर्वस्व उलथून येते. आणि तिच्या असामान्य धाडसाने वर्फ झालेला देवदास जेव्हा बघावा तेव्हा स्त्रीची आदिम तेजस्विता आणि पुरुषाची आदिम भेकडता हेच लक्षात येते. आणि यामुळेच सरंजामशाहीपेक्षाही देवदासच्या ह्या भेकड व निष्क्रीय स्वभावानेच त्याच्या वधस्तंभाची तयारी केली होती.

वास्तविक पाहता 'देवदास' फक्त देवदासचेच शोकनाट्य नाही. त्याच्या हृदयद्रावक मृत्यूमुळे तसे वाटत असले तरी सुद्धा 'देवदास' हे शोकनाट्य जितके देवदासचे किंबहुना त्याहीपेक्षा जास्त पार्वतीचे व चंद्रमुखीचेही आहे. देवदासने नकार दिल्यामुळे पार्वतीचा स्वाभिमान दुखावतो व ती चाळीशीतील बिजवर जमीनदाराशी विवाहबद्ध होते. शरदबाबू देवदासच्या त्यानंतर झालेल्या मनःस्थितीचे वर्णन करताना म्हणतात, "...देवदास चालू लागला. रस्त्यातून चालताना एक दोन वेळ त्याला ठोकरा लागल्या. त्या ठोकरांसरशी पायाचे बोट रक्तबंबाळ झाले..." देवदासच्या नकारामुळे रक्तबंबाळ हृदय घेऊन पार्वती विवाह वेदीवर उभी राहिली. केवळ स्वाभिमान राखण्यासाठी का तिनं हा निर्णय घेतला होता ? देवदासने तिच्या केलेल्या उपमर्दापायी त्याला द्यायची शिक्षा म्हणजे तिचा विवाह होता ? असे जर असते तर देवदासने कपाळावर कायमच्या ठेवलेल्या डागाबद्दल त्याच्याशी झालेल्या भेटीत हे उद्गार तिने काढले नसते. "हे शरमेचं लक्षण नव्हे– माझा कलंक नव्हे माझ्या गौरवाचं भूषण आहे." "एवढी मिजास !" म्हणून देवदासने डिवचल्यानंतर "शिवाय आता यापुढे मी स्वतः देखील तुमच्या पेक्षा ऐश्वर्यानं काही कमी ठरणार नाही ते माहीत आहे का तुम्हाला ?" असा सवाल टाकणाऱ्या पारूचे दोन्ही उद्गार अपमानाचा बदला घेणारे वाटत नाहीत. आपण केलेल्या निरपेक्ष प्रीतीला जेव्हा तसाच प्रतिसाद मिळत नाही, ज्याला आयुष्यात टिकावू समजलं ते असं टाकावू निघावं याची खंत पेलतच ती विवाहबद्ध होते. प्रमाला प्रतिसाद न मिळालेले मन रक्तबंबाळ होते आणि

हा निर्णय घेते. खरे तर पार्वतीचा विवाह हा देवदासवरील सूड न ठरता पार्वतीने स्वतःचाच घेतलेला तो सूड ठरतो. श्रीमंताशी लग्न करून लाखांची धनीण होऊन देवदासच्या ऐश्वर्याशी बरोबरी करणारी पार्वती लग्न करून देवदासला जितके प्रेमाच्या दुनियेत कफल्लक बनविते तेवढेच तिचे प्रीतिजग भिकाऱ्याप्रमाणे लाचार रानोमाळ भटकते. तिच्या भंग हृदयाचे शरदबाबूंनी सुंदर वर्णन केले आहे. "आजवर हृदयात साठवून ठेवलेल्या साऱ्या आशाआकांक्षा तिच्या हृदयातून बाहेर पडण्यासाठी ओढाताण करू लागल्या." देवदासच्या मृत्यूने त्याचे एकाकीपण संपते. दुःख नष्ट होते. पण समंजसपणा न दाखवता घेतलेल्या चुकीच्या, घाईच्या निर्णयामुळे सर्वस्वाने मिळवलेले प्रेमनिधान हरवून बसल्यानंतर पार्वतीला भोगाव्या लागणाऱ्या जिवंतपणीच्या मरणयातना लक्षात येताच पार्वतीचे दुःख करुणगडद होते. रक्तबंबाळ शरीर देवदासने मृत्यूत धुवून टाकले पण प्रिय व्यक्तीच्या मृत्यूचे घाव सांभाळत पार्वतीचे जगणे म्हणजे रोज येणारा मृत्यूच ! आणि निरपेक्ष प्रेम करूनही देवदासकडून धंदेवाईक ठरवली गेलेली चंद्रमुखी हिचे दुःखही मोठेच. या तिघांच्या तिपेडी दुःखाने 'देवदास'चे कथानक शोकात्म झाले आहे. व म्हणूनच डॉ. द. भि. म्हणतात त्याप्रमाणे हे खरे ठरते की, देवदासचे प्रेम 'घेणे'शी निगडित आहे, स्वतः अपेक्षापूर्ती ठेवून प्रेम करणारा देवदास पारू व चंद्रमुखीकडून निरपेक्ष प्रेमाची अपेक्षा करतो व त्यांनी त्याला तसे प्रेम देऊनही त्याबद्दल शंकित होणारा देवदास हा स्वतःचा सर्वनाश करून घेतो व त्यावरोबरच आपल्या सभोवती व्यक्तींचेही !

शरदबाबूंच्या देवदासच्या ठिकाणी आढळणाऱ्या एकाकीपणाचे संदर्भ तपासून पाहत असताना देवदासचे एकाकी बनलेल्या आयुष्यातील कारणांचीही तपासणी करावी लागते. देवदासचा चुकीचा निर्णय तो त्याच्या मनस्वी स्वभावामुळे घेतला जातो. या त्याच्या मनस्वी स्वभावामुळेच देवदास हा अस्तित्ववादी नायक किंवा देवदासही अस्तित्ववादी कादंबरी आहे काय हा विचारही वाचकांना उपस्थित होतो. 'देवदास' कादंबरी अस्तित्ववादी व देवदास अस्तित्ववादी नायक ठरविताना डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केलेले "प्रेमाच्या पहिल्या साक्षात्कारानेच" त्याला आपल्या पहिल्या मूलस्वातंत्र्याचे व त्याच्या आड येणाऱ्या सर्व नात्यांच्या बंधनांचे तीव्र भान येते... एकूणच देवदासच्या आयुष्यात त्याच्या मृत्यूशिवाय उत्कट असे काही नाही ? म्हणून देवदासला अस्तित्ववादी ठरविणारे मत जितके आग्रही आहे तितकेच प्रा. मृणालिनी पाटील यांचे "मानवी मूल्याची गृहीते देवदासच्या मनात नाहीत. त्यामुळे त्याला या विश्वपसाऱ्यातील अर्थशून्यता जाणवत नाही. या कारणामुळे देवदासला अस्तित्ववादी नायक ठरविणे योग्य नाही" ही त्यांची भूमिकाही आग्रही आहे.

देवदासच्या मनाचा कोपरा धुंडाळल्यास जाणवते की, देवदासचे पूर्वायुष्य व उत्तरार्धाही जास्तीत जास्त भाग त्याचे आत्मभान जागृत असण्याचे निदर्शक आहे. प्रेमाच्या साक्षात्काराने त्याचे जागृत झालेले मन आत्मभानाचेच द्योतक नव्हे काय ? शिक्षकांच्या आज्ञा केवळ मनस्वी स्वभावातून अव्हेरल्या जात नाहीत. कुणी आज्ञा करावी आणि आपण पाळावी, असे आपण शून्य नाही ही त्याला वाटणारी जाणीव त्याच्या प्रत्येक कृतीमागे आहे. 'मी आलोय् पारू' असे पाणोठ्यावरील पाठमोऱ्या पार्वतीला सांगणारा देवदास प्रेमबंधनासोबत विवाहबंधन स्वीकारायला तर नाही ना आला हा प्रश्न अनुत्तरित राहतो. "मला क्षमा कर पारू. त्यावेळी मला एवढं कळत नव्हतं," असे सांगणाऱ्या देवदासच्या मनातील मानवी मूल्ये जर पारूने संधी दिली असती तर ओळखणे कठीण झाले नसते. 'देवदास' अस्तित्ववादी आहे की नाही या होय–नाहीच्या सीमारेषा अस्पष्ट आहेत. कधी तो भावनाशील तर कधी भावनाशून्य वाटतो. कधी जीवनाची आसक्ती त्यात झळकते तर आयुष्याची विरक्ती दिसते. कधी जीवनात बुडून गेलेला असतो तर कधी जीवनापासून उडून जाण्याचा प्रयत्नही करतो व म्हणूनच तो पूर्णतः अस्तित्ववादी वाटत नाही. हृदयाला दावे लावून ही देवदासची कथा आपल्याला आपल्याबरोबर फरफटत नेते. सुन्न करते. देवदासचा स्वभाव

गावला असे वाटतात्र कथा हातातून निसटते. मागे ठेवून जाते अनेक उपप्रश्न, अस्वस्थ विचारमाला. देवदासचा तो मृत्यू : "मरणाची पर्वा नाही. मरायच्या वेळी कुणाच्या स्नेहाचा, जिव्हाळयाचा हात मस्तकावरून फिरावा, दयेने ओथंबलेल्या कुणाच्या तरी स्नेहपूर्ण तोंडाकडे पहात जीवनाचा शेवट व्हावा, देहातून प्राण निघून जात असताना कुणाच्या डोळयातल्या आसवाचा एक थेंब पडलेला पाहून मृत्यू यावा !" भयंकर मरण वाटयाला आलेल्या देवदासचे जीवन पाहू गेल्यास लक्षात येते ते एकच, सरंजामशाही नष्ट झाली तरी तिची सांस्कृतिक मूल्ये कायमच राहणार का ?

रत्नप्रभा अंजनगावकर

■

'युगवाणी' मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. असेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही बरेच अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. तुमच्याकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या तीन महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, **प्रथम** तुमच्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा—लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया खबरदारी घ्यावी. शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा. संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- तुमची वर्गणी संपलेली नाही ना ? तुमचे नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या नोंदीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

वाचक : ललित साहित्यातील प्रमुख घटक

अरुण कुळकर्णी

ललित साहित्य म्हणजे कल्पनेच्या साहाय्याने सकल सृष्टीतून मिळालेल्या अनुभूतीची अभिव्यक्ती. साहित्यिकाला जीवनात जी कलात्मक अनुभूती येते ती तो वाङ्मयातून व्यक्त करीत असतो. वाङ्मयनिर्मिती ही साहित्यिकाच्या मानसिक सृष्टीचा म्हणजेच त्याच्या कलात्मक मनाचा आविष्कार असते. ललित साहित्य म्हणूनच एक कला मानली जाते.

ललित साहित्याचा विचार होत असताना "वाचक" हाही एक महत्त्वाचा घटक असतो. त्यामुळे ललित साहित्याचे वाचकांच्या मनावर जे काही परिणाम होत असतात त्यांचाही विचार करणे अगत्याचे असते. या संदर्भात सर्वप्रथम वाचकाचा प्रत्यक्ष अनुभव कसा असतो हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

एखादी चांगली कविता किंवा कथा वाचताना आपल्याला नेमके काय जाणवते हे स्पष्ट करताना प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध ह्यांनी असे म्हटले आहे की, "वाक्यार्थ, लय, प्रतिमा इत्यादींच्या द्वारे आपल्या समोर काहीतरी घडत असते. फुले, तारे चंद्र असोत किंवा काही माणसे हालचाल करताहेत बोलताहेत असे प्रसंग असोत; अशाच गोष्टींची छाप मनावर पडत असते. थोडक्यात, आपल्याला जीवनासारखे अनुभव भाषेमार्फतच येत असतात. देशभक्ती, देशद्रोह, पिळवणूक असे अमूर्त अनुभव येत नसतात ही गोष्ट उघड आहे. कलेचा प्रत्यक्ष परिणाम असा बौद्धिक कधीही नसतो." प्रा. मुक्तिबोधांच्या प्रतिपादनाचा अन्वयार्थ हाच की, साहित्यिक कलाकृतीचा आस्वाद घेताना वाचकाला येणारा अनुभव संकल्पनात्मक नसतो. तो जीवनानुभवात्मक असतो.

प्रत्यक्ष कलानुभव जीवनानुभवात्मक असतो असे जे प्रा. मुक्तिबोधांनी म्हटले आहे ते पटण्यासारखेच आहे. दुसऱ्यांच्या भल्यासाठी स्वार्थत्याग करणारी एखादी व्यक्ती जेव्हा एखाद्या कथेतील किंवा कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा असते तेव्हा ती कथा किंवा कादंबरी वाचताना त्यागमय मानवजीवनच आपल्या डोळ्यासमोर येते. अशा वेळी त्यागात सुख मानणाऱ्या व्यक्तीची वृत्ती आणि तिची एकूण वर्तनशैलीच आपल्या मनात घोळत असते. केवळ "त्याग" ही एक अमूर्त संकल्पना तेवढीच आपल्याला प्रतीत होत असते असे नाही.

कथा किंवा कादंबरीत तपशीलवार वर्णन असल्यामुळे ते साहित्य वाचताना येणारा अनुभव जीवनानुभवात्मक असणे शक्य आहे. पण काव्याची प्रकृती कथा-कादंबरीच्या प्रकृतीपेक्षा वेगळी असते. काव्यात तपशीलाला महत्त्व नसते. म्हणून मोजक्याच शब्दात कवीला आपली अनुभूती व्यक्त करावी लागते. यासाठी एक विशिष्ट प्रतिमासृष्टी योजून इष्ट तो भावनात्मक परिणाम त्याला साधावयाचा असतो. काव्यातील शब्दप्रतिमा प्रतीकात्मक असल्यामुळे आणि तपशीलाला काव्यात महत्त्व नसल्यामुळे वाचकाला येणारा कलानुभव जीवनानुभवात्मक असू शकतो काय ? असा प्रश्न येथे उपस्थित होऊ शकतो. यासाठी काही जणांना एखादी कविता वाचावयास देऊन त्यांना ती वाचताना कोणता अनुभव आला हे जाणून घेणे शक्य आहे. प्रस्तुत लेखकाने "काव्यातील शब्दप्रतिमा वाचकांना कशा प्रतीत होतात ?" हे जाणून घेण्यासाठी जे एक सर्वेक्षण केले होते त्यातून वाचकांच्या कलानुभवावर पुरेसा प्रकाश पडू शकतो. या सर्वेक्षणात श्री. बाळकृष्ण बन्नोरे ह्यांची आठ ओळींची एक कविता नवव्या इयत्तेतील २० शालेय विद्यार्थ्यांना व २२ महाविद्यालयीन पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना वाचावयास देऊन "एक चांदणी साद घालते हिमालयाला" म्हणजे काय हे लिहावयास सांगितले होते. ४२ विद्यार्थ्यांपैकी ज्या २४ जणांना यातील लाक्षणिक अर्थ शोधता आला, त्यातल्या

१६ जणांना "आपल्या प्रियकराची वाट बघणारी प्रेयसी" किंवा "आपल्या प्रियकराला हाक घालणारी एक सुंदर तरुणी" असा अर्थबोध झाला. यातील महत्त्वाचा भाग हा की कविता वाचताना प्रियकराच्या मीलनासाठी उत्सुक असलेली एक विरहिणी तिच्या त्या अवस्थेतील वर्तनवैशिष्ट्यांसह वाचकांच्या डोळ्यासमोर आली, आणि नंतर तिच्या वागण्यातून तिची व्याकुळता, मीलनोत्सुकता इत्यादिकांचा प्रत्यय त्यांना आला. त्यांच्या प्रतिक्रियांमधील वर्णनावरून त्यांच्या ह्या कलानुभवाला संकेत मिळाला. यावरून जी एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की, एखाद्या कवितेत माणसांच्या हालचालीचा उल्लेख नसला तरी "चांदणी"सारख्या अमानवी प्रतिमातून मानवी व्यक्तीचे अस्तित्व सूचित होऊ शकते. इतकेच नव्हे तर असले अस्तित्व जेव्हा सूचित झालेले असते तेव्हा अशी व्यक्ती तिच्या वर्तनवैशिष्ट्यासह आपल्या डोळ्यासमोर वावरत असते. यावरून कविता वाचत असतांना येणारा कलानुभव, तपशीलाचा अभाव असूनही जीवनानुभवात्मक असतो हे स्पष्टपणे दिसून येते.

जीवनानुभव म्हटला की मानवी वर्तन आलेच; आणि ललित वाङ्मय म्हटले की वाचताना जीवनानुभव आलाच. म्हणून ललित वाङ्मय म्हटले की मानवीवर्तन आलेच. वर्तनातूनच व्यक्तीचे व्यक्तिमत्व प्रकट होत असते. व्यक्तिमत्व म्हणजे मूल्ये, आवडी-निवडी, अभिवृत्ती, धारणा, जीवनविषयक दृष्टिकोन व इतर वैशिष्ट्यांचे एक विशिष्ट असे संघटन. तेव्हा वर्तनातून व्यक्तिमत्व प्रकट होणे म्हणजेच व्यक्तिगत वैशिष्ट्ये प्रकट होणे असे म्हणता येईल. प्रत्यक्ष जीवनात काही जणांचे वागणे आपल्याला आवडते तर काहींचे आवडत नाही; काही जणांविषयी आपल्याला जवळीक वाटते आणि सहानुभूती वाटते तर काही जणांविषयी असे आपल्याला वाटत नाही; काही जणांमुळे आपण प्रभावित होतो, तर काही जणांची आपल्याला चीड येते. हे सारे प्रत्यक्ष जीवनातले आपले विविधप्रकारचे अनुभव, ललित साहित्य वाचताना देखील जागृत होतात. अर्थात् साहित्यिकाने आपल्या कल्पनाशक्तीच्या साहाय्याने जी जीवनसृष्टी निर्माण केलेली असते त्या सृष्टीशी वाचक कितपत समरस होतो यावर हे सर्व अवलंबून असते.

ललित साहित्य वाचताना त्यातील व्यक्तिरेखांशी, विशेषत: मध्यवर्ती व्यक्तिरेखांशी एकरूप होण्याची किंवा तादात्म्य पावण्याची, एक स्वाभाविक प्रवृत्ती वाचकांमध्ये असते. यालाच "आयडेंटिफिकेशन" असे म्हणता येईल. हे "आयडेंटिफिकेशन" मुद्दाम साधले जाते असे नाही, तर कळत न कळत ते घडून येते. साहित्यातील जीवनसृष्टी काल्पनिक असली तरी त्यात वावरणाऱ्या काल्पनिक व्यक्तींशी वाचक एकरूप होऊ शकतो हा यातील अतिशय महत्वाचा भाग आहे. अर्थात वाचकाला ज्या व्यक्तिरेखांमध्ये स्वत:च्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब पडलेले दिसते त्यांच्याकडे तो आकर्षित होतो. जेव्हा मध्यवर्ती व्यक्तिरेखा त्याच्या व्यक्तिमत्वाशी जुळणारी असते तेव्हा तर तो स्वत:ला तिच्यापासून अभिन्न समजतो. साहजिकच अशावेळी संपूर्ण कलाकृतीत त्याला स्वत:चे जीवनचरित्र प्रतिबिंबित झाल्याचे दिसते.

स्वत:ला दुसऱ्या एखाद्या व्यक्तीपासून अभिन्न समजण्याची प्रवृत्ती तशी स्वाभाविकच म्हणावी लागेल. प्रत्यक्ष जीवनात बहुतेक जणांना अशा तऱ्हेचा अनुभव कधी ना कधी येत असतो. शिवाय बाल्यावस्थेतून किशोरावस्थेत पदार्पण करीत असताना मुलगी आपल्या आईशी तर मुलगा पित्याशी अभिन्नत्व प्रस्थापित करीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुलीच्या वागण्यावर आईच्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटलेला दिसतो, तर मुलाच्या वागण्यावर पित्याच्या व्यक्तिमत्वाचा. पुढे युवावस्थेत पदार्पण करताना समाजातल्या महत्त्वाच्या किंवा प्रभावशाली व्यक्तींचा आदर्श समोर ठेवून त्यांच्याशी तादात्म्य साधले जाते. चित्रपटातील नटनट्या किंवा आता टेलिव्हिजन वरील कलावंतांचा अशा व्यक्तींमध्ये समावेश होतो. काही युवक-युवती अशा व्यक्तींमुळे इतक्या प्रभावित होत असतात की त्यांच्यासारखे बोलणे, पोषाख करणे किंवा हावभाव करणे तर सोडाच पण त्यांची मूल्ये, आवडी-निवडी इत्यादी व्यक्तिमत्व वैशिष्ट्य देखील ते आत्मसात करीत असतात.

या शिवाय प्रत्येक समाजव्यवस्थेत काही ऐतिहासिक किंवा पौराणिक व्यक्तिरेखा इतक्या प्रभावी ठरलेल्या असतात की त्यांच्या वर्तन-वैशिष्ट्यांचा ठसा त्या ठिकाणच्या जनमानसावर अगदी कायमचा उमटलेला असतो. ही सारी वर्तनवैशिष्ट्ये त्या समाजातील लोकांनी कळत न कळत पूर्णपणे आत्मसात केलेली असतात. साहजिकच कोणत्याही राष्ट्रातील किंवा समाजव्यवस्थेतील लोकांमध्ये काही मूल्ये, आवडी-निवडी व जीवनविषयक दृष्टिकोन इत्यादिंबाबत समानता दिसून येते. म्हणूनच त्या सर्वांची मानसिक घडण निदान काही अंशी तरी समान असते. अर्थात ही समानता त्यांना मनाच्या सुप्तस्तरावर प्रभावित करीत असते. आता प्रश्न असा पडतो की याची वाचकांना येणाऱ्या कलानुभवाशी संगती कशी लावावयाची ?

काही पौराणिक व्यक्तिरेखांचा भारतीय जनमानसावर किती खोलवर प्रभाव पडलेला आहे हे जर आपण लक्षात घेतले तर कदाचित वरील प्रश्नाचे उत्तर सहज देता येईल. "सीता" ही रामायणातील एक अशी व्यक्तिरेखा आहे की जी हाल-अपेष्टा व अन्याय यांची शिकार बनूनही तिच्या पातिव्रत्याच्या तेजामुळे ती पवित्र राहते. साहजिकच तिच्याविषयीच्या आदरामुळे शेकडो-वर्षांपासून भारतीयांना तिने प्रभावित केले आहे. भारतीय नारीचे प्रतिनिधित्व करणारे हे चित्र सगळ्यांच्याच मनात खोलवर कुठेतरी उमटलेले असते. म्हणून सीतेसारखी हाल-अपेष्टा भोगणारी एखादी साध्वी स्त्री जेव्हा कथेतील किंवा कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा बनलेली असते तेव्हा तिला वाचकांची सहानुभूती मिळाल्याशिवाय राहत नाही, पण येथे हे उल्लेखनीय आहे की सीतेसारखी हाल-अपेष्टा भोगणारी स्त्री आधुनिक जीवन संदर्भात जरी वाचकांपुढे आली तरी त्यांची सहनुभूती तिला मिळू शकते. कारण "सीता" या व्यक्तिरेखेनी त्यांच्या सुप्त मनात जी एक प्रतिमा उमटवलेली असते तिच्याशी ते कळत न कळत आधुनिक सीतेची तुलना करतात.

वाचकांच्या सुप्त मनात काही प्रभावी, व म्हणून आदर्श, स्त्री आणि पुरुष ह्यांच्या प्रतिमा उमटलेल्या असतात व यांचा ते साहित्यातील काल्पनिक पण त्यांच्या डोळ्यासमोर वावरणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या वर्तनाच्या मूल्यमापनासाठी संदर्भ म्हणून कळत न कळत उपयोग करीत असतात यातही अभिन्नता प्रस्थापनेचा कार्यभाग आहेच, कारण ज्या व्यक्ती आदर्शभूत ठरतात त्यांच्याच प्रतिमा सुप्त मनात क्रियाशील होत असतात. याच व्यक्तींची मूल्ये वाचकांनी आत्मसात केलेली असतात. काल्पनिक व्यक्तीच्या वागण्यातून ती व्यक्त झालेली दिसली की त्या काल्पनिक व्यक्ती, त्यांचे वागणे व त्यांना जन्म देणाऱ्या कलाकृती वाचकांना खूप परिणामकारक वाटतात.

येथे एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. तो हा की, एक सामान्य व्यक्ती या नात्याने वाचक अशाच व्यक्तींच्या प्रतिमा आत्मसात करीत असतो की ज्या शाश्वत आणि अंतिम मूल्यांसाठी जगत असतात. सत्य, अहिंसा, सौजन्य, अपरिग्रह, शुचिता इत्यादि मूल्यांवरच ज्यांनी आपल्या आयुष्याचा पाया उभारला होता अशा महात्मा गांधींनी सगळ्या भारतीयांच्या अंतर्मनात आदर्श म्हणून जे कायमचे स्थान मिळविले आहे ते या संदर्भातील एक उत्तम उदाहरण आहे. खऱ्या प्रतिभावंत कलावंताला शाश्वत आणि अंतिम मूल्यांचा शोध घ्यायचा असतो. त्याची कलाकृती जरी तत्कालीन सामाजिक संघर्षावर आधारलेली असली तरी त्या जीवनाची भूत-भविष्याशी त्याने संगती लावावी म्हणूनच एखाद्या जुन्या संघर्षात नव्या आणि बदललेल्या संदर्भातील वाचकांनाही त्याच्या जीवनातील संघर्षाचे प्रतिबिंब कलाकृतीत उमटलेले दिसायला हवे. असे घडले तरच ते अशा कलाकृतींशी समरस होतील.

शवटी, ललित साहित्याचा वाचक हा एका अर्थी समीक्षकच असतो असे म्हणावेसे वाटते. तो जसा रसज्ञ असतो तसा मर्मज्ञही असू शकतो. कलावंतांच्या कलासृष्टीशी समरस होऊन तिचा आस्वाद घेता येण्यासाठी त्याच्या मनाची पातळी कलावंताच्या पातळीशी पोहचावयास हवी. पण यासाठी तो बुद्धिमान असायला हवा असे नाही. याचे कारण असे की कलानुभव बौद्धिक कधीच नसतो. तो जीवनानुभवात्मक व भावनात्मक असतो. दुसरे असे की, प्रस्तुत लेखकाला या बाबत त्याने केलेल्या सर्वेक्षणात जे आढळले ते हे की

कवितेतील शब्दप्रतिमांचा अर्थ आणि वाचकांची बौद्धिक तसेच सर्जनशील विचारक्षमता यांच्यात संबंध नाही. कवितेचा एकूण भावात्मक परिणाम वाचकावर कसा होतो हेच जास्त महत्त्वाचे आहे. अर्थात तो तसा न होण्याची जी कारणे असतील त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे कलावंताने योजलेल्या प्रतिमासृष्टीतील दुर्बोधता. काही शब्द-प्रतिमा इतक्या संदिग्ध असतात की, तल्लख बुद्धीच्या आणि अधिक सर्जनशील विचारक्षमता असणाऱ्या वाचकांनाही त्या नीट कळू शकत नाहीत.

जी गोष्ट कवितेची तीच इतर ललित साहित्य प्रकारांची, एखाद्या कथेत संदिग्ध शब्दप्रतिमांचा त्रोटक वाक्यरचना करून प्रयोग केल्यास कोणा-लाही अशा प्रतिमांनी सूचित होणारा गर्भित अर्थ समजू शकणार नाही. अर्थात खऱ्या जाणत्या समीक्षकालाच हे शक्य होईल असे यावर कोणी म्हणेल. पण समीक्षक हा वाचकांमधूनच जन्माला येता असतो हे विसरून चालणार नाही. त्याने लावलेला अर्थ स्वतःच्या संदर्भ चौकटीतला व म्हणून "व्यक्तिनिष्ठ" ठरणार नाही हे कशा-वरून ? असे असेल तर एकाच कलाकृतीचे परस्पर विरोधी ठरावे असे मूल्यमापन दोन किंवा अधिक समीक्षकांकडून घडल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे अशी कलाकृती परिणामकारक समजावयाची की नाही असा संभ्रम निर्माण होईल. अशी अवस्था येऊ द्यायची नसेल तर बहुसंख्य वाचकांवर इष्ट तो भावात्मक परिणाम कितपत साधल्या गेला आहे हाच "निकष" कलावंतांनी ग्राह्य मानावा. यासाठी आपल्या अभिव्यक्तीतील क्लिष्टता सोडून कलानुभवाच्या सामान्यीकरणावर कलावंताने भर द्यावा. असे केल्याने कोणत्याही समीक्षकाएवढाच सामान्य वाचकही "रसज्ञ" आणि "मर्मज्ञ" असतो ही वस्तुस्थिती स्पष्ट होईल. ■

मानसशास्त्र विभाग, नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

कथा

वेदना

योगेन्द्र मेश्राम

गावाहून आल्यानंतर उन्मेष मधले काही दिवस सकाळी नदीवर जाऊ शकला नव्हता. आई आली होती. नव्याने खोलीची व्यवस्था लावायची होती. पण पैशाच्या कडकीमुळे तो हवे ते नवे काही घेऊ–करू शकत नव्हता. त्याला ओशट वाटत होते. बेचैन. आल्यापासून मूडच उडालेला! मुख्य वस्तीच्या त्या जनरल संडासातल्या भन्नाट घाणीमुळे जीव कावला होता. त्यात, धड उन्हाळा नाही–धड पाऊसही नाही, त्यामुळे या मधल्या कळकट वातावरणात साचणारी घाण नुसती चिगदळून राहत होती. भणभण वास मारत होती. तो एवढा उबगला की त्याला उठता–बसता आणि झोपेतसुद्धा डोळ्यापुढे घाणच घाण दिसत होती.

आई जानकीला त्याने आशाच्या आईच्या सोबतीला लावले. गेले दोनतीन दिवस तो बाहेर उघड्यावर पहाटेलाच उठून जात गेला. पण तिकडेही काही बाया माणसं हजर आहेतच! तो शरमेनं मरून गेला.

असा वैताग–कंटाळा, उबग नि आळस त्याच्या रोमरोमात भरून राहिला होता. हे सारं विद्रूप झटकलं पाहिजे! हा कंटाळा, आळस ही उबग सारी काढून फेकायची आता!–त्याने मनाशी ठरविलं.

आज रविवार. आजपासून सुरुवात. नदीवर जायचं. उशीर झाला. पांडू आता सोबतीला येणार नव्हता. गेल्या आठवड्यात आलटून पालटून वापरलेले तेच तेच कपडेही मैले झालेले. स्वच्छ व्हायचं! स्वच्छ राहणंही पहिल्यांदा मनाला स्वच्छ तरतरीत करतेच...तो आंघोळीच्या निमित्ताने आपल्या 'शबनम' बॅगेत कपडे घेऊन नदीवर गेला धुवायला. सकाळी नऊदहाचा सुमार. धुण्याचा घाट त्याला माहिती नसल्याने काठाकाठाने पाहत गेला. नदीकाठावरील एका मशानवटीच्या जवळ पंधरावीस लोक–बाया–माणसं–पोरं गोळा झालेली दिसली. काही लोक घेर करून बसले होते. ते काही पूजा–विधी–करीत असावेत.

उन्मेषच्या लक्षात आले. परवाच्या दिवशी गवळी वा कुणबी–मानीपुऱ्याचा कोणी म्हातारा गलंडला होता म्हणे. आणि आज तिसऱ्या दिवशी ते लोक मयतीच्या अस्थी विसर्जनासाठी आले असावेत. आता विधीपूर्वक काम चालले होते.

–त्या लोकांपासून थोड्या दूर वरच्या बाजूला धुण्याचा छोटासा घाट पण होता. काठाजवळून पाण्याची मोठीशी धार वाहत होती, आंघोळपण येथे मनमुराद करता येईल, म्हणून उन्मेश घाटावर गेला. आणि एका पसरट खडकाळ फत्तरावर बसून तो अगोदर कपडे धुवायला लागला

काही वेळाने त्या लोकांमधून दोनतीन पोरं सहज फिरत इकडे आली. पोरांनी ओळखलं. 'अरे, हे तं गजभिये सर होत!' 'हो रे–हो, फुटा वे–' असे एक दुसऱ्याला कानाशी सांगत ती विद्यार्थी पोरं दबकत एकीकडे वळली. उन्मेषनेही त्यांना ओळखले होते. ती आपल्या गांवी कॉलेजचीच ११ वीची–रमेश ढोले, घंडू वरखेडे, खडसे वगैरे विद्यार्थी पोरं होती, अभ्यासात जेमतेम. वर्गात खोडसाळ. वात्रटपणा, खडूसपणा करण्यात एक नंबरी. सरांना ती मुलं तशी भीत होती. उन्मेषला वाटलं, आपण बोलावं–बोलवावं–त्याने मान वळविली. पण एव्हना पोरं आपल्या लोकात जाऊन मिसळली होती...उन्मेष मोठ्या आवडीने कपडे धुण्यात गुंग झाला.

काही वेळ गेला आणि त्या लोकांमधून तीन-चार मोठी माणसे गजभिये प्राध्यापकाच्या जवळ

आली. येतायेताच एकाने जरा दबकत हाकारलं–

"सायेब,...हो जी ऽ-सायेब–"

उन्मेषचं लक्ष नव्हतं.

"सायेब–अंह–ह–हॅं–" एकजण खकारला.

"सायेब, हे जरा तुम्चं चुकलं!"–दुसरा एकजण घाईने बोलला.

"मला म्हणता–?"–उन्मेषने थांबून विचारलं. विस्मयचकित होऊन.

"हो...सायेब, तुम्ही हे बरं केलं नाही!"

"मी–? मी काय बरं केलं नाही म्हणता?"–तो थोडा चक्रावलाच. आता उभा झाला. परत त्याच्या कानावर सरळसोट प्रश्न आला–

"हेस् का, हे–कपडया–आंगोळीची तुम्हास जागा नाही!"

"मला–? नाही?...पण का?...मी समजलो नाही, तुम्हाला काय म्हणायचं आहे, ते–" तो काहीसा भयचकित. प्रश्न कापत निघाले. डोक्यात वीज चमकून गेली.

"अजी सायेब, तुम्ही का नाही, येथं–कमसकम् या वर आंगास कापडं धुवायास नाही पाह्यजे होतं असं म्हंतोन् आम्ही!"

"पण का, काय झालं इथं–?"

"झालं म्हंज्यात असं, का...का वरतंन् तुम्चं धुतलं पानी आमाकडे येऊन रायलं नं, मयल्याचं?"

"मग वरचं पाणी खाली वाहत जाणारच. त्याला उपाय नाही."

–उन्मेषला कल्पना आली होती, ते त्याला असे का हटकताहेत, याची. त्यांना जातीपातीचा न् विटाळाचा मध्येच झटका आला होता. तो गंभीर झाला. कठोर, डोळ्यात वीज कडाडली.

"हे बघा, तुम्ही चांगले, शहाणे लोकं आहात, असं मी समजतो. मला सांगा, ही नदी–हे पाणी सगळ्यांसाठी सारखं असते, का नाही?–की या नदीवरसुद्धा कुणाची मालकी आहे? सांगा–"

"नाईजी सायेब, तसं नाही पण–" एकजण बोलला.

"अरे काय तसं नाही न असं म्हणता?... त्यात एवढ्या मोठ्या वाहत्या पाण्यात माझ्या कपड्याचा मळ तो काय राहणार? पण...हां, ते पहा–" तो हाताने इशारा करीत दाटून म्हणाला, "आपल्या वरच्या अंगालाच ते काही बलकी गाईढोरं धुताहेत. त्यांच्या शेणामुताची घाण माझ्या ह्या साबण लावलेल्या कपड्याच्या मळा. पेक्षा फार खराब, म्हणून ती घाण तर मुळीच चालणार नाही तुम्हाला!–हो की नाही?...मग जा, पहिले त्या गाईढोरांना बाहेर काढा. बंदी घाला. आणि मग–मला बोला."

उन्मेषच्या या खरमरीत सवालावरतं त्या शहाण्या–वेडयांनी खालीच माना घातल्या... यावेळपर्यंत तेथे आणखी पाचसहा मंडळी येऊन दाखल झालती. ती विद्यार्थी पोरं मात्र दुरूनच पाहत होती. हसत होती.

एका खालच्या मानेला आता वरून चेव आला "अजी सायेब, पण बैल ढोरं म्हंजी, मुके निसपापी जनावरं, बिचारे! त्यान्ले कोणी सांगते का?"

"पण घाण तर होतेच का नाही? आणि ती मुकी जनावरं असली, तरी त्यांना वळवतो–तो बलकी, शेवटी माणूसच की नाही?"

–त्याचा हर सवाल त्या लोकांना घासाबरोबर घशात मासोळीचा काटा अडकल्याप्रमाणे जब्बर भारी गेल्यामुळे निरुत्तर झालेली ती तोंडं आता एकीकडे वळली. काही–कसं सांगावं यानले, सुचेना म्हणून जागच्या जागी चुळबुळत, तर काही आतल्या आत धुसफुसत राहिली. ते पाहून तेथे मागाहून आलेल्या 'शहाण्या'पैकी आता दोघंतिघं उवारशहाणी माणसं पुढारपण करायला पुढं सरसावली. दादागिरीच्या सुरात एकानं विचारलं–

"काय, काय म्हणून राह्यलं प्रोफीसर साहेब; मले सांगा–"

"आयकून नाही रायलं, बाँ! आता पाहा, तुम्ही सांगून पाहा."

कोणी–'कसं' नाही आयकलं गा कितीवी इदवान झालं म्हून गावाले राव जिंकल– असे आपसात फुसफुसत होते.

उन्मेषने प्रसंग ओळखला होता. एकीकडे अपमानाने तो मनात पेटू लागलेला. दुसरीकडं काय करावं–करू नये, या विचारात पेचात. तो

एकटा ! त्याच्या गळ्याला क्रूर रुढीची कैंची आवळली जात होती.

मिशीवर मुरडा देत एकाने काहीशा गरम-गरम चेतावणीच्या सुरात उन्मेषला म्हटले-

"सायेबजी, आता आमचं निमूट आयकास तुम्ही न् त्या तिकड खालच्या आंगाले जावा, त् बरं होईल का-"

"हो; तेही तुमी आमच्या पोरायचे प्राध्याकप साहेब म्हणून आमी तुमास मना नाही करत घुन्यास. तवा-"

उन्मेषला त्या लोकांचा घुमसता आक्रमक पवित्रा कळत होता. ते असे का वागत होते, हे ठाऊक होते. तरी त्या रूढिपालकांच्या अडाण-तोंडाने नेमके काय कारण बाहेर पडते, हे जाणून घेण्यासाठी त्याने खेदाने विचारले-

"ठीक आहे. मी तिकडे धुवायला जाईन किंवा नाही, पण त्यापूर्वी मला सांगा, इथं मी तुमचं काय असं विघडवलं ?... काय बिघडलं माझ्यामुळे, हे सांगा-?"

त्याचे ओठ थरथरले.

"ह्यो बगा, सायेव-" एक मुखंड आपलं पिढ्यान्-पिढ्यांचं काळंघोर शहाणपण उगाळीत समजावणीच्या सुरात म्हणाला—

"-आम्ही त्या पवित्र आत्म्याच्या 'अस्ती-राक शिरवणीच्या कार्यास आलो आहो. अईन पूजा-विधीचं काम चालू हाय बगा. साहेव, हे आमच्या मरना-तोरनांचं न् देवधर्माचं कार्य हाय आन् तिच्यात धरमरुढीपरमान तुम्हा वाहार-जातीच्या म्हंज्या खालजातीच्या हातचं हे मैलपानी वाहात येताय, त् आम्ही मेलोन् का तो पवित्र आत्तमा विटाळल का नाय ?— नाही शाप देईल न् नेईल सातही पिढ्या नरकात,- कसं ?... तुम्हीस सांगा सायेव, तुम्ही शिकल्यालं, इद्वान न् मोठं मानूश आहा ! हे सांगास नोको म्हना !... हेय-हेयबी आम्चं मान्सा बह्यताळ ढोर-ढुम्मस ! नायतं का, उगा वाद करत वसले. अगोदरस समजून नोहे सांगाची परस्थिती. तुम्ही का देव आहा ?... जावा सायव. नाराज व्हऊ नोका. वाईट मानू नोका. तकलीप देल्ल्यावद्द्ल मापी द्येवा."

उन्मेष कल्पनेपेक्षाही अधिक हतबुद्ध होऊन पाहतच राहिला... जागच्या जागेवर कळवळत. त्या लोकांशी आता वाद घालण्यात अर्थच नव्हता. त्या ठार आंधळ्या रुढिदासांच्या पुढे तो काय बोलणार ?... नाईलाजाने त्याला तेथून उठावे लागले. काही धुवून पिळलेले व काही अर्धं धुतलेले कपडे-होते तसेच काखबॅगेत कोंबले. गावाहून आल्यावर किती इच्छा असूनही त्याला प्रिय नदीच्या पाण्याची आज आंघोळसुद्धा करता आली नव्हती. तो रस्त्याला लागला. त्याच्या शिकलेल्या मनाला. स्वाभिमानाला ह्या अपमानाचे फार दुःख झाले. इंगळीगत सारखे डसत होते. रक्त पेटवीत होते. अरे-अरे-अरे, तुमच्या त्या देव-धर्मानं न् रुढीनं तुम्हाला किती अडाणं-आंधळं, भोंदू नि मूर्ख करून ठेवलंय !- आणि हे तुम्हालाच माहीत नाही, कळत नाही, हे तुमचं दुर्दैवच म्हणायचं ! त्या दुष्ट धर्मरुढीनं तुमच्यातल्या माणुसकीलाच मुळात नासवून टाकलं आहे, खरोखर !

तुम्ही तुमच्या सारख्याच एका माणसाला लाथाडून दूर फेकता, पण जनावराला मात्र जवळ करता, काय नाव द्यावं तुम्हाला ? तरी आम्ही हे सारं सोसूनही म्हणतो, 'माणूस' मुळात वाईट नाही. अरे, तुम्ही मला 'साहेब' म्हणता, मोठं मानता- ही प्रेमाची नसली तरी मुळात एक चांगली भावना पळातच नासते कशी ? जाते कुठे ? त्या मलाच अव्हेरता अन् काळजाला डागण्या देणारा अपमान करता ?... अरे, तुम्ही कोण माणसं आहात ?- की माणसाच्या नावाखाली... काय म्हणावं तुम्हाला ?

उन्मेष रस्त्याने चालता चालता आतून असा नुसता गलबलत, आक्रोशत जात होता. त्याच्या डोळ्यात अपमान—संतापाचे पाणी लकाकत होते.

पाणी !

नैसर्गिक पाण्यासाठी सुद्धा हा जीवनमरणाचा प्रसंग यावा ना ! हां, उन्मेषने अविवेक दाखवून त्या लोकांपुढे जराही अरेरावीपणा केला असता तर- ?

पाण्याचं आणि जीवन-मरणाचं कार्यं जगात एकच असते का ?

तुमचं- हे त्या बिचाऱ्या मेलेल्या माणसाच्या मौतीचं काम- त्या मृतात्म्याला शांती व सद्गती देणाऱ्या तुमच्या देवाधर्माचं परम पवित्र कार्य चाललंय, हे ठीक. पण- पण या जिवंत माणसाचं काय ?

–तुम्ही त्याला आपल्या माणुसकीहीन वर्तनानं मरणदुःख देता !... मारताही. अन् त्यांच्या 'मरणाला' आपल्या मरण-घाटावर मातीसुद्धा मिळू देत नाही !

–कुठेय तुमचा एका मसनवटा- एक पाणवठा ?

मनुष्यजीवनाचा पुरा मसनवटा केलाय तुम्ही !

पाण्यासाठी तर किती मरणहाल सोसावेत आम्ही ? पाणीदार जगण्यासाठी वगैरे !... पण हे काही खरं नाही !

अरे या देशात-जगात कुठे-कुठेच घडले नसतील, एवढे घोर मरण-उत्पात एकट्या पिण्याच्या पाण्यानं या माणसाला जगण्यासाठी घडविले आहेत !

–पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जगात कुठेतरी असतो ?... तो ग्रेट कवी म्हणतो–

'भल्या भल्यांनी करू नये छक्के-पंजे पाण्याशी ! पाणी असतं सिद्धार्थासारखं ! पाण्यासारखं सुंदर कर्तव्य जगात दुसरं कुठलंच नसतं !'

पण इथे कोणी-कोणी केलंय या सुंदर कर्तव्यमय पाण्याचं असुंदर घाण-पाणी ? अन् पाण्यासारखं रक्त क्रांतिहीन-कांतिहीन !

...पाण्यासाठी ह्या जिवंतपणी मरणयातना देणं... ही तुमच्या त्या मानवधर्माची, विश्वस्वधर्माची शिकवण !

–तिला कोणत्या, कुठल्या वैश्विक पसायदानाच्या पंचारतीनं ओवाळावं ?

–मानवतेच्या कुठल्या दिव्याने तिला उजळावं ?

–आम्ही दुसरं काय करावं ?...

–आम्हाला काही केलं पाहिजे !

आम्हाला हे सारं गंभीरपणे घेतलं पाहिजे !

आणि माणुसकीच्या तोलदार मक्कम् पावलावर संघर्ष उभारला पाहिजे !

–तुमच्या धर्मदत्त माणुसकीला लागलेली कीड काढून फेकण्याकरिता !

–या माणसाची अवहेलना थांबविण्याकरिता !

वेदना माणसाला नवी शक्ती, नवी ताकद देत असावी. गेल्या तीनचार दिवसापासून उन्मेषच्या मनात साचलेली वैतागवाण्या जगण्यातली मरगळ आता उडू लागलेली... अशा किती तरी वेदना–टोचण्या त्याने सोसल्या होत्या, लहानपणापासून. आजसुद्धा– आपण वादळातला दिवा झालं पाहिजे... झुंजणारा न विझणारा !

पण आपण तर असे विझतो, असे लागतो– बिघडलेल्या बल्बप्रमाणे ! सतत पेटत राहायला आलं पाहिजे, मेणबत्तीसारखं... सपेतोपर्यंत !

'अत्त दीपो भव.'

तो रस्त्याने असा विचार करीत, भोगलेल्या–दुःखावर काही नवा निश्चय बांधत घरी जाऊन पोहचला.

–त्यावेळी चढता सूर्य रखरख राखेल्या आभाळात आता ऐन डोक्यावर येत होता.

■

१३४, नागसेननगर
नागपूर ४४०० १४.

एक संध्याकाळ : बालकलाकारांची

सोमवार दि. २ मार्च रोजी सायंकाळी ठीक ५-३० वाजता विदर्भ सहित्य संघाने टिळक सभागृहात 'श्यामची आई' चित्रपटाने दिलेले एक गुणी कलावंत माधव वझे यांची नागपुरातील नाट्यप्रेमी बालमंडळींशी बातचीत घडवून आणली. हडस शाळेची गाजलेली वाक्‌पटू मृणालिनी नानिवडेकर हिने माधव वझे यांची उपस्थितांना ओळख करून दिली आणि कार्यक्रमाला सुरुवात झाली.

वझे बोलायला उठले, तेच मुळी बालमंडळींशी संवाद साधीत. त्यांनी पहिलाच प्रश्न विचारला : "नाटक करण्याकरिता कशा कशाची गरज असते ?" उपस्थित बालश्रोत्यांनी झटपट उत्तरं दिली. "नटांची', "नाटकाची", "नेपथ्याची" "वेषभूषेची", "रंगभूषेची", "प्रकाशयोजनेची." यातील नटांची गरज सोडून इतर सगळ्या गरजा कटाप करीत वझ्यांनी नव्या बालरंगभूमी विषयीचे आपले विचार मांडायला सुरुवात केली. ते म्हणाले, "मित्रांनो ! नाटक करण्याकरता फक्त नट, प्रेक्षक आणि जागा या तिघांचीच गरज असते. लिखित संहितासुद्धा नको. नेपथ्य आणि प्रकाश योजना यांची तर मुळीच गरज नाही. आमच्या जागेवर (उंच स्टेज सुद्धा नको.) असलीच तर एखादी खुर्ची, एखादा दगड, एखादा स्टूल एवढे साहित्य पुरे ! नाटकाकरता खरी गरज असते. ती पात्रांची. आपल्याला जो विषय सादर करायचा असतो नं त्यात येणारं प्रत्येक पात्र खरं तर आपल्या अंतःकरणात कुठेतरी दडी मारून बसलेलं असतं. नाटक करताना त्या पात्राला हुडकून आपण बाहेर काढायचं असतं. जसा, शिवाजी तुमच्या माझ्या सगळ्यांच्या मनात दडलेला असतो. अभिनयाच्या रूपानं त्याचा संचार आपल्या शरीरात घडवून आणायचा की शिवाजी साकार होतोच."

लिखित संहिताविरहित अशी नाटकं पुण्याला 'जागर' या संस्थेतील बाल कलाकारांकडून त्यांनी करून घेतलेली आहेत.

'अभ्यास' या विषयावरच्या पाचच मिनिटांच्या एका अशाच नाटकाचा वझ्यांनी देखणा एकपात्री प्रयोगच तिथे सादर केला. हे करीत असतानाच त्यांनी एका खुर्चीला आपण किती रूपं देऊ शकतो ते प्रत्यक्ष करून दाखवलं. त्यांची खुर्ची कधी राजाचं सिंहासन होई, कधी शेजाऱ्याची खिडकी, कधी चौरस्त्यातील पोलीसचा चौथरा तर कधी मोटार मेकॅनिकची मोटार होई.

'जागर' तर्फे वझ्यांनी पुण्यात बालकलाकारांच्या समयस्फूर्त नाटकांच्या स्पर्धाही घेतलेल्या आहेत. यातून त्यांना उत्तम नट तर मिळतातच पण त्या नटांनासुद्धा आपसूक लेखनाचे आणि दिग्दर्शनाचे धडेही मिळतात. यापेक्षाही अधिक महत्त्वाचं म्हणजे आपल्या दैनंदिन घडामोडींकडे बघण्याची जाण मिळते, दृष्टी मिळते. असे प्रयोग नागपुरातही व्हावेत अशी रास्त अपेक्षा व्यक्त करून ते थांबलेत, आणि बालगोपालांनी विविध प्रश्न विचारून माधव वझे यांचे संपन्न व्यक्तिमत्त्व अजमावून घेतले.

उपस्थित बालगोपालातील हडस शाळेची सोनाली कोलारकर हिने रंगभूमीची एक नवी-देखणी दिशा बालकलाकारांना दाखवल्याबद्दल वझ्यांचे ऋण मानले; तसेच हा संवाद घडवून आणल्याबद्दल अनुराधा जोशींचे व उपस्थितांचे आभार मानले.

माधव वझे यांच्या रंगभूमीवरील प्रेमानं, तिच्या विकासाच्या तळमळीनं आणि बालकलाकारांच्या जिव्हाळ्यानं रंगलेला तब्बल अडीच तास चाललेला हा कार्यक्रम केवळ वेळेअभावी थांबवावा लागला.

■

अनुक्रमणिका

आनंद कृष्णाजी टेकाडे

अक्षयकुमार काळे

आनंदराव टेकाडे ह्यांची कविता विपुल असली तरी तीत भावनिक वा वैचारिक विकासाच्या चढउताराच्या खुणा नाहीत. चार काव्यसंग्रह निघूनही पहिला काव्यसंग्रह वाचल्यानंतर त्यांच्या वाच्यार्थप्रधान कवितेविषयीचे झालेले मत बदलण्याचा संभव नाही. आनंदराव हे गायक कवी म्हणून प्रसिद्ध होते. ते आपल्या पहाडी आवाजात कविता म्हणून दाखवीत असत. 'आनंद कंद ऐसा । हा हिंद देश माझा' ही कविता त्यांच्या कालखंडात त्यांनी आपल्याबुलंद आवाजीने घराघरांत पोचविली होती. एखादी मनोहर कल्पना, त्याला साजेशी मृदुल शब्दरचना, आणि त्याला पेलवेल अशी चाल हे त्यांच्या बहुतांश कवितेचे स्वरूप आहे. या दृष्टीने आपल्या काव्यसंग्रहाला त्यांनी दिलेले नाव अन्वर्थक वाटते.

आनंदरावांच्या काव्याचे विषय राधाकृष्ण, प्रेम, देशभक्ती आणि प्रासंगिक गोष्टी किंवा एखाद्या कवीच्या कवितेस उत्तर अशा स्वरूपाचे आहेत. राधा–माधव–मुरली याविषयी त्यांना नितांत आवड आहे. राधामाधव प्रेमवर्णनपर अनेक प्रसंगावर त्यांनी नाट्यगीतात्मक रचना केली आहे. राधाकृष्ण प्रेमातील संभोग आणि विप्रलंभशृंगाराच्या नानाविध छटा आनंदराव अनेक काल्पनिक प्रसंगासहित काव्यात व्यक्त करतात. बालपणापासून तर अर्जुनाला उपदेश करण्यापर्यंतची भगवान कृष्णाची सगळी रूपे त्यांनी आपल्या काव्यात रंगविली आहेत. 'राधा–माधव', 'राधे ऊठ', 'खेळ राधिके खेळ गडे', 'गवळण', 'गोपाळास', 'मुरलीवाला' इत्यादी त्यांच्या चारही काव्यसंग्रहातून विखुरलेल्या कविता याची साक्ष देतात. परंतु राधाकृष्णाला कोणतेही नवीन परिमाण देण्याची शक्ती त्यांच्यामध्ये नव्हती व त्यामुळे अतिपरिचयामुळे येणारा तोचतोपणा या कवितांत आहे. ईशप्रेमाबरोबरच देशभक्तीचाही झरा त्यांच्या काव्यातून ओसंडून वाहताना दिसतो. पारतंत्र्यातील अवनत स्थितीविषयीची अनुकंपा, पूर्वजांच्या पराक्रमी गतेतिहासाविषयीचे प्रेम, प्राचीन महापुरुषाविषयी श्रद्धायुक्त प्रीती हे त्यांच्या देशभक्तीपर काव्याचे विशेष आहेत. तद्वतच या जागृतीसाठी कटिबद्ध असलेल्या आपल्या वाणीचा लयबद्ध ललकार हाही विशेष महत्त्वाचा ठरावा.

भारता ऊठ रे ऊठ झोपसी असा किती काळ
साम्राज्य तमाचे सरले । हे गीत गाई चंडोल
हा अरुण दूत सूर्याचा । जागती सकल भूगोल
उदयाचल कर वरि करुनी । हर्षांचा उधळी गुलाल

जुन्या पिढीतील
एका
वैदर्भीय कवीच्या
व्यक्तित्वाविषयी
माहिती देणारा
लेख

उघडी रे उघडी नयन
दुरि आलस्या टाकून
बघ जरा भवतीचे भुवन
तेजाग्नि स्वातंत्र्याचा । चहुकडे उडवी कल्लोळ

अशा ओळींतून जनजागृतीची प्रेरणा दिसते तर

'ज्याच्या हृदयी उत्कटतेची ।
इच्छा अभिनव स्वातंत्र्याची ।
धरिता न लालसा मुळिही परिणामाची ।
कृष्णार्पण होणे स्वतः उचित त्या हेचि'

अशी हौतात्माची ओढही दिसते.

देशभक्ती आणि ईशप्रेमाशिवाय इतर विषयांवर पुष्कळच प्रासंगिक कविता आनंदरावांनी लिहिली असली तरी आज ती विस्मृतप्राय झाली आहे याचे कारण आनंदरावामध्ये नानाविध प्रकारचे रचनाकौशल्य नव्हते. काव्यनिर्मितीचा आवेग होता पण कलानिर्मितीची सूक्ष्मता नव्हती. निवडावयाच्या विषयाच्या संदर्भात ते मुळीच चोखंदळ नव्हते. त्यांच्या काव्यात गेयता आहे पण कविता चालीवर म्हणण्याइतपतच. अंतर्गत गेयता आणि अंतःसंगीतापासून ही कविता बरीच दूर असल्यामुळे त्यांच्या काहीच कविता जनमानसाची पकड घेऊ शकल्या.

■

ए-१ राणी लक्ष्मीनगर, नागपूर २२

---

१. आनंद कृष्णाजी टेकाडे
जन्म : ५ एप्रिल १८९०. मृत्यु : १६ फेब्रुवारी १९६४.
जन्म : धापेवाडा (जि. नागपूर)
वास्तव्य : मोहपा, नागपूर येथे. काव्यलेखन कालखंड : १९०८ पासून पुढे. काव्य : आनंदगीत, भाग १ (१९२०); भाग २ (१९२४); भाग ३ (१९२८); भाग ४ (१९६१).
नाटक : संगीत मधुर मीलन; संगीत मथुरा (कंसवध).

अनुक्रमणिका

साभार पोच

बाड / अरुण शहाणे / शशांक शहाणे, केडगाव, अहमदनगर (पृ. ५९) रु. १० /-
उत्सव / वसंत वऱ्हाडपांडे / इंदिरा प्रकाशन, नागपूर (पृ. १५५) रु. ४०/-
रान कामुन्या / उषा भालेराव / अमर वैभव प्रकाशन; औरंगाबाद (पृ. ६४) रु. २०/-
अंधारबन / राम गोसावी / श्री. विशाखा प्रकाशन, पुणे-३० / (पृ. ६४) रु. ८/-
डंख / रमेश पाटील / सांची प्रकाशन, पुणे-२८ (पृ. ४२) रु. ७ /-
अरुण / सं. तुकाराम खिल्लारे / जीवन प्रकाशन, सोनखेड (पृ. ६७) रु. १७/-
ढगाळलेले आभाळ / नाना ढाकुलकर / साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद (पृ. ८५) रु. २५/-
मधुमालती / स. म. ओईम्बे / सौ. मालती ओईम्बे, यवतमाळ (पृ. ५२) रु. १५/-
प्रेस आणि दुर्बोधता / जयंत परांजपे / पां. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर (पृ. २४६) रु. ६०/-
इदं न मम / अनु भागवत / पां. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर (पृ. १२७) रु. २५/-

'युगवाणी' संबंधी माहिती

प्रकाशनस्थळ : विदर्भ साहित्य संघ, राणी झाशी चौक, सीताबर्डी नागपूर ४४००१२. प्रसिद्धीचा नियतकाल : द्वैमासिक. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता मधुसुदन पांडुरंग बनहट्टी, भारतीय, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर ४४००१२. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : मनोहर म्हैसाळकर, भारतीय, पवनीकर बंगला, धनतोली, नागपूर ४४००१२. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : सौ. आशा सावदेकर, भारतीय, २५५ लक्ष्मीनगर, नागपूर ४४००२२, वृत्तपत्राची मालकी : विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

मी, मनोहर म्हैसाळकर जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

नागपूर दि. ३० मार्च ८७ — मनोहर म्हैसाळकर, प्रकाशक

'नटसम्राट'–शोधातून गवसलेल्या दिशा

आशा सावदेकर

ग्रं थि की

काही कलाकृती काळाच्या शिरावर पाय देऊन उभ्या असतात. समीक्षक आणि अभ्यासकांनाही आवाहन करण्याचे त्यांचे सामर्थ्य अफाट असते. अशा कलाकृतींपैकी १९७० साली रंगभूमीवर आलेले, पुढच्याच वर्षी म्हणजे १९७१ साली प्रकाशित झालेले वि. वा. शिरवाडकर यांचे 'नटसम्राट' हे महत्त्वाचे नाटक आहे. आजतागायत ह्या नाटकावर चर्चा झाली आहे आणि पुढेही होणार. चर्चा झाली एवढेच नव्हे, ती सर्वांगाने ह्या कलाकृतीचा शोध घेणारी ठरली आहे.

'नटसम्राट'च्या संदर्भात उपलब्ध असलेली ही सर्व चर्चा संकलित करून अभ्यासकांपुढे ठेवणे ही आजच्या नव्या समीक्षेच्या वाटा धुंडाळणाऱ्या अभ्यासकांची गरज होती. म्हणून "नटसम्राट समीक्षा" हा गो. तु. पाटील यांनी संपादित केलेला ग्रंथ महत्त्वाचा ठरतो.

'नटसम्राट' हे नाटक म्हणून, कुठे शिरवाडकर ह्या नाटककाराचे अनमोल देणे म्हणून, विद्यापीठीय पातळीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. पण 'नटसम्राट समीक्षा' हा ग्रंथ त्यासाठीच केवळ निर्माण झालेला नाही. त्यात एक सर्वदृष्टींनी काळाच्या अतीत जाणारे असे विचारमंथन आहे जे नाट्यसमीक्षा ह्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरावे.

गो. तु. पाटील यांनी शीर्षकांपासूनच संपादनातील चोखंदळ दृष्टी प्रकट केलेली आहे. ती शीर्षके लेखांचे मर्म वाढवणारी ठरली आहेत. परिशिष्टात जोडलेली साहित्यसूची आणि प्रथम प्रयोगांची सूची महत्त्वाची असून विभाग दोन मधील नाटकाबद्दलचा साहित्यविचार, शोकात्मिका विचार, अनुभवांतराचा विचार हाही महत्त्वाचा आहे. तिसऱ्या विभागात शिरवाडकरांचा एक लेख, आणि त्यांच्याशी संवाद साधून संपादकांनी त्यांच्या गुरूंबरोबर केलेली अभ्यासपूर्ण चर्चा ही तर ह्या ग्रंथाची महत्त्वाची बाजू आहे.

एकत्रित केल्या गेलेले लेखन हेही एकमेकांशी संबंधित, संवादी वा पूरक नाहीत. उलट ही विवाद करणारी चर्चाच आहे आणि यातच कलाकृतीची श्रेष्ठता आहे. कलाकृतीचे खरे मर्म वेगवेगळ्या वेळी, आणि वेगवेगळ्या दृष्टीने पाहणाऱ्या अभ्यासकांसाठी पूर्णपणे प्रगट होणारे कधीही नसते. ते हुलकावणी दाखवत असते. कलाकृतीचे मर्म जाणण्याच्या दृष्टीने ह्या कलास्वादाच्या प्रक्रिया एकत्रित न्याहाळणेही महत्त्वाचे असते आणि ह्याच दृष्टीने हे संपादन नव्या विचाराला, नव्या दिशेच्या अभ्यासाला गती देणारे ठरावे.

दिगंबर पाध्ये, रा. भा. पाटणकर, प्रभाकर पाध्ये, माधव मनोहर, व. दि. कुळकर्णी, उषा देशमुख, गंगाधर पाटील, कृ. रा. सावंत, दत्तात्रय पुंडे, रमेश धोंगडे ही ह्या संपादनातील लेखकनामावलीही पुस्तकप्रेमी मंडळींना खुणावणारी आहे.

'चेतश्री प्रकाशना'ने अशा महत्त्वाच्या संपादन-ग्रंथाची यशस्वी आणि सुंदर निर्मिती केली त्याबद्दल अल्पावधीत लौकिक मिळवणारे हे प्रकाशन अभिनंदनास पात्र आहे.

म. सु. पाटील ह्यांनी आपल्या प्रस्तावनेत किंग लिअरचा प्रभाव, सिंधूचे मॉडेल ह्या कल्पना ह्या नाटकाबाबत कशा विचारात घ्याव्या याचे फार चांगले विवेचन केलेले आहे. दिगंबर पाध्ये यांनी 'कमी माणसाच्या नात्यातील हरवलेले दुवे दर्शविण्याचे या नाट्यकृतीतील सामर्थ्य' मोठे मानले आहे तर 'नटसम्राट' या नाटकाला 'जीवनाची एक संक्षिप्त सुलभीकृत डी-लक्स एडिशन' असे नाव रा. भा. पाटणकर यांनी दिले आहे. 'निर्भर कल्पनारम्यता आणि दुर्धर वास्तवता' यांच्या संगमात प्रभाकर पाध्ये ह्या नाटकातील सौंदर्य शोधतात, आणि 'ते थोडे आहेत' अशी खंतही प्रकट करतात. 'नटसम्राट' हे 'किंग लिअर'पेक्षा बंदिस्त;

बांधेसूद उतरले आहे आणि 'याच आकुंचनाच्या परिणामी 'नटसम्राट'ची 'ट्रॅजिडी' संबंद्ध विशेष गुणवत्ताही पराकाष्ठेची आकुंचित झाली आहे' असे परखड मत माधव मनोहर नोंदवतात तर म. सु. पाटील यांना 'या नाटकात–एक सनातन दुःख व्यक्त झाल्यासारखे वाटते.' व. दि. कुळकर्णी यांनी आपल्याला हे नाटक कसे जाणवले ते सांगताना म्हटले आहे– 'नाटकाच्या प्रारंभी अप्पासाहेब आपले नटसम्राटत्वाचे प्रभामंडल मिटवून घेताना दिसतात; तर नाटकाच्या अखेरीस अप्पासाहेब आपल्या नटसम्राटत्वाच्या साऱ्या तेजानिशी तळपताना दिसतात!' ह्या नाटकाची प्रश्नात्मकता उषा मा. देशमुख यांच्या लेखाने फार चांगल्या रीतीने उभी केली आहे आणि 'श्रेष्ठ कलाकृती ही नेहमीच विविध प्रश्न उभी करीत असते.' याच दृष्टीने आपले विचार मांडलेले आहेत. श्रीराम लागूंनी 'भूमिकेआडचा माणूस शोधलेला आहे. 'स्वप्नभूमीचे कायदेकानू' म्हणजे काही 'या व्यवहारी जगाचे हिशेब नाहीत.' हे न कळलेले गणपतराव बेलवलकर हेच ह्या नाटकाचे सामर्थ्य असे त्यांनी दाखविले आहे. 'नटसम्राट'च्या भाषेच्या दृष्टीने रमेश धोंगडे यांनी 'आत्मप्रत्ययाची साक्ष देणारी वाक्ये' या संदर्भात अभ्यास मांडलेला आहे. कृ. रा. सावंतांचे 'शोकात्मिके' वरील टिपण महत्त्वाचे आहे. 'नटसम्राटमधील 'विचार' हा अपरिहार्यपणे आलेला आहे.' हे नाटककाराचे मनोगतही अभ्यास-चर्चेला अधिक नव्या दिशा देऊ शकेल असे आहे.

'नटसम्राट–समीक्षा'च्या मुखपृष्ठावर आणि शेवटीही नाटकात महत्त्वाच्या ठरणाऱ्या प्रसंगांची छायाचित्रे आहेत. मुद्रणही सुबक असून ग्रंथाचे व्यक्तित्व मोठे ठसठशीत साधले आहे.

कोणताही विचार हा साहित्यक्षेत्रात पूर्णविराम नसतो याची जाण ठेवून एक मौलिक ग्रंथ रसिक अभ्यासकांना दिल्याबद्दल संपादक व प्रकाशक यांचे मनःपूर्वक अभिनंदन! ■

'नटसम्राट' समीक्षा
–संपादक गो. तु. पाटील
चेतश्री प्रकाशन, अमळनेर, जि. जळगाव
प्रथमावृत्ती, ११ जून १९८६ पृष्ठे २५१
मूल्य–पंचावन्न रुपये.

'विवर्त'

सुलभा हेर्लेकर

'विवर्त' हा प्रभा गणोरकर यांचा दुसरा काव्यसंग्रह. त्यांचा पहिला संग्रह 'व्यतीत'. यानंतर जवळजवळ १० वर्षांनी प्रसिद्ध झालेला हा 'विवर्त' एका वेगळ्या विश्वाच्या समृद्ध आणि सकस जमिनीवर उभा आहे. 'व्यतीत' मधली आर्तता, विवशता, शोधता न आलेले संदर्भ, हे सारे जाऊन 'विवर्त'मध्ये कवयित्रीला स्वतःच्या कवितेतला, स्वतःच्या व्यक्तिमत्वातला एक पक्का सूर सापडलेला आहे.

'झाड' ही एकच प्रतिमा घेऊन त्याच्या अनुषंगानेच सारी कविता उलगडत जाते. मुख्यतः स्त्रीत्वाभोवती रुजणारे सारे संदर्भ उघडपणे न मांडता झाडाच्या प्रतिमेतून साकारताना कवयित्रीला कुठेही शब्दांची वाण पडलेली नाही. अतिशय साध्या साध्या गोष्टीतून स्त्रीचे रूप शब्दांकित झालेले दिसते. उदा. 'पाणी' या कवितेत सखू भोईणीच्या चित्रातून तर 'हिवाळा' यात–

आपण रडायचे नाही
मी स्वत्वाला बजावले.
दूर एका मैदानात निमूट
फुले गाळणाऱ्या वृक्षाच्या झाडाखाली बसून
हातात गारगोटया खेळवित
मी स्वतःला थांबवले,
आपण हिवाळ्यासारखे असायचे.
सारी पाने गळून
झाड ओकेबोके होताना पाहत,
भयाने थरथरत, पण हताश नव्हे.

ह्या ओळीतून निराशा टाळून स्वत्वाला सांभाळायचे हा सूर नेमकेपणाने व्यक्त झाला आहे. माणसाच्या मृत्यूनंतर येणाऱ्या भयाण पोकळीने आपण दहा दिवस त्याच्या जागी दिवा लावतो. या दिव्याबद्दलही कवयित्री म्हणते,

अनोळखी काळोखात कायमचा प्रवेश
करण्यापूर्वी शेवटची प्रकाशाची सोबत
रहावी म्हणून!

'निक्षेप' या कवितेतही यापुढचा विचार 'मूठमाती' देण्याचा व्यक्त झाला आहे.

जीवनमृत्यूच्या प्रवासातले अनेक क्षण गणोरकरांच्या कवितेत व्यक्त होतात. वास्तवातल्या रंगतरंगाचे, स्त्रीच्या मनतळातले सगळे बारकावे त्या नुसत्या टिपत नाहीत तर झाडाभोवती रुजणाऱ्या छोट्या मोठ्या प्रतिमांतून चित्रदर्शी व परिणामकारकताही साधतात. क्षितिजावर घटकाभर रेंगाळत रंग उधळणारा सूर्य आणि कधीतरी टाकलेल्या बियांना उगवलेली हिरवी जीवनेच्छा ! तसेच 'चित्र' ह्या कवितेतही युक्तीने काढलेल्या चित्रामध्ये बाग, वेल, कुंड्या क्रोटन आणि कॅक्टस हेच सारे.

कित्येकदा कथा सांगावी व शेवटी त्याचा विस्मयकारक उलगडा व्हावा अशी कथाकाव्याची शैली घेऊन गणोरकर अनुभव चित्रित करतात. एकाच वेळेला आर्त, हळवा आणि वेधक पण वेधडक असाही अनुभव त्या देतात. आपली वाट आपणच निग्रहाने सांभाळीत जायचे या वृत्तीतून त्यांची कविता ही इतर रूढ असलेल्या कवितांपेक्षा वेगळी वाट चालते आहे. स्त्रीचे, नव्हे तर व्यक्तीचे आजचे अस्तित्व मानवी जीवनातील अनेक चढउतार–जीवनमृत्यूच्या सीमारेषेवर लोंबकळणारा जीव स्वतःच्या वैयक्तिक अनुभवातील प्रीतीचा, दुःखाचा, अगतिकतेचा, एकाकीपणाचा, हताशतेचा अशा अनेक अंगांना कवयित्री लेखणीतून स्पर्श करते. सहजतेने आविष्कार घडणे हे या कवितेचे एक वैशिष्टच ! कणखरपणे स्वतःच्या तळातला, स्वतःच्या दुःखाचा शोध ती घेते.

'माणसातले माणूसपण आटणे
मला समजू शकते
पण मला स्वीकारता येत नाही
माझ्या घरानेही माझ्याशी
चालवलेला हा असहकार.'

कधी ही निराशा दाटून येते तरी त्यातल्या त्यात समाधान आहे, संध्याकाळच्या करुण घटकेला, भलत्या वेळी परतले तर ओवाळून टाकायला आईने रोज भाकरीचा तुकडा जपून ठेवलेला आहे याचे.

स्त्रीच्या साऱ्याच रूपांच्या छटा फार समर्पक रीतीने कवयित्री रंगवते, वर्षानुवर्षे स्त्रीचे तेच जगणे—

'या नव्या मातीला, खऱ्या मातीत मिसळून जाण्यासाठी फार काळ धिमेपणाने वाट पहावी लागेल !'

असे गणोरकरांना वाटते.

एकूणच, एकच मूड जोपासण्याचा गणोरकरांचा हा प्रयत्न, तोही स्त्रीत्वाच्या अवहेलनेभोवती रेंगाळणारा अतिशय परिणामकारक झाला आहे. विशेषतः जी माती सृजनशील तिचेच नाते स्त्रीशी जोडून आणि रोपं, फुलं, झाडं या भोवतीचे एक विश्व निर्माण करून स्त्रीच्या वेदनेला तोंड फोडले आहे. तसे तर कथा, कादंबऱ्यातून वर्षानुवर्ष आपण हेच वाचत आलो आहोत. पण गणोरकरांच्या कवितेत ते झाडांमातीतून वैशिष्टयपूर्ण रीतीने आपल्यापर्यंत पोहचले आहे. 'उन्हात ठेवलेले फूल' किंवा सुरूच्या वृक्षाची पानगळ 'फुलांनी भरून गेलेल्या–जुईच्या आता निव्वळ काड्या उरल्या', 'झाडाने आतल्या आत जळावे' इत्यादी अनेक ओळीतून कवयित्रीच्या मनाची विषण्णता झिरपत येते. लहानपणचा निरागसपणा 'राहीच्या' कवितेतून जसा आपल्यापर्यंत पोहचतो तसाच घर मांडल्यावर घराचे निरर्थकपणही जाणवते 'घर' या कवितेतून. झाडाच्या नव्या धुमाऱ्याबरोबर सहप्रवासी असाच हवा हे मनोगत अलगद उलगडते, पण कुणाची दया नको, तर सरळपणे जगण्याचा 'एक मार्ग हवा' हे सुचवणारी ही तरल कविता.

अनुभवाच्या अभिव्यतीची पारंपारिक लकब न घेता स्वतःला सापडलेल्या वाटेने ती नेटाने निघते म्हणूनच मोजक्या पण प्रकाशमय शब्दात ती स्त्रीचे दुःख नेमकेपणाने मांडते, पण तिने कसे असावे ? हे मात्र सांगत नाही. तिच्या वाटेला आलेले अनंत दुःखाचे क्षण चित्रांकित करताना ही कविता मात्र एकाच दिशेने गेलेली दिसते, मनात शिरून विचार करायला लावते एवढे निश्चित !

■

विवर्त
कवयित्री–प्रभा गणोरकर
पॉप्युलर प्रकाशन–मुंबई
पृष्ठ–९२ किंमत–रु. ३०

नाट्यसम्मेलनाच्या निमित्ताने

सुनील शिनखेडे

इचलकरंजी येथील सदुसष्टाव्या अ. भा. मराठी नाटचसंमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीत विजया मेहता बहुमताने विजयी झाल्या तेव्हा त्यांच्या अभिनयाचा व नाटकांचा चाहता या नात्याने मला खचितच आनंद झाला. नाटच-संमेलनाध्यक्षपदी एका दिग्दर्शिकेची निवड होणे ही तिच्या कर्तृत्वाची पावती आहे. गेली सदतीस वर्षे रंगभूमीवर वावर असणाऱ्या विजयाबाई या एक कुशल कलावती, प्रतिभावंत दिग्दर्शिका, उत्तम संघटक आणि परिश्रमी व यशस्वी निर्मात्या आहेत.

महाविद्यालयीन स्पर्धेत 'लग्नाची बेडी' सादर करून रंगभूमीवर प्रवेश करत्या झालेल्या विजया-बाईंचे रंगभूमीशी आज अतूट नाते आहे. स्वतःचा अभिनय समृद्ध करीत जातानाच कल्पक दिग्दर्शन करून त्यांनी साऱ्यांचे लक्ष आपल्याकडे वेधले. आव्हानात्मक भूमिका यशस्वीरीत्या साकार करण्यात बाई निष्णात आहेत. आयनेस्कोच्या 'खुर्च्या'मधील जख्ख म्हातारी, 'संध्याछाया'तील वृद्धा किंवा 'एक होती राणी'मधील वेश्या. आपल्या समर्थ अभिनयाने विजयाबाईंनी ती-ती पात्रंच जिवंत केली. अगदी अलीकडे 'स्मृतिचित्रे' बघितला तेव्हा विजयाबाई नव्हे जणू लक्ष्मीबाईच आपल्याशी बोलताय्त असे वाटले. अशा कितीतरी भूमिका आणि कितीतरी नाटकांचे दिग्दर्शन. साहजिकच अनेक पारितोषिकं आणि राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय मान-सन्मान त्यांचा स्वीकार करीत निगर्वी वृत्तीनं बाईंचा कलाप्रवास सुरू आहे.

प्रायोगिक नाटकांची चळवळ वेगवान करण्यात विजया मेहता यांचे मोलाचे योगदान आहे. परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे प्रायोगिकतेचे व्याव-सायिक रंगभूमीशी नाते जोडून रसिकांची अभिरुची त्यांनी श्रीमंत केली. मर्यादांचे जाणीव-पूर्वक व यशस्वीपणे उल्लंघन करून कलावंतांमध्ये आत्मविश्वास जागविला. 'आपण मराठी नाटक करतो ते मराठी भाषेतलं असतं, मराठी भावनांचं असतं पण ते भारतीय रंगभूमीचं म्हणता येईल काय ?' या प्रश्नाने त्यांना सतावले आणि त्या भारतीय रंगभूमीच्या मूळाकडे वळल्या. संस्कृत रंगभूमीचा अभ्यास त्यांनी केला. त्यातून त्यांना कालिदासाच्या 'शाकुंतल'च्या निर्मितीचे वेध लागले आणि रंगभूमीवर एक नितांतसुंदर काव्य त्यांनी साकारलं.

नाटकाकडे पाहण्याची विजयाबाईंची दृष्टी ही अभ्यासकाची आहे. त्यांना भावलेल्या नाटकावर त्या कसून परिश्रम घेतात. म्हणूनच त्यांचा नाटचाविष्कार एक आगळा अनुभव असतो. 'हमीदाबाईच्या कोठी'पासून 'वाडा चिरेबंदी' पर्यंतची त्यांची वाटचाल थक्क करून सोडणारी आहे. इब्राहीम अल्काझी हे विजयाबाईंचे गुरू. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच ही वाटचाल करताना विजयाबाईंच्या पायी बळ आले. 'रंगायन' या नाटचसंस्थेची स्थापना हा या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा. रंगायननं जसे कलावंत घडवले, प्रेक्षकांच्या अभिरुचीचा स्तर उंचावण्यात मदत केली तसे नाटककारही समाजाभिमुख केले. नित्यनूतनाचा शोध घेणाऱ्या विजयाबाईंनी नवं, दमदार लेखन करणाऱ्या खानोलकर, तेंडुलकर, दळवी, एलकुंचवार यांच्या एकाहून एक सरस नाट-कांना आपल्या समर्थ दिग्दर्शनाने देखणं रूप दिलं.

रंगभूमीच्या १९५० पासूनच्या प्रवासात, प्रत्यक्ष नाटचचळवळीत सक्रिय असलेल्या विजया मेहता यांच्या अध्यक्षीय भाषणाबद्दल म्हणूनच कुतूहल होते. आपल्या भाषणात विजयाबाईंनी अनेक उपयुक्त योजना मांडल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी झाली तर मराठी रंगभूमीला ते उपकारकच ठरेल. विजयाबाईंनी उपस्थित केलेला आणि काहीही भाष्य न करता सोडून दिलेला एक प्रश्न महत्त्वाचा वाटतो. 'आज मराठी रंगभूमी-वरील सृजनशीलता ओघ बदलण्याच्या प्रक्रियेत आहे का ?' –हा तो प्रश्न. समाजात सृजन-शीलतेची भरती-ओहोटी सतत चालू असते. त्याचे पडसाद साहित्य-नाटचादी कलाक्षेत्रात उमटतात. राजकारण, अर्थकारण इत्यादी अनेक सामाजिक घटनांचा भार पेलत सृजनशीलता

जीवनाचा अर्थ टिपू पाहते, कधी-कधी भांबावते, ओघ बदलते, दिसेनाशी होते. पण लागलीच कुठेतरी नव्या झऱ्याच्या रूपानं प्रकट होते. आज मराठी रंगभूमीवरील सृजनशीलतेचे स्वरूप कसे आहे ? असा प्रश्न विजयाबाईंच्या प्रश्नामुळे माझ्या मनात निर्माण झाला. आपल्या प्रश्नाच्या अनुषंगाने विजयाबाईंनी अजिबात चर्चा केलेली नाही. ती करायला हवी होती असे वाटते.

व्यावसायिक रंगभूमीला विजयाबाई 'लोकमान्य रंगमंच' असे संबोधतात. सकस नाटकं प्रेक्षकांपुढे येण्यात लोकमान्य रंगमंच हा अडसर असल्याचे नमूद करून त्यांनी, तरुण-सुशिक्षित नट या धंदेवाईक अस्थिर प्रवृत्तीला बळी पडत असल्याबद्दल खंत व्यक्त केली आहे. एवढेच नव्हे तर नाटक वेतण्याच्या नाटककारांच्या प्रवृत्तीवरही त्यांनी टीका केली आहे. नाटककाराला उमगलेला एखादा जीवनानुभव अथवा त्याला स्तिमित करणाऱ्या व्यक्तिरेखा हे खरं नाटकाचं केंद्रस्थान असायला हवं असे त्या म्हणतात. दूरदर्शन आणि व्हिडिओनं रंगभूमीवर आक्रमण केलंय् असं म्हटलं जात असलं तरी त्यात काळजी करण्यासारखे काही नाही. थोडा वेळ जाताच मराठी रंगभूमी अधिक सुस्पष्टपणे, चोखंदळ प्रेक्षकांसाठी उभी राहील, असा विजयाबाईंना विश्वास आहे. त्यांनी सुचविलेल्या काही योजना अशा :—

१. ग्रंथालय— " देशातील प्रसिद्ध झालेली नाटकं, नाट्याबाबतचे टीकात्मक लेख, नाट्यशिक्षणासाठी लिहिलेली पुस्तकं यांचा संग्रह करणे. मराठी रंगभूमीसंबंधीची जुनी पुस्तकं आणि प्रकाशनं, जुने फोटो यांचे संग्रह जागोजागी आहेत. या सर्वांचे एक मध्यवर्ती ग्रंथालय होईल यासाठी परिषदेने प्रयत्न करावा.

२. सभासद योजना— आज नाट्य परिषदेचे दोन हजार सभासद आहेत. संख्या दहा हजारापर्यंत वाढविण्याचा संकल्प आहे. यातून मराठी रंगभूमीच्या निर्मात्यांचं, कलाकारांचं आणि प्रेक्षकांचं वैचारिक नातं जुळू शकेल.

३. नाट्यशिक्षण— पूर्वीच्या काळी नाटक कंपन्यांतून नाट्यशिक्षण मिळत असे. शिक्षणविरहित पिढी रंगभूमीवर माझ्यापासूनच सुरू झाली. भारतातील सर्वात श्रेष्ठ रंगभूमी ही उपाधी मिळालेल्या मराठी रंगभूमीवर नाट्य शिक्षणाची इतकी हेळसांड योग्य नव्हे. या बाबतीत नाट्यपरिषदेला निश्चित पुढाकार घेता येईल. नाट्यविद्यालयाची आज मराठी रंगभूमीला गरज आहे. नाट्यपरिषदेनं स्वतःचं विद्यालय काढावं असं नव्हे. पण सरकारी आणि विद्यापीठाच्या यंत्रणेला चालना देऊन विद्यालय स्थापन होईल असे प्रयत्न अवश्य करावेत.

४. अनुदानं आणि सांस्कृतिक देवाणघेवाण— आंतरप्रांतीय आणि आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण, तसंच सरकारी अनुदानं हे व्यवहार पाहणाऱ्या सरकारनियुक्त संस्था दिल्ली-मुंबईत आहेत. अ. भा. नाट्य परिषदेच्या कार्याध्यक्षाला या संस्थांवर सभासदत्व मिळालं पाहिजे. महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धांचं स्वरूपही तावून पाहायला हवं.

५. नाट्य परिषद आणि लोकमान्य रंगभूमी— रंगमंचाची उभारणी करणाऱ्या तंत्रज्ञांची परिस्थिती खरोखरच हलाखीची असते. पेन्शन-योजना, वैद्यकीय मदत, ठरलेले पैसे मिळण्याची हमी या गोष्टींसाठी त्यांची संघटना असणे आवश्यक आहे. पण संघटना उभी करण्याचं काम मात्र व्यवसायात वावरणाऱ्या, तंत्रज्ञांबद्दल मनस्वी कळवळा वाटणाऱ्या मंडळींनीच करायला हवं.

कलाकार आणि निर्माते यांची करारपत्रं असावीत असं मला मनापासून वाटतं. करारपत्रातूनच बेजबाबदारपणाला आळा बसू शकतो. निर्मात्यांचा अरेरावीपणा कमी होईल पण त्याच बरोबर कलाकारांचाही !"

संमेलनाध्यक्षा विजया मेहता यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत यातील काही योजना जरी पूर्णत्वास गेल्या तरी मराठी रंगभूमीच्या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीत ती भरीव कामगिरी ठरेल यात शंका नाही. अ. भा. नाट्य परिषदेला ते शक्य होवो ही नववर्षारंभी शुभेच्छा.

■

प्रायोगिक नाट्यचळवळीचे प्रणेते–अरविंद देशपांडे

शुभदा सावदेकर

अरविंद देशपांडे, रंगमंचाशी गेल्या तीन दशकांपासून संबद्ध असं एक प्रबुद्ध आणि ख्यातनाम व्यक्तित्व. एक जातिवंत कलावंत. नाट्य आणि रंगभूमीशी संबंधित अशा मोजक्या तज्ज्ञांमध्ये अरविंद देशपांडे यांचे नाव अग्रगण्य आहे.

हौशी रंगभूमीपासून ते व्यावसायिक रंगभूमीपर्यंत सर्व प्रकारच्या नाटकांवर त्यांच्या कर्तृत्वाची छाप दिसून येते. विख्यात नाट्य व दूरदर्शन कलावंत असलेल्या त्यांच्या पत्नी सौ. सुलभा देशपांडे यांच्या समवेत त्यांनी रंगभूमीवर अनेक नाटके गाजविली. 'श्रीमंत', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'ती फुलराणी', 'ससा आणि कासव', 'मधल्या भिंती'; 'प्रेमाच्या गावा जावे', 'आर्य चाणक्य', 'लोभ नसावा ही विनंती', 'शितू', 'हॅम्लेट', असा त्यांचा यशस्वी नाट्यप्रवास !

एक कलावंत यशस्वी दिग्दर्शक याहीपेक्षा त्यांचे नाव एकदम डोळ्यासमोर येते ते प्रायोगिक रंगभूमीचे एक ज्येष्ठ प्रणेते म्हणून. प्रायोगिक नाट्यचळवळ ही त्यांची कर्मभूमी. ती यशस्वी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. सुप्रसिद्ध दिग्दर्शिका श्रीमती विजया मेहता यांच्यासमवेत 'रंगायन' मार्फत प्रायोगिक रंगभूमीवर त्यांचे पदार्पण झाले. पण पुढे १९६९ मध्ये त्यांनी 'आविष्कार' ही स्वतःची संस्था काढली आणि छबिलदास सभागृहात नियमित प्रायोगिक नाटके करण्याची एक परंपराच निर्माण केली. तीच आजची सर्वपरिचित आणि रूढ छबिलदास नाट्यचळवळ होय. प्रायोगिक रंगभूमीचे छबिलदास हे विद्यापीठच बनले आणि त्यातून 'तुघलक', 'वादळ माणसाळतंय', 'ससा आणि कासव' इत्यादि अनेक नाटके आणि नवे नवे प्रयोग केले गेले. नाटकांना त्यांनी अत्यंत मेहनतीने नवे रूप दिले.

रंगभूमीला नव्या बिंदूंनी सांधत सांधत हा कुशल रंगकर्मी मराठी नाट्यसृष्टीत आपली पावले घट्ट रोवून उभा होताच पण त्याचबरोबर 'आविष्कार'च्या हिन्दीभागामार्फत रसिकांच्या मनावरही आपला प्रभावो ठसा उमटवत होता. डॉ. शंकर शेष यांची 'रक्तबीज'; 'कोमल गांधार' आदि नाटकांमधील अरविंद व सुलभा देशपांडे' यांच्या भूमिका व अरविंद देशपांडे यांचे दिग्दर्शन खरोखर अप्रतिम आहे. मुळातच प्रायोगिक नाटकांचा हिन्दी रंगभूमीवर अभाव ! तरीही ती अत्यंत प्रभावी व यशस्वीपणे सादर करून हिन्दी रंगभूमीला एक वेगळाच आयाम देण्यात अरविंद देशपांडे यांचा फार मोठा वाटा आहे.

'आक्रोश', 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है', 'तरंग', 'एक दूजे के लिये', 'मोहन जोशी हाजीर हैं' यासारखे हिन्दी चित्रपट आणि 'छोटी बडी बाते' व 'छोटे-बडे' इत्यादि दूरदर्शन मालिका त्यांच्या अभिनयसंपदेने समृद्ध झाल्या आहेत. श्री. राजदत्त यांच्या समवेत 'शापित' या मराठी चित्रपटासाठी त्याना राज्य पारितोषिकही प्राप्त झाले.


आपल्या अभिनयाच्या जोरावर रंगभूमी गाजविणारे अनेक कलावंत असतात पण रंगभूमीचे विविध पैलू उजळविण्याचे आणि त्यासाठी स्वतःच्या पदराला खार लावून घेऊनही सतत यत्नशील असणारे धुरंधर रंगकर्मी फारच कमी ! रंगभूमीच्या विकासासाठी नाटकासोबतच नाट्यचर्चा

नाट्यप्रशिक्षण, नवनवे दृष्टिकोन आणि त्याचे प्रत्यक्ष प्रायोगिक रूप हे फार महत्त्वाचे असते. या माध्यमातूनही अरविंद देशपांडे यांचे योगदान फार मोठे आहे. अनेक छोट्यामोठ्या नट दिग्दर्शकांशी होणाऱ्या विचारांच्या, दृष्टिकोनांच्या आदान–प्रदानाला त्यांनी फार महत्त्व दिले, हाही त्यांचा मोठेपणा मानावा लागेल.

बालरंगभूमी हा आज रंगभूमीचा एक उपेक्षित भाग पण ‘चंद्रशाला’ ह्या संस्थेद्वारे बालरंगभूमीवरही देशपांडे दांपत्याने कित्येक महत्त्वाचे प्रयोग करून तिला समृद्ध बनविली. ‘दुर्गा झाली गौरी’ आदि बालनाट्याचे प्रयोग तर अविस्मरणीय आहेत !

आणि त्याचबरोबर त्यांच्या घडणीचे श्रेय असणाऱ्या अरविंद देशपांडे यांचे नावही ! त्यांच्या अकाली मृत्यूमुळे रंगभूमीचा एक चिराच ढासळला आहे.

■



रेखाटन : हेमंत मानमोडे

|सं|मे|ल|न|वि|शे|ष|

वर्धा जिल्हा साहित्य संमेलन

वर्धा येथील न्यू इंग्लिश हायस्कूल, संत विनोबा भावे नगरात विदर्भ साहित्य संघ वर्धा शाखेच्या वतीने वर्धा जिल्हा साहित्य संमेलन दि. १७ व १८ जानेवारी १९८७ शनिवार व रविवारला अतिशय उल्हसित वातावरणात पार पडले. संमेलनास दोन्ही दिवस रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संमेलनाचे अध्यक्ष होते सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी प्राचार्य देवीदास सोटे.

पहिल्या दिवशी म्हणजे शनिवारी दि. १७ जानेवारीला ठीक पाच वाजता उद्घाटन सोहळ्याला सुरुवात झाली. सरस्वतीच्या प्रतिमेला माल्यार्पण करून व दीप प्रज्वलन करून विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. प्रारंभी आमंत्रक प्रा. किशोर सानप यांनी साहित्यभूषण तु. ना. काटकर व वर्ध्याचे ज्येष्ठ वकील ॲड्. त्रिवेदी यांच्या निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त केली. गो. से. वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रा. रविंद्र भेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली रामदास कुहिटे लिखित स्वागत गीत सादर केले. सुरवातीला आमंत्रक प्रा. किशोर सानप यांनी सर्व रसिकांचे साहित्यिकांचे स्वागत केले व आमंत्रकीय भाषणात वर्धा जिल्ह्याच्या वाङ्मयीन परंपरेचा परामर्ष घेतला. याच प्रसंगी नागपूरच्या अभिजीत प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या प्रा. किशोर सानप यांच्या "ऋतू" या कविता संग्रहाचे प्राचार्य राम शेवाळकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. उद्घाटनपर भाषण करताना प्राचार्य राम शेवाळकर म्हणाले, "भाषा, साहित्य यामुळे माणसे जवळ येतात. ती जोडली जातात. ज्या लिखाणामुळे माणसात दुरावा निर्माण होईल तेढ निर्माण होईल अशी साहित्य निर्मिती होऊ नये, याकडे साहित्यिकांनी जाणिवपूर्वक लक्ष दिले पाहिजे." नंतर प्राचार्य देवीदास सोटे आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, "साहित्यिकांनी फक्त काल्पनिक व रंजक साहित्याची निर्मिती न करता जीवनाचे वास्तव प्रतिबिंब असलेले लिखाण करावे. आता समाजाची अपेक्षापूर्ती फक्त ग्रामीण साहित्यच करू शकते" असे आग्रही मत त्यांनी मांडले. या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य राम शेवाळकर, प्राचार्य श्री. पु. कठाळे, श्री. वामनराव तेलंग, प्रभाकर पाटील; प्रा. किशोर सानप व राजेंद्र मुंढे हे विराजमान होते. शाखाध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी आभार प्रदर्शन केले तर कु. वीणा दीक्षितच्या पसायदानानंतर उद्घाटन सोहळ्याचा हा कार्यक्रम संपला. या सोहळ्याचे संचालन शाखासचिव राजेंद्र मुंढे यांनी केले. यानंतर प्राचार्य राम शेवाळकरांनी वर्धा जिल्ह्यातील साहित्यिकांच्या पुस्तक प्रदर्शनीचे तसेच अभिजीत प्रकाशन नागपूरच्या पुस्तक प्रदर्शनी व ग्रंथ विक्री केंद्राचे उद्घाटन केले.

त्याच रात्री नऊ वाजता सुरू झालेले कवी संमेलन अविस्मरणीय व वैशिष्टपूर्ण ठरले ते निमंत्रितांसोबतच वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ९० कवींच्या सहभागामुळे. या कवी संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले नाना ढाकुलकर यांनी तर यशस्वी संचालनाचा रंग भरला रामदास कुहिटे यांनी. प्रा. नारायण कुळकर्णी, ज्योती कोटमकर, मिर्झा रफी अहमद बेग, प्रा. सुखदेव ढाणके, लोकनाथ यशवंत, अनिल कांबळे, गजानन डामरे, ललित सोनोने, सुनिल शिनखडे, हरीहर पेंदे, प्रा. ज्ञानेश वाकुडकर, या सोबत प्राचार्य देवीदास सोटे, प्रा. किशोर सानप, राजेंद्र मुंढे; भगवान ठग, सतीश पावडे, अनंत भीमनवार, अशोक चोपडे, दीपमाला कुबडे, प्रशांत पनवेलकर व अरविंद पाटील या वर्धा जिल्ह्यातील मान्यवरांबरोबर नवोदितांनी कविता म्हटल्या. असे कवीसंमेलन उत्तर रात्रीपर्यंत रंगले.

दुसरा दिवस गाजला तो परिसंवादाने—

"सामाजिक स्थित्यंतरे व समकालीन साहित्य" या विषयावरील प्रा. डॉ. श्रीकांत तिडके यांच्या

अध्यक्षतेखाली दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी सकाळी नऊ वाजता परिसंवादाला सुरुवात झाली. या परिसंवादात प्रा. रघुनाथ कडवे, प्रा. तु. ग. माने, डॉ. मधुकर कासारे, प्रा. शेषराव तळवेकर, श्री. नागेश चौधरी व श्री. मनोज तायडे यांनी आपली मते मांडली. प्रा. तिडकेंनी विषयाचे सूत्रकथन केल्यामुळे वक्त्यांना विषयाची उकल चांगली करता आली व त्यामुळेच परिसंवाद गाजला. डॉ. श्रीकांत तिडके आपले अध्यक्षीय वक्तव्य करताना म्हणाले, "ज्या भाषणातून प्रश्न निर्माण होतात ते भाषण चांगले. नव्या साहित्याने नवे संदर्भ सामाजिक चळवळीला दिले. तसेच नवी अभिव्यक्ती व क्रियाशील साधनेही दिलीत."

मुक्तछंद कविता : रंगलेली खुली चर्चा–

दुपारी एक वाजता "मुक्तछंद कविता" यावर खुली चर्चा श्री. भगवान ठग यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. गजानन डामरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. चर्चेचे संचालन प्रा. किशोर सानप यांनी केले. ह्या चर्चेत डॉ. श्रीकांत तिडके, प्रा. नारायण कुळकर्णी, नाना ढाकुलकर, प्रा. ज्ञानेश वाकुडकर, बाबाराव मुसळे, सुनीता कावळे व तायवाडे यांनी भाग घेतला. कविता शब्दांची जादू आहे. मुक्तछंद कवितेतून कवीला स्वयंस्फूर्तपणे आपल्या भावनांची अभिव्यक्ती करता येते." असा चर्चेचा निष्कर्ष काढला गेला.

वर्धेकरांना कथाकथनाची मेजवानी

डॉ. मल्हार गंगाधर यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी तीन वाजता कथाकथनाला सुरवात झाली. यात नाना ढाकूलकर, बाबाराव मुसळे, सतीश तराळ, प्रा. नवनीत देशमुख विदर्भातील या प्रतियश कथाकारांसोबत डॉ. किशोर पाटील, प्रा. मीना कारंजेकर, डॉ. शामसुंदर भुतडा, शांतीलाल गढीया, प्रा. प्रमोद मुनघाटे, भालचंद्र डंभे यांनी भाग घेतला. जवळपास तीन तासा पर्यन्त चालणाऱ्या कथाकथनात रसिकांना विनोदी, वैचारिक व भावनात्मक अशा सर्व पैलूंचे कथाकारांनी कथांतून दर्शन घडविले.

समारोप

दि. १८ जानेवारी रविवारी सायंकाळी सात वाजता प्राचार्य मधुकरराव देशमुख, श्री. वसंतराव क्षीरसागर व कविवर्य बाबा मोहोड यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोपाचा भावपूर्ण सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या सुरवातीला सतीश पावडे यांनी खा. शहाबुद्दीन यांच्या प्रजासत्ताक दिनावरील बहिष्काराच्या आवाहनाचा निषेध करणारा, शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देणारा, श्यामची आई व ग्रामगीता ही पुस्तके क्रमिक अभ्यासक्रमात लागू व्हावीत, अशा महत्त्वाच्या ठरावासोबत अन्य ठराव वाचून दाखविले व उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात ठरावांचे स्वागत केले. प्रारंभी प्रा. किशोर सानप यांनी प्रास्ताविक केल्यानंतर श्री. वसंतराव क्षीरसागर, बाबा मोहोड यांची भाषणे झालीत. प्राचार्य मधुकरराव देशमुख आपल्या भाषणात म्हणाले, "साहित्य संमेलनामुळे माणसाची मने जुळण्यास मदत होते. अशी लहानलहान संमेलनेही विशिष्ठ ध्येयाने आयोजित केली जात असतात. नव्या साहित्यिक पिढीला वाव देण्यासाठी ही संमेलने सहकार्य करतात." संमेलनाध्यक्ष प्राचार्य देवीदास सोटे यांनी समारोपाचे अध्यक्षीय भाषण केल्यानंतर हा कार्यक्रम संपला. या कार्यालयाचे संचालन सौ. दीपमाला कुबडे यांनी केले.

दोन दिवसाचे संमेलन यशस्वीपणे उभे करण्यात सर्वश्री प्रा. विजय राठी, प्रा. विनय चौहाण, प्रकाश ठाकरे, अरुण मुंढे, विलास लडके, प्रमोद मुंढे, शिरीष लाडे, शेषराव जुडे, प्रकाश वैद्य, कमलाकर मरघडे, शेख शकील, गोपाल ढवळे, प्रकाश सानप, प्रदीप मुंढे व पुरुषोत्तम सेलधरे यांनी अथक परिश्रम घेतलेत.

■

राजेंद्र दुर्योधन मुंढे
संत ज्ञानेश्वर नगर,
वर्धा ४४२००१.

वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान
वर्तमान

१५ व १६ जानेवारीला वर्धा वि. सा. संघातर्फे जिल्हा साहित्य संमेलन कवी दे. गं सोटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

□ □

दिवाळी अंकातील सर्वोत्कृष्ट ललित लेखासाठी देण्यात येणारे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कै. अनंत काणेकर पारितोषिक अमरावतीचे कवी प्रा. मधुकर केचे यांच्या 'हे भ्रम आभास' या पुणे तरुण भारतच्या दिवाळी अंकातील ललित लेखास मिळाले.

□ □

१९८५ चे दादाभाई नौरोजी स्मृती पारितोषिक जगप्रसिद्ध पक्षीतज्ञ डॉ. सलीम अली यांना प्रदान करण्यात आले.

□ □

कवी विंदा करंदीकर यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पु. ल. देशपांडे पुरस्कृत गोविंदाग्रज पुरस्कार मिळाला.

□ □

कुसुमाग्रज पुरस्काराचे मानकरी नागपूरचे कवी श्रीधर शनवारे हे ठरले. 'थांग–अथांग' या कविता संग्रहासाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला.

□ □

मेनका प्रकाशनचा पु. भा. भावे पुरस्कार देऊन श्री. अरविंद गोखले यांना सन्मानित करण्यात आले.

□ □

विदर्भ साहित्य संघाचा ६४ वा वर्धापन दिन श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा झाला. मराठीत आचार्य पदवी प्राप्त करणाऱ्यांचा व ज्येष्ठ पूर्व सरचिटणीसांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

□ □

रामटेक येथे कविकुलगुरू कालिदास महोत्सव थाटात साजरा झाला. तसेच 'अभिज्ञान शाकुंतलम्' व 'मालविकाग्निमित्र' ही दोन नाटके सादर करण्यात आली.

□ □

महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीसाठी आचार्य अत्रे लिखित 'लग्नाची बेडी' या नाटकाचे महाराष्ट्रात सर्वदूर लागोपाठ पंचवीस प्रयोग करून २५ लाख रु. 'सामाजिक कृतज्ञता निधी' उभारण्याची महत्त्वाकांक्षी योजना मराठी रंगभूमीवरील ज्येष्ठ कलावंत डॉ. श्रीराम लागू, श्री. निळू फुले आदींनी पुढाकार घेऊन पूर्णत्वास नेली. अभिनेत्री तनुजा हिने रश्मीची भूमिका सादर केली.

□ □

प्रसिद्ध नाट्यकलावंत व दिग्दर्शक श्री. अरविंद देशपांडे यांचे आकस्मिक निधन झाले.

□ □

प्रसिद्ध लेखक डॉ. अ. वा. वर्टी यांचे नाशिक येथे निधन झाले.

□ □

विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष व साहित्यिक साहित्यभूषण श्री. तु. ना. काटकर यांचे चंद्रपूर येथे निधन झाले.

□ □

संगीतकार जयदेव यांचे निधन.

□ □

मराठी रंगभूमीची साधने एकत्रित करणारे संशोधक श्री. के टी. देशमुख यांचे देहावसान.

□ □

अखिल भारतीय दलित संमेलन सोलापूर येथे १४ व १५ फेब्रु. ८७ रोजी पार पडले. अध्यक्ष होते प्रा. रावसाहेब कसबे. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी दलित वाङ्मयातील कोंडीचा विचार केला व साहित्यसंमेलने ही आत्मटीकेचे व्यासपीठ असावे असे विचार मांडले.

□ □

अनुक्रमणिका

'सप्तक' तर्फे 'वेटिंग फॉर गोदो' ह्या सॅम्युएल वेकेट यांच्या नाटकाचा प्रयोग रविवार दि. ८ मार्च रोजी वसंतराव देशपांडे सभागृहात पाहण्यास मिळाला. नासिरुद्दीन शाह याचा अभिनय ह्या नाटकाचे एक आकर्षण होते.

□ □

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या अमृत महोत्सवानिमित्त नागपुरात विविध साहित्य संस्थांमध्ये कार्यक्रम झाले. विदर्भ साहित्य संघातर्फे १ मार्च रोजी 'कुसुमाग्रज : एक प्रकाशपर्व' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. याचवेळी प्रा. डॉ. अक्षयकुमार काळे यांनी लिहिलेल्या 'कविता कुसुमाग्रजांची' या समीक्षाग्रंथाचे प्रकाशन डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या हस्ते झाले. 'कुसुमाग्रज : एक प्रकाशपर्व' या कार्यक्रमाची संकल्पना श्री. रमेश अंमईकर यांची होती. त्यात नागपुरातील गायकगायिका श्याम देशपांडे, गुणवंत घटवाई, स्मिता खर्डेनवीस आदींनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे गायन केले. धरमपेठमधील राजाराम वाचनालयात रसिकच्या सहकार्याने आयोजित एका कार्यक्रमात कुसुमाग्रजांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी प्रा. तारा सावंगीकर आणि श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांची, कुसुमाग्रजांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. 'अभिव्यक्ती' व 'भगिनी मंडळ' या संस्थांच्या वतीने कुसुमाग्रजांच्या काव्यावरील एक कार्यक्रम सादर करण्यात आला.

□ □

दि. १२ मार्च रोजी, विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी सभागृहात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून नवलेखकांना कै. यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्काराचे वितरण डॉ. भाऊसाहेब कोलते यांचे हस्ते करण्यात आले. त्यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य राम शेवाळकर होते व साहित्य संस्कृती मंडळाच्या परीक्षक समितीचे प्रमुख म्हणून गंगाधर पानतावणे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबईचे सचिव सूर्यकान्त देशमुख यांनी केले. त्यात प्रकाशनाचा 'मानसन्मान' चे रवींद्र कुळकर्णी यांना मिळाला. इतर पुरस्कार प्राप्त लेखकांत बशीर मुजावर श्री. कुळकर्णी, शांताबाई कांबळे इत्यादींचा समावेश होता.

□ □

दि. १९ व २० मार्च रोजी नाटककार प्रा. कानेटकर यांनी श्रीमती मनोरमाबाई मुंडले व्याख्यान मालेची दोन पुष्पे गुंफली. विषय होते— 'नाटकाचा जन्म मनात आणि जनात.' व 'शिवाजी, संभाजी, ताराबाई आणि औरंगजेब' नाटकातील आणि इतिहासातील पात्रे,' ही व्याख्यानमाला दरवर्षी धरमपेठ शिक्षण संस्था, नागपूर यांच्या तर्फे घेण्यात येते.

□ □

गेल्या साठ वर्षांपासून नागपुरातून सातत्याने प्रकाशित होत असलेल्या 'मुलांचे मासिक' चे संपादक श्री. बा. रा. मोडक यांचा नव्वदावा वाढदिवस २१ फेब्रुवारी रोजी साजरा झाला. विदर्भ साहित्य संघाच्या वतीने सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी श्री. मोडक यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अभीष्टचिंतन केले. नागपूर श्रमिक पत्रकार संघाने श्री. मोडक यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. नागपूरचे महापौर श्री. पांडुरंग हिवरकर यांच्या हस्ते श्री. मोडक यांचा सत्कार करण्यात आला.

□ □

२० मार्च रोजी दुपारी ३-३० वाजता विदर्भ साहित्य संघाच्या शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे मर्ढेकर स्मृतिदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात अरुणा जोशी यांनी 'मराठी कवितेतील मर्ढेकरांच्या काव्याचे स्थान' या विषयावर निबंध वाचला. अध्यक्षस्थानी डॉ. आशा सावदेकर होत्या.

■

वाचकांचा
पत्रव्यवहार

संपादक 'युगवाणी' यासी
स. न. वि. वि.

'युगवाणी'च्या "श्रीपाद महादेव माटे जन्मशताब्दी विशेषांका"त (जुलै–सप्टेंबर १९८६ च्या अंकात) स्नेहश्री म. श्री. दीक्षित यांचा "बापूसाहेब माटे : व्यक्तिविशेष" हा लेख प्रसिद्ध झालेला आहे. या लेखात दीक्षितांनी मी संपादित केलेल्या 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' या ग्रंथाबद्दल एक विधान केलेले आहे. त्या संदर्भात वाचकांसाठी खुलासा देणे मला आवश्यक वाटते.

"'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' (संपा. प्रा. द. दि. पुंडे) या अलीकडच्या पुस्तकात या सर्व वादाची तात्त्विक व इतर तपशीलवार माहिती दिलेली आहे..." असे दीक्षितांनी लिहिले आहे. तथापि या पुस्तकात माटे–बेडेकर–सरदार वादाची माहिती मी दिलेली नाही, हा खुलासा नम्रपणे करणे आवश्यक वाटते.

तथापि 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' या मी संपादित केलेल्या ग्रंथात ज्या माटे यांच्या योजनेवर टीकेचा फार मोठा भडिमार झाला ती "वाङ्मयेतिहासाची एकादश–खंड योजना" पहिल्या परिशिष्टात यथामूल छापलेली आहे. या योजनेचा विरोध दर्शविणारा निबंध दि. के. बेडेकर व गं. बा. सरदार यांनी ऑक्टोबर १९५२ मध्ये तयार केला व तो त्यांनी श्री. म. माटे यांना सादर केला होता. तो निबंध (–"मराठी वाङ्मय व भाषा यांच्या इतिहासाची योजना"–) मात्र बेडेकरांच्या 'साहित्यविचार'मधून प्रस्तुत ग्रंथात हेतुतः घेतलेला आहे. बेडेकर–सरदारांच्या निबंधामुळे आणि अन्य विचारवंतांनी त्या काळात केलेल्या ऊहापोहामुळे महाराष्ट्र साहित्य परिषदेने माटेकृत 'एकादश–खंड योजने'ला तिलांजली दिली आणि नवी सप्तखंडात्मक योजना १९५४ मध्ये स्वीकरली. परिषदेने स्वीकारलेली योजना मी ग्रंथाच्या दुसऱ्या परिशिष्टात यथामूल दिलेली आहे.

सारांश, माटे यांची मूळ योजना, बेडेकर–सरदारांचा निबंध आणि परिषदेने नंतर केलेली सप्तखंडात्मक योजना इतकाच काय तो तपशील 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' या ग्रंथात समाविष्ट झालेला आहे. वाङ्मयेतिहासाच्या त्या काळी गाजलेल्या वादासंबंधीचा समग्र तपशील समाविष्ट झालेला नाही, हे नम्रपणे नमूद करतो.

याच संदर्भात आपल्या परवानगीने आणखी दोन शब्द लिहिण्याची मुभा घेतो.

माटे यांच्या एकादशखंड योजनेच्या निमित्ताने जी टीका झाली, जे लेख, टिपणे पत्रे इत्यादी लेखन झाले त्यातून मराठी वाङ्मयाच्या इतिहास लेखनाविषयी खूप ऊहापोह झालेला आहे. या विचारमंथनाचा पाठपुरावा होणे आवश्यक आहे, असे मला वाटते. खरे तर या संबंधीचा बराच तपशील मी स्नेहश्री म. श्री. दीक्षितांच्या व इतर सुहृदांच्या मदतीने गोळाही केलेला आहे. कुसुमावती देशपांडे, मा. गो. देशमुख, पु. य. देशपांडे, श्री. ना. बनहट्टी इत्यादी मान्यवरांनी आपापले विचार विस्तृत लेखाद्वारे खुद्द म. सा. पत्रिकेत मांडलेले आहेत. (म. सा. पत्रिकेत लेखाद्वारे विचार मांडणाऱ्यात विदर्भातलेच मान्यवर ज्येष्ठजन असावेत हा लक्षणीय योगायोग) माटे यांच्या योजनेवर उघडपणे आणि छुप्या रीतीने (टोपण नावाने किंवा टोपण नावे वाटू नयेत अशा नावांनी) 'मौज' या साप्ताहिकात संपूर्ण वर्षभर (१९५३) भरपूर लेखन झालेले आहे. 'सत्यकथे'-मध्ये सातत्याने टिपणे आली. हे सर्व लेखन अभ्यासपूर्ण होते आणि म्हणून वाङ्मयेतिहास लेखनाच्या तत्त्वविचाराच्या संदर्भात महत्त्वाचे आहेच.

माटे–बेडेकर–सरदार वादातील विचारांचा धांडोळा मला घ्यायचाच आहे. त्या दृष्टीने मी बरीच सामग्री गोळा केलेली आहे, तथापि अजूनही काही महत्त्वाची सामग्री मिळविण्यात मला यश आलेले नाही. उदाहरणार्थ श्री. म. माटे यांनी (किंवा परिषदेने) वाङ्मयतिहासाच्या संपादकां-

कडे "इतिहासात यावयाच्या कलमासंबंधी" एक पत्रक पाठवले होते. या पत्रकात एकापाठोपाठ एक या प्रमाणे ७८ कलमे दिलेली होती व ती बरीच वादविषय ठरली होती. (पाहा "टीका आणि टिप्पणी," सत्यकथा, मार्च १९५३) हे पत्रक मला खूप प्रयत्न करूनही मिळू शकलेले नाही.

माटे–वेडेकर—सरदार वादाचा परामर्श घ्यायचा तर हे महत्त्वाचे पत्रक मिळायलाच हवे, असे मला वाटते. 'युगवाणी'च्या एखाद्या वाचकाकडे हे पत्रक असल्यास त्यांनी मला ते अभ्यासार्थ उपलब्ध करून द्यावे अशी माझी त्यांना कळकळीची विनंती आहे. अर्थातच माटे–वेडेकर सरदार वादाच्या संदर्भात अन्य दुर्मिळ अशी संदर्भसाधने कोणाकडे असल्यास तीही मला हवी आहेतच. अभ्यासकांना मी मदतीची विनंती करतो.

(माझा पत्ता : डॉ. दत्तात्रय पुंडे, ४/९ अर्चना सहनिवास, एरंडवन, पुणे ४११०३८)

आपला,
दत्तात्रय पुंडे

स. न. वि. वि.

आजच युगवाणीचा अंक माटे विशेषांक हाती आला. अंक अतिशय चांगला निघाला आहे. व कै. माटे यांच्या चतुरस्र कामगिरीचे मूल्यमापन प्रस्तुत अंकात समग्रतेने आले आहे. आगामी अंकाच्या जाहिरातीतील भरगच्च आलेख तुमच्याविषयीच्या अपेक्षा वाढविणाराच आहे. पहिल्या अंकापेक्षा या अंकातील संपादनाची चतुरस्रता वाखाणण्यासारखी आहे. तुमचे व संपादक मंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन ! युगवाणीचा दर्जा हळूहळू ऊंचावू लागला आहे हाच त्याचा अर्थ आहे.

आपली,
उषा मा. देशमुख

स. न. वि. वि.

अलीकडच्या आपल्या अंकांबद्दल वेगळे सांगण्याची गरज नाही. इतरत्र मरगळ आली असताना आपण जो भरगच्च दर्जेदार मजकूर उपलब्ध करून देता त्यामुळे प्रत्येक अंक केवळ विशेष अंक नव्हे तर त्याला संदर्भ मूल्यही प्राप्त होते. (ही वैदर्भी रीती आदर्शच म्हणावी लागेल) त्या मागील कष्टांची जाणीव अंक पाहताना पानोपानी होते.

आपले,
माधव कृष्ण

अनुक्रमणिका

युगवाणी : साहित्यसूची

जानें. ८६ ते डिसेंबर ८६ (चार अंक) संकलन–केशव जोशी

कथा–ललित (कथा ९, ललित १)

१. गाडे रमेश दा.	बीस्ट ऑफ बर्डन	पृ. ७८	जुलै–सप्टेंबर ८६
२. जाधव बापू यशवंत	वेशीबाहेरची पाने	पृ. ३२	जाने–मार्च ८६
३. तल्हार मनोहर	गॉडफादर	पृ. ४८	एप्रिल–जून ८६
४. पाठक यशवंत	सागरगोटचांची संध्याकाळ	पृ. ९०	ऑक्टो–डिसें. ८६
५. बेंजल रेखा	एक थेंब आकाश	पृ. ७८	ऑक्टो–डिसेंबर ८६
६. भावे नीलिमा	सुमनोत्सव	पृ. ८५	ऑक्टो–डिसेंबर ८६
७. महल्ले अरविंद	झळ	पृ. ३५	जाने–मार्च ८६
८. माधव कृष्ण	भान	पृ. ७४	ऑक्टो–डिसेंबर ८६
९. मेश्राम योगेन्द्र	मुलाखत	पृ. ७१	जुलै–सप्टेंबर ८६
१०. वडस्कर या. वा.	माणूस किती जगांमधे राहतो ?	पृ. ५२	एप्रिल–जून ८६

कविता–दीर्घ कविता (कविता ७८, दीर्घकविता ३)

१. अलोन	४ कविता	पृ. ३८	जुलै–सप्टे. ८६
	मन नसतेच कधी /उत्सव	पृ. ९८	ऑक्टो–डिसेंबर ८६
२. इनामदार कल्याण	आरव	पृ. १०१	ऑक्टो–डिसेंबर ८६
३. कपूर डब्ल्यू	संदर्भ	पृ. ५०	जाने–मार्च ८६
४. कावळे श्रीपाद गंगाधर	इथवर वाट चालून आलो	पृ. १०२	ऑक्टो–डिसेंबर ८६
५. कांबळे नामदेव चं.	भाडेपट्टा	पृ. ४८	जाने–मार्च ८६
६. कॉम्रेड	चूक	पृ. ४८	जाने–मार्च ८६
७. कुबडे एकनाथ	रात्र	पृ. ३९	जुलै–सप्टें. ८६
८. खरात प्रकाश	दोन कविता	पृ. ११	जाने–मार्च ८६
	ढग छद्मी हसून गेले	पृ. ४३	जुलै–सप्टे. ८६
	जेलरांचे सर्वस्वी थोटे हात	पृ. ४४	जुलै–सप्टें. ८६
	झडू पाहणाऱ्या अजस्रहाताचा	पृ. १०२	ऑक्टो–डिसेंबर ८६
९. खिल्लारे तुकाराम	समनाक	पृ. ४९	जाने–मार्च ८६
१०. गवळे जगन्नाथ	आसवं गाळणारी पावलं	पृ. ५३	जाने–मार्च ८६
११. गिरप सिताराम	प्रवाहपतित	पृ. ४७	जाने–मार्च ८६
१२. गिरिबाल कवी	तेच आता नडणार आहे	पृ. १०१	ऑक्टो–डिसेंबर ८६

कविता–दीर्घकविता

लेख–संशोधन–निबंध (३१)

टिपणे–चर्चा–भाषणे (१९)

मुलाखत–बातचीत (२)

पुस्तके (परिचय–समीक्षा) (१८)

गतकालीन साहित्य (५)

१. पंडित भ. श्री.	आधुनिक काव्य	पृ. ११९	ऑक्टो–डिसेंबर ८६
मुक्तिबोध शरच्चंद्र	युगवाणी डिसेंबर १९५१		
२. पेंढारकर य. दि.	काव्य गायनाची परंपरा आणि त्यातले स्वारस्य	पृ. ७६	एप्रिल–जून ८६
३. माटे श्री. म.	अध्यक्षीय भाषण साहित्य संम्मेलन १९४३	पृ. ३७	जुलै–सप्टे. ८६
	विचार मौक्तिके	पृ. ५५	जुलै–सप्टे. ८६
	श्री. म. माटयांचे हस्ताक्षर	पृ. ८९	जुलै–सप्टे. ८६
४. शेळके शांता ज.	उपेक्षितांचे अंतरंग	पृ. ४६	जुलै–सप्टे. ८६

साभार पोच

समुद्रपक्षी / वत्रन सराडकर / पारिजात पब्लिकेशन, पुणे / रु. १०/– (पृ. ५१)

शेतकरी / फ. मु. शहाजिंदे / आंतरभारती प्रकाशन, लातूर / रु. ५०/– (पृ. २५३)

दलित प्रेमकविता / संपा–शरणकुमार लिंबाळे / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रु. २५/– (पृ. ८३)

दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते / डॉ. योगेंद्र मेश्राम / प्रचार प्रकाशन, कोल्हापूर / रु. ३५/– (पृ. ११९)

अनुबंध / रामभाऊ महाजन / जयश्री प्रकाशन, नागपूर / रु. १५/– (पृ. ५२)

मुक्तिबोधांचे साहित्य / रा. भा. पाटणकर / मौज प्रकाशन, मुंबई / रु. ५०/– (पृ. २१६)

नर्सेस क्वार्टर्स आणि इतर एकांकिका / तारा वनारसे / मौज प्रकाशन, मुंबई / रु. ४०/– (पृ. १३२)

हरदत्तचा जिंदगीनामा / अमृता प्रीतम / अनुवादक पद्माकर जोशी / श्रीविद्या, पुणे / रु. ६०/– (पृ १७६)

वामन परत न आला / जयंत नारळीकर / मौज प्रकाशन, मुंबई / रु. ४५/– (पृ. १३३)

आवजो / पद्मजा फाटक / श्रीविद्या, पुणे / रु. ५०/– (पृ. १८१)

हॅलो चार्लस् / माधव गडकरी / श्रीविद्या, पुणे / रु. २५/– (पृ. ४७)

विदर्भ साहित्य संघ नागपूर

केन्द्रीय कार्यवृत्त दि. १ जानेवारी ते २० मार्च १९८७

दि. १०-११ जानेवारी : विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणारी बालनाट्य एकांकिका स्पर्धा यावर्षी दिनांक १० व ११ जानेवारी १९८७ या दोन दिवशी धनवटे रंगमंदिरात उत्साहाने संपन्न झाली. दोन दिवस चाललेल्या ह्या स्पर्धेसाठी एकूण १० प्रवेशअर्ज स्वीकृत झाले होते. ऐनवेळी एका संस्थेचा अर्ज रद्द झाल्यामुळे ९ एकांकिका सादर करण्यात आल्या. ह्या स्पर्धेचे वैशिष्ट्य असे की भाग घेणाऱ्या सर्व संस्था नवीन होत्या. स्पर्धेत सादर झालेल्या एकांकिकांचा दर्जाही चांगल्या प्रतीचा होता. दोन्ही दिवस पाऊस असून सुद्धा बाल प्रेक्षकांची रंग मंदिरात झुंबड उडाली होती. या स्पर्धेत श्रीयुत नरेश जोशी, श्रीयुत दिलीप म्हैसाळकर व सौ. श्रद्धा तेलंग ह्यांनी परीक्षक म्हणून सहकार्य दिले. लेखनाचे परीक्षण प्रख्यात लेखिका सौ. शुभांगी भडभडे ह्यांनी स्वतंत्रपणे केले. स्पर्धेचे संपूर्ण आयोजन श्रीयुत मनोहर ढोक यांनी केले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ वि. सा. संघाच्या वर्धापनाच्या समारंभात सुप्रसिद्ध नाट्य दिग्दर्शक श्रीयुत पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या हस्ते झाला.

निर्मितीची पारितोषिके

प्रथम : पैंजण रंगभूमी, नागपूर (आधार) रु. ३०१/- रोख व रंजन कला मंदिर फिरता-चषक व प्रशस्तिपत्र.

द्वितीय : केशवनगर माध्यमिक शाळा, नागपूर (गुडबाय डॉ. अस्वलकाका) रु. २०१/- रोख व प्रशस्तिपत्र.

तृतीय : म. पा. देव स्मृती लोकांची शाळा (जगी धूळ मी) रु. १०१/-रोख व प्रशस्तिपत्र.

अभिनयाची पारितोषिके

मुले (प्रथम) राजेश शेरकी, 'आधार'मधील लंगडा, पैंजण रंगभूमी, रु. ५१/-वि. सा. संघ व रु. १५/-कै. देवीदास माधव पालकर पारितोषिक व प्रशस्तिपत्र.

मुली (प्रथम) प्राचीन मराठे, 'पंखाविना पाखरू'मधील श्यामली, सुरुची निकेतन, रु. ५१/- व प्रशस्तिपत्र.

मुले (द्वितीय) पंकज गणोरकर, 'गुड बाय डॉ. अस्वलकाका' मधील राजू, केशवनगर माध्यमिक शाळा, रु. २५/-व प्रशस्तिपत्र.

मुली (द्वितीय) विशाखा जोशी, 'जगी धूळ मी'मधील माणूस, लोकांची शाळा, रु. २५/-व प्रशस्तिपत्र.

मुले (उत्तेजनार्थ) रविकांत डांगे, 'फिरकी'मधील वकील, ऑर्डनन्स फॅक्टरी स्कूल, प्रशस्तिपत्र.

मुली (उत्तेजनार्थ) प्रगती गभणे, 'गुड बाय डॉ. अस्वलकाका'मधील सुषमा, केशवनगर माध्यमिक शाळा, प्रशस्तिपत्र.

दिग्दर्शन, लेखन तथा नेपथ्य पारितोषिके

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक रु. ७५/–रोख व प्रशस्तिपत्र–श्री. संजय काशीकर यांना 'आधार' एकांकिकेसाठी देण्यात आले, तर श्री. संजय वलीवकर यांना 'गुड बाय डॉ. अस्वलकाका' एकांकिकेसाठी उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र देण्यात आले.

सर्वोत्कृष्ट लेखनाचे पारितोषिक रु. ५१/–रोख व प्रशस्तिपत्र श्री. गणेश वडोदकर यांना 'गुड बाय डॉ. अस्वलकाका' या एकांकिकेसाठी देण्यात आले.

सर्वोत्कृष्ट नेपथ्याचे पारितोषिक रु. ६१/–रोख व प्रशस्तिपत्र सर्वश्री जोशी, गुरू, लोणारे यांना 'जगी धूळ मी' या एकांकिकेसाठी देण्यात आले.

दि. १४ जानेवारी : विदर्भ साहित्य संघाचा ६४ वा वर्धापन दिवस बुधवार दिनांक १४ जानेवारी १९८७ रोजी सुप्रसिद्ध नाटककार व दिग्दर्शक श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत धनवटे रंगमंदिरात साजरा झाला. या प्रसंगी नागपूर व अमरावती विद्यापीठाचे आचार्य पदवी (पीएच. डी.) चे मानकऱ्यांचा मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. ढवळे प्रकाशन मुंबई यांचे तर्फे १९८७ ची डायरी प्रत्येकास भेट देण्यात आली. याचप्रसंगी माजी सरचिटणीसांचाही सत्कार करण्यात आला. सर्वश्री श्री. गो. काशीकर मा. नी. गलगलीकर, व गो. स. देहाडराय हे उपस्थित होते. श्री. बाबुरावजी चिमोटे व अ. ल. लिमये प्रकृति–अस्वास्थ्यामुळे हजर राहू शकले नाही.

दिनांक १–१–८६ ते ३१–१२–८६ या काळात नागपूर विद्यापीठाने खालील व्यक्तींना आचार्य पदवीने विभूषित केले–

१. सर्वश्री दिलीप देशपांडे, २. रमाकांत कोलते, ३. श्रीमती प्रतिभा मारावार, ४. श्रीकांत तिडके, ५. विजयकुमार इंगळे, ६. चंद्रकांत पांढरीपांडे, ७. अनंत अडावदकर तर अमरावती विद्यापीठातर्फे ८. श्री. शरद कळणावत यांना आचार्य ही पदवी देण्यात आली. वरीलपैकी सर्वश्री १. रमाकांत कोलते, २ श्रीमती प्रतिभा मारावार, ३. चंद्रकांत पांढरीपांडे व डॉ. शरद कळणावत हे सत्कारास हजर होते.

आचार्यातर्फे डॉ. चंद्रकांत पांढरीपांडे व डॉ. शरद कळणावत यांनी सत्काराला उत्तरादाखल भाषण केले तर माजी सरचिटणीसांच्या वतीने श्री. श्री. गो. काशीकर यांनी सत्कारास उत्तर दिले.

याच प्रसंगी डॉ. वसंत वऱ्हाडपांडे यांच्या "उत्सव" या कथा संग्रहाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे हस्ते झाले.

वि. सा. संघाच्या बालनाट्य स्पर्धेची पारितोषिके श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या हस्ते वितरीत करण्यात आली.

अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर हे होते. कार्यक्रमाचे संचालन सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी तर सत्कार कार्यक्रमाचे संचालन चिटणीस श्री. केशव जोशी यांनी केले. बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाचे संचालन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

कार्यक्रमाचे शेवटी सर्वांना तिळगुळ देण्यांत आला.

दि. १८ जानेवारी : विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी. मंडळाची ८६–८७ ह्या काळातील चवथी व शेवटची सभा झाली.

दि. १९ जानेवारी : कै. ना. के. बेहेरे यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. २३ जानेवारी : कै. राम गणेश गडकरी यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहण्यात आली. सावनेर येथील गडकरी स्मारकाचे काम शासनाने पुढाकार घेऊन तातडीने पूर्ण करावे म्हणून सावनेरला स्थानिक मंडळींनी चालविलेल्या उपोषण मंडपाला संस्थेचे सांस्कृतिक चिटणीस श्री. योगेश वऱ्हाणपुरे ह्यांनी भेट दिली व कै. गडकरी यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहिली.

दि. २६ जानेवारी : भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, कर्मचारी व सेवक वर्गाच्या उपस्थितीत ध्वजारोहण करून सामूहिक राष्ट्रगीत म्हणण्यात आले व मिठाई वाटण्यात आली. त्याचप्रमाणे लोकनायक बापूजी अणे यांचा हा स्मृतिदिन असल्यामुळे त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. ३० जानेवारी : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. ३१ जानेवारी, १ फेब्रुवारी : १९८६–८७ च्या प्रथम सत्रातील मराठीच्या परीक्षा भिडे कन्या शाळेत घेण्यात आल्या. या सत्रातील विविध परीक्षांत एकूण १०,३०२ परीक्षार्थी विदर्भातील एकूण १०२ केंद्रात सम्मीलित झाले. त्यापैकी यशवंत महाविद्यालय (वर्धा) या केंद्रातून सर्वाधिक परीक्षार्थी सम्मीलित झाले. ह्या परीक्षांबरोबरच नागपूर येथे शासनमान्य प्रवीण व प्राज्ञ ह्या परीक्षाही घेण्यात आल्या.

दि. २ फेब्रुवारी : प्रख्यात विनोदी लेखक डॉ. अ. वा. वर्टी यांचे दुःखद निधनानिमित्त शोक-सभा घेण्यात येऊन त्यांना मूक श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. ६ फेब्रुवारी : वि. सा. संघाच्या सहकार्याने जयश्री प्रकाशन नागपूर द्वारा श्री. रामभाऊ महाजन लिखित 'अनुबंध' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ माजी मंत्री श्री. नरेन्द्र तिडके यांचे शुभ हस्ते करण्यात आला. माननीय श्री. मुकुंदराव किर्लोस्कर, आमदार श्री. यादवरावजी भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी प्रा. भा. ल. वैद्य, सौ. श्रद्धा पराते व श्री. विनयकुमार काटे यांची भाषणे झाली. संचालन श्री. श्री. वि. गंध्रे यांनी केले.

दि. ७ फेब्रुवारी : वक्तृत्वोत्तेजक सभा पुणे यांच्या विद्यमाने वि. सा. संघ नागपूर द्वारा आयोजित न्या. रानडे वादस्पर्धा पार पडली. स्थानिक विधी महाविद्यालय, जी. एस्. कॉमर्स, सिटी बिन्नाणी, नागपूर महाविद्यालयाच्या चमूंनी या वादस्पर्धेत भाग घेऊन, विषयाच्या बाजूने व विरुद्ध असे विभिन्न विचार व्यक्त केले. "सर्व नागरिकांना बंधनकारक असा समान नागरी कायदा सत्वर करावा" हा या वादस्पर्धेचा विषय होता. स्पर्धेसाठी ठेवण्यात येणारी फिरती ढाल नागपूर विद्यापीठाच्या विधी महाविद्यालयाने पटकावली. प्रथम क्रमांक या महाविद्यालयाच्या मुकुल कानिटकर

याने पटकावला तर द्वितीय क्रमांक कु. कीर्ती काळे व शामकांत जहागिरदार यांना विभागून देण्यात आला. वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. वादस्पर्धेचे संयोजन श्री. योगेश बऱ्हाणपुरे यांनी केले. या वादस्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. कुमार शं. शास्त्री व वसंत वाहोकार यांनी काम पाहिले.

दि. १० फेब्रुवारी : प्रख्यात समीक्षक कै. नरहर कुरुंदकर यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. १३ फेब्रुवारी : विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने अदबी मजलीस या साहित्य सेवी संस्थेने सुरू केलेल्या मराठी व उर्दू वर्गाचे उद्‌घाटन मौलाना आझाद हायस्कूल, गांधी बाग नागपूर येथे परीक्षा समितीच्या आमंत्रक सौ. शोभाताई उबगडे यांचे हस्ते व डॉ. मनशा उर रेहमान खान 'मनशा' व श्री. रवि जैस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

दि १४ ते १९ फेब्रुवारी : विदर्भ साहित्य संघाच्या स्पर्धा समितीतर्फे दर वर्षी घेण्यात येणारी कै. पद्माकर डावरे स्मृति मराठी एकांकिका स्पर्धा यंदा दि. १४, १५, १६, १७, १८ व १९ फेब्रु. ८७ या दरम्यान धनवटे रंगमंदिरात उत्साहाने संपन्न झाली. परगावच्या ९ व नागपूरच्या १४ अशा एकूण २३ एकांकिका स्पर्धेत सादर झाल्या. सुमारे ६ दिवस चाललेल्या या स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूल, नांद ने सादर केलेल्या 'मेंढरं' या एकांकिकेने ५०१/– रु. च्या प्रथम पुरस्कारासह कै. पद्माकर डावरे फिरती ढालही पटकावली.

या स्पर्धेत सादर झालेल्या एकूण २३ एकांकिकांत रंजन कला मंदिरच्या 'मॅनर्स' ने दुसरा तर पी. एम. जी. हौसिंग सोसायटी, नागपूरच्या 'पडघम' ने तिसरा क्रमांक पटकावला.

'मेंढरं' च्या दिग्दर्शनाबद्दल दिलीप पुरी यांना दिग्दर्शनाचा प्रथम पुरस्कार मिळाला. पुरुष विभागात 'यमूचे रहस्य' मधील विनोद मुरकुटेला मधूच्या भूमिकेसाठी प्रथम तर 'रंक' मधील कोसाच्या भूमिकेसाठी किरण बनसोड ह्यांना अभिनयाचा द्वितीय पुरस्कार मिळाला. महिला अभिनयातील 'कोको' ची भूमिका करणाऱ्या कु. पूजा शिंगणे हिला अभिनयाचा प्रथम तर 'वेताळाची गोष्ट' मधील शिरमीची भूमिका करणाऱ्या कु. सोनाली देशपांडे हिने अभिनयाचा द्वितीय पुरस्कार पटकावला. 'आंडेल' मधील निळाची भूमिका करणाऱ्या सुनील रामटेके व 'उत्खनन' मधील मिरी सादर करणाऱ्या अनुपमा नगरकर यांनी अभिनयाची उत्तेजनार्थ प्रमाणपत्रे प्राप्त केली.

निर्मितीचा उत्तेजनार्थ पुरस्कार डायमंड क्रीडा व सांस्कृतिक मंडळ उमरेडच्या 'कोको' या कांकिकेने पटकाविला.

लेखनासाठीच्या पुरस्काराची निवड प्रा. म. ना. लोही यांनी केली व श्री. सुरेश गांजरे यांना 'मेंढरं' व श्री. माणिक कानेड यांना 'चकवा' या एकांकिकांसाठी हे पारितोषिक विभागून देण्यात आले. यावर्षीपासून श्री. शिवशंकर माळोदे यांनी त्यांचे दिवंगत बंधु कै. मुरलीधर माळोदे यांच्या स्मरणार्थ ठेवलेले उत्कृष्ट प्रकाश योजनेचे पारितोषिक श्री. शिवशंकर माळोदे यांनी 'वेताळाची गोष्ट' या एकांकिकेच्या प्रकाश योजनेबद्दल पटकावले. परंतु त्यांनी रोख रकमेचा (१०१/ – रु.) स्वीकार न करता याच स्पर्धेतील अन्य दुसऱ्या उत्कृष्ट प्रकाश–योजनाकाराला ते द्यावे

अशी विनंती केली. त्याप्रमाण परीक्षकांनी या पारितोषिकासाठी 'मॅनर्स'मधील प्रकाश–योजनाकार श्री. प्रमोद जोशी यांची या पारितोषिकासाठी निवड केली.

सर्वश्री अरविंद पाठक, महेश पातुरकर, आणि सौ. ज्योत्स्ना धर्माधिकारी यांनी परीक्षकाची जबाबदारी पार पाडली. सुमारे सहा दिवस चाललेल्या या नाट्यस्पर्धेचा आढावा श्री. अरविंद पाठक ह्यांनी घेतला, तर संचालन आणि प्रास्ताविक श्री. दिनेश दगडकर यांनी केले. सौ. कुमुदताई पाठक यांनी निकाल घोषित करून आभार प्रदर्शन केले. नाट्य समितीच्या सर्व सदस्यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी बरेच परिश्रम घेतले.

दि. २१ फेब्रुवारी : 'मुलांचे मासिक' या माध्यमातून सातत्याने साठ वर्षेपर्यंत केवळ विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील बाल पिढीवर सुसंस्कार करणारे, आयुष्याच्या उत्तरार्धातही ते व्रत निष्ठेने चालविणारे आणि बालनिष्ठा सांभाळत असतानाच उपनिषदांच्या गाढ्या अभ्यासात व चिंतनात स्थितप्रज्ञ वृत्तीने रममाण होणारे नागपुरातील ज्येष्ठ पत्रकार श्री. बा. रा. मोडक यांनी वयाच्या नव्वदीमध्ये पदार्पण करून शतकाकडे वाटचाल सुरू केली आहे. त्यानिमित्त वि. सा. संघाचे सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर व शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे आमंत्रक चंद्रकांत कुळकर्णी ह्यांनी त्यांचे निवासस्थानी जाऊन त्यांचे पुष्पहार घालून अभीष्टचिंतन केले.

दि. २३ फेब्रु. : कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. २५ फेब्रु. : वि. सा. संघाचे जुने व ज्येष्ठ आजीव सभासद व माजी कार्यकारिणी सदस्य श्री. ब. ना. एकबोटे यांच्या दुःखद निधनानिमित्त शोकसभा घेण्यात येऊन त्यांना मूक श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. २६ फेब्रु. : स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. २८ फेब्रु. : 'राष्ट्रीय विज्ञान दिन' विदर्भ साहित्य संघ मराठी विज्ञान परिषद नागपूर यांच्या सहकार्याने साजरा करण्यात आला. शालेय विद्यार्थींना उपयोगी पडतील अशा वैज्ञानिक प्रयोगाची माहिती देणाऱ्या पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवनशास्त्र आदी विषयावरील दुर्मिळ उद्‌बोधक अशा फिल्म्स् व त्या अनुषंगाने त्या विषयावरील तज्ञांचे मार्गदर्शन असे एकूण ह्या कार्यक्रमाचे स्वरूप होते. शालेय विद्यार्थी व शिक्षकं यांच्या ह्या नावीन्यपूर्ण कार्यक्रमास चांगलाच प्रतिसाद मिळाला.

दि. १ मार्च : विदर्भ साहित्य संघाने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या अमृत महोत्सवानिमित्त 'कुसुमाग्रज– एक प्रकाशपर्व' हा श्री. रमेश अंभईवर संकलित एक विशेष कार्यक्रम सादर केला. ह्या प्रसंगी डॉ. अक्षयकुमार काळे यांचे 'कविता कुसुमाग्रजांची' ह्या ग्रंथाचे काशन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुळकर्णी यांचे हस्ते करण्यात आले. प्रकाशक श्री. राजाभाऊ कुळकर्णी व लेखक डॉ. अक्षयकुमार काळे यांचे वि. सा. संघातर्फे स्वागत करण्यात आले. कुसुमाग्रजांच्या वाङ्मयाचे प्रदर्शनही ह्या कार्यक्रमाला जोडून ठेवण्यात आले होते.

दि. १ मार्च : 'श्यामची आई' ह्या चित्रपटात 'श्याम'ची भूमिका साकार केलेले व बालरंगभूमीशी निकटचा संबंध असणारे श्री. माधव वझे ह्यांनी संस्थेला भेट दिली. संस्थेच्या एकूण कार्याबद्दल त्यांनी प्रशंसा केली.

दि. ३ मार्च : डॉ. वा. वि. मिराशी यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेला हार घालून श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. ४ मार्च : मराठी रंगभूमीचे एक अभ्यासक कै. मा. कृ. शिंदे यांचे दुःखद निधनाबद्दल शोकसभा घेऊन मूक श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. १२ मार्च : भारताचे थोर नेते रसिकराज कै. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने 'कै. यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार' वि. सा. संघाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील नवलेखकांना डॉ. वि. भि. कोलते यांचे हस्ते व प्राचार्य राम शेवाळकर यांचे अध्यक्षतेखाली देण्यात आले. वि. सा. संघाच्या वतीने श्री. वामन तेलंग ह्यांनी आभार मानले. श्री. सूर्यकांत देशमुख ह्यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

दि. १९ मार्च : विख्यात नाटककार श्री. वसंतराव कानेटकर यांनी विदर्भ साहित्य संघास भेट दिली. संस्थेच्या कार्याबद्दल त्यांनी आस्थेवाईक चौकशी करून कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

दि. २० मार्च : शुक्रवार दि. २० मार्च रोजी श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे कै. बा. सी. मर्ढेकर यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी "मर्ढेकरांच्या मराठी कवितेतील कामगिरी" या विषयावर प्रा. अरुण जोशी यांच्या शोध निबंधाच्या वाचनाचा समयोचित कार्यक्रम डॉ. सौ. आशा सावदेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. अभ्यासकांनी एका नवीन विचारसरणीचा मागोवा घेतला. ■

"चुकीची दुरुस्ती"

"युगवाणी / ऑ. नो. डि. ८६ या अंकातील पान नं. १४३ शाखा वृत्त–देऊळगाव राजा······कार्यक्रमसंचालन प्रा. दा. ए. दगडे यांनी केले......" असे हवे. मुद्रण दोषाबद्दल क्षमस्व.

—सरचिटणीस

चामोर्शी :

शाखा उद्घाटनाचा कार्यक्रम दिनांक २१-१-८७ रोजी सायंकाळी प्राचार्य राम शेवाळकर, अध्यक्ष वि. सा. संघ यांचे हस्ते व खासदार श्री. शांतारामजी पोटदुखे यांचे अध्यक्षतेखाली तसेच प्रा. सुरेश द्वादशीवार, प्रा. मदन धनकर, प्रा. रमेशचंद्र मुनघाटे, आमदार शाम वानखेडे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

दि. २८-१-८७ ला शाखेतर्फे श्रीमान के. ज. उपाध्य शांताराम पुरोहित यांचे "साहित्याची आवड का असावी ?" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

लाखनी

दिनांक २६-१-८७ रोजी शाखेतर्फे राष्ट्रभक्तीपर गीतगायन स्पर्धा घेण्यात आली. अध्यक्षपदी माजी अध्यक्ष श्रीमान दा. सो. शिवणकर, मुख्याध्यापक वरिष्ठ प्रा. शाळा शिवनी (मोगरा) हे होते. "राष्ट्रीय गीते भावगीताप्रमाणे आनंद मिळवून देतातच याशिवाय आपला इतिहास, धर्म, संस्कृती यांची जाणीव करून देऊन राष्ट्रीय अस्मिता जागृत करतात. म्हणून विद्यार्थ्यांनी देशप्रेमाला सर्वोत्तम स्थान दिले पाहिजे" अशा आशयाचे उद्गार त्यांनी काढले. बापूसाहेब लाखनीकरांनी याप्रसंगी मार्गदर्शन केले. यशस्वी स्पर्धकांना श्री. शिवणकरांच्या हस्ते पारितोषिके व प्रशस्तीपत्रके देण्यात आली.

यशस्वी स्पर्धक

पूर्व मा. विभाग (वर्ग ५ ते ७) (१) कु. मुक्ता दौलत बोरकर (२) कु. प्रतिभा प्रभाकर डवीर, (३) कु. ज्योती प्रभूनाथ पारधी

माध्यमिक विभाग (वर्ग ८ ते १०) (१) भूपेशकुमार प्रभूनाथ पारधी, (२) कु. मंगला वासुदेव वालोदे, पोहरा, (३) कु. साधना दुलीचंद राऊत, पिपळगाव

महाविद्यालयीन : (१) कु. रेखा संपत खोब्रागडे, पोहरा (२) कु. अपर्णा नारायणराव खेकाळे, (३) कु साधना वामनराव सांवरे, (४) अजयसिंह व्यास.

चोहोट्टा बाजार

दि. १-२-८७ रोजी शाखा सभा घेण्यात आली. ही सभा प्रा. शांताराम बुटे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होऊन ठराव क्र. १ व ठराव क्र. ३ प्रमाणे खालील कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

(१) कार्याध्यक्ष : प्रा. ज. पां. खोडके, (२) कार्योपाध्यक्ष : सौ. गोकर्णा माधवराव आढे, (३) सचिव : प्रा. दि. पु. आगरकर, (४) सहसचिव : श्री. श्रीराम गंगाराम बुटे, (५) खजिनदार श्री. भीमराव भिकउन बुंदे, (६) कार्यक्रम प्रमुख : श्री. शिवराम संपतराव बुंदे, (७) कायदा सल्लागार : ॲड. श्री. प्रकाश पुरुषोत्तम गव्हाळे, (८) कार्यकारिणी सदस्य : श्री. रामनिवास रामनारायण राठी.

दिनांक २५ फेब्रुवारी ते २ मार्चपर्यंत शाखेने केशव भिकाजी ढवळे प्रकाशन मुंबई प्रदर्शनी भरविण्याचा उपक्रम केला. काकासाहेब श्रोत्रिय यांच्या अध्यक्षतेखाली श्री. भगवंतराव इंगळे जिल्हा प्रतिनिधी, लोकमत यांनी प्रस्तुत प्रदर्शनीचे उद्घाटन केले होते. प्रा. ज. पां. खोडके, श्री. सुरेश

खोडके, श्री. रघुवीर ढवळे यांनीही याप्रसंगी आपले विचार मांडले. व श्री. प्रा. दि. पु. आगरकर यांनी आभारप्रदर्शन केले. याप्रसंगी नागपूर केंद्रीय कार्यालयाकडून उत्तम सहकार्य लाभले.

चंद्रपूर

दि. २९–१–८७ रोजी गोंडवण शाखेचे संस्थापक साहित्यभूषण तु. ना. काटकर यांच्या दुःखद निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी खास सभा घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. श. वि. सालफळे होते. सभाध्यक्षांनी शोक प्रस्ताव वाचून दाखविल्यावर सर्वांनी मूक श्रद्धांजली अर्पण केली.

नरखेड

दि. ३० जानेवारी ८७ ला राष्ट्रपिता म. गांधी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्षस्थानी कार्योपाध्यक्ष श्री. पांडुरंग कटारे हे होते. याप्रसंगी मराठी व हिंदी साहित्यिक प्रा. नरेंद्र पराडकर यांचे "महात्मा गांधी व आमचा भारत" या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण झाले.

दि. ६ व ७ फेब्रुवारी रोजी नगर परिषद जवाहर वाचनालयाचे सहकार्याने वसंत व्याख्यानमाला आयोजित केली होती. इतिहासकार श्री. गो. मा. पुरंदरे यांची दोन व्याख्याने झाली. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष श्री. रमेश गुप्ता नगरपरिषदाध्यक्ष होते.

भंडारा

शाखेच्या वतीने दि. १२–२–८७ रोजी सार्वजनिक वाचनालयात सुप्रसिद्ध कथालेखिका सौ. वर्षा रेगे यांच्या कथाकथनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी आपल्या कथाकथनाची "मुखवटा", "हेमामालिनी आमच्या ऑफिसात" आणि "वायको माहेरी जाते" या कथा सादर केल्या.

कार्यक्रमाचे संचालन सहसचिव कु. माधुरी सुतोने यांनी केले तर स्वागत आणि आभारप्रदर्शन कार्योपाध्यक्ष सौ. सुधा कापरे यांनी केले.

कुऱ्हा

दि. १२–२–८७ रोजी शाखेचे उद्घाटन प्राचार्य राम शेवाळकर, अध्यक्ष, वि. सा. संघ नागपूर यांचे हस्ते दीप प्रज्वलीत करून झाले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. नानासाहेब पिंपळगांवकर, चिटणीस वि. सा. संघ नागपूर उपस्थित होते व अध्यक्षस्थानी श्री. वसंतराव मालधुरे शिक्षक, जि. परिषद अमरावती हे होते. सर्वप्रथम पाहुण्यांचे कुंकुमतिलक लावून, स्वागतगीताने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन श्री. सुधाकरराव कडू व आभारप्रदर्शन सहसचिव प्रा. विजय कडू यांनी केले.

मूल

दि. ३–१–८७ रोजी कै. नरेंद्र उपलप शाखा सहचिटणीस व संस्थापक यांना शाखेतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कै. उपलप यांनी मूल येथे साहित्यिक व सांस्कृतिक चळवळ उभारली, शाखेच्या प्रगतीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. ते ज्योतिष्य शास्त्राचे चांगले अभ्यासक होते.

धामणगाव

दि. २८–२–८७ रोजी शाखेच्या वतीने श्री. जगन वंजारी यांचा "चेहरे वऱ्हाडचे" हा शंभरावा निखळ मनोरंजनात्मक कार्यक्रम पार पडला. प्रथम अखिल भारतीय संगीत स्पर्धेत प्रथम

क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल शाखेचे डॉ. संजय अंदूरकरांचे गायनाचार्य विष्णूपंत भातखंडे यांचा फोटो भेट देऊन कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. शिरीष पाटील व आभारप्रर्शन प्रा. सुखदेव ढाणके यांनी केले.

उमरखेड

दि. २ व ३ डिसेंबर ८६ रोजी स्थानिक साधु महाराजांच्या सभामंडपात पुण्याचे विद्वान पंडित रामचंद्रशास्त्री जोशी यांची अनुक्रमे भवभूती व संत ज्ञानेश्वर ह्या विषयावर व्याख्याने झाली.

लॉयन्स क्लब व शाखा यांचे संयुक्त विद्यमाने यवतमाळचे जिल्हा माहिती अधिकारी व व्यंग चित्रकार श्री. बळवंतराव घुसे यांच्या व्यंगचित्रांचे प्रदर्शन दि. १७ व १८ फेब्रुवारी ८७ रोजी न. पा. उद्यानात आयोजित केले होते. दि. १७-२-८७ ला या प्रदर्शनाचे उद्‌घाटन नगराध्यक्ष श्री. सुरेशचंद्रजी माहेश्वरी यांचे हस्ते, डॉ. मोहन पद्मावार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याप्रसंगी सर्वश्री डॉ. बा. दा. जोशी, प्राचार्य चितलांगे, चंद्रकांत क्षीरसागर, बळवंतराव घुसे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संयोजन व संचालन श्री. दीपक देशमुख यांनी केले.

शाखेचे माजी कार्याध्यक्ष १९७५ साली भरलेल्या वि. सा. संमेलनाचे स्वागताध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक लो. बापूजी अणे यांचे सच्चे अनुयायी कै. बळीरामपंत एकबोटे यांच्या निधनाबद्दल शोकसभा घेऊन सभेने पारित केलेला शोकप्रस्ताव कै. ब. ना. एकबोटे यांचे चिरंजीव श्री. काशीनाथ-राव एकबोटे यवतमाळ यांचेकडे पाठविण्यात आला.

तिरोडा

शाखेतर्फे नुकतीच काही नामवंतांची व्याख्याने पार पडली. पहिले व्याख्यान "युगवाणी"च्या मुख्य संपादिका डॉ. सौ. आशा सावदेकर यांचे "गडकऱ्यांच्या मानसकन्या" या विषयावर झाले. त्यांनी सिंधु, इंदुबिंदु, कालिंदी इ. स्त्रीपात्रांचे व्यक्तिमत्त्व, गडकरी शैली वैशिष्टयाने सादर केले. दुसरे व्याख्यान मेडिकल कॉलेजचे प्रा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांचे "तुलसी रामायणातील राम" या विषयावर झाले. शाखा कार्याध्यक्ष प्राचार्य गो. मो. कोलते यांनी प्रास्ताविक भाषणातून व्याख्यात्यांचा परिचय करून दिला. शाखा सचिव व श्री. शंकर हरोडे यांनी व्याख्यात्यांचे स्वागत केले. श्री. संजीव कोलते यांनी आभार मानले.

कारंजा (लाड)

शाखेच्या वतीने १४ जाने. ८७ ला दरवर्षीप्रमाणे मकर संक्रांतीनिमित्त तिळगुळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रा. विसुभाऊ बापट यांचा "कुटुंब रंगलय काव्यात" हा मनोरंजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. प्रा. बापट यांचे स्वागत कार्योपाध्यक्ष श्री. बाळासाहेब नंदे यांनी केले. शालान्त परीक्षेत मराठी या विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या कारंजातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी २१ रुपये पारितोषिक द्यायचे घोषित केले. त्यानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून तेजसिंग वसराम पवार (जे. डी. चवरे विद्यालय) कु. मीनाक्षी भलोणे, कु. शैलजा झंझाड (कंकुबाई कन्या शाळा) अमराठी भाषिक विद्यार्थ्यांमधून किशोर देवडा (जे. डी. चवरे विद्यालय), तर उर्वरीत गटातून अविनाश आमटे (जे. डी. चवरे विद्यालय) इत्यादी विद्यार्थ्यांना प्रा. विसुभाऊ बापट यांचे हस्ते प्रत्येकी २१ रुपये पारितोषिके देण्यात आली. शाखासचिव प्रा.

सुभाष गढीकर यांनी प्रास्ताविक केले तर कार्याध्यक्ष श्रीमती चारुमती डोरले यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुभाष गढीकर यांनी केले.

'हसत खेळत संगीताची ओळख' शिबिर

दि. २८-१-८७ ते ३०-१-८७ पर्यंत प्रसिद्ध संगीतज्ञ पंडित अरविंद गजेंद्रगडकर यांचे 'हसत खेळत संगीताची ओळख शिबिर' आयोजित करण्यात आले होते. हे २५१ वे शिबिर असून या शिबिराचा लाभ ६० रसिकांनी घेतला. कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. शरद अमोलकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाबासाहेब संपट यांनी पंडित गजेंद्रगडकरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. ३ दिवसाच्या या शिबिरात संगीताची ओळख आस्वाद, स्वर, सूर, राग, ताल, आदि अनेक बाबींचा परिचय करून दिला. शेवटच्या दिवशी पंडितजींच्या बासरी व स्वरमंडळाचा बहारदार कार्यक्रम झाला. या वेळी तबल्यावर श्री. शरद पवार यांनी साथ दिली. कार्यक्रमस्थळाबाबत नगरपालिका व जे. डी. चवरे विद्यालय यांचे सहकार्य लाभले.

विप्रस

(१) दि. २६ जाने. ८७ रोजी नगर परिषदच्या सौजन्याने श्री. बबन सराडकर यांचे प्रमुख उपस्थितीत भव्य कवी संमेलन पार पडले. श्री. सुरेश गांजरे यांनी संचालन केले. यात श्री. नीलकृष्ण देशपांडे व स्थानिक कवींनी आपल्या बहारदार कविता सादर केल्या. नगराध्यक्ष श्री. विजयकुमार बंग, कार्याध्यक्ष प्राचार्य म. वि. ढोले व सदस्य यांनी कार्यक्रमासाठी योगदान दिले. श्री. रमेश काळे यांचे संयोजन श्री. बालगिर यांचे प्रास्ताविक तर प्रा. राम गायगोले यांनी आभारप्रदर्शन केले.

(२) दि. २१-२-८७ ला स्व. माणिकलालजी बंग यांचे स्मृति प्रित्यर्थ प्रा. श्रीकांत तिडके यांचे 'निळ्या पहाटेची चाहूल' या विषयावर प्राचार्य एम्. एम्. महल्ले यांचे अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. प्रा. पद्मावार यांनी प्रास्ताविक, श्री. भालचंद्र गायगोले यांनी पाहुण्यांचा परिचय तर प्रा. राम गायगोले यांनी संचालन केले. आभारप्रदर्शन सौ. दुद्दलवार यांनी केले. प्राचार्य ढोले, प्रा. केशरवाणी श्री. शर्मा यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम केले.

नवीन मान्यताप्राप्त शाखा

चोहोट्टाबाजार, ता. आकोट, जि. अकोला.

नवीन आजीव सभासद

सर्वश्री सुधाकर श्रावणजी चौधरी, विजय लक्ष्मणराव जोशी, भूपेशकुमार दिनकररावजी मेहर (सर्व नागपूर)

सर्वश्री महादेव विक्रमसा ढोले, प्रभाकर दत्तात्रयराव खेडकर, जयंत माधवराव घाडगे, श्रीराम उकंडजी राऊत, प्रा. रामभाऊ बापुरावजी गायगोले, प्रा. गोकुलप्रसाद रामप्रसाद केशरवाणी, कृष्णराव रामजी खोरगडे, प्रा. गोविंद वामनराव गावंडे, प्रा. विठ्ठल बापूरावजी काटेवाले, प्रा. माणिक शामरावजी गोल्हर, प्रा. मधुकर शिवाजी वाघमारे, प्रा. शरद माधवराव पद्मावार, प्रा. जगन्नाथ सांडूजी गवळीकर, रमेश जयरामपंत काळे, ॲड. सुधाकर पिरूजी जाधव, भालचंद्र परशरामपंत गावंडे, रामभाऊ लक्ष्मणराव तुपसुंदरे, विनोद जानराव वानखेडे, सुरेश देवेंद्रजी शर्मा, सौ. अरुणा दीपकराव

दुद्दलवार, सौ. शोभा सुधाकरराव भसेगावकर, कैलासचंद्र रामविलासजी बाजोरीया, बालाजी विठ्ठलराव बेलगमवार, वामन विनायकराव देशपांडे, जगदीश वीरभान भरोडा, महादेव परसराम भगत, प्रा. विनोद शामराव गावंडे, हरिभाऊ शंकरराव शिंदे (सर्व दिग्रस)

सर्वश्री बबनराव यादवराव माधमशेट्टीवार, मनोहरराव कृष्णाजी पालारपवार, माधवराव गणपतराव चावरे, प्रकाश पांडुरंगपंत गण्यारपवार (सर्व चामोर्शी)

सर्वश्री जनार्दन पांडुरंगपंत खोडके; रामनिवास रामनारायणजी राठी, गोपालकृष्ण गोविंदराव कुळकर्णी, प्रा. हिरालाल पूर्णाजी आगरकर, भिमराव भिवसनराव बुंदे, रविंद्र जयकुमार इंजनकर, रमेश भिमराव मानकर, सौ. गोकर्णाबाई मधुकरराव आढे, प्रकाश पुरुषोत्तम गव्हाळ, दिनेश विनायकराव तरोळे, प्रल्हाद महादेवराव इंगळे, शिवराम संपतराव बुंदे, डॉ. चंद्रकांत लक्ष्मणराव तिरुक, सौ. सुरंजनादेवी गणेशराव खेडकर, श्रीराम गंगारामजी बुटे, सौ. सुनंदा शांतारामजी बुटे, (सर्व चोहोट्टाबाजार)

डॉ. आनंद सुभेदार, श्री. झुंबरलालजी प्रेमराजजी राठी, श्री. तुळशीराम वी. बेलसरे (सर्व धामणगाव रेल्वे)

श्री. मन्साराम तुकारामजी पडोळे, श्री. देवाजी तुकारामजी पडोळे, श्री. डेबु दुवरामजी धोंडे; (सर्व लाखनी)

श्री. अनिरुद्ध सदाशिव पांडे (यवतमाळ) ■


सरचिटणीस

युगवाणी

एप्रिल/मे/जून '१९८७

बालगंधर्वजन्मशताब्दिनिमित्त
नाट्य-विशेषांक

विशेष लेख,
आकर्षक चित्रे,
आणि
इतर वाचनीय मजकूर....



YUGAVANI / REGD No. NGP. 275 युगवाणी जाने. / फेब्रु. / मार्च १९८७ / मूल्य ६ रु.
MH-1174

सस्नेह नमस्कार

विदर्भातील लेखकांच्या वाङ्मयकृतींना पारितोषिके देण्याची एक योजना विदर्भ साहित्य संघाने उराशी बाळगली आहे. कार्यकारिणीच्या गेल्या बैठकीत तीवर विचारही झाला. त्यावेळी असे ठरले की, कै. डॉ. मिराशी, भाऊसाहेब माडखोलकर, पु. भा. भावे आणि शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या नावाने क्रमाने समीक्षा व संशोधन, कादंबरी, कथा आणि कविता या वाङ्मयप्रकारांसाठी ही पारितोषिके असावीत. ही पारितोषिके भरघोस असावीत व विदर्भातील लेखकांना ती सन्मानपूर्वक दिली जावीत, असाही विचार कार्यकारिणीत व्यक्त झाला.

वाङ्मयनिर्मितीसाठी पारितोषिके देण्याची ही योजना राबवायची तर त्यासाठी किमान ५० हजाराचा कायम स्वरूपाचा ठेव-निधी लागेल. आनंदाची बाब अशी की, या ठेव-निधीसाठी कार्यकारिणीतील सदस्यांनी प्रत्यकी ५०० रु. देण्याचे स्वयंस्फूर्तीने ठरवले आहे. प्रा. सुरेश द्वादशीवार व प्रा. मदन धनकर यांनी तर प्रत्येकी १००० रु. या निधीसाठी जमाही केले आहेत. सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर व वामन तेलंग यांनीही आपापला वाटा जमा केला आहे. निधीचे लक्ष्य पूर्ण करणे तसे कठीण नाही; मात्र आपल्यासारख्या ह्या क्षेत्राशी निगडित असलेल्या, मित्रमंडळींचे सहकार्य त्यासाठी मिळावयास हवे. निधीसाठी बर्डीवरील बँक ऑफ इंडियाच्या शाखेत एक स्वतंत्र खातेही (खाते क्रमांक ६०७३) उघडले आहे.

साहित्य संघाच्या एका चांगल्या योजनेला आपल्या सर्वांच्या सक्रीय सहकार्याने वेग येईल असा व्यक्तिशः मला विश्वास आहे. आपल्या उदार प्रतिसादाच्या अपेक्षेत.

आपला,

राम शेवाळकर

अध्यक्ष, वि. सा. संघ

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-४४० ०१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर-४४० ०१२
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर वैद्य, मधुकर आर्टस, धनतोली, नागपूर-४४० ०१२